

MAHARASHTRA MANDAL
CHICAGO
कार्तिक शके १९४६
नोव्हेंबर २०२४
रचना

# महाराष्ट्र मंडळ शिकागो

Maharashtra Mandal Chicago Inc.
(Year of Establishment: 1969)
The first Maharashtra Mandal in United States of America, serving the community as non-profit organization
Website:
https://www.mahamandalchicago.org
Email Address for correspondence:
president@mahamandalchicago.org
karyakarini@mahamandalchicago.org

मुखपृष्ठ: वेदश्री नाईक
मुद्रित शोधन: शिल्पा देशपांडे,
दिप्ती जानोरकर, निष्का पाटील
मांडणी आणि संकलन: नेहा चितळे
संपादन: श्रद्धा भट

Coverage and Art: Vedashree Naik
Proofreading : Shilpa Deshpande,
Deepti Janorkar,Nishka Patil
Compiling: Neha Chitale
Editor : Shraddha Bhat


महाराष्ट्र मंडळ शिकागो (MMC) बद्दल काही उल्लेखनीय नोंदी:
It is the first Maharashtra Mandal in the United States of America, serving local community as a non-profit organization, since 1969. It is the proud founder of (BMM) Bruhan Maharashtra Mandal, North America (http://www.bmmonline.org)
It is also initiator of BMM Newsletter – BMM Vrutta (https://bmmonline.org/vrutta-archive)

साहित्य / मजकूर पाठविण्यासाठी संपर्क: rachana@mahamandalchicago.org
साहित्य / मजकूर पाठविण्यासाठी सूचना:

- आपले साहित्य मराठी किवा इंग्रजी भाषेत असावे.
- साहित्य लिहिताना मराठी फॉन्ट (उदा. मंगल - Mangal) आणि आकार १० असावा.
- लिखाणात क्रमांक वापरल्यास ते मराठीत लिहावेत (उदा. १..२५ इ.)
- अखेरीस आपले संपूर्ण नाव नमूद करावे.
- आपले साहित्य 'मायक्रोसॉफ्ट वर्ड' किंवा 'गूगल डॉक' मध्ये लिहून पाठवावे.
- साहित्य वरील ईमेल वरतीच पाठवावे.
- ईमेल पाठवताना साहित्य अटॅचमेंट स्वरूपात पाठवणे.
- सोबत आपला फोटो पाठवावा.

## MMC Trustees


रामदास थत्ते


धनंजय काळे


उल्का नगरकर


राहुल थत्ते


जयदीप बुझरुक

## MMC Investment Advisors


सुहास गोसावी



पराग जोशी


योगेश गायकर

## BMM Trustee


नितीन जोशी

## Registered MMC Agent


पंकज अकोलकर

## MMC's शिकागो विद्या मंदिर

Coordinator



वैदेही देशपांडे

Advisor

लक्ष्मीनारायण महिसेकर

Treasurer



अमोल पाळेकर

Naperville PoC



अभिषेक सोहनी

Schaumburg PoC



सुवर्णा गणपुले

Buffalo Grove PoC



दिप्ती मिश्रीकोटकर

## रचना टीम

**शिल्पा देशपांडे**




मुद्रित शोधन (मराठी)
Proof-reading(Marathi)

**दीप्ती जानोरकर**



मुद्रित शोधन (इंग्रजी)
Proof-reading(English)

**निष्का पाटील**



मुद्रित शोधन (इंग्रजी)
Proof-reading(English)

**वेदश्री नाईक**



मुखपृष्ठ आणि कला
(Cover Page & Design)

**नेहा चितळे**



संकलन
(Compilation)

**श्रद्धा भट**



संपादक
(Editor)

## Volunteer List

Chaitanya Agashe
Radhika Vaidya
Prakash Anturkar
Minal Aroskar
Manisha Athalye
Mihira Bandekar
Rasika Bandekar
Chitra Bapat
Mandar Bapat
Vaishali Belsare
Pallavi Betsur
Sameer Betsur
Shraddha Bhat
Namrata Bhuleskar
Ananya Bhuskute
Samaira Bongale
Sameer Bongale
Sara Bongale
Sneha Chaphalkar
Aniruddha Damle
Urmila Damle
Rekha Deodhar
Dipti Desai
Neha Chitale
Ketki Deshpande
Sachin Deshpande
Shilpa Deshpande
Sonali Deshpande
Vaidehi Deshpande
Chinmay Dhawale
Pranjali Doshi
Pooja Gadre
Yogesh Gaikar
Rohan Gandhi
Madhav Gogawale
Suhas Gosavi
Rajesh Hatkar
Shweta Hattalli
Minakshi Hedaoo
Urvi Hirve
Deepti Janorkar
Mandar Joglekar
Pradnya Joglekar
Manoj Joshi
Shridhar Joshi
Dhananjay Kale
Trupti Kale
Sheetal Kalokhe
Deepa Kamat
Narsimha Kamat
Ruchira Karandikar
Anaysha Kaulgekar
Aparna Khaladkar
Sameer Khalakar
Ameya khare
Prasad Khare
Shreya Khare
Arati Khot
Santosh Kukian
Swati Kukian

Gauri Kulkani
Amit Kulkarni
Kavita Kulkarni
Shweta Kulkarni
Sujit Kulkarni
Vaidehi Kulkarni
Diya Kumar
Samanvi Kumbhar
Ashwini Kunte
Gunjan Laad
Suchita Labade
Vishnu Mahadik
Anagha Manjrekar
Subhash Mantri
Puja Marathe Joshi
Amruta Mate
Abhijit Mhaske
Ashwini Mhaske
Rupali Morey
Archana Munge
Ulka Nagarkar
Anagha Naik

Sanika Naik
Vedashree Naik
Gauri Navalkar
Vaishnavi Navalkar
Vishal Navalkar
Manjusha Pande
Mandar Pandit
Manisha Pandit
Soumil Pandit
Ketan Parekh
Priyanka Parekh
Brijesh Patil
Kabhori Patil
Mayur Patil
Milind Patil
Nishka Patil
Pallavi Patil
Dipti Patkhedkar
Mandar Pitre
Tanuja Potdar
Aditit Puntambekar
Ketan Railker

Vaishali Raje
Yogendra Rao
Chetan Rege
Shree Rege
Amit Rogye
Shilpa Sant
Vinayak Sant
Aniket Sawant
Brijen Sawant
Sameer Sawant
Shalaka Sawant
Chitra Shirke
Amol Shripal
Komal Swadas
Vaidehi Talegaokar
Tanishq Taware
Manasi Thatte
Rahul Thatte
Pranil Vaidya
Chandra Vedak
Nameeta Vedak
Yogi Washikar

## अनुक्रमणिका

### कविता: 

-----------------------------------------------------------------------------------------------


| | |
|---|---|
| दीपोत्सव | तृप्ती सरदेसाई / 18 |
| शुभ दिपावली | शैलजा लोखंडे गोरडे / 19 |
| देवी स्तवन | नीला जोशी / 20 |
| दिवाळीसाठी सज्ज | शैलजा लोखंडे गोरडे / 21 |
| या जगी आलो असा मी | कै.प्रा दि.वि जोशी / 36 |
| माझं वय | आसावरी काकडे / 37 |
| बंध | चंचल काळे / 39 |
| ल्याले रुप नाही बाणा | दीपा मिट्टीमनी / 40 |
| पोटघर | प्रशांत पनवेलकर / 41 |
| सीताफळ | समरेंद्र निंबाळकर / 42 |
| शरणागत | प्रशांत पनवेलकर / 43 |
| नको पावसा तू | अजय अंबादास देशपांडे / 44 |
| काळ | अजय अंबादास देशपांडे / 54 |
| कृष्णवेणू | प्रिया कालिका बापट / 68 |
| सुखशांती स्थान | तृप्ती सरदेसाई / 69 |
| निरोप | चंचल काळे / 70 |
| नकोच आता | दीपा मिट्टीमनी / 71 |
| पुस्तकं | श्रद्धा भट / 72 |
| मी कवयित्री | स्वप्नाली देशपांडे / 122 |
| आशय तोच आविष्कार भिन्न | सुरेखा काळवीट / 123 |
| तू असताना | शुभदा पालखे / 125 |
| एक प्रवास | राजीव गोखले / 152 |
| घडा वहात असतांना | डॉ. राजेंद्र लीला-धन मुंढे / 153 |
| दिवाळी गरीबाची | दीपक वाकडे / 154 |

| | |
|---|---|
| आई | अनघा भट / 155 |
| बांध पापण्यांचे | दीपक वाकडे / 156 |
| पिंकीची भाऊबीज | संजीवनी कुलकर्णी / 159 |
| मला वाचवा | अनघा भट / 160 |
| दीन | कै. सौ. मिनाक्षी भांबुरे पाटील / 161 |
| फक्त क्षितिजापर्यंत.. | स्वप्नाली देशपांडे/ 163 |


**कथा:**


| | |
|---|---|
| दहा वर्षांनंतर.. | मेघना साने / 61 |
| मनी वसे ते स्वप्न दिसे | प्रतिभा जोशी / 110 |
| फू...... फू..... फू.....! | वंदना धर्माधिकारी / 118 |
| वारी | प्राजक्ता पाडगावकर / 126 |


**लेख:**


| | |
|---|---|
| अध्यक्षीय | समीर बोंगाळे / 12 |
| संपादकीय | श्रद्धा भट / 14 |
| शैलपुत्री | प्रिया गोडबोले / 22 |
| शारदीय नवरात्र | मिनाक्षी हेडाऊ / 25 |
| रंगी रंगली मराठी | डॉ.सुप्रिया सहस्त्रबुद्धे / 28 |
| डॉ. तारा भवाळकर | प्रशांत गौतम / 32 |
| 'वाटेवरती काटे गं'... एक प्रवास | मीना नाईक / 45 |
| आठवणींचा सर्वा... | डॉ.पल्लवी परुळेकर-बनसोडे / 49 |
| जलदिव्य | वैशाली कुलकर्णी / 55 |
| भेटवस्तू | रेखा देवधर / 74 |
| सत्य -शिव -सुंदर | शुभदा पालखे / 77 |
| परिचित युद्धातील एक अपरिचित योद्धा | समीर जिरांकलगीकर / 79 |

| | |
|---|---|
| संवाद | दीपा मिट्टीमनी / 108 |
| झगमगाट | संजीवनी कुलकर्णी / 109 |
| माझी टोकियोवारी | क्षितिज जोशी / 97 |
| Gold Rush | राजीव गोखले / 102 |
| वरुडचे अतिप्राचीन राम मंदिर | अजय देशपांडे / 104 |
| अहंकार | हेमंत साने / 133 |
| नदीष्ट : वाहून नेणारी धार आणि तारणारा काठ | समरेंद्र निंबाळकर / 136 |
| पाईनटॉप - एक सहल | मनोहर देवकर / 149 |
| Music And Its Impact on Life | अनुराधा कुलकर्णी / 157 |
| लावणी- भुरळ घाली मना | नागेश शेवाळकर / 165 |
| आणिक स्मृती ठेवूनी जाती | चंद्रशेखर ठाकूर / 172 |
| कॅलेंडर | अलका धाराशिवकर / 174 |
| दिवाळी सोहळा २०२४ : तेजोमय नादब्रह्म हे! | शिल्पा देशपांडे / 176 |
| दिवाळी कार्यक्रम २०२४- आढावा | मिनाक्षी हेडाऊ / 178 |
| Diwali 2024 - MMC | मनिषा पंडित गजेंद्रगडकर / 182 |

## सफर देशोदेशीची :

| | |
|---|---|
| दक्षिण कोरिया | माधव एम जोशी / 83 |

## तन मनाचा भोवरा:

| | |
|---|---|
| पोस्ट पार्टम डीप्रेशन | रश्मी वडवळकर / 139 |

## नाट्यवेध:

पुन: एकदा 'वस्त्रहरण' — अरूण घाडीगावकर / 143
द अनटोल्ड स्टोरी ऑफ नथुराम गोडसे - आढावा — राजीव गोखले / 147

शब्दकोडे — अभिजित रायरीकर / 185
शब्दकोडे उत्तर — अभिजित रायरीकर / 190

**खवय्येगिरी:**

टोमॅटोची चटणी — रत्नांगी निलेश मालपेकर / 187
दही पालक — अलका धाराशिवकर / 188
खमंग कुरकुरीत मिरची — मिनाक्षी हेडाऊ / 189

**रंगवेध:**

गौरी मोहिते / 59-60
सोनल आगाशे - Anderson Japanese Garden / 75
दीपा मिट्टीमनी / 162
अर्चना मुंगे / 181

विविध कार्यक्रमाची परिपत्रके (Flyers) / 191-193

# अध्यक्षीय

प्रिय मंडळ सदस्य आणि सहकारी बंधू भगिनींनो,
सस्नेह नमस्कार!

दिवाळीच्या मंगलमयी सणानिमित्त आपल्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या २०२४ च्या अंतिम रचना अंकासाठी आपल्याशी संवाद साधताना मन आनंदाने भरून येते आहे. हे वर्ष मंडळासाठी अत्यंत यशस्वी, उत्सवमय आणि प्रगतीशील ठरले आहे.

२०२४ - एक गौरवशाली प्रवास
सन २०२४ मध्ये मंडळाने आपल्या कार्यकाळात अनेक उल्लेखनीय उपक्रम राबवले, ज्यामुळे मंडळाचे सांस्कृतिक, सामाजिक, आणि शैक्षणिक योगदान अधोरेखित झाले.
संक्रांत उत्सवाने या वर्षाचा प्रारंभ झाला. यात स्थानिक कलाकारांनी आपले कौशल्य सादर केले, तर श्रेयस बेडेकर आणि रूपाली मेहेंदळे यांचा 'द म्युझिकल कॅफे' हा कार्यक्रम प्रेक्षकांना भावला.

गुढीपाडव्यानिमित्त कार्यक्रम सत्यनारायण पूजा, बालकलाकारांनी सादर केलेली 'My Marathi' या नाटुकली आणि स्थानिक व युवा कलाकारांच्या सहभागाने विशेष रंगतदार झाला. सर्वांनी पुरणपोळी व सुग्रास भोजनाचा आनंद घेतला. कार्यक्रमाचे आकर्षण असलेल्या 'सौजन्याची ऐशीतैशी' या विनोदी नाटकाने सभागृहात हास्याचे फवारे उडवले.

गणेशोत्सवात, मंडळाने भव्य व पारंपरिकरीत्या बाप्पांचे स्वागत करून भक्तीरसपूर्ण वातावरण निर्माण केले. मंडळाने यावेळी सामूहिक आरती, स्थानिक कलाकारांची सादरीकरणे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी सादर केली. हा उत्सव मंडळाच्या ऐक्याचे आणि आपुलकीचे प्रतीक ठरला. सन २०२४ हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे ३५० वे वर्ष असल्याने छत्रपती शिवाजी महाराजरुपी गणेश मूर्तीची स्थापना करण्यात आली होती. तसेच सजावटीस देखील राज्याभिषेक सोहळ्याचे स्वरूप देण्यात आले होते. या उत्सवा दरम्यान विद्यार्थ्यांचे नृत्य सादरीकरण, गप्पाष्टकार माननीय डॉ. संजय उपाध्ये यांचे 'जिंकलो ऐसे म्हणा' या विषयावरती प्रवचन आयोजित करण्यात आले होते.

मंगळागौर कार्यक्रमात, महिलांनी उत्साहाने सहभागी होऊन पारंपरिक मराठमोळ्या संस्कृतीचा अनुभव घेतला गेला. याशिवाय, मंडळाच्या 5K रन/वॉक उपक्रमाने आरोग्यविषयक बांधिलकीही अधोरेखित केली.

या वर्षी मंडळाने Community Outreach या थीमखाली सामाजिक उपक्रमांवर विशेष भर दिला. 'Feed My Starving Children' उपक्रमामध्ये मंडळाच्या सदस्यांनी गरजूंसाठी अन्नधान्य पॅकिंगसाठी योगदान दिले. याशिवाय, योग दिनानिमित्त उत्सवात 'योग साधने' च्या कार्यक्रमांमधून उत्तम आरोग्य राखण्यामाठी प्रोत्साहन दिले गेले.

मंडळाने यावर्षी इतिहास मंचातर्फे in-person व्याख्यान आयोजित करून चर्चासत्रांना वेगळी दिशा दिली. प्रसिद्ध अभ्यासक झंकार गडकरींनी 'Co-Exist: The Only Solution' या विषयावर सखोल विचार मांडले. यंदा मंडळाने पदवीधर आणि शालांत परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमात पद्मश्री एस.व्ही. रामाराव आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम नवीन पिढीला प्रेरणा देणारा ठरला.

तसेच, मंडळाने स्थानिक मराठी भाषिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. 'What India gave to the world cuisine' या विषयावरच्या सादरीकरणाने भारताच्या समृद्ध खाद्यसंस्कृतीला अधोरेखित केले गेले. भ्रमणगाथातर्फे आयोजित सहलींतून सभासदांना शिकागोतील ऐतिहासिक स्थळांना भेटी देण्याची अनोखी संधी मिळाली.
२०२४ हे वर्ष पारदर्शकता, परवडणारे उपक्रम, आणि समावेशकता यांसारख्या मूल्यांवर आधारित होते. तुम्हा सर्वांच्या सहकार्याने २०२४ आपण यशस्वीरीत्या पार पाडले.
मंडळासाठी नवे वर्ष अजून भरभराटीचे जावो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. आपणा सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा! आपण एकमेकांशी स्नेहभाव आणि आपुलकी टिकवून आपली मराठी संस्कृती वृद्धिंगत करूया!
धन्यवाद!

**समीर बोंगाळे**
अध्यक्ष, महाराष्ट्र मंडळ शिकागो **२०२४**



## संपादकीय

नमस्कार प्रिय वाचकहो,

तुम्हा सर्वांची दिवाळी उत्साहात, आनंदात साजरी झाली असेलच. हेच सणाचं, उत्साहाचं वातावरण शिकागोमध्ये अगदी  ख्रिसमसपर्यंत रेंगाळेल. दिवाळीतली आपल्या घरातली सजावट, रोषणाई जणू ख्रिसमसपर्यंत इतरत्र प्रतिबिंबित होऊन  झगमगत राहिल. शुष्क होत चाललेल्या निसर्गाचा आणि थंडीच्या कडाक्याचा विसर पडायला लावणाऱ्या अशा उत्साही वातावरणात हा दिवाळी विशेषांक प्रकाशित करताना मला आनंद होत आहे.

या अंकाला अतिशय सुंदर आणि कलात्मक मुखपृष्ठ लाभले आहे. नरकासुराचा वध करणाऱ्या सत्यभामा आणि कृष्णाची प्रतिमा, प्रतिमात्मक अंधाराचा नाश करून दिव्यत्त्वाचा प्रकाश उजळणाऱ्या या चित्राने वेदश्री नाईकने कलात्मकरीत्या तिची कल्पना साकार केली आहे.

नेहेमीप्रमाणेच यावेळीसुद्धा अतिशय सुंदर आणि भावपूर्ण कविता आल्या आहेत. अंकाची सुरुवात शैलजा गोरडे, तृप्ती सरदेसाई यांच्या दिवाळीवर आधारित कवितांनी झाली आहे. दीपक वाकडेंनी दिवाळीची वेगळी बाजू त्यांच्या कवितेतून मांडली आहे. प्रतिभावान लेखक, नाटककार, कवी कै. प्रा. दि. वि. जोशी यांची 'या जगी आलो असा मी' ही गजल मनाला भिडते तर प्रसिद्ध कवयित्री आसावरी काकडे यांची 'माझं वय' ही कविता अंतर्मुख करते. समरेंद्र निंबाळकर यांच्या 'सीताफळ' कवितेतली आजी आपल्याही डोळ्याच्या कडा पाणावून जाते. प्रशांत पनवेलकर यांच्या दोन्ही कवितांमधल्या विलक्षण प्रतिमा अस्वस्थता अधिक गडद करतात. दीपा मिट्टीमनी यांची 'ल्याले रूप नाही बाणा' ही कविता जात्यावरच्या ओव्यांची आठवण करून देते. प्रिया कालिका बापट यांची 'कृष्णवेणू' ही कविता तर कवयित्रीतल्या राधेचीच मनोगाथा आहे. चंचल काळे यांच्या वृत्तबद्ध कविता आशयघन आहेत. सुरेखा काळवीट यांनी  काही वर्षांपूर्वी सुचलेली मुक्तछंद कविता रचली होती. पुन्हा तोच विषय घेऊन त्यांना लयबद्ध रचना करावीशी वाटली. 'आशय तोच आविष्कार भिन्न' यातल्या दोन्ही कविता सुंदर आहेत. स्वप्नाली देशपांडे यांची 'फक्त क्षितिजापर्यंत' ही कविता भावगर्भ आहे. संजीवनी कुलकर्णी यांची 'पिंकीची भाऊबीज' ही बालकविता गंमत आणते. अजय देशपांडे यांच्या गजला, राजेंद्र मुंढेंची कविता जीवनावर, निसर्गावर भाष्य करतात, नीला जोशी, राजीव गोखले, शुभदा पालखे, अनघा भट यांच्या कवितांतून वेगवेगळ्या मनोरम भावछटा उलगडल्या आहेत.

एखादा अनुभव, जाणवलेला विचार, संकल्पना शब्दात मांडून आपल्या दृष्टीकोनाचा सुंदर कवडसा  लेखांतून आपल्यापर्यंत कित्येक लेखकांनी पोहोचवला आहे. यावेळीसुद्धा लेखांच्या विषयांमध्ये खूप वैविध्य आहे. नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला या निमित्ताने मराठी भाषेची रंगत सांगणारा सुंदर लेख 'रंगी रंगली मराठी' लिहिला आहे व्यासंगी लेखिका डॉ.सुप्रिया सहस्रबुद्धे यांनी.

नवी दिल्ली येथे फेब्रुवारी २०२५ मध्ये ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा नुकताच मिळाला आहे. त्या पार्श्वभूमीवर हे संमेलन महत्वाचे ठरणार आहे. या तब्बल ७० वर्षांनी भरणाऱ्या या संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसंस्कृती, लोकसाहित्याच्या गाढ्या अभ्यासक डॉ. ताराबाई भवाळकर यांची नुकतीच निवड करण्यात आली. त्यांच्या कारकीर्दीवर प्रशांत गौतम यांनी अभ्यासपूर्ण लेख लिहिला आहे.

मीना नाईक प्रसिद्ध अभिनेत्री म्हणून सर्वांना माहित आहेत. त्यांनी कळसूत्री बाहुल्यांचा वापर करून बाल लैंगिक शोषणाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी खूप मोठे कार्य केले आहे. त्यांनी लिहिलेल्या 'वाटेवरती काचा गं' व 'अभया' या नाटकांबद्दल, त्यामागच्या प्रेरणेबाबत आणि प्रयोगादरम्यानच्या त्यांच्या अनुभवाबद्दल त्यांनी लिहिले आहे.

समरेंद्र निंबाळकर 'नदिष्ट' या पुस्तकाचे परिक्षण लिहितांना लेखकाच्या, त्यांना भेटलेल्या माणसांच्या अनुभवांशी समरस झाले आहेत. हे पुस्तक वाचतांना त्यांना सुचलेल्या काव्यपंक्ती हृद्य वाटतात.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात कित्येक अनामी वीर लढले. भारताबाहेर राहून, सैन्य गोळा करून लढणाऱ्या डॉ. खानखोजे यांची शौर्यगाथा आपल्यापर्यंत समीर जिरांकलगीकर यांनी पोहोचवली आहे 'परिचित युद्धातील अपरिचित योद्धा या लेखातून.

प्रिया गोडबोले यांच्या 'शैलपुत्री'' या लेखातला देवीशी संवाद आणि त्यातली कविता मनाला भावते. दीपा मिट्टीमनीचं 'संवाद' हे स्फुट अतिशय हृद्य झालं आहे. शुभदा पालखे यांचा 'सत्य-शिव-सुंदर' हा निसर्ग कसा विविध नात्यांचे रूप घेऊन लळा लावतो याचे सुंदर निरीक्षण आहे. पल्लवी परुळेकर यांचा बालपणीच्या आठवणीतली, समरसून जगलेल्या अनुभवांची, तेंव्हाच्या मायेच्या माणसांची श्रीमंती वर्णन करणारा 'आठवणींचा सर्वा' हा लेख सुंदर झाला आहे. चंद्रशेखर ठाकूर यांनी केलेले व्यक्तिचित्रण अतिशय परिणामकारक झाले आहे. हेमंत सानेंचा अहंकाराच्या दोन बाजू मांडणारा लेख आणि रेखा देवधर यांचा 'भेटवस्तू' हा लेख नक्कीच विचार करायला लावतो. रसिकांच्या मनावर राज्य करणारी लावणी भक्तिरस, वीररसात सुद्धा असते हे उदाहरणं देऊन आपल्या अभ्यापूर्ण लेखात स्पष्ट केलं आहे नागेश शेवाळकर यांनी. संजीवनी कुलकर्णी यांचा लेख सुंदर झाला आहे. मीनाक्षी हेडाऊ यांचा 'शारदीय नवरात्र' हा आपली संस्कृती सांगणारा आहे.

तुकारामांच्या गाथा गंगेने तारल्या असं म्हणतात. त्या घटनेची कथा किंवा गाथा वैशाली कुलकर्णी यांनी अतिशय सुरसपणे वर्णन केली आहे. अनुराधा कुलकर्णी यांचा संगीतावरचा 'Music And Its Impact On Life' हा लेख सुंदर आणि माहितीपूर्ण आहे.

'सफर देशोदेशीची' या सदराअंतर्गत श्री.माधव मनोहर जोशी यांनी लिहिलेली लेखमाला प्रकाशित झाली. आत्तापर्यंत इंडोनेशिया, थायलंड आणि व्हिएतनाम या ३ देशांवर असलेल्या भारतीय संस्कृतीच्या प्रभावाबद्दल त्यांनी लिहिलं होतं,

या अंकात लेखमालेतील 'साऊथ कोरिया' हा चौथा आणि शेवटचा लेख प्रकाशित होत आहे.
डॉ. क्षितिज जोशी यांचा 'माझी टोकियोवारी' हा लेख, राजीव गोखले यांचा 'लेक टाहो' वरचा 'Gold Rush' हा लेख आणि मनोहर देवकर यांचा 'पाईनटॉप - एक सहल' हे प्रवासवर्णनपर लेख अत्यंत वाचनीय आहेत.
प्रसिध्द लेखक पटकथाकार अजय देशपांडे यांनी वरुड येथे असलेल्या राममंदिर व त्यासंदर्भातला सविस्तर इतिहास सांगणारा माहितीपूर्ण लेख लिहिला आहे.
नाटक पाहणे हा मराठी संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. कितीतरी जाणकार नाट्यरसिक नाटक जाणीवपूर्वक पाहतात. श्री. अरूण घाडीगावकर कित्येक वर्षांपासून वृत्तपत्रांतून नाटकांवर परीक्षणे लिहित आले आहेत. त्यांचे विविध नाटकांवर लिहिलेल्या परीक्षणांचे संकलन असलेले पुस्तक सुद्धा प्रकाशित झालेले आहे. या अंकासाठी त्यांनी नवीन संचाने सादर केलेल्या 'संगीत वस्त्रहरण' या मनमुराद हसवणा-या नाटकाबद्दल लिहिले आहे. त्यांनी नाटकाच्या सर्व बाजूंचा केलेला विचार आणि त्याचा घेतलेला आस्वाद परीक्षणातून जाणवतो.
राजीव गोखले यांनी पाहिलेल्या 'द अन्टोल्ड स्टोरी ऑफ नथुराम गोडसे' या नाटकाचा उत्तम आढावा लिहिला आहे.
महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या दिवाळी कार्यक्रमावर, त्यावेळी रंगलेल्या संगीत मैफिलीवर आणि कार्यक्रमासाठी केलेल्य कलात्मक सजावटीवर शिल्पा देशपांडे, मिनाक्षी हेडाऊ आणि मनीषा पंडित यांनी सविस्तर लेख लिहिले आहेत.
कथा हे असं माध्यम आहे जिथे आपण एखाद्या आपल्याहून वेगळ्या व्यक्तिमत्त्वाच्या, विचारांच्या व्यक्तींच्या जीवनात, भावविश्वात डोकावून बघू शकतो, त्यांचे अनुभव समजून घेऊ शकतो. एकप्रकारे केलेला हा परकाया प्रवेशच म्हणा ना. या अंकातल्या कथा नक्कीच तुम्हाला असा अनुभव देतील. मेघना साने यांची 'दहा वर्षांनंतर..' ही कथा सुरस व वाचनीय आहे. प्रतिभा जोशींनी 'मनी वसे ते स्वप्नी दिसे' या कथेतील गूढ रहस्याची पटेल अशा पद्धतीने उकल केली आहे. वंदना धर्माधिकारी यांनी त्यांच्या कथेत चार वर्षांच्या मुलाचे भावविश्व उलगडून दाखवले आहे. प्राजक्ता पाडगावकर यांच्या वारी या कथेची नायिका विठ्ठलाचा आणि नकळत स्वतःचाच शोध घ्यायला निघाली आहे. काळजी, संकटं, अस्वस्थता, मीपण याची आवरणं एक एक गळत जात शेवटी तिची स्वतःशी आणि विठ्ठलाशी झालेली प्रतिमात्मक भेट लेखिकेने अप्रतिमरित्या रंगवली आहे.
यावर्षी सुरू झालेल्या 'तनामनाचा भोवरा' या मानसिक विचारांबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने लिहिलेल्या कथामालेअंतर्गत रश्मी वडवळकर यांनी 'पोस्ट पार्टम डिप्रेशन' ही वाचनीय कथा लिहिली आहे.
यावर्षीच्या प्रत्येक अंकात आणि या अंकातही शब्दकोड्याचे संकलन अभिजित रायरीकर यांनी केले आहे. दिपा मिट्टिमनी आणि गौरी मोहितेची सुंदर पेंटींग्स, अर्चना मुंगे यांनी गिफ्ट बॅग्सवर काढलेली कलात्मक चित्रं आणि सोनल आगाशे यांनी काढलेली Anderson Japanese Garden ची निसर्गरम्य छायाचित्रे या अंकात तुम्हाला

पाहायला मिळतील. रत्नांगी मालपेकर, अलका धाराशिवकर  मीनाक्षी हेडाऊ यांनी पाठवलेल्या रुचकर पाककृतींनी या अंकाची रंगत नक्कीच वाढली आहे.

नुकताच आपण Thanksgiving साजरा केला. कृतज्ञता ही खरच खूप सुंदर भावना आहे! गेली दोन वर्ष मी 'रचना' साठी जीव ओतून काम केलं. मागील वर्षी प्रूफरिडर अणि संकलक म्हणून आणि या वर्षी संपादक म्हणून. या निमित्ताने मला कित्येक प्रतिभावान, संवेदनक्षम आणि कल्पक लेखक-लेखिका, कवी- कवयित्री आणि कला क्षेत्रातल्या व्यक्तींशी संवाद साधण्याची संधी मिळाली. त्या निमित्ताने मलाही नवनवा दृष्टिकोन मिळत गेला, कलाविषयक जाणीवा समृद्ध होत गेल्या. संवेदनक्षम व कामसू टीमबरोबर काम करायची संधी मिळाली. यासाठी मी 'रचना'ची, महाराष्ट्र मंडळ शिकागोची आणि माझ्या टीमची सदैव ऋणी राहीन. कलात्मकदृष्ट्या हातून काहितरी वेगळं, चांगलं घडलं याचं मला समाधान आहे. आता मी काही काळ ब्रेक जरी घेणार असले तरी पुढच्या वर्षीच्या टीमला माझ्या मनापासून शुभेच्छा आणि पाठिंबा असेल!!

महाराष्ट्र मंडळ शिकागोचे २०२४ चे अध्यक्ष श्री. समीर बोंगाळे यांचे, त्यांनी मला ही संधी यावर्षी दिल्याबद्दल मी आभार मानते. याबरोबरच सतत कार्यरत असलेली आणि मनापासून कष्ट घेणारी माझी टीम यांची मी आभारी आहे. संपूर्ण वर्षभर वेदश्री नाईकने सुंदर मुखपृष्ठ, मलपृष्ठ आणि कला सांभाळली. शिल्पा देशपांडेने मराठी प्रूफ रीडिंग आणि दीप्ती जानोरकर आणि निष्का पाटील यांनी इंग्रजी प्रूफ रीडिंग केले. दिप्ती जानोरकरने आवश्यक तेथे मराठी टंकलेखन केले.नेहा चितळेने या अंकाची मांडणी आणि संकलन उत्तमरित्या केले. या सर्वांच्या सहकार्यामुळेच हे काम सहज शक्य झाले. ‘रचना’ दर्जेदार आणि सुंदर व्हावं यासाठी आम्ही, सगळ्या रचना टीमने मनापासून कष्ट घेतले आहेत. तरीही आमच्या अखत्यारीत असलेल्या, नसलेल्या बाबींमध्ये काही उणीवा राहून गेल्या असतील तर क्षमस्व. अजून एक गोष्ट मी नम्रपणे नमूद करू इच्छिते, की या अंकात आलेल्या सर्वच तपशिलांशी आणि व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक किंवा महाराष्ट्र मंडळ सहमत असेलच असे नाही.

वेगवेगळ्या साहित्याने नटलेला हा दिवाळी विशेषांक तुमच्या नक्कीच पसंतीस उतरेल अशी आशा आहे.

आपली नम्र,

**श्रद्धा भट**

**संपादक, रचना**



# दीपोत्सव

शुभ्र प्रकाश दीप मालिका
दीपोत्सव साकार
दूर व्हावा तम जीवनाचा
मिळो त्यास आकार

मांगल्याचे प्रतीक दीपक
वसुंधरा न्याहळे
ऋतू शरदाच्या प्रसन्नतेने
सृष्टी रूप आगळे



आधुनिक साजे उजळे पणती
तनामना मोहवी
मेणबत्तीचा गंध सुगंधी
सांज रंग खुलवी

ऊर्जा देई दीप संस्कृती
करी नैराश्या दूर
दिवाळीत आरास दिव्यांची
चैतन्याचा नूर

मन उजळावे ज्ञानदीपाने
ताणतणाव नकोत
दीपावली ही पर्वणी आम्हा
आनंदमळे फुलोत

परब्रह्मातील ज्योती तारका
आल्या धरतीवरी
दीप उत्सव होई साजरा
किमया जादूभरी

**सौ. तृप्ती सरदेसाई**



## शुभ दीपावली



इवल्याश्या पणतीने तेजाळला वाडा
दिवाळी पहाट दारी शिंपून सडा

थेंबे थेंबे जोडून जुळली रांगोळी
सूत्रबद्धतेची ती सांगते आरोळी
रंग संगतीत विजयांची कहाणी
आखून भोवती रेखा, गुंफल्या ग कडा

इवल्याश्या पणतीने तेजाळला वाडा


अंगणी वासुदेव घेऊन ऊभा झोळी
दाळ धान्यासंगे, वाढू त्याला पोळी
परतु नये कोणी याचक रिकामा
दानधर्माने भरे पुण्याचा गं घडा

इवल्याश्या पणतीने तेजाळला वाडा

विष्णूप्रिया तुळशी नांदे वृंदावनी
पाच प्रदक्षिणा जलार्पण करुनी
आरोग्य रक्षणार्थ धन्वंतरी जपूनी
गिरवू कृतीत सदा संस्काराचा धडा.

इवल्याश्या पणतीने तेजाळला वाडा


**शैलजा लोखंडे गोरडे**
**(वरूड)**



# देवी स्तवन

नमन करितो आम्ही शारदे चरणी
माता जगत् जननी नेई आम्हा उध्दरोनी. ॥ध्रु॥

तूच एक काली माता
नाम दुजे अष्टभूजा
माया अंबा दुर्गा माता
भवानी शिवानी॥१॥



नम्र होऊनिया वाचे
मागू तूज आशिर्वचे
सर्व साक्षी सर्वज्ञानी
तूच आम्हा ध्यानी मनीं ॥२॥

षड् रिपू त्यागीले
तव चरणी वाहीले
कवन ऐसे गाईले
रंगुनी भजनी ॥३॥

नीला जोशी



# दिवाळीसाठी सज्ज

खमंग सुगंध, मधुर चवीला
डब्या-डब्यात बंदिस्त करते
स्वयंपाकघराच्या रणभूमीत
ती, दिवाळी पराक्रम गाजवते

आकाशीच्या चंद्र-चांदण्या
अन् आकाशकंदील दारातले
अवाक् झाले बघून दोघे
प्रकाश धगधगत्या चुल्हयातले



चक्रव्यूहात अडकली चकली
शरणागत घायाळ अनारसे
तोऱ्यात म्हणती सुतळीबॉम्ब
टणक तीळलाडू फुटतील कसे

करंजीताईच्या पोटात जुळे
शेवताईचे अवयव लुळे
भुरळ घालती कंदी पेढे
खमंगचिवडा झरझर पळे.....

विजयी सैन्य शंकरपाळी
बहुमान औक्षण स्वीकारती
सुगरण, शिस्तबद्ध गृहिणीस
खवय्ये श्रेय अर्पण करती

तूप-तेलाचे भंडार रिते
उष्मांक पाढे शर्करा गाते
आरोग्याला पोषक म्हणूनी
मीठ-भाकरी मराठे खाते.

**शैलजा लोखंडे गोरडे**
**(वरूड)**



# शैलपुत्री

पहाटेचा बाल नारायण अंगणात नुकताच खेळायला आला होता. फुलं पानं अजूनही झोपली होती. वारा सुद्धा हलके झोके घेत निद्रादेवीच्या स्वाधीन होता. काळ्या मातीच्या सुगंधाच्या आमिषाने मी अंगणात सडा घातला. स्वच्छ शुभ्र रांगोळीने देवीची दोन पावले उंबरठ्यावर काढली, तेवढ्यात, लगबगीने आलीच मागून शैलपुत्री!



अगदी तशीच, नेहमीसारखी, प्रसन्न. सुरेख असे श्वेत पातळ त्यावर नाजूक जरीचे काठ. हिरे, माणकं काही नाही.

मोगऱ्याच्या टम्म फुललेल्या फुलांच्या कुड्या, जाई-जुईची सर, तगरीचा मुकुट आणि रातराणीचे नाजूक बिलवर.

आता मोठ्ठी रांगोळी कुठे काढायची म्हणून दोन कमळाची फुलं तेवढी पटकन काढली.

पुढे येऊन तिचे स्वागत केले, पाय धुवायला पाणी घेतलं तर म्हणे "मीच दोन तांब्या घालून घेते" हसून मी तिला हळद कुंकू लावलं आणि आसनावर बसवलं.

मी आपली नेहमीसारखी तिच्या पायाजवळ बसून तिचे प्रसन्नचित्त न्याहाळत होते.

तर म्हणे, "अगं, माझ्या बरोबरीने बस, तू आणि मी काही वेगळ्या आहोत का?"

"तुझ्यात मी आणि माझ्यात तू" असं अगदी सहज म्हणून तिनेच दोन खुर्च्या आणल्या.

तिच्या आवडीच्या गरम गरम ओल्या खोबऱ्याच्या करंज्या आणि पांढऱ्या शुभ्र खोबऱ्याच्या वडीचा घास घेत तिने मलाही हात धरून खुर्चीवर बसवलं.

तिच्या बोलक्या डोळ्यात बघत मी हळूच विचारलं, "रागावली नाहीस ना माझ्यावर?"

"अगं तू येईपर्यंत हेच दोन पदार्थ जमले बघ करायला मला!

का, मागच्या वर्षी कवितेत मी तुझी तुलना रस्त्यावरच्या मुलीसोबत केली, म्हणून तू अशी साध्या वेशात आलीस?"

शिवाय उगा चिडल्याचा आव आणून मी म्हंटलं, “तुझं बरंय, तुझ्याकडे दासींची रेलचेल, शृंगारास एक, दालनात एक, मुदपाकखान्यात अनेक!” माझ्या बोलण्यातला खोटा तोरा ओळखून ती म्हणाली, ”अगं, त्यांच्यातही मीच आणि तुझ्या त्या रस्त्यावरच्या मुलीतही मीच! दर वर्षी तुझा हाच प्रश्न आणि माझं हेच उत्तर! जणू रतीबंच!”

हिमगौरी नुसतीच माझ्याकडे हसून बघत होती

कौतुकाने म्हणाली, “नाही गं, तुझ्यावर मी कशी चिडेन?

मी बघते ना तुझी रोजची धावपळ, प्रत्येक गोष्टीसाठी धडपड, काहीतरी करायची जिद्द,

तुझा प्रामाणिकपणा जो सतत तुला यशाचा मार्ग दाखवत असतो.

तुमचं ते appraisal का काय? मला कळत असतं हो सगळं!"

"शैलपुत्री, म्हणजे मी नुसतीच शिखरकन्या नाही काही!

तुझ्या विचारांनी, तुझ्या आचरणांनी जेव्हा तू तुझे अत्युच्य शिखर गाठतेस, ते माझे स्थान आहे. तिथेच मी तुला भेटते. पण माहीत आहे ना? सूर्याच्या तडाखाही मलाच सगळ्यात जास्त भासतो, आणि बर्फाच्छादित माझे शिखर सुद्धा सगळ्यात आधी विरघळायला लागतात."

मी आश्चर्यचकित होऊन तिच्याकडे बघत बसले. म्हणजे देवीलाही संघर्षातून जावं लागतं तर!

"तू पडलीस, खचलीस की मी येतंच असते तुला धरायला.

फक्त, तुला दिसताना तो हात कधी तुझ्या ज्ञाताचा असतो, कधी अज्ञाताचा".

"माझ्यातला तुझा विश्वास अढळ आहे, तुझ्यातल्या माझा ढळू देऊ नकोस बरं का"!

एव्हाना माझा बाल नारायण निसर्गाच्या खोड्या काढत बसला होता.

तेवढ्यात गौराईने वहाणा चढवल्या आणि निघाली की पुढच्या घरी!

माझा हिरमुसलेला चेहरा बघून म्हणाली, “अगं, माझ्यातल्या काहींना तो परमोच्च शिखर बिंदू गाठण्यास मदत करायची आहे अजून, निघावं लागेल”.

पुढच्या वर्षी पुन्हा पहिला मुक्काम तुझ्याच दारी! नेहमीसारखा!"

पुन्हा खुणावत म्हणाली, ”माझं कौतुक बस कर गं आता! पंधरा ई-मेल आल्यात. तिकडे लक्ष दे".

त्यातल्या एका ई-मेलमधे माझा हिमालयावर काढलेल्या एका छायाचित्राची, कंपनीच्या इंटर्नल न्यूज़लेटरमधे छापण्यासाठी निवड झाली होती.

मी लगबगीने खिडकीतून बघितलं, माझ्या पार्वतीचे कधीच दुसऱ्या घरी आगमन झाले होते.

पण, माझी ही ‘photo-entry submission’ची ई-मेल तर कालपर्यंत ‘draft’मधेच होती ना?

## पहिली माळ - शैलपुत्री

शैलपुत्री म्हणजे नावाप्रमाणे पर्वत कन्या किंवा शिखर कन्या तर आहेच पण, जेव्हा आपल्या मनाने आपण स्वतःच्या विचारांच्या, आचारांचा उच्च स्थानावर पोहोचतो, ती स्थिती.




रस्त्याच्या कडेला वस्तू विकणाऱ्या एका मुलीमधे मला दिसलेली शैलपुत्री.

*गुमान रस्ता, गुमन वाट, काहीच नव्हतं त्यात खास,*  
*तापलेली उन्हं, रापलेली कात, नजरेत मात्र एक विश्वास*  
*झोपडीवजा घरासमोर काहीबाही होती विकत*  
*दया येऊन, घेतला जिन्नस होती मात्र धडपडत*  
*बाजूच्या टपरीतून आणून दिला थोडा फराळ*  
*डोळ्यातली चमक तिच्या, माझ्या लहान असण्याचा साक्षात्कार*  
*सरळ येऊन पुढे तिने नमले माझे पाय*  
*देवच देऊन जातो अन्न म्हणे तिची माय*  
*धावत जाऊन लहानगी पुन्हा बसली उन्हात*  
*हात चालू लागेल तिचे भराभर कामात*  
*आज भेटली पहिली देवी, असेल बहुतेक शैलपुत्री*  
*तिच्या उर्जेच्या शिखरावर, नाही कुणी असेल दुसरी*

**प्रिया गोडबोले**  
**न्यू जर्सी**



# शारदीय नवरात्र

*सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके |*
*शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते ||*

आपल्या हिंदू संस्कृतीत शारदीय नवरात्र हा दुर्गा मातेच्या सन्मानार्थ साजरा केला जाणारा एक वार्षिक हिंदू सण आहे. नवरात्र म्हणजे नऊ रात्रींचा समूह असा शब्दशः अर्थ होत असून हा सण नऊ रात्री आणि दहा दिवस साजरा केला जातो.

हा सण नऊ दिवस आदिशक्तीची आराधना करण्याचा आहे. हिंदू दिनदर्शिकेनुसर अश्विन महिन्यातील शुक्ल पक्षात साजरा केला जातो. शरद ऋतूतील शारदीय नवरात्र. आश्विन शुद्ध प्रतिपदा ते अश्विन शुध्द नवमी पर्यंत देवीची उपासना केली जाते.

शारदीय नवरात्र हे शाक्त  पंथीय मानले जाते. शारदीय म्हणण्याचे कारण एकच की ते शरद ऋतूच्या प्रारंभी येते. ईश तत्व हे स्त्री रूपात अत्यंत मोहक आणि रम्य वाटतं.

ही देवी शुभफलदायीनी, भक्तवत्सला आहे. मातृ रुपिणी आहे. तिच्या सौंदर्याचे वर्णन करायला शब्द अपुरे आहेत. पण ही शस्त्रास्त्र धारण करणारी आहे. दुष्टांचे निर्दालन करणारी आहे. शक्तीची पूजा अनादी काळापासून चालत आली आहे.

अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून होणाऱ्या नवरात्र काळात शरद ऋतू असल्याने हया नवरात्रास शारदीय नवरात्र असे म्हणतात. नवरात्र हा अत्यंत महत्त्वाचा कुळधर्म असून तो सगळ्यांकडे कटाक्षाने पाळला जातो.

धार्मिक मान्यतेनुसार या नऊ दिवसात दुर्गा देवी पृथ्वीवर येते आणि पृथ्वीला तिचे माहेर म्हटले जाते. देवीची १. शैलपुत्री २. ब्रह्मचारिणी ३. चंद्रघंटा ४. कुष्मांडी ५. स्कंदमाता ६. कात्यायनी ७. कालरात्री ८. महागौरी ९. सिद्धीदात्री अशी नऊ रूपे आहेत.

नवरात्रीच्या काळात उपवास केले जातात. काही जण नऊ दिवस उपवास करतात. तसेच काही जण एक वेळ खाऊन राहतात. अनेक जण विशिष्ठ दिवशी उपवास करतात. हे उपवास करण्यामागचे कारण असे, की आपण घटस्थापनेला घटाची स्थापना करतो. हा घट म्हणजे देहाचं प्रतीक आहे. आपल्या देहाला दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या,एक मुख अशी नऊ द्वार आहेत. आणि ही नऊ द्वार मजबूत करायची तर त्यासाठी या देह नामक घटाला थोडी विश्रांती द्यायला हवी म्हणून उपवास करायचे. आपल्या संस्कृतीने किती चांगला विचार आपल्या मनात रुजवला आहे.

अशा पद्धतीने आदिमाया, आदिशक्तीची नऊ दिवस मनोभावे पूजा अर्चा केली जाते.

आसुरी शक्ती, दैत्यांचा विनाश करण्यासाठी नऊ रूपात नवरात्री सण.

नऊ दिवसात प्रगट झालेल्या आदिमाया, आदिशक्ती, नवदुर्गेची आपण पूजा करून दहाव्या दिवशी विजयादशमी उत्सव साजरा करतो. हा सण स्वतःसोबतच इतरांचाही विचार करण्यास शिकविणारा सण आहे.

विजयाची प्रेरणा देणारा आणि क्षात्र वृत्ती जागृत करणारा सण म्हणजे विजयादशमी.

त्रेता युगांपासून हिंदू लोक दसरा हा सण उत्साहाने साजरा करतात.

नवरात्रोत्सव साजरा करण्याच्या पौराणिक कथेनुसार महिषासुर नावाच्या राक्षसाने ब्रह्मदेवाला प्रसन्न केले आणि वरदान मागितले, की विश्वातील कोणताही देव, राक्षस किंवा पृथ्वीवरील मनुष्य त्याला मारू शकत नाही. हे वरदान मिळाल्यानंतर महिषासूर दहशत निर्माण करायला सुरुवात केली. त्याची दहशत थांबविण्यासाठी दुर्गा देवी शक्तीच्या रूपात जन्माला आली. दुर्गा देवी आणि महिषासुर यांच्यातील युद्ध नऊ दिवस चालले आणि दहाव्या दिवशी देवीने महिषसुराचा वध केला.

सनातन धर्म हा नेहमी शक्तीचा उपासक राहिला आहे. देवीची मूळ तत्त्व तम, रज आणि सत्व याप्रमाणे नवरात्रात पहिले तीन दिवस तमोगुणांचा महाकाली, मधले तीन दिवस रजोगुणांचा महालक्ष्मी आणि शेवटचे तीन दिवस सत्व गुणांची महासरस्वती रूपात उपासना केली जाते.

नवरात्रात नऊ दिवसात देवी मातेच्या सान्निध्यात आपण अधिकाधिक वास करावा. तिचे सतत स्मरण करावे. देवीच्या शक्तीच्या उपासनेवर मन एकाग्र करावे हे उपवासाचे आध्यात्मिक प्रयोजन.

*या देवी सर्व भुतेषु शांती रूपेण, शक्तिरुपेण संस्थिता |*
*नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः||*

आपल्या संपूर्ण मानव जातीचा विचार करता जाणवतं ते स्त्रीच मातृरूप.भक्तांना आशीर्वाद देणारी त्यांच्या मनोकामना पूर्ण करणारी वात्सल्यरूपिणी आईच न हो ती! तुमची माझी नव्हे तर साऱ्या जगाची जननी जगत्जननी. मातृत्व भाव तिच्या ठाई असतोच असतो. शांति रूपात, शक्ती रूपात ती भक्तांच्या सर्व इच्छा, मनोकामना पूर्ण करणारी आहे.

आपली उपास्य दैवते आणि सण खरोखरच सार्थ आहेत हे लक्षात येते.

नवरात्रीचे विविध आयाम आहेत: आध्यात्मिक, सांस्कृतिक, सामाजिक.

नवरात्रा मुळे सकारात्मक मानसिक प्रभाव विशेषत्वाने जाणवतो. सकारात्मक उर्जे मुळे जीवनात शांती, समाधान, सौख्य मिळते. सत् चित् आनंद देणारा हा नवरात्री सण. शक्तीच्या उपासनेचे दिवस, आईच्या जवळ सामर्थ्य मागण्याचे दिवस.

आई भवानीला एकच मागणे,

*'माय भवानी तुझे लेकरू कुशीत तुझिया येई।*
*सेवा मानून घे आई, सेवा मानून घे आई।'*

आगमनाच्या आनंदात हे नऊ दिवस दुर्गोत्सव म्हणून मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.

नऊ दिवसात आदिमाया,आदिशक्तीची उपासना करताना काही ठिकाणी शेतातील धान्याची ही पूजा केली जाते. कलश हे गणेशाचे रूप आहे. देवतांची गणेशाच्या रुपात पूजा केली जाते. म्हणूनच नवरात्री मध्ये घटस्थापनेला म्हणजेच कलशाच्या स्थापनेला खूप महत्त्व आहे. कलश किँवा घट बसवण्याची परंपरा मां दुर्गेला आपल्या घरात आमंत्रित करण्याचा एक मार्ग आहे असे मानले जाते. कलश शुभ, नशीब, ऊर्जा आणि शक्ती दर्शविते.

नवरात्री हा सण  दैवी स्त्री शक्तीला समर्पित आहे. देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाते.

नवरात्रीच्या पहिल्या दिवशी घटस्थापना होते. देव्हाऱ्यात दररोज नंदादीप, झेंडूची फुले, पानांची माळ आणि देवीपुढे सप्तशतीचा पाठ वाचणे, घागरी फुंकणे, कुमारिका पूजन, श्रीसुक्त तसेच महालक्ष्मी अष्टक , संगीत, भजन अशा विविध प्रकारे शारदीय नवरात्र भक्ती भावाने साजरे केले जाते.

आपल्या संस्कृतीत नऊ हा अंक आणि निर्मिती यांचे अतूट नाते आहे. जसे बीज जमिनीत पेरल्यापासून नऊ दिवसांनी अंकुरते, गर्भधारणा झाल्यापासून नऊ महिने नऊ दिवसांनी बाळाचा जन्म होतो. स्त्री मध्ये असणाऱ्या या निर्मिती शक्तीचा हा उत्सव.

सर्व देवांच्या ठिकाणी असलेल्या शक्तीचे दैवतीकरण होऊन त्या शक्तिरुप मूर्तीला देवी असे नाव मिळाले आणि शाक्त संप्रदायी लोकांनी तिला सर्वश्रेष्ठ देवता, आदिमाया किंवा जगदंबा म्हणून गौरविले.

*प्रथमं शैलपुत्रीच द्वितीयं ब्रह्मचारिणी ।*
*तृतीयं चंद्रघण्टेति  कुष्मांडेती चतुर्थकं ॥*
*पंचमं स्कंदमातेती षष्ठं कात्यायनी तिच ।*
*सप्तमं कालरात्रीति महागौरीतीचाष्टमंम ॥*
*नवमं सिद्धिदात्रिंच नवदुर्गा: प्रकीर्तिता: ।*
*उक्तान्येतानी नामानि ब्रम्हणैव महत्मना ॥*

**मिनाक्षी हेडाऊ**



# रंगी रंगली मराठी

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. उशिरा का असेना, तिला न्याय मिळाला. आता मराठी भाषिकांचे कर्तव्य हे आहे की त्यांनी तिचे महत्त्व व सौंदर्य लक्षात ठेवून तिचा जाणीवपूर्वक वापर करीत रहावे. दुसऱ्या भाषेतले शब्द एकदम वापरायला घेण्यापूर्वी त्याला सार्थ पर्याय आपल्या भाषेत आहे, तो असतोच, हे विसरू नये. तिला अधिक समृद्ध करणे हाही आपल्या कर्तव्याचा भाग आहे. तिच्या अनुपम सौंदर्याचा एक पैलू इथे लक्षात घेतला आहे.

रंगपंचमीच्या दिवशी मनात रंगांविषयी अनेक विचारत-रंग उठतात आणि लक्षात येते की इंग्रजी-हिन्दीच्या मानानं मराठी भाषेत रंगांच्या जाणिवा अधिक सूक्ष्म आहेत. म्हणजे रंगांच्या छटांबद्दल जागरूकता आहे. नुसतं छटा असं न म्हणता ही भाषा शब्दाला शब्द जोडून त्या रंगांच्या विविध छटा कशी दाखवते, हे पाहाणे मनोरंजक आहे. ते शब्द कधी कुरूपता, तिरस्कार दाखवणारे नकारात्मक होतात, तर कधी  प्रेम, सौंदर्य दाखवणारे सकारात्मक होतात.

लाल रंग लालसरमध्ये लालच्या जवळपास आहे, पण थेट लाल नाही. लालबुंदमध्ये रंगाची धुंद छटा आहे, आवाहकता आहे, थोडी रंगमत्तता आहे. लाल रंगाचा जणू गाभा आहे. लालचुटूकमध्ये गाभा नाही पण थोडी चमक आहे. लालभडकमध्ये लाल रंगाची नको वाटणारी छटा आहे, निषेध आहे, मर्यादेचा अतिक्रम आणि आक्रमकता आहे. म्हणजे इथे हा लाल रंग कारंज्यासारखा आहे आणि तो रंग जोषात उधळतो. लालमलाल या शब्दात कलिंगडाच्या फोडीचा गारवा, रसरशीतपणा येतो. लालपणा किती सांगू असा भाव लालेलाल, लालजर्द या विशेषणात आहे. लालची दोन नामं होतात - लाली आणि लालिमा. पण लाली वेगळी. ती सुजेची असू शकते. लालिमा वेगळा. लालिमा लाडिक काव्यात्म सौंदर्य घेऊन येतो. त्यानेही समाधान न झाले तर एखादा कवी संस्कृतमधून रक्तिमा किंवा अरुणिमा शब्द आणतो. कवी पु. शि. रेगे जसे 'पुष्कळ' या शब्दाशी मनमुराद खेळतात, त्या खेळात रंगून जातात, तसे लाल या शब्दाशी खेळलेले दिसत नाहीत. संस्कृत भाषेतील ताम्र या धातूच्या शब्दातून तांबडा हा शब्द आला. या शब्दाशी मराठी खेळताना दिसत नाही, मात्र सूर्य पूर्ण उगवण्याच्या आधीच्या रंगभरल्या आभाळासाठी 'तांबडं फुटलं' हा विलक्षण शब्दप्रयोग आहे. तापलेल्या तांब्याची झळाळी ल्यालेला हा रंग आभाळात असा काही फुटून पसरलेला असतो की तो लाल या शब्दामध्ये मावत नाहीच.

शिवाय रंगाच्या वेगवेगळ्या छटा वेगवेगळ्या वस्तूंमध्ये दिसल्या की त्या दाखवण्यासाठी वस्तूंच्या नावांची विशेषणेच केली जातात. मग हिंगुळी, तपकिरी, डाळिंबी, अंजिरी, शेंदरी, जास्वंदी असे शब्द तयार होतात. पोपटी, शेवाळी या हिरव्याच्या छटांनाही त्या त्या वस्तूंची नावे आहेत. निळ्याची एक छटा फक्त आकाशी या शब्दातूनच व्यक्त होते. मोतिया रंग मोत्याची आभा दाखवतोच. किरमिजी, नारिंगी, भगवा, केशरी हे शब्द वरवर समानार्थी वाटले तरी मराठीच्या लेखी ते तसे नाहीत, कारण या अगदी स्वतंत्र रंगछटा आहेत. राखी, कबरा, करडा याही तशाच.

पांढरा हा शब्द अगदीच फिका आहे, त्यात जिवंतपणा नाही. पांढराफटक किंवा पांढराफट्ट झाल्यावर तर तो निर्जीवच होऊन जातो. संस्कृतमधून शुभ्र आणून त्याला जोडून पांढराशुभ्र केल्याशिवाय त्याला तेज, शुचिता, पावित्र्य येत नाही. त्यामुळे शारीर कांतीच्या वर्णनाला गोरा किंवा गोरटेला हा शब्द घ्यावा लागतो. तो शुभ्र जोडल्यावर मात्र जाई, जुई, मोगरा वगैरे फुलं दरवळतात. चांदणे शुभ्र नसते, ते टिपूर किंवा पिठूर असते. पिवळा रंग पिवळा 'गर्द' होत नाही [का बरं?] तर जर्द होतो. तसा पिवळाजर्द किंवा पिवळाधम्मक झाला की एकदम वरण, लिंबू, शेवंती  नजरेसमोर तरळायला लागतात. चित्रकाराला चित्रफलकावर रंगाची अधिकाधिक अचूक छटा पकडायची असते, त्याप्रमाणे लेखकालाही ती छटा दाखवणारा शब्द पकडायचा असतो. पं. महादेवशास्त्री जोशी एका कथेत अश्विनातल्या उन्हांना सोनेरीही म्हणत नाहीत, हळदिवी म्हणतात.

तसाच काळा हा शब्द. एरवी अंधाराचं प्रतीक असणारा हा शब्द. निराश मुद्रा ही काळवंडलेली असते. काळामिचकूट, काळाढोण किंवा काळाढुस्स म्हटले की तुच्छ कुरूपताच जाणवायला लागते, तसेच काळारोम, काळाबेंदरा, काळुंद्रा ही विशेषणे ज्याला लावली जात असतील, त्या बिचाऱ्या माणसाची दया वाटायला लागते. पण रात्र काळी, घागर काळी, यमुनाजळे काळी असतात तेव्हा हा काळा रंग वेगळ्याच रंगात येतो. गूढगहन होतो. काळाभोर शब्द याची हवीशी छटा दाखवतो, नकारात्मता पुसली जाते. काळेपणाला तुकतुकी, चमक येते. ही चमक गेली की काळा रंग काळपट होतो, जसा पांढरा रंग पिवळट पडू शकतो. इजिप्तच्या एका पिरॅमिडमधले एक चित्र आठवते. त्यातल्या पांढऱ्या पट्टयात पिवळट छटेचा तुकडा होता. गाइडने सागितले, इथला दगडाचा तुकडा निघाला, म्हणून आम्ही तिथे आजचा पांढरा रंग लावला होता, तो आता असा पिवळट पडला आहे. अजिंठ्यातल्या चित्रांमध्येही असेच सौंदर्य टिकवून ठेवणारे रंग त्या महान कलावंतांनी वापरले आहेत. काळाकुळकुळीत किंवा काळाकुट्टमध्ये मात्र एकही अंधुकसा प्रकाशकिरण नसलेली अमावास्येची रात्र एकवटलेली असते. न सांगता 'ट्ट' या जोडाक्षरातून जोरानं हट्टाग्रही सैतानाचं काळीज दिसायला लागतं. पण काळाठिक्करमधल्या जोडाक्षरात काळेपणाची कमाल मर्यादा दिसली तरी दुष्टपणा न दिसता ओशाळवाण्या शरमेचा भाव दिसतो.

काळाकभिन्नमध्ये काळेपणाचे भव्य रूप दिसते आणि हा शब्द कसा काय तयार झाला असेल, याचे कुतूहल वाटते. काळाकरंद हे केवळ कणखर काळ्या पाषाणाला लावले जाणारे विशेषण आहे. 'काळाशार'मध्ये डोहाचा खोल गूढ काळिमा आहे, त्याच्या आत सात आसरा असतील असं वाटायला लावणारा. या 'काळा'ला सावळा रंग जोडला की नकारात्मता वा काळेपणा कमी होतो. भारतीय संस्कृतीने कधी गोरेपणाचा अट्टाहास धरलाच नाही. तेजस्वी द्रौपदी श्यामा होती. लोभस कृष्णसखा मेघश्यामच होता. हा सावळा निळ्याच्या सावलीत जाऊन निळासावळा झाला की आभाळ भरून टाकतो. जीव वेढून टाकतो. रसिकतेचे पाणी घेतो, अंतरंगात शिरतो, हलकीशी बासरीही वाजवायला लागतो. मेघावर ओठंगतो. निळ्यालाही शार लागला की गहराई येते. निळाई झाली की भारून टाकते. हिरवाईसारखी. इटलीतल्या काप्री बेटाजवळच्या ब्लू ग्रॉटो गुहेत चंदेरी झळाळी असलेले निळसर प्रकाशमय पाणी आहे. पाण्यात तळापासून शिरलेल्या सूर्यप्रकाशाची ही किमया आहे, असे वैज्ञानिक म्हणतात. मराठीचे भूषण असलेले पु. ल. देशपांडे यांनी केलेले त्या निळाईच्या सौंदर्याचे अप्रतिम वर्णन वाचावे. ते आठवले तरी मन भरून येते.

मराठी हिरव्या रंगाचंही खूप कोडकौतुक करते. ते साहजिकच आहे, कारण या मराठीच्या प्रदेशात उन्हाळ्याचे दिवस जास्त आणि हा रंग डोळ्यांना दुरूनसुद्धा थंडावा देणारा. ग्रीष्मात रखरखलेल्या भूमीला ओलावा देणारा निर्मितीचा, सृजनाचा रंग. वाळवंटात प्रवास करणाऱ्यांच्या डोळ्यांना दिलासा देणारा रंग. म्हणून तर तो इस्लामच्या ध्वजावर विराजमान झाला. हिरव्या शब्दात पावसाचं पाणी ओथंबलेलंच आहे. साधा एक बगीचा पाहिला तर या हिरव्याच्या अनंत सूक्ष्म छटा पहायला मिळतात. त्या निसर्ग नावाच्या चित्रकाराला किती किती प्रणाम करावेत असे होऊन जाते. मराठी भाषा शक्यतो त्या छटा पकडण्यासाठी नवे शब्द तयार करते. गवत आणि हा रंग इतका एकरूप आहे की अनेक भाषांत कुरणाला हिरव्याचेच नाव आहे. मराठीत हिरवळ, हिरवाई हे शब्द येतात. हिंदीत हिरवळीला हरियाली म्हणतात आणि 'हराभरा' म्हणत हिन्दी भाषा हिरव्यातली समृद्धी दाखवते. इंग्रजीतही Greenery हा शब्द आहे पण तिथे हिरवा रंग मात्र आजारपणाशी जोडलेला आहे, याचे आश्चर्य वाटते. पोटाचे विकार निर्माण करणाऱ्या कच्च्या पदार्थांचा रंग म्हणून किंवा गंभीर आजारी माणसाच्या कांतीवर पिवळसर, हिरवट छटा येते, असे कारण इंग्रजीत यासाठी दिले जाते. उलट हिरव्या पाचू रत्नातला हा रंग आजार बरे करायला मदत करतो असं आपल्याकडे म्हणतात. शेक्स्पीअरच्या मर्चंट ऑफ व्हेनिसमधली पोर्शिया आणि ऑथेल्लोमधला इयागो मत्सराला green-eyed monster म्हणतात आणि शेक्स्पीअरनेच हे शब्द प्रथम वापरले, असेही म्हणतात. monster ठीक आहे, पण या भाषाप्रभूने मत्सराला Green-eyed का म्हटले, याचे सयुक्तिक कारण मात्र कळत नाही. हिरव्याची 'हिरवट' ही छटा मात्र नापसंती घेऊन येते. पिकल्या पानानं हिरवेपणा टाकला पाहिजे, तो टाकला नाही, तर त्याला हिरवट असं उपहासानं म्हटलं जातं.

शिवाय, हिरवाचार हा शब्द फक्त विषारी सापालाच वापरला जातो. मराठीत द्विरुक्तीने तीव्रता दाखवली जाते. लाल लाल, हिरवा हिरवा, पण जणू एवढ्याने या रंगाची उधळण पुरेशी व्यक्त होत नाही म्हणून हिरवागर्द किंवा हिरवाकंच हा शब्द येतो. त्याच्यात दाट, गर्द झाडी भरूनच राहिली आहे. हिरवागार म्हणून त्याच्यातली शीतलता अधोरेखित केली जाते.

मराठी भाषा सतत अशी सुंदर रंगीबेरंगी रंगपंचमीच साजरी करत असते असे वाटते.

**डॉ.सुप्रिया सहस्रबुद्धे**
**पुणे**





# डॉ. तारा भवाळकर

डॉ. तारा भवाळकर यांचा सन्मान म्हणजे लोकसंस्कृतीचा व स्त्री शक्तीचा गौरव!

♦ नवी दिल्ली येथे फेब्रूवारी २०२५ मध्ये होणा-या ९८ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी लोक संस्कृती, लोकसाहित्याच्या गाढ्या अभ्यासक डॉ.ताराबाई भवाळकर यांची नुकतीच निवड करण्यात आली. सत्तर वर्षापूर्वी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली संमेलन भरले होते. त्या प्रदीर्घ काळानंतर मध्ये एकदा संमेलन आयोजित करण्याचा प्रयत्न झाला होता, पण प्रत्यक्षात तसे झाले नाही. त्यामुळे देशाच्या राजधानीत होणा-या ९८ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनास मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे आनंदाचे वातावरण आहे. त्यामुळे संमेलन नक्कीच रंगतदार होईल.

### ♦स्त्री शक्तीचा व लोकसंस्कृतीचा गौरव

शारदीय नवरात्रोत्सवाच्या काळात मराठी साहित्यक्षेत्रासाठी अभिमानास्पद, गौरवास्पद ठराव्यात अशा दोन घटना घडल्या; एक म्हणजे नवरात्राच्या पहिल्याच दिवशी, आधीच अभिजात असलेल्या आपल्या मराठी भाषेस केंद्रशासनाने अधिकृत अभिजात दर्जा घोषित केला; दुसरे म्हणजे नवी दिल्ली येथे पुढील वर्षी संपन्न होणा-या ९८ व्या अ.भा. मराठी साहित्य संमेलन अध्यक्षपदाचा सन्मान लोकसाहित्य, लोकसंस्कृतीच्या गाढ्या अभ्यासक सांगली येथील डॉ. तारा भवाळकर यांना मिळाला. पुण्यात साहित्य महामंडळाच्या बैठकीत एकमताने निवड होणे अपेक्षित असताना तसे झाले नाही. अंतिम क्षणापर्यंत विश्वास पाटील, की डॉ.तारा भवाळकर यावर सदस्यांचे एकमत झाले नाही. अखेर दोन्ही नावासाठी मतदान घेतले तेव्हा विश्वासरावांचे पानिपत झाले आणि ताराबाईंनी बाजी मारली. अखेर महामंडळाने त्यांच्या नावाची घोषणा केली; आणि ताराबाईंना आयुष्याच्या उतरार्धात का होईना संमेलन अध्यक्षपदाचा सन्मान प्राप्त झाला. त्यांच्या आधी असा सन्मान कुसुमावती देशपांडे (ग्वाल्हेर), दुर्गा भागवत (क-हाड), शांता शेळके(आळंदी), डॉ.विजया राजाध्यक्ष (इंदुर) आणि अरुणा ढेरे (यवतमाळ) यांना मिळाला होता. एवढेच नाही तर याआधी मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद सांगलीत जन्मलेल्या किंवा सांगलीत जडण-घडण झालेल्यांनी भूषवले आहे. सांगली जिल्ह्यातील आचार्य शंकरराव जावडेकर, प्रा.कृ.पा.कुलकर्णी यांनाही अध्यक्षपद लाभले. तसेच आटपाटी तालुक्यातील ग.दि.माडगुळकर, त्यांचे बंधू व्यंकटेश माडगुळकर, शंकरराव खरात या शिवाय अलिकडच्या काळात ना.सं. इनामदार, प्राचार्य म.द.हातकणंगलेकर

यांनाही अध्यक्षपदाचा सन्मान लाभला. पुण्यात एक एप्रिल १९३९ ला जन्मलेल्या आणि सांगलीत ५६ वर्षापासून वास्तव्य असलेल्या ताराबाईंनी आपल्या विविधांगी संशोधनात्मक लेखनातून मराठी साहित्यविश्वावर अमीट छाप सोडली आहे. तेच लक्षणीय कार्य साहित्य महामंडळाने लक्षात घेतले आणि एकाच वेळी स्त्री शक्तीचा सन्मान आणि लोकसाहित्य-लोक संस्कृतीचाही गौरव केला. अध्यक्षपद निवडी नंतर त्या म्हणाल्या "अभिजात दर्जा मिळाल्यानंतर संमेलनाचे अध्यक्षपद जाहीर होणे, ही चांगली बाब होय. मराठी माणसांचा दर्जा अभिजातमुळे वाढला का, हे भविष्यात कळेल. भाषेचा दर्जा वाढला म्हणजे भाषा बोलणारे, व्यवहार करणारे लोक वाढले पाहिजेत." त्या आणखी म्हणाल्या तेही फार महत्वाचे आहे, "माझ्या आयुष्याच्या उतरार्धात  हा सन्मान मिळाला. उमेदीच्या काळात लेखकांना मान मिळायला हवा. आयुष्याच्या सायंकाळीही चालेल, पण अगदीच तिन्ही सांजेला नको " ताराबाईंची दोन्ही वक्तव्यं अतिशय महत्वाची आहेत.

♦वैविध्यपूर्ण साहित्य निर्मिती

डॉ. तारा भवाळकर यांचा जन्म पुणे येथे १ एप्रिल. १९३९ ला झाला. या प्रामुख्याने वैचारिक लेखन करणाऱ्या एक मराठी लेखिका होत. वयाच्या ८५ व्या वर्षी त्यांना साहित्य संमेलन अध्यक्षपदाचा सन्मान मिळाला. आजही लेखन, संशोधनाचा तोच ध्यास आहे आणि खणखणीत आवाजही आहे. ताराबाई या लोकसाहित्य, लोकसंस्कृती, लोकपरंपरा आणि लोककला या विषयांशी संबंधित असून या विषयांच्या त्या गाढ्या अभ्यासक आहेत. त्यांनी लोकसंस्कृती, नाट्यसंशोधन, संतसाहित्य, एकांकिका, ललित लेखन, लोककला यांविषयी तसेच स्त्री जाणिवांवर लक्ष केंद्रित करणारे विपुल लेखन केले आहे आणि लोककला आणि लोकसाहित्य या विषयांशी संबंधित अनेक चर्चा, परिसंवाद, संमेलने यांत भाग घेतला आहे. ताराबाईंनी पौराणिक नाटक, लोकनाट्य, दशावतार, तंजावरची नाटके, यक्षगान, कथकली अशा नाट्य प्रकारांची जडणघडण शोधली. त्यांचे समग्र लेखन वस्तुनिष्ठ, यथार्थ व चिकित्सक दृष्टी आणि सैद्धांतिक अभ्यासाचा वस्तुपाठच आहे. मराठी विश्वकोश, मराठी वाङ्मयकोश आणि मराठी ग्रंथकोश या महत्त्वाच्या कार्यातही सहभाग घेतला आहे. त्यांची महत्त्वाची साहित्य संपदा म्हणजे-

अभ्यासक स्त्रिया (ज्येष्ठ लेखिका मालती दांडेकर, विदुषी दुर्गा भागवत यांच्यापासून ते प्रसिद्ध कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांच्यापर्यंत ज्ञात-अज्ञात अशा २५ अभ्यासक स्त्रियांच्या संशोधन कार्याचा परिचय करून देणारे पुस्तक)

आकलन आणि आस्वाद, हे सांगता येईल (साहित्यिक)

तिसऱ्या बिंदूच्या शोधात (वैचारिक),

निरगाठ सुरगाठ (लेखसंग्रह)

प्रियतमा ( गडकरी साहित्यातील स्त्री प्रतिमा)

बोरीबाभळी (रा.रं. बोराडे यांच्या ग्रामीण स्त्रीविषयक कथांचे संपादन आणि प्रस्तावना)
मधुशाळा (हरिवंशराय बच्चन यांच्या ‘मधुशाला’चे पहिले मराठी भाषांतर)
मरणात खरोखर जग जगते (कथासंग्रह)
मराठी नाटक : नव्या दिशा, नवी वळणे
मराठी नाट्यपरंपरा : शोध आणि आस्वाद
महामाया
माझिये जातीच्या (सामाजिक)
मातीची रूपे (ललित)
मायवाटेचा मागोवा
मिथक आणि नाटक
यक्षगान आणि मराठी नाट्य परंपरा लोकनागर रंगभूमी (माहितीपर)
लोकपरंपरा आणि स्त्रीप्रतिभा (माहितीपर)
लोकपरंपरेतील सीता
लोकसंचित (वैचारिक)
लोकसाहित्य : वाड्मयप्रवाह
लोकसाहित्याच्या अभ्यासदिशा (माहितीपर)
लोकांगण (कथासंग्रह)
संस्कृतीची शोधयात्रा (माहितीपर)
स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर (वैचारिक)
स्नेहरंग (वैचारिक)

त्यांना बरेच सन्मान आणि पुरस्कार लाभले. त्यांच्या पीएच.डी.च्या प्रबंधाला सर्वोत्कृष्ट प्रबंधाचा पुणे विद्यापीठाचा पुरस्कार लाभला.

### ♦विविध संमेलनाचे अध्यक्षपद

विविध साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचा सन्मान त्यांना मिळाला.
आवास (अलिबाग) येथे भरलेल्या कोकण मराठी साहित्य परिषदेच्या महाराष्ट्रातील पहिल्या महिला साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद, इस्लामपूर येथे भरलेल्या जागर साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद, येथेच भरलेल्या राजारामबापू ज्ञानप्रबोधिनी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद. उचगाव (बेळगाव) येथे भरलेल्या महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रदेशीय साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद.
कादरगा येथे भरलेल्या महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रदेशीय साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद,
जळगाव येथे भरलेल्या सूर्योदय साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद,
पुण्यात ५ जानेवारी २०१९ रोजी झालेल्या पर्यावरण साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद
यांचा उल्लेख देता येईल. त्यांच्या लेखन चळवळीचा गौरव अनेक पुरस्कारांनी झाला, यात मुंबईतील मुलुंडच्या महाराष्ट्र सेवा संघातर्फे सुं.ल. गद्रे साहित्य पुरस्कार. (२२-१-२०१७)

'लोकसंचित' या पुस्तकाला महाराष्ट्र सरकारचा १९९१ सालचा पुरस्कार लाभला. या प्रदिर्घ वाटलीचा यथोचित सन्मान म्हणजे नवी दिल्ली येथे भरणा-या नियोजित ९८ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद हे सांगता येईल.

साहित्य महामंडळ स्थापन झाल्यानंतरचे नवी दिल्लीत होणारे हे पहिलेच साहित्य संमेलन होय. सत्तर वर्षापूर्वी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली संमेलन भरले होते. त्या प्रदीर्घ काळानंतर मध्ये एकदा संमेलन आयोजित करण्याचा प्रयत्न झाला होता, पण प्रत्यक्षात तसे झाले नाही.

आता देशाच्या राजधानीत होणा-या ९८ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनास मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे आनंदाचे वातावरण आहे, त्यामुळे संमेलन नक्कीच रंगतदार होईल..

**प्रशांत गौतम**

prashant6455881@hotmail.com






# या जगी आलो असा मी

या जगी आलो असा मी, की जसा आलोच नाही
वाटले कळले जरासे, पण खरे कळलेच नाही
काळ हा करवट बदलतो, श्वासांसवे मी तयांच्या
पाहिली रंगीत स्वप्ने, पण तसा जगलोच नाही

लेखणीला झोंब माझ्या, येत जेंव्हा गीत वेणा
अर्थ गर्भातच जिरे अन् उरे शब्दांचा बहाणा
गावयाला ताल होता, लागला तो सूर नाही
जीवनाचा अर्थ मजला, अद्यापही कळलाच नाही



डुंबलो मायेत इथल्या! मी तरी भिजलोच नाही
कोरडी नाती उराशी, दुश्मनी टळलीच नाही
लागतो हा अर्थ म्हणती, दुःख ही त्याची कसोटी
पांघरोनी ऊन आलो, सावली दिसलीच नाही

वाटतो आनंद मी हा, दोष का माझाच आहे!
हा इथे कसला रिवाज, रीत ही न्यारीच आहे
ख्रिस्तापरी खांद्यावरी क्रूस मी माझाच वाही
ओढू नका पाय माझे, ही भल्याची रीत नाही!

जादुई गुलजार क्षणांना, सप्तरंगी घोस आले
ओंजळीला साज नवखा, माळता गजरे फुलांचे
वास घ्याया वाकलो मी, गंध तो आलाच नाही
ओंजळीचे देणे असे, ते कधी फिटलेच नाही

**कै. प्रा. दि. वि. जोशी**



# माझं वय

आईनं सांगितलेल्या माझ्या जन्मतारखेनुसार माझं वय त्रेसष्ठ आहे.
पण त्यांना माझ्या आईचं सांगणं मान्य नाही.
ते फक्त स्कूल लीव्हिंगचा कागद मानतात.
त्यानुसार माझं वय चौसष्ठ आहे.

एका वर्षानं काय फरक पडतो?
म्हणून त्यांच्यापुढे नमतं घेऊन माझं वाढतं वय मी स्वीकारून टाकलं..
तर आता प्रत्येक डॉक्टर माझं वेगवेगळं वय सांगताहेत.
तेही एकसंध नाही
एकजण फक्त हाडांचं वय सांगतो दुसरा लिव्हरचं.. तिसरा फुफ्फुसांचं..
त्यांना स्कूल लीव्हिंगचा कागद मान्य नाही
ते यंत्राची स्पंदनं मानतात.

काल त्यांनी मला जोरात फुंकर मारायला सांगितली.
मी मारली
अजून.. जास्तीत जास्त.. अशी- सर्व बळ एकवटून..
मी पुन्हा फुंकर मारली त्यांनी स्क्रीनवर पाहिलं
एक.. दोन ..तीन वेळा काळजीपूर्वक तपासून त्यांनी प्रिंटाउट काढला
त्यातली आकडेवारी समजावून सांगत त्यांनी मला पटवून दिलं की
माझ्या फुफ्फुसांचं वय सत्त्याणौ आहे...ताठ मानेनं आत गेलेली मी वाकत थरथरत बाहेर पडले...

मनात आलं, असं कसं झालं?
आता तर नव्यानं तरूण झाल्याच्या आनंदात होते मी
माझे दोन कवितासंग्रह प्रकाशित झाले म्हणून असं कसं अचानक वाढलं वय..?

अर्थपूर्ण शब्द शोधण्याच्या नादात मी भरभरून श्वास घ्यायला
आणि मोकळेपणानं सोडायला विसरत होते की काय?
इतक्या वर्षांच्या अवधीत
मला साधी फुंकर मारता येऊ नये?

तरी पूर्वसूरी बजावत होते ‘शब्द बापुडे केवळ वारा..!’
तो मी भरभरून आत घ्यायला हवा होता
आणि निःसंगपणे सोडून द्यायला हवा होता..
‘..निज शैशवास जपणे..’
मग जमलं असतं कदाचित..!

**आसावरी काकडे**
('व्यक्त अव्यक्ताच्या मध्यसीमेवर' या कविता संग्रहातून)



# बंध

(वृत हिरण्यकेशी)

सुरेख साधे अतूट धागे  तुझे नि माझे परस्परांशी
सुरेल नात्यातली खुमारी अजून सुद्‌धा हवीहवीशी

कधीतरी भावरम्य दृष्टी , हळूच काही निरोप देई
कधीतरी कोसळून धारा अबोल प्रीती भिजून जाई

कुणीच नाही कधीच केले उगीच वेडे छुपे बहाणे
कळून आले तुला मला हे, कमी कुठे ते कळून  घेणे

कृतार्थ झालो खरेच,आता, मनात काही मुळीच  नाही
जमून आल्या सुरावटीं की, सुरात गाणे  कठीण नाही

चढून आलो ब-याच वाटा, उतार सुद्‌धा अपार आले
कुणास ठावे चिरंतनाचे असे कितीसे प्रवास झाले

**चंचल काळे**




# ल्याले रूप नाही बाणा

पाटावरी घरंगळे
मोहरीचा दाणा दाणा
वरी दगुड साचले
ल्याले रूप नाही बाणा

जात्यामंदी भरडले
थोडे दगड नि डाळं
डाळं सुखात वाटले
बाकी खरखर काचले

आला म्हशीचा कळप
दोन शिंगे चार पाया
माझी म्हस ओळखाया
लागे अंतरीची माया



खणा किती खोल खोल
नसे कोरड्याला ओल
नाही सवतीचा तान्हा
कसा फुटेल गं पान्हा

खाली घातले जाजम
वीण घट्ट मजबूत
परी गोधडीची ऊब
त्याले नाही समजत

कावळ्याने कोकिळेचे
जरी घेतले गं रूप
येता वसंत बहर
खरे कळेल स्वरूप

**दीपा मिट्टीमनी**




# पोटघर

सक्रीय झाला गोठणबिन्दू
पोटाआतले पाणी गोठले
रुधिरपेशी स्तब्ध जाहल्या
कोण कुठले, कोण पाठले

दोन्ही डोळ्यात तेल घालूनी
पतंग प्रतीक्षेत वातीच्या
विवरातल्या बुरुजातून
घार शोधते जागा कातीच्या

काजव्यांना कवेत घेऊन
नको वेशीस पुसू खुशाली



पारावरल्या शेंदरातल्या
अजून जाग्या जुन्या मशाली

दिव्या अंगात तेल मुरता
वात भोगून रात माजते
कीट करते तिथेच दावा
जिथे उजेड बात गाजते

झोळी अजुनी आशेवरती
कोण देतो भिक्षा मूठभर
हर घरात असते उपाशी
अंधारले एक पोटघर


**प्रशांत पनवेलकर**

Email.--pppanvelkar@gmail.com

# सीताफळ!

आजी टोपली भरून सीताफळ
घेऊन यायची ,तिची गोड गोड
सीताफळं वाटताना खुश व्हायची!

जमिनीचं नातं होतं तिच्याशी
माऊलीच तिची कायमची..
जणू लांबवर पांघरलेली
घोंगडी..ऊब जिंदगीची!



आजी गेली, माती हिरमुसली
व्यापाराची वावटळ विखंडित
करून गेली, सगळ्याच वावराला!
गुंठा,किंमत,प्लॉट झाले आईचे!!

गुंठे विकले..बुलडोझर आले..
आजीचे सीताफळाचे झाड बापडे
गेले..सगळे सपाट केले..
आजी नव्हतीच..पण..
माझ्या आतून तिचे डोळे झरले..

मातीची पार मातीच झाली
सीताफळाची बाग गेली ती गेलीच..!

मॉल मध्ये custard apple दिसते
पावकिलो पंच्यातर रुपयाला आता
अन् टोपली घेतलेली आजी
तरळून जाते,पाणावल्या डोळ्यात!!

समरेंद्र निंबाळकर




# शरणागत

नियत वेळी वेस लांघतो
तरी उरते काही किरणे
जीर्ण ठसे पुसता पुसता
गवसून जाते नाकारणे

उभेआडवे पिसाळलेले
गर्द संभ्रमी रत कार्मिक
गळला तरी घ्यावा सोबत
काकपदाने चोर धार्मिक

जगण्यासाठीच मकरंद
मुंगी मधुरव खोल मुळे



जाता येता तुंबडी भरता
तेव्हढीच बाकी दशांगुळे

निवांत वेळी मापट्या पोटी
एक अंधारी काळी पोकळी
अजुनी शेष वीणावयाची
मानव्यशास्त्र जाळी मोकळी

देव कशाला अंगात येतो
आहे शेंदूर मैलोगणिक
शरणगताचे स्तोम स्वार्थी
मधल्याबोटी घालून माणिक

**प्रशांत पनवेलकर**
Wardha, Maharashtra
Email. pppanvelkar@gmail.com

# नको पावसा तू

(वृत्त - भुजंगप्रयात )

नको पावसा तू करू हे बहाणे
बळी पेरतो आज मातीत गाणे

तरू दे जगू दे सदा पीक पाणी
पक्षीही सुस्वरात गातील गाणी

बघू दे विजांचे चमकणे नव्याने
भिजू दे ही माती तुझ्या संगतीने



असावी उपाशी बिचारी पिले ती
मिळे घास त्यांना तुझ्या बरसण्याने

नको दाखवू फार खोटीच आशा
मनी आस जागे तुझ्या आठवाने

फिटे पांग सारे जगाचे तुझ्याने
असू दे मनी प्रेम ओठी तराणे

**अजय अंबादास देशपांडे**
**वरुड, अमरावती**



# वाटे वरती काचा गं... एक प्रवास

1997 साली फॅक्से ( फोरम अगेन्स्ट चाईल्ड सेल्सशुअल एक्सप्लॉयटेशन )यांनी एक बैठक बोलवली होती. त्यामध्ये अनेक कलाकार, तंत्रज्ञ, दिग्दर्शक, फिल्म मेकर, लेखक अशी सगळी मंडळी होती. मलाही निमंत्रण होतं. त्यांनी एक विषय मांडला, की ‘बाल लैंगिक शोषण’ ही एक समस्या आहे. त्याविषयी फक्त कुजबुजल्या स्वरात बोललं जातं. ते मोठ्यानं बोलावं म्हणून तुमच्या आविष्कार माध्यमातून तुम्ही काय करू शकता याचा विचार करा. या विषयाला वाचा फोडणे अत्यंत आवश्यक आहे. कारण ही एक गंभीर समस्या आहे. त्याचा मुलांच्या मनावर खोलवर परिणाम होतो. कधी कधी वैवाहिक आयुष्य उध्वस्त होतं.

मला असं वाटलं की माझ्या पपेटच्या माध्यमातून मी हा विषय लोकांपर्यंत पोहोचवू शकेन. त्यानंतर लगेचच 1998 मध्ये कोलंबोला ‘युनिसेफ नॉर्वे’ ने ‘बाल हक्क’ यावर एक इंटरनॅशनल कॉन्फरन्स आयोजित केली होती. त्याला मी भारताचं प्रतिनिधित्व केलं होतं. त्यावेळेस खरंतर मला कळलं की ‘बाल हक्क’ म्हणजे काय आहेत. त्याची सनद काय आहे, त्यातली कलमं काय आहेत. त्यामध्ये मुलांचा कुटुंबात राहण्याचा हक्क, मुलांना शाळेत जाण्याचा हक्क, बालमजुरी न करण्याचा हक्क, मुलांना घरच्या काही बाबींमध्ये बोलण्याचा हक्क, याचा सर्वांनी आदर करायला पाहिजे.

त्याचबरोबर त्यांचं लैंगिक शोषण होत असेल तर त्या विरोधात आवाज उठवणं हापण त्यांचा हक्क आहे, हेही मला कळलं. परत आल्यानंतर मी या विषयाचा अभ्यास सुरू केला. अनेक लोकांच्या भेटी घेतल्या. राणी रावते, विद्या आपटे यांनी खूप मदत केली. त्यानंतर अनेक केस स्टडी केल्या.

तीन साडेतीन वर्ष समस्येचा पूर्णत: अभ्यास केल्यानंतर मी याचं नाटक लिहीण्यासाठी रत्नाकर मतकरींपासुन अनेकांना भेटले. शेवटी डॉ. अनिल बांदिवडेकरांना मी माझा विचार सांगितला. त्यांनी एक नाटक लिहून दिलं. ज्याची सुरुवातच एक मुलगी व्हील चेअरकडे बोट दाखवून ’ही माझी सखी’ असं म्हणते. मला अशी रडकी, भावनिक सुरुवात नको होती. तसंच मला पुरुष पात्रंही नको होतं. मला लोकांनी विषयात वाहून न जाता विचार करायला पाहिजे होतं. मग संहितेत मी बरेच बदल केले. काही नवीन सीन्स लिहीले. शोषण करणारा काका प्रत्यक्ष न दाखवता तो भाग कृष्ण धवल छाया बाहुल्यांनी सादर केला. तसंच पीडित मुलीला बोलतं करण्यासाठी हात बाहुल्यांचा उपयोग केला. प्रेक्षकांना हे सर्वच नवीन होतं. गंभीर विषय, त्यात बाहुल्यांचा कल्पकतेने केलेला उपयोग हे सर्वांनाच विशेष भावलं.

हा विषय नाटकातून मीच पहिल्यांदा मांडणार होते. त्यापूर्वी कोणीच या विषयाला स्पर्श केला नव्हता. त्यामुळे तो अत्यंत तरलतेने मांडणं आवश्यक होतं. नाहीतर नाटक 'हिट अन्ड हॉट' झालं असतं. शोषण करणारा बहुधा जवळचा नातेवाईक किंवा कुटुंबाच्या मित्र परिवारातील असतो. त्याचा चेहरा कुणाला दिसत नाही. तसंच पीडित मुलीच्या अनप्लेझंट मेमरीज दाखवायच्या होत्या. म्हणून कृष्ण धवल छाया बाहुल्या वापरल्या. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

सुरुवातीला मी खूप घाबरले होते. प्रेक्षक हुट आऊट तर करणार नाहीत ना. पण असं कधीच झालं नाही. उलट पत्रकार, मिडीया, सामान्य प्रेक्षक, मुलंमुली सर्वांनीच याला भरघोस पाठिंबा दिला. नाटकाच्या माध्यमातून समाजाचं उद्‍बोधन करणं किती परिणामकारक होऊ शकतं याचा अनुभव आला. त्याचबरोबर बाहुल्या या फक्त मनोरंजनासाठी नसून गंभीर विषयही लोकांपर्यंत त्या पोहोचवू शकतात हे दाखवून दिलं.

या नाटकामध्ये काम करणाऱ्या दोन मुली होत्या. एक मोठी मुलगी आणि एक छोटी मुलगी, आई आणि मावशी अशी चारच पात्र होती. सोशल वर्कर मावशीची भूमिका अर्थातच मी केली होती. मोठ्या मुलीची भूमिका सुरुवातीला प्रिया बापट करत असे आणि छोट्या मुलीची श्रेया बुगडे. प्रिया बापट ज्यावेळेस या नाटकात काम करायला आली तेव्हा ती नववीत होती. तिला मी स्क्रिप्ट दिलं. तिच्या आईने ते वाचलं आणि म्हणाल्या, "अहो, हे असं कसं काम करणार प्रिया?" (त्याच्यामध्ये असा उल्लेख होता की काका तिला उचलतो आणि बेडवर नेऊन ठेवतो). मी त्यांना म्हटलं, "अहो, मला पण दोन मुली आहेत. मी रंगमंचावर असं कसं दाखवेन. त्यासाठी मी बाहुल्यांचा उपयोग करणार आहे. त्यांनी हे ऐकलं; आणि प्रियाला परवानगी दिली. नंतर प्रिया दहावीत गेली. त्यामुळे श्रेया मोठ्या मुलीची भूमिका करू लागली आणि छोट्या मुलीसाठी गौरी वैद्य आली. तर अशा तऱ्हेने १४ नोव्हेंबर २००० ला बालदिना रोजी नाटकाचा पहिला प्रयोग सादर केला.

नाटकात कविवर्य विंदा करंदीकरांच्या बालकविता वापरल्या आहेत. त्यातल्याच एका कवितेतील एक ओळ ही नाटकाचं शीर्षक आहे, 'वाटेवरती काचा ग...'

नाटकाचा शंभरावा प्रयोग अनेक दिग्गजांच्या उपस्थितीत संपन्न झाला. प्रयोग संपल्यावर एक 12/13 वर्षांची मुलगी मोठमोठ्याने रडत स्टेजवर आली. म्हणाली, मला त्या ताईंना भेटायचंय. माझा चुलत भाऊ मला असाच त्रास देतो. पण घरात भांडणं होतील म्हणून मी कुणाला सांगितलं नाही. मुलीच्या मागोमाग तिची आई, मुलगी रडत कुठे जातेय पहायला आली. तिला प्रत्यक्षच सगळा उलगडा झाला.

असाच एक अनुभव. औरंगाबादच्या शोनंतर काही दहावीतल्या विद्यार्थिनी रडत रडत मला भेटायला आल्या. म्हणाल्या," आमचे योगाचे शिक्षक आम्हाला असा त्रास देतात. आम्हाला वाकायला लावतात, आमच्या पाठीवर हात फिरवतात. आम्ही आमच्या मुख्याध्यापिका आहेत त्यांच्याकडे तक्रार केली तर त्या म्हणतात तुम्ही मुलीच तसल्या आहात. आम्ही दहावीत आहोत. अभ्यासात लक्ष लागत नाही. आम्हाला काय करावं कळत नाही." त्याच शोला कॉलेज ऑफ सोशल वर्कचे काही विद्यार्थी आणि प्राध्यापक आले होते. त्यांना मी तिथेच ताबडतोब सांगितलं, "तुम्ही हे टेक ओव्हर करा,फॉलोअप करा आणि त्या माणसाला समज द्या. मुख्याध्यापिकेलाही सांगा."

असाच आणखी एक अनुभव. वसईच्या एका कार्यक्रमानंतर एक मुलगा नाटक संपल्यानंतर इकडे तिकडे घोटाळत होता. नंतर  तो माझ्याकडे आला आणि म्हणाला, "मला पण असंच होतंय. पण मला वाटलं की माझं एकट्याचंच असं शोषण केलं जातंय; पण तुमचं नाटक पाहिल्यानंतर लक्षात आलं की कुणालाही असा अनुभव येऊ शकतो. आता मला हिम्मत मिळाली.  मी  त्याच्या विरुद्ध आवाज उठवणार. 'नाही, नको' म्हणून ओरडणार." मला खूप बरं वाटलं हे नाटक पाहून. तुम्हाला खूप खूप धन्यवाद. हा मुलगा साधारण १७-१८ वर्षांचा होता.

एकदा लातूरला कार्यक्रम संपल्यानंतर दोन मुली मला भेटायला थांबल्या होत्या आणि काय बोलू कसं बोलू असं त्यांचं चाललं होतं शेवटी एक मुलगी आली माझ्याजवळ, अत्यंत तुटक शब्दात मला म्हणाली की, 'माझे वडील मला त्रास देतात.' मुलगी १३/१४ वर्षांची होती. तिथेच आमचे काही सोशल वर्कर्स  होते. त्यांना सांगितलं, तुम्ही तिचं आणि तिच्या वडिलांचं समुपदेशन करा.

अशा तऱ्हेने अनेक शोषित मुलगे, मुली भेटतात. आपले अनुभव सांगतात. त्यांचं मन मोकळं  होतं. त्यांचं समुपदेशन केलं जातं. आता तर पॉक्सो कायद्यामुळे गुन्हेगाराला दंड आणि शिक्षा केली जाते.

२००० साली मुलांना चांगला स्पर्श, किळसवाणा स्पर्श म्हणजे काय हे शिकवलं. एखादा स्पर्श आवडला नाही तर 'नाही, नको' असं मोठ्याने ओरडायला शिकवलं. पालक, शिक्षक यांनाही लैंगिक शोषण होत असलेल्या मुलांमध्ये होणारे बदल टिपायला शिकवलं. गुन्हेगार जवळचा नातेवाईक असला तरी गप्प न बसता त्याची पोलिसात जाऊन तक्रार नोंदवायला शिकवलं. अजूनही शिकवते आहे.

२०१२ साली  'पॉक्सो' हा कायदा अस्तित्वात आला. त्याला नेमकं स्वरुप यायला काही वर्ष गेली. अठरा वर्षांखालील कुठल्याही व्यक्तीचं लैंगिक शोषण झाल्यास कायद्यानं त्याला शिक्षा होऊ शकते.

हे लोकांपर्यंत पोहोचवायचं होतं. म्हणून या कायद्याचा परिपूर्ण अभ्यास करुन 'अभया' हे नाटक लिहून २०२० साली रंगमंचावर आणलं. जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी नाटकाची बांधणी, नेपथ्य सोपी ठेवली. त्यामुळे शाळा, महाविद्यालयं, सामाजिक संस्था यांच्यासाठी खेडोपाडी जाऊन याचे प्रयोग करता आले. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर बेळगाव, हैद्राबाद, गोवा, इंदोर याठीकाणी 'अभया' पोहोचली. अजूनही नाटकाला मागणी आहे. १८० प्रयोग झाले.

२००० सालापासून लैंगिक शोषणाची समस्या लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी माझे अथक प्रयत्न चालू आहेत. दुर्दैवाने दिवसेंदिवस मुलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटना वाढतच आहेत.

**मीना नाईक**





# आठवणींचा सर्वा...

उतरत्या कौलांनी टेकू दिलेल्या भिंतीचा कानाकोपरा आज खूप काही सांगत होता. वर्षानुवर्षे खुंटीवर टांगलेल्या आठवणी निपचीत पडल्या. अंगाखांद्यावर रांगणारं बालपण कसं धावून आलं. कित्येक पिढ्यांची रुजूवात करणारं माझं घर जमीनदोस्त होणार होतं. कॉंक्रीटशी सौदा झाला आणि घरादाराचा कोपरानकोपरा मुसमुसला.


जुन्या टाकाबरीतल्या संदुकासारख्या आठवणी मनाचे पापुद्रे उलगडत गेल्या. भिंती बोलत होत्या आणि मी ऐकत होते. सांबरशिंगही थोडीशी वाकलेली. जळमट नेहमीचीच इथुनतिथून मिरवणारी,सणवारी झटकून टाकलेली पण सवयीने पुन्हा कोपरा धरून बसलेली. तिरपीतून ऊन रेंगाळत रहावं तसा धुराचा लोळ ही मागोमाग शिरत होता. पाण्याच्या बंबातून निघुन थेट घरात. पण त्यात रेंगाळणारे जीवजंतु आगंतुक पाहुण्यासारखे हुंदडत होते अंगणातल्या फुलपाखरासारखे पण चिमटीत धरलेले चतुर फिरकले नाहीत आज. कदाचित त्यांचे रंग हरवतील म्हणून लांबूनच डोकावत होते माझ्या आत आणि बाहेर..ओटीवर शेणाने सारवलेली बोटं मात्र तशीच ठसठशीत वेलांटया मारलेली. दारातलं स्वस्तिक मात्र काहीसं विस्कटलेलं, बहुतेक वारा येवून गेला असावा. प्राजक्तही निखळला होता. कदाचित त्यालाही कळून चुकलं की काय आज बुलडोझर फिरणार ते..!

सायली मात्र फारच डवरली होती, गुलमोहराला बिलगून निर्धास्त होती. आजीने तिला फारच लाडावून ठेवलं होतं. दम्याच्या असंख्य उबळींची ती साक्ष होती. तिची चिडचिड, अस्वस्थता सारं काही ही माती समजून घ्यायची. ऊन माघारी फिरेपर्यंत ती वाडीतल्या गवतकाड्यांशीही हितगुज करायची. तिच्या हातांनी लावलेल्या प्रत्येक रोपटयांनी स्वत्त्वाची बीजं रोवली. फळ-फूल ही तर आमच्या अंगणाची शान.

परसात लिंबाच्या झाडाखाली एक गोल दगड असायचा. तो आमचा बालपणीचा देव. भातुकलीचा खेळ ही त्याच झाडाखाली वसलेला..आई झोपल्यावर चोरुन आणलेला मीठ मसाला, चिंचेचं, कैरीचं करमट, कच्ची पपई मीठ मसाला लावून खाणं ह्या सगळ्यांचा तो एकमेव साक्षीदार. घराच्या मागच्या बाजूला म्हणजे पडवीत जिथे आम्ही चूल पेटवायचो तिथे एक करवंदाचं झाड होतं. सफेद, गुलाबी, लालसर अशा त्या बहरलेल्या झाडाचं मला फार आकर्षण होतं. आजीचं आणि त्या असंख्य पानाफुलांचं काय नातं होतं कोण जाणे पण घरापेक्षा ती त्यांच्यातच जास्त रमायची. तरी घरातल्या प्रत्येक वस्तूला तिची सवय होती. नीटनेटकेपणा, स्वच्छता, धू-चोळ यांतच तिचा दिवस निघून जायचा;

आणि आज ती निघून गेल्यावर व घरही निघून चालल्यावर तिच्या आठवणींनी मन कासावीस होतंय. तिची चिडचिड,बडबड आज हवीहवीशी वाटते. 'माणूस मेल्यावरच आपण हुंदक्याने जपतो.'

तिच्या हाताची चव आजही ओठांवर रूळत रहाते. तोंडात जमा होणाऱ्या लाळेसारखी..तिचं ते ठेंगणं गोरंपान रुप, लांबसडक मऊ केस, सोज्वळ हसू आणि वयोमानानुसार कमरेला आलेला बाक त्यातूनही तिची स्वयंपाक घरातली लुडबूड, साजूक तुपातले सर्वच पदार्थ, तिच्या हातचं आंबटवरण याची सर कशालाच नाही. आयुष्यात कुणीतरी असं असावं जे उतू गेलेल्या सायीसारखं माया करेल असं वारंवार वाटतं.संस्कारांची सक्षम पुंजी तिने हाती दिली. तिच्या खूप साऱ्या आठवणी हृदयाच्या कुपित कायम बंदिस्त रहातील यात वादच नाही. लहानपणी माझ्या वाढदिवसाला तिने कोऱ्या करकरीत दहा रुपयांच्या नोटांचा हार केला होता. त्याची किंमत फारशी नसली तरी माझ्यासाठी ते तेव्हाही मौल्यवान होते आणि आजही! म्हणजे त्याची किंमतच करता येणार नाही. कोण म्हणून आनंद झाला होता त्यावेळी. एकत्र कुटुंबातली ती नात्यांची गर्दी मनावरून सरता सरत नाही. मोदकाच्या पारीप्रमाणे तिने गोडव्याने सारं सांधल होतं.



'रडत माझे बाळ तान्हे
समजाविता राहीना
नानापरी समजाविले
मागितले खाया देते
थापटोनी निजविते
हलविते पाळणा~~~
समजाविता राहीना...'

हृदयाच्या कप्प्यात कायम हा पाळणा झुलत असतो. तिच्या सुरकुतल्या हातांनी कितीक पाळण्यांची दोरं हलवली कोण जाणे. पण आमच्या आयुष्याची घट्ट नाळ आणि दोर आईपेक्षा तिच्याच हातात कायम राहिली त्यामुळे संस्कार शिकावे लागले नाहीत. आदर आणि मायेचा पदर याची सर आज कुठल्याच नात्याला नाही पण तिच्या शिकवणीची दोर मात्र आयुष्य कैद करुन गेली. ती गेल्यानंतर असंख्य हुंदक्यांनी तिला जपलं..तेवढंच मागे ठेऊन गेली ती. तिच्या आठवणींच्या गोतावळ्यात संस्काराची पुंजी आमच्या हाती सूपूर्त करून...

तिच्या सोवळ्याओवळ्याचा त्यावेळी राग यायचा, आज मात्र आयुष्याच्या डिजिटल पेजवरची धूळ खुणावत राहाते. मिळकतीच्या हातांना सवड काही मिळत नाही. सणवारी कोळीष्टके झटकताना हमखास तिचा कल्ला आठवतो. बडबडीची लाखोली अन् स्वच्छतेची पारायणं यात बालपण सरलं.

शेणामातीचे अंगण, ती ओलेती शिंपण, वर फटक पांढरी रांगोळी, त्यावर हळद कुंकवाची चिमुटधार कोंबडयाची बांग, चिऊची मातीत अंगमोड, इवलाल्या चोचीत दाण्याचे कण चिंचा बोरींचा ऐब, प्राजक्ताचा सडा, गुलमोहर, सायली, गुलाब, जास्वंदी या साऱ्यांनी अंगणाची शोभा कायम दुणावली. त्यामुळे कायम मातीची पायाशी लोळण.. आज काँक्रिटच्या खरबरीत स्पर्शाने निब्बिड होत जाते चामडी; पण पर्याय नाही. जिथे पाणी विकलं जातं तिथे मातीचा लिलाव सहज. आजच्या पिढीला या सर्वांचा गंधही नाही याचं वाईट वाटतं. पूर्वी घरात टीव्ही नसल्याने आजीच्या गोष्टी म्हणजे चांदोमामा पेक्षाही भारी..एक तीळ सात जणांनी कसा वाटून खाल्ला, ती राजा आणि त्याच्या सात मुलींची गोष्ट, ती टुणुक टुणुक भोपळ्यातली आज्जी, ते आपडी थापडी गुळाची पापडी गाणं, झिम्म पोरी झिम्म, ते मामाचं पत्रं, खांब खांब, लगोरी, विटीदांडू, लपाछुपी या सगळ्याची जागा आता लॅपटॉप, मोबाईलने घेतली त्यामुळे आजी टीव्ही सिरियलसारखी सिरिएस झाली आणि सुरक्षित कोपरा धरून बसली. आमची आजी मात्र सायंकाळी निरांजनाच्या नाजुक वाती, गणपतीला रंगीत, शंकराला शुभ्र वस्त्र वळत बसताना कसली तल्लीन असायची. जणूकाही आपल्या बाळासाठी दुपटीच विणतेय. आता सगळं रेडिमेड मिळत कापसाच्या वातीपासून तें वस्त्रापर्यंत पण त्या वातीना बोटांचा रेशीम स्पर्श नसतो. तो देवाप्रती भाव नसतो.

लहानपणी चिवडा,लाडू,चकली यांकरीता दिवाळीची वाट पहावी लागायची नाही. रोजच दिवाळी अन् दसरा. साजुक तुपाचा घमघमाट, केळीच्या पानावर मीठ, लिंबू, लोणचं, कोशिंबीर, पापड, भजी, भाजी, केळ्याचं शिकरण, दही, खीर, वरण भात, वर तुपाची धार..पुरी, चपाती, भाकरी काय वाट्टेल ते पंचपक्वान्न, लहानमोठ्यांची पंगत एकत्र बसून ते 'वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे'..अहाहा..! कसली ती ईश्वरी अनुभूती.. हल्ली मात्र कुणाच्याच वेळा जमत नाहीत आणि जमल्यातरी, बिगबॉस, सिरियल यामुळे जेवणाला बेचव. माझी आजी मात्र सुगरण होती. प्रत्येक पदार्थ ती जीव ओतून तर करायचीच पण तितक्याच आग्रहाने खाऊ घालायची त्यामुळे तृप्तीचा ढेकर यायचाच. तिच्या तोंडुन येणाऱ्या म्हणी, ओव्या, गाणी म्हणजे आमच्यासाठी पर्वणीच. तिच्या आठवणींचा किती सर्वा वेचू काही कळत नाही. अण्णाई, इंदिरा, चंद्रभागा, अंबु या कोणत्याही हाकेत ती सर्वांची होऊन जायची.

एकत्र कुटुंबाची वीण तिने घट्ट विणली होती. अण्णा गेल्यानंतर मात्र ती फार वर्ष नाही राहिली. अण्णा म्हणजे माझे आजोबा. त्यांच्या 'चिंतामण' या नावातच ईश्वरी अनुभूती होती. त्यांच्या 'खंडन भव बंधन तव वंदन...' या आरतीने सांजेचा दिवा तेलातुपाला आलिंगन देऊन इवल्याशा प्रकाशात अवघा देव्हारा उजळवायचा. त्या सात्त्विकतेला मन आसुसतं. हल्ली कुणाला आरतीला उभं राहण्याइतका वेळ नसतो. देव हया शब्दालाच छेद देत आजची पिढी, 'बी प्रॅक्टिकल'..'एकविसावं शतक आहे' वैगरे लेक्चर देऊन आपल्यालाच गप्प बसवते. पण आमच्या लहानपणी आम्ही मात्र झांझारतीत मग्न होऊन जायचो.

मनोमन खुप काही मागायचो. ती श्रद्धा भाबडी असली तरी त्या सात्त्विकतेत प्रचंड ऊर्जा असायची. एक प्रकारची पॉझिटिव्ह एनर्जी...आरती म्हणजे एकत्र कुटुंबात सगळ्यांना बांधुन ठेवणारी अर्चाच असायची.

एकत्र भोजन, गप्पाटप्पा यामुळे विचारांची देवाणघेवाण व्हायची. मतमतांतरे असायची पण मनभेद नव्हते. अण्णा नेहमी म्हणायचे, ‘कुठल्याही गोष्टीचा तळ शोधताना नितळपणा हरवू नये.' खूप छोट्या छोट्या वाक्यात ते आयुष्याचं तत्त्वज्ञान शिकवून जायचे. म्हणूनच की काय द्वेष मत्सर हा आजुबाजूला कधी फिरकलाच नाही. अण्णा म्हणायचे, 'बाय आपण समोरच्याचा स्वभाव नाही बदलू शकत आपण बदलायचे..'किती साधं सोप्पं बोलून जायचे. आज त्याचा अर्थ उमगतोय. या व्यवहारी जगात अण्णांची शिकवण मार्गस्थ होतेय. व्यवहारावरून आठवलं. पै पै च्या हिशोबाची त्यांची चोपडी, एक आणा, चाराणा यापासून नोटांपर्यंत सगळ्याचा दैनंदिन हिशोब. त्या चौपडीचा कोपरान् कोपरा त्यांच्या वळणदार अक्षराने भरलेला असायचा. आता कदाचित तो कंजूसपणा भासेल पण ते परिस्थितीला मार्जिन न आखता मांडलेलं व्यवहारीपण होतं असं मला वाटतं.

अण्णांचा हात धरून मंदिरात भजन कीर्तनासाठी जाणं. स्वामी विवेकानंद, परमहंस, माताजी यांच्या गोष्टी श्रवण करणं त्यामुळे भक्तीचे कान तयार झाले. अण्णांचा त्यावेळचा पेहेरावही खास धोतर, कुर्ता वर जॅकेट, खांद्यावर शाल आणि गांधी टोपी. अहाहा! काय ते रुप..नुसत पहात रहावं आणि त्यांच्या सोबत आपणही रुबाबात पाऊल टाकावं.

आज अण्णा असायला हवे होते. आधी उपभोगलेल्या सर्व जाणिवा बोथट होताना योग्य तो सल्ला द्यायला.जुनी माणसं आयुष्य गिरवून गेली...लहानपणी  मुंबईला असताना पप्पा रागावल्यावर अण्णांना लिहिलेली पत्रं आठवतात, 'तुम्ही मला इथून घेऊन जा.' हे बोचरे शब्द आठवले, की त्या अल्लडपणाचे हसूही येतं आणि त्या जाणीवेचं दुःखही वाटतं..हल्ली पत्र हा शब्द सुद्धा दुर्मीळ झालाय..हां अधुनमधून ‘चला हवा येऊ द्या’ च्या सेट वर अरविंद जगताप यांच्या शब्दांतून आणि खाकी पेहेरावातून सागर कारंडे छान रंगवतो. पण तेही कितीसे पाहिले, ऐकले जाते आणि त्याच्याशी आत्ताची पिढी किती समरस होते हेही कोडंच, नातेसंबंध, जिव्हाळा हे शब्द फार बोथट होत चाललेत. इमोशनल ब्लॅकमेल असं काहीतरी बोललं जातं त्याला. हल्ली टीव्हीवर येणारी ती चहाची जाहिरात मला फार आवडते, ‘हमारे यहाँ रिश्ते हाथ से नही चाय से बनते है।' या एका वाक्यातून किती दुरावा सरला. वाह! असं काहीतरी पहायला, ऐकायला मिळायला हवं. पूर्वी आम्ही लहान असताना अण्णा सकाळी रेडीओ लावायचे, त्यावर हमखास ‘घन:श्याम सुंदरा श्रीधरा' ही भूपाळी लागायची आणि सकाळ कशी प्रसन्न, प्रफुल्लित व्हायची. त्यावेळचे हे काहीसे सूर्यकिरण दारात पडण्याचे क्षण नाही अनुभवता येत आज. कडक पावाचे चार तुकडे चहात भिजवून खाण्यात जी मजा होती ती ह्या मस्का खारीत नाही हेच खरं!

अण्णा, आजी निघून गेले तेव्हा मी माझ्यातली दोन स्वत्त्वाची माणसं गमावली. मनातून वजा होत जाणारी ही माणसं आयुष्यात बेरीज करायला शिकवतात. आयुष्याची ही कोरडी जाणिवच कदाचित माझ्या आजवरच्या लिखाणाची मार्जिन झाली.

आज सकाळी एफ बी वरची ती बातमी वाचली आणि अस्वस्थ झाले. परदेशी असलेल्या मुलाला, सुनेला, नातवाला वृध्दाश्रमात मेलेल्या आईला, सासूला, आजीला अग्नि देण्याइतका वेळ नाही. “पैसे पाठवतो विधी उरकून घ्या "...किती सोप्प झालंय सारं. जन्मदात्या आईच्या मृत्यूचंही दुःख नाही. जिच्यामुळे हा जन्म ही पुसटशी जाणीवही नाही. या साऱ्या विचारांनी मी सुन्न झालेय. म्हणूनच की काय आज रांगत्या बाळासारख्या आठवणी लुडबूड करताहेत.

मातीची धूळ गेली कॉन्क्रीटची जंगलं झाली तशीच नात्यांतली हिरवळ संपली आणि सगळ्याला आर्टिफिशियल लुक आला. ऐसपैस जागा गेली आणि चौकटीचा महाल झाला. कंदील गेला, दिवे गेले, झुंबर आलं..जुनं जुनं..नकोसं झालं, जुन्याची अडगळ झाली तशी नातीही जुनी झाली. पॉप,डॅड,मॉम या साऱ्यात आजी फारच सुरकुतली...वृध्दाश्रमात तिची वस्ती झाली.

आज घरावर बुलडोझर फिरणार याचं जितकं वाईट वाटतंय ना, तितकंच एका गोष्टीचं समाधानही वाटतंय, की अण्णाई, ही नात्यांची पडझड आणि अंगणातली हिरवळ जमीनदोस्त होताना पहायला तुम्ही नाहीत..फार बरं झालं!

**डॉ.पल्लवी परुळेकर-बनसोडे**

संपादिका - 'अधोरेखित ' दिवाळी अंक



# काळ

घेणार काळ आहे , साधून डाव आता

बेशिस्त माणसावर, होणार घाव आता.

वाईट वेळ येता, धावून कोण येतो

घेतील सोंग सारे आणून आव आता

होता जिवंत तेंव्हा, भेटीस कोण आले?

मयतीस आज आला झाडून गाव आता

कष्टास या बळीच्या, जाणून कोण घेतो?

घेणार माळ जो तो, पाहून भाव आता

खोटेच काम सारे, खोटाच दाम त्यांचा

सत्तेत यावयाची, भलतीच हाव आता

शिरकाव काल झाला, रानात पारध्यांचा

गाफील पाडसांचा घेणार ठाव आता

**अजय अंबादास देशपांडे**



# जलदिव्य

विठ्ठल तत्त्वाला स्पर्श केलेल्या तुकारामांची भक्ती अंतरीच्या उमाळ्याने त्यांच्या अभंगातून उतरू लागली. बोली भाषेतील त्यांचे स्पष्ट व सोप्या भाषेतले अभंग त्या वेळच्या समाजमनाला भिडले, त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेचे अभंग जीवनातील मौलिक सिद्धांत, त्यांनी अभंगासारख्या सोप्या वृत्तांत मांडले. त्यांच्या साधुत्वाची व अभंगांची कीर्ती लोकांना भुरळ घालू लागली, पण रामेश्वर भट्टाना तुकोबांची कीर्ती सहन होईना. तुकारामांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, नाथ भागवत, इत्यादी ग्रंथ आपल्या स्वतंत्र प्रज्ञेतून वाचले. बाबाजी चैतन्यांच्या गुरूपदेशातून त्यांची वृत्ती परातत्त्वाला स्पर्श करण्याइतकी समर्थ झाली. उपनिषदे व वेद यातील सार उत्कृष्टपणे त्यांच्या अभंगातून उतरू लागले. याचा सर्वसामान्य लोकांवर परिणाम होऊन, रूढीप्रमाणे चालत आलेली धर्मकृत्ये लोक करीनासे झाले. याचा परिणाम भिक्षुक ब्राह्मणांच्या मिळकतीवर झाल्यामुळे ब्रह्मवृंद नाराज झाला.

तुकाराम शूद्र आहेत, त्यांनी आपल्या अधिकार क्षेत्राच्या बाहेर पाऊल टाकले, असा आरोप त्यांनी तुकारामांवर केला. त्यामुळे रामेश्वर भट्ट स्वतः देहूस आले. त्यांनी स्वतःच्या विद्वत्तेच्या जोरावर बुवांचा तेजोभंग करावा असे ठरविले.

ते प्रथम एका ग्रामाधिकाऱ्याकडे  गेले व अशी तक्रार केली की, तुका जातीचा शूद्र असून आपल्या अभंगात श्रुतीचा अर्थ सांगतो, हरी कीर्तन करून लोकांना मोहिनी घालतो, ब्राह्मणांनी शूद्र नमस्कार करावा हे आम्हास लांच्छनास्पद आहे. हे ऐकून ग्रामाधिकाऱ्याने, तुकोबांच्या वर्तनाचा संताप येऊन, त्यांनी देहूच्या पाटलास चिठ्ठी पाठविली की तुक्यास गावाबाहेर काढावे. देहूतील लोकांनी ही चिट्ठी वाचली व तुकोबास दाखविली. तेव्हा तुकोबांनी असा विचार केला की वाघोलीस रामेश्वरभट्टाच्या घरी जाऊन ते काय म्हणतात ते पहावे. त्याप्रमाणे ते त्यांच्या समोर जाऊन कीर्तन करू लागले. तेव्हा रामेश्वर भट्ट म्हणाले, “तू जातीचा शूद्र, कीर्तनात अभंग म्हणतोस, त्यात श्रुतींचा अर्थ उमटतो, वेदांचा अर्थ सांगण्याचा अधिकार तुला नाही. तुझे वर्तन अगदी शास्त्रबाह्य आहे. म्हणून यापुढे अभंग रचण्याचे सोडून दे आणि आतापर्यंत केलेले कवित्त्व इंद्रायणीच्या पाण्यात सोडून दे.”

अवश्य, असे म्हणून बुवा तेथून परतले आपली बाजू मांडताना विनयाने पण निक्षून त्यांनी सांगितले कोणत्याही तऱ्हेचे अनाधिकारी कृत्य करण्याचा माझा स्वभाव धर्म नाही. भगवत भक्ती हे प्रभोपदी जाण्याचे एकमेव साधन आहे.

मी श्रुतींचा अर्थ सांगतो, ते माझ्या मुखातून परमेश्वराची वाणी येते. असे असताना या देववाणीला मी आळा कसा घालू. तुकोबांनी आपल्या कवित्त्वाचा सर्व भार देवाच्या माथी टाकल्याने, रामेश्वर भट्टांना निकाल देताना फार विचार करावा लागला. त्या वेळच्या धर्मशास्त्राच्या आधारे त्यांनी तुकोबास जलदिव्याची शिक्षा दिली. तुकोबांनी पांडुरंगाला साष्टांग नमस्कार घातला व त्यांनी त्यां शास्त्राला शरण गेल्याशिवाय परमेश्वर प्राप्ती नाही. ही उक्ती त्यांनी आचरणात आणून खरी केली. शास्त्र शरणागती आली की त्याचा पाठीराखा परमेश्वर असतो याची त्यांना खात्री होती.

त्यांनी, त्यांचा विक्षोभ बाहेर दर्शविला नाही, पण वह्या नदीत बुडविताच, त्यांनी विठ्ठलाच्या नावाने टाहो फोडला. ज्या देवाने माझ्या तोंडून अभंग वदविले, त्यानेच माझ्यावर असा प्रसंग का आणला. त्यांची तडफड सुरू झाली. त्यांचे भांडण धर्मशास्त्राशी नव्हते, ते होते नारायणाशी.

संसारातील क्षणभंगुरता व अशाश्वतता याबद्दल त्यांची खात्री झाली होती. निराशेचा काळोख त्यांच्यापुढे पसरला होता. त्यांच्या मनात आले, 'देवा, तू जर माझ्या मागे नसशील, तर हे जीवित ठेवण्यात तरी काय अर्थ? या क्षणापासून आता तुझी प्रचिती येई पर्यंत मी अन्न पाणी घेणार नाही. मग भले माझा देह जावो. असे म्हणून तिथल्याच एका शिळेवर देह टाकून ते पडून राहिले. ना अन्न ना पाणी तुकारामाने महानिर्वाण मांडले.

ज्या परमेश्वराने कवित्व स्फूर्ती दिली, त्यानेच आता हे ग्रंथ तारावेत डोळे मिटवून, त्या शिळेवर ते तेरा दिवस पडून राहिले. त्यांच्या आयुष्यातील हा अगदी निर्वाणीचा प्रसंग होता. तुकारामांना आता स्वदेहाचे औत्सुक्य राहीले नव्हते. त्यावेळी त्यांची पत्नी आवली- तिच्या हृदयात दुःखाचे कोलाहल माजले होते. ज्या भगवंताची त्यांनी इतके दिवस सेवा केली, तो देव त्यांच्या पाठीशी उभा राहील का?

तिच्या जीवाची तळमळ चालू होती. तुकारामांचे अभंग इंद्रायणीत बुडवल्यावर तीसुद्धा तुकारामांजवळ येऊन त्यांची अहोरात्र सेवा करू लागली.

दिवसा मागून दिवस जात होते. देहूच्या व आजूबाजूच्या परिसरातील लोकांमध्ये या प्रसंगाने फारच उलथापालथ झाली होती. तुकाराम असे काहीतरी करतील, असे तेथील ब्रह्मवृंदांना वाटले नव्हते. काही लोक सोडले, तर बहुतेकांना पश्चाताप होत होता. गावात लोक वेगवेगळी संभाषणे करीत होते. पण सर्वांचा अर्थ एकच होता की तुकारामाने उपोषण सोडावे. त्या दृष्टीने गावातील काही प्रतिष्ठित लोकांनी प्रयत्न केले. पण आपली पत्नी व मुले यांचेही ज्यांनी ऐकले नाही, ते लोकांना काय दाद देणार. विठ्ठलावरील निष्ठा हेच त्यांचे आयुष्य होते. अशाप्रकारे तेरा दिवस निघून गेले. चवदाव्या दिवशी पहाटेस एक आश्चर्य घडले. त्या पाण्याच्या पृष्ठभागावर तुकाराम बुवांच्या अभंगाच्या वह्या तरंगत असताना गावकऱ्यांना दिसल्या.

ही बातमी वाऱ्यासारखी सबंध देहूत पसरली. ते आश्चर्य पाहण्यासाठी लोकांच्या झुंडीच्या झुंडी इंद्रायणीच्या डोहापाशी गर्दी करू लागल्या.

अभंगांचे तरंगणारे बाड लोकांनी डोहात उड्या मारून मोठ्या गौरवाने परत आणले. तेरा दिवसांच्या उपवासामुळे तुकारामांना अत्यंत शीण आला होता. आजूबाजूचे सर्व लोक त्यांच्याजवळ आले.

जिजाबाईंचा आनंद गगनात मावेना! तिने मनोभावे देवाला नमस्कार केला. तुकोबांच्या डोळ्यातून घळघळ अश्रू वाहू लागले. चवदाव्या दिवशी जेव्हा अभंगांच्या वह्या पाण्यावर तरंगू लागल्या, तेव्हाच श्रीहरीने त्यांना साक्षात दर्शन दिले होते. स्वतःविषयी किंचितही मोठेपणा न वाटता ते सद्गतीत होऊन देवाला बोलू लागले, 'तू सतत भक्तांच्या पाठीशी उभा राहतोस.

हे माहीत असून सुद्धा मी तुला त्रास दिला. मी उतावीळ झालो; आणि तुझ्यासारख्या कृपानिधीला संकटात टाकले. पण तू म्हणजे कृपेचा सागर, तूच आता माझ्या हृदयी वास कर. असे तृप्तीचे उद्गार तुकारामांच्या मुखातून आले. त्यानंतरचे त्यांचे आयुष्य म्हणजे केवळ भगवंत भक्तीच होती.

तुकारामांच्या खटल्यातील निवाडा रामेश्वर भट्टानी दिल्यावर ते नागनाथाच्या दर्शनाला निघाले. नागनाथावर त्यांची अत्यंत श्रद्धा होती. परंतु वाटेत अनगड शहा नावाचा अवलिया राहात होता. त्याच्या बागेतील विहिरीवर, त्यांनी स्नान केले. ते अनगड शहाला आवडले नाही. त्याने रामेश्वर भट्टांना शाप दिला, की तुझ्या शरीराचा दाह होईल. रामेश्वर भट्ट यांच्या शरीराचा दाह कशानेही कमी होईना, तेव्हा ते आळंदीस येऊन ज्ञानदेवांची सेवा करू लागले. तेथे त्यांना दृष्टांत झाला, 'की देहूस तुकाराम महाराज आहेत, त्यांना शरण जा म्हणजे तुझा दाह शांत होईल'. ते देहूस येण्यास निघाले, तोपर्यंत त्यांच्या कानावर अभंग वह्यांचे भगवंताने रक्षण केले ही वार्ता पोहोचली होतीच. अखेरीस, तुकोबा ही देवाला प्रिय असलेली विभूती आहे, हे समजल्यावर ते अनन्य भावाने त्यांना शरण गेले. त्यांचा सर्व अहंकार पळून गेला व अत्यंत शुद्ध मनाने त्यांनी तुकोबांना पत्र लिहिले. त्यात त्यांची खूप स्तुती केली. त्यांच्या अंगाचा झालेला दाह व ज्ञानेश्वरांचा दृष्टांत याचा वृत्तांत कळविला. त्या पत्राचे उत्तर म्हणून तुकोबांनी एक अभंग लिहून पाठविला.

*चित्त शुद्ध जरी। शत्रू मित्र होती II व्याघ्रही न खाती I सर्प तया II*

रामेश्वर भट्टानी अभंगाचे वाचन केले; आणि त्या क्षणीच त्यांचा दाह शांत झाला. मनही अत्यंत निर्मल झाले. ते तुकोबारायांचे परमभक्त झाले. त्यांनी तुकारामांवर स्तुतीरूप आरती लिहून त्यांच्या पायावर मस्तक ठेवले. आता तुकारामांच्या बाबतीत कोणाच्याही मनात राग नव्हता. ते सद्गुरु सत्पुरुष म्हणूनच ओळखले जाऊ लागले.

तुकोबांची सगुण भक्ती लोकप्रिय झाली होती. त्यांची विठ्ठल भक्ती 'मा फलेषु कदाचन' अशी असल्याने तेथे देवाणघेवाण, असा व्यवहारीपणा नव्हता. त्यांनी आपला देह पांडुरंगाचरणी अर्पण केल्यासारखे होते. ते अत्यंत निगर्वी आणि शालीन असल्यामुळे त्यांच्या गोड स्वभावाने, त्यांनी आजूबाजूचा परिसर आपलासा केला होता. जलदिव्य पार करून आलेले तुकोबांचे अभंग लोकांच्या मनात ठसले होते. मुखात बसले होते.

शके १५७० उलटून गेले होते. फाल्गुन वद्य प्रतिपदेच्या रात्री ते कीर्तनाला उभे राहीले. कीर्तनामध्ये भक्ती प्रेम ओसंडून वाहत होते. त्यांचा आनंद त्यांच्या पोटात भरून व ब्रह्मांड व्यापून राहिला होता. बीजेच्या दिवस होता. लोक देहभान हरपून कीर्तन ऐकत होते.

त्याचवेळी सर्वांना परतत्त्व स्पर्शाचा भास होऊ लागला. सर्वजण आनंदात डोलत असतानाच तुकाराम महाराज लोकांना सांगू लागले, 'पहा, खरोखर आज वैकुंठपीठ घरी आले आहे;' आणि बघता बघता ते कुडीसहीत गुप्त झाले. ते अनंतात विलीन झाले. पण त्यांच्या भक्तीपूर्ण अभंगांमुळे ते अमर झाले.


**श्रीमती वैशाली कुलकर्णी**







गौरी मोहिते



**गौरी मोहिते**

# दहा वर्षांनंतर....

प्रेमविवाह करायला घरून परवानगी असली तरीही प्रत्येक मुलीचा प्रेमविवाह होईलच असे नाही. आता दळवींकडे पहा. त्यांना दोन मुली. पहिलीचा प्रेमविवाह झाला. ऑफिस मध्ये बॉसशी मैत्री झाली आणि पाहता पाहता लग्नच ठरलं. त्यांचा प्रेमविवाह साऱ्या ऑफिसने साजरा केला. रजिस्टर पद्धतीने लग्न झालं. कारण बॉसचं हे दुसरं लग्न होतं. पण दळवींच्या संगीताने ते स्वीकारलं होतं. दळवींची दुसरी मुलगी प्रज्ञा ही मात्र फार चोखंदळ होती. तिच्या बऱ्याच अटी होत्या. प्रेमात वगैरे पडण्याचा तर तिचा स्वभावच नव्हता. दळवीसाहेब काळजीत पडले, की आता लग्न जमवायचं कसं? तेव्हा दळवींचे मोठे भाऊ तात्या, यांनी एक स्थळ सुचवलं. मुलगा बेंगलोरला असतो पण तो दिवाळीच्या सुट्टीत इकडे येणार आहे. मुली पाहणार आहे. प्रज्ञाला ‘मुली पाहणार आहे’ हा शब्दच पसंत नव्हता. ‘मुली पाहणार आहे काय? मीच त्याला पाहायला जाईन.' तिने जाहीर केले.

दिवाळीच्या सुट्टीच्या आठ दिवसांच्या काळात मोने परिवारातील मुलगा मिलिंद, मुंबईत आला होता. त्याचा आठही दिवस मुली पाहण्याचा कार्यक्रम होता. शेवटच्या दिवशी प्रज्ञाचे स्थळ पाहायला तारीख मिळाली. प्रज्ञाच त्याला दादरला प्रीतम रेस्टॉरंटमध्ये जाऊन भेटणार होती. मुलगा पसंत पडला तर पुढच्या गोष्टी होणार होत्या. ठरल्याप्रमाणे मुलगा दादरला अगदी वेळेवरच प्रज्ञाने सांगितलेल्या ठिकाणी आला. रेस्टॉरंट मध्ये समोरासमोर बसले. तो प्रथम काय बोलतो यावर प्रज्ञाचे लक्ष केंद्रित झालं होतं.

तो मोकळेपणी म्हणाला,” बरं झालं तुम्ही मला इकडे बोलवून घेतलं. घरी आजूबाजूला सगळी मोठी मंडळी असतात आणि पाहायला गेल्यावर मुलीशी काही बोलणं होत नाही हो.” यावर प्रज्ञाने एक गोड स्माईल दिले. मग काय जॉब आहे, किती काम करावं लागतं वगैरे विषय निघत गेले. प्रज्ञाच्या लक्षात आलं हा देखील आपल्यासारखा वर्कोहोलिक आहे.

‘लग्नानंतर आपण राहणार कुठे?’ या तिच्या अचानक आलेल्या प्रश्नावर मिलिंद सावधपणे म्हणाला, ”ते ठरवू आपण. तुम्हाला बंगलोरला आवडत असेल तर तेथे या. नाहीतर मी मुंबई ऑफिसला बदली करून घेईन. स्वतंत्र राहायला मला पण आवडेल. आपण मुंबईत एक फ्लॅट घेऊया.”

“मलाही तुमच्या बरोबर राहायला आवडेल.” प्रज्ञा नकळत बोलून गेली.

मिलिंद क्षणभर गप्प बसला. मग प्रज्ञाचा हात हातात घेऊन म्हणाला,”मी हा होकार समजू ना?" प्रज्ञाने त्याच्या हातावर आपला हात ठेवला आणि मानेने होकार दिला.

दोघेही रेस्टॉरंटच्या बाहेर पडले. पण दोघांनाही एकमेकांना सोडवत नव्हतं. मग कुठेतरी फिरत फिरत जाऊन आईस्क्रीम खायचं ठरलं.

त्याप्रमाणे त्यांनी एक आईस्क्रीम पार्लर शोधलं. दिवस दिवाळीचे होते म्हणून तेथे काही गर्दी नव्हती. आईस्क्रीम खाताना दोघांचाही चॉईस बटरस्कॉच आईस्क्रीम होता. दोघांना आश्चर्य वाटलं. एकमेकांशी बोलताना कळलं की बऱ्याचशा आवडीनिवडी जुळतात.

“आता फक्त एकच प्रॉब्लेम आहे.” मिलिंद म्हणाला. प्रज्ञाने प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले. “काल एक मुलगी पाहायला गेलो होतो. तेथे आईने हो कळवून टाकले आहे. पण मला विशेष पसंत नव्हती ती. म्हणून आईला न सांगता मी ही मुलगी, म्हणजे तुम्हाला पाहायला आलो आहे. तुमचे काका हे माझ्या वडिलांचे दोस्त आहेत. त्यांनी सुचवले हे स्थळ.”

“ती मुलगी मुंबईतली आहे का?” प्रज्ञाने विचारले.

“नाही. बाहेरगावची आहे. तिला नोकरी नाही. घरातलं सगळं व्यवस्थित करते या माहितीवर आई खूष झाली आणि होकार देण्यासाठी माझ्यावर प्रेशर आणलं.”

“मग आता काय करणार आहात?” प्रज्ञाने विचारले.

“मी माझी ही पसंती घरी जाहीर करून टाकतो आणि त्या मुलीला नकार कळवतो.” मिलिंद म्हणाला. प्रज्ञाचा दाखवण्याचा कार्यक्रम दोघांच्या मोकळ्या स्वभावामुळे लगेचच निर्णयापर्यंत आला. प्रज्ञाने मुलगा पसंत केला. दळवींच्या घरी आनंद उसळला. मिलिंद यांना रविवारी घरी बोलवायचं ठरलं. पण तो दुसऱ्या दिवशी बंगलोरला जाणार होता. मिलिंदच्या आईचा प्रज्ञाच्या आईला फोन आला. यावरून प्रज्ञाने काय तो अंदाज केला की आधी जी कोण मुलगी पसंत केली होती तिला नाही सांगितलेलं दिसतय. लग्नाची तारीख अजून सहा महिन्यांनी काढावी असं ठरलं. तोवर फारशी वाच्यता करायची नाही हे दोन्ही पार्टीला मान्य होतं. यानंतर मात्र मिलिंद दर शनिवार रविवार फ्लाईटने मुंबईला येऊन प्रज्ञाला भेटू लागला. लग्नाची खरेदी हे निमित्त होतं. मुंबईला त्याने प्रज्ञाच्या पसंतीने वन बेडरूम किचनचा फ्लॅट बुक केला. त्या आनंदाप्रीत्यर्थ दळवी कुटुंबाने मिलिंदच्या परिवाराला घरी जेवायला बोलावले. तेव्हाच मिलिंदने प्रज्ञाला अंगठी देऊन छोटेखानी साखरपुडाही केला. मोने परिवारातील मुंबईचे नातलगही आमंत्रित होते.

पाडव्याचा मुहूर्त पाहून मिलिंद-प्रज्ञाच्या लग्नाच्या पत्रिका छापण्यात आल्या आणि पोस्टाने नाशिक, पनवेल, अकोला येथील नातलगांना पाठवल्या गेल्या. मुंबईतील आमंत्रणे प्रज्ञाचे आई बाबा स्वतःच करणार होते. पत्रिका पोस्टात टाकून चार दिवस नाही झाले तोच प्रज्ञाची नाशिकची सुलू मावशी लग्नघरी हजर झाली. ती मूळची कोकणातील होती. तिचा स्वभाव रोखठोक बोलण्याचा होता.

आल्याआल्याच तिने सरबत्ती सुरू केली. "घरच्या माणसांना असे कसे फसवता तुम्ही?” तिने सवालच केला. दळवी मंडळी गोंधळली. त्यांना अर्थ कळेना. “बंगलोरचा हा मिलिंद मोने मुलगा आमच्या शैलाला पाहायला आला होता. त्याच्या आईने होकारही कळवला होता. मग त्यांनतर प्रज्ञाचं लग्न त्याच्याशीच कसं काय ठरलं?

तुम्हाला काही रीतभात आहे की नाही? आमच्या मुलीचं लग्न मोडायला काहीच कसं वाटलं नाही?”
आता प्रज्ञाला उलगडा झाला की तिला पाहिला आलेला मुलगा नाशिकच्या सुलू मावशीच्या मुलीला पाहायला गेला होता आणि त्याच्या आईने तिला पसंती कळवली असावी.
“अगं सुलू, तुझा काहीतरी गैरसमज होतोय. तुमच्याकडे मिलिंद हा शैलाला पाहायला आला होता हे आम्हाला माहीत सुद्धा नव्हतं.” प्रज्ञाची आई वैशाली म्हणाली.
“आता माहित झालं ना? मग अजूनही त्या मुलाला नकार कळवून टाका. लग्न काय अजून झालेलं नाहीये.” तिच्या या बोलण्याने सर्वांना धक्काच बसला.
“अगं चार दिवसांवर लग्न आलंय. तू आशीर्वाद द्यायला आली आहेस की लग्न मोडायला आली आहेस?” प्रज्ञाच्या वडिलांनी विचारलं. सुलू मावशीला अनेक वर्षांपासून ते ओळखत होतेच. ती आक्रस्ताळी आहे हे त्यांना माहित होतं.
“तुम्हाला लग्न मोडायला काही लाज वाटत नाही मग मला बोलायला कशाला लाज वाटेल?” सुलू मावशी एकामागून एक आरोप करू लागली. तिची सरबत्ती थांबण्याचे काही लक्षण दिसेना.
“ठीक आहे. मी मिलिंदला फोन लावतो. त्याचं काय मत आहे शैलाबद्दल ते विचारू.” प्रज्ञाच्या बाबांनी मिलिंद यांना फोन लावला. सुलूमावशीसमोरच काय तो सोक्षमोक्ष लावायचे ठरवले. "स्पीकरवरच घेतो, ऐका सगळे."असं म्हणाले. रविवार असल्याने मिलिंद घरीच असेल हे त्यांना ठाऊक होतं. फोनवरून मिलिंद व मिलिंदची आई, दोघेही बोलले. शैला आईला पसंत पडली होती पण आपलं तिच्याशी विशेष जमलं नव्हतं असं मिलिंदने स्पष्ट सांगितलं. मिलिंद आणि प्रज्ञा दोघे आयटी क्षेत्रातील असल्याने त्यांना संवाद साधायला सोपं गेलं असं मिलिंदच्या आईने सांगितलं. सुलू मावशीचा चेहरा पाहण्यासारखा झाला. मिलिंदने तरीही सुलू मावशीला सॉरी म्हटले. आहे ती परिस्थिती स्वीकारून कृपया लग्नात आनंदाने सहभागी व्हावे असे आवाहन केले.
लग्न समारंभात सुलू मावशी मुलीसह उपस्थित होती. तिला हॉलवर यायला बराच उशीर झाल्यामुळे हॉलमधील नाश्ता संपला होता. त्याबद्दल तिने बराच आरडाओरडा केला.
तिची बडबड ऐकून कुणीतरी तिला बाहेरून बटाटेवडे आणून दिले. मग ती मुकाट बसली. मुलीकडची असल्याने ती फार दादागिरी करू शकत नव्हती.
प्रज्ञाच्या वडिलांनी त्यांच्या दोन तरुण पुतण्यांना तिच्यावर लक्ष ठेवायला सांगितले. लग्नाचे विधी सुरू असताना सुलू मावशी नेमकी वधूपक्षाच्या खोलीत शिरलेली त्यांनी पाहिली. तेथे ती काय करते हे पाहायला पुतणेसुद्धा तिच्या मागे गेले. ती एक बॅग उघडून काहीतरी चोरणार होती.
ऐनवेळी महत्त्वाच्या वस्तू सापडू नयेत आणि वैशालीताईची फजिती व्हावी ही तिची इच्छा होती.
पण दोघा पुतण्यांनी तिला हात धरून बाहेर काढले. मग ती चांगलीच वरमली आणि कोपऱ्यात जाऊन बसली.

वरपक्षाच्या लोकांनी तिला मानाची साडी दिली ती मात्र तिने हसतमुखाने घेतली.
लग्न नीट पार पडले. प्रज्ञा व मिलिंद तिथून बंगलोरला आणि तेथून ऑस्ट्रेलियाला फिरायला गेले. तेथून परत आल्यावर प्रज्ञा नोकरीसाठी मुंबईला पुन्हा माहेरी आली. मुंबईचा फ्लॅट ताब्यात येईपर्यंत त्यांना शनिवार रविवारच भेटता येणार होते. सुलू मावशी एकदा आपल्या बहिणीला भेटायला म्हणून प्रज्ञाच्या माहेरी आली आणि प्रज्ञा तिथेच राहत आहे हे पाहून तिच्या तिरक्या डोक्याला वेगळाच संशय आला.
"आता कसला नेतोय मिलिंद तिला बंगलोरला! तुम्ही फ्लॅट घेऊन दिल्याशिवाय तो काही प्रज्ञाला नेणार नाही." असे बडबडायला सुरूवात केली. खरे काय ते प्रज्ञाला माहित होते. तिच्या आई बाबांना मात्र राग आला. पण बाबा मुद्दामच म्हणाले,"हरकत नाही. घेऊन देऊ की त्याला फ्लॅट आम्ही आणि त्याच्याकडेच राहायला जाऊ म्हणजे झाले. जावई आम्हाला मुलासारखाच, नाही का? " प्रज्ञाची आई वैशाली स्वयंपाकघरात हसत होती. आता मात्र सुलू मावशीला जास्त काहीच बोलता आलं नाही. ती मुकाट नाशिकला निघून गेली.
चार महिन्यातच सुलू मावशीच्या लेकीचे, शैलाचे लग्न ठरले. स्थळ बडोद्याचे होते. सुस्थितीत होते. प्रज्ञाच्या घरी पत्रिका आली तेव्हा प्रज्ञाच्या फक्त माहेरच्यांनाच बोलावले होते. प्रज्ञाचा नवरा, सासू सासरे, कुणालाच आमंत्रण नव्हते. ते पाहून दळवी मंडळी शैलाच्या लग्नाला नाशिकला गेलीच नाहीत. आहेर मात्र पाठवून दिला. आता सुलू मावशीचे आणि प्रज्ञाच्या आईचे संबंध पूर्वीसारखे राहिले नव्हते. दोघी एकमेकींना फोनही करायचे टाळत होत्या. सुलू मावशीने लग्नात केलेला प्रकार विसरता येण्याजोगा नव्हता. दरम्यान प्रज्ञा आणि मिलिंदने कर्ज काढून मुंबईत जो फ्लॅट घेतला होता, त्याचा ताबा त्यांना मिळाला. मिलिंदने मुंबईत बदली करून घेतली आणि नवदाम्पत्याचा संसार सुरळीत सुरू झाला. दीड दोन वर्षात त्यांना एक मुलगी झाली. दळवी परिवार नातीच्या कौतुकात रमून गेला.
त्याचवेळी नाशिकहून प्रज्ञाकडे बातमी आली की शैला बडोद्याचे सासर सोडून कायमची नाशिकला माहेरी येऊन राहिली आहे. बहुधा तिचा डिव्होर्स होणार आहे. प्रज्ञाने ही बातमी घरी सांगितली तेव्हा प्रज्ञाचे वडील म्हणाले, "आई तशी मुलगी. आईचे संस्कार काय आहेत ते कळलं आपल्याला. मग मुलगी काय संसार करेल?"
पण प्रज्ञाच्या आईला, वैशालीताईंना आपल्या बहिणीबद्दल वाईट वाटत होतं. त्यांनी न राहवून बहिणीला फोन केला. तेव्हा सुलू मावशी खरे काय ते सांगायचे टाळत होती.
"हे बघ, काही मदत हवी आहे का सांग. मुलीचा संसार नीट झाला पाहिजे गं." वैशालीताई म्हणाली.
पलीकडून तोऱ्यात उत्तर आले, "काही नको ताई. आम्ही आमचं पाहून घेऊ. तुमच्या करणीचीच फळं भोगतोय आम्ही." सुलूने असं म्हटल्यावर वैशालीताईचा नाईलाज झाला. अखेर शैलाचा डिव्होर्स झालाच. तिचे वडील सज्जन गृहस्थ होते. मुलीच्या डिव्होर्समुळे धक्का बसून त्यांना हार्ट ऍटॅक आला आणि ते गेले.
ही दुःखाची बातमी कळल्यावर मात्र दळवी परिवार तडक गाडी करून नाशिकला सुलू मावशीच्या सांत्वनाला गेला. शैला रडतच होती.

आईला कसे सांभाळावे हे तिला कळत नव्हते.

प्रज्ञा आणि वैशालीताईंनी तिला आधार दिला. प्रज्ञाच्या वडिलांनी आपल्या साडूच्या तेराव्यापर्यंत सर्व विधी नीट करून घेतले. वैशालीताईंनी घर सांभाळले. प्रज्ञा येणाऱ्या जाणाऱ्यांचे पहात होती. त्यांच्या आर्थिक व्यवहारांची घडी नीट बसवून देऊन दळवी परिवार परत मुंबईला निघाला. निघताना, 'काही अडचण आली तर आम्हाला सांग.' असे बजावून जायला प्रज्ञाचे वडील विसरले नाहीत. तसेही शैलाला त्यांनी लहानपणापासून पाहिले होते. शैलाने आईची जबाबदारी घेतली आणि प्रज्ञाकडे कधीही फोन केला नाही. प्रज्ञाने कधी फोन केला तर ती जेवढ्यास तेवढे बोलत होती. 'कोणत्याही गोष्टीवर काळ हेच औषध असतं.' वैशालीताई मनात म्हणत होत्या. म्हणता म्हणता प्रज्ञाच्या लग्नाला दहा वर्षे झाली. प्रज्ञाच्या चुलतबहिणीचं, निशाचं लग्न ठरलं. लग्न समारंभ थाटात होणार होता. प्रज्ञाने पुढाकार घेऊन, सर्व जबाबदारी घेऊन हॉल बुक केला, मेनू ठरवला, पत्रिकाही सुंदर बनवली. निशाच्या वडिलांनी नातलगांची लिस्ट तयार केली. प्रज्ञाच्या बाबांनीही पार अमेरिकेपर्यंत आपल्या मित्रांची नांवे त्यात टाकली. पण दोन्ही पुतण्याच्या सूचनेवरून सुलू मावशीचे नांव या यादीतून गाळण्यात आले होते. वैशालीताई मधे पडल्या.

"आपल्या घरात लग्न असताना सुलूकडे का नाही आमंत्रण करायचं?" असा त्यांचा प्रश्न होता. तेव्हा दोघे पुतणे सांगू लागले की," सुलू मावशीने प्रज्ञाच्या लग्नात जाम राडा करायचं ठरवलं होतं. पण आम्ही तिला थोपवलं म्हणून ते टळलं." पुतण्यांनी वैशालीताईंना प्रज्ञाच्या लग्नातल्या अशा काही गोष्टी सांगितल्या,
 की ज्या वैशालीताईंच्या कानावर आजवर आलेल्या नव्हत्या. वैशालीताईंनी सर्व नीट ऐकून घेतले आणि म्हणाल्या,"आता त्या गोष्टीला दहा वर्षे झाली आहेत ना! या काळात जग खूप बदललं. सुलू मावशीच्या घरचंच घ्या. मुलीचा डिव्होर्स झाला. यजमान वारले. आता या सगळ्या घटनांनी तिचा स्वभाव बदलला असेल. ती पूर्वीसारखी वागणार नाही. पहा तुम्ही फोन करून."

"आई पण ती तशी वागणार नाही याची काय गॅरंटी?"

"त्यावेळची परिस्थिती लक्षात घ्या. तिच्या मुलीला सोन्यासारखं स्थळ मिळणार होतं. ते हातचं गेलं. म्हणून ती नाराज होती. नातलग असूनही आपण ते स्थळ लाटलं असं समजून ती आपल्यावर चिडली होती. आता दहा वर्षात हे सर्व किल्मिष वाहून गेलं असेल. आपण तिला माफ करून टाकूया." सगळे गप्प बसले. प्रज्ञाने स्वतःच फोन करायचे ठरवले.

"मी आमंत्रण करते. स्पीकरवर सगळे ऐका रे." असं म्हणून तिने फोन केला आणि स्पीकर सुरू ठेवला.

"हॅलो सुलू मावशी. मी प्रज्ञा बोलतेय. अगं निशाचं लग्न ठरलंय. तर तुम्ही दोघींनी यायचं बरं का."

"काय म्हणतेस प्रज्ञा? अगं एवढीशी निशा, तिचं आता लग्नसुद्धा ठरलं! अगं जरूर येणार! तेवढीच सर्वांना भेटायची संधी. आणि मी मोकळी आहे. लग्नघरी काम असेल तर सांग. मी येईन मदतीला." सुलू मावशीच्या या उत्तराने सर्व चाट झाले.

"हो, हो. अगं खूप काम आहे. तू आठ दिवस राहायलाच ये आईकडे." प्रज्ञा म्हणाली.

आठ दिवस नाही, पण लग्नाच्या आधी चार दिवस सुलू मावशी बहिणीकडे राहायला आली आणि देवदेवक, केळवण, घरच्या जेवणावळी या सगळ्या समारंभात तिने उत्साहाने मदत केली. निशाचे लग्न थाटात पार पडले आणि ती लग्नानंतर यू.एस.ला निघून गेली. दोघे पुतणे आपापल्या घरी गेले. प्रज्ञाच्या वडिलांची फिरतीची नोकरी असल्याने कधी कधी ते टूरवर असायचे. त्यामुळे वैशाली एकटीच घरी बसली होती. आज खूप दिवसांनी तिला आपल्या जुन्या दिवसांची आठवण येत होती.

मुलींची लग्नें होईपर्यंत, आई मुलींच्या जीवनाशी इतकी एकरूप झालेली असते की आपल्या वेगळ्या जीवनाचे तिला भानच उरत नाही. मुलगी योग्य हाती सोपवल्यावर, ती संसारात रमल्यावर आईची जबाबदारी कमी होते. मग तिला आपल्या स्वतःच्या जीवनाकडे पाहायला वेळ मिळतो. मग ती पूर्ण वेळ फक्त
आईच नसते. संसाराच्या ओझ्यात दबलेल्या तिच्या स्त्रीमनाच्या भावनाही पुन्हा एकदा उमलतात.

वैशालीभोवती आता आपल्या कॉलेजच्या जीवनातील आठवणींनी फेर धरला होता.

'बघता बघता पन्नाशीला आलो आपण. पण अजूनही त्याची आठवण पुसली गेली नाही.' ती मनाशीच म्हणाली. कॉलेजच्या फायनल इयरला केलेले ते नाटक... त्याचा दिग्दर्शक महेश कुलकर्णी आणि वैशाली यांची छान मैत्री झाली होती. मग एकमेकांच्या घरी चोरून झालेल्या गाठीभेटी.... लग्न ठरेपर्यन्त घेतलेले सारे निर्णय.... अन् अचानक संपुष्टात आलेलं ते नातं.

वैशालीला महेश तेव्हाही आवडायचा आणि आजही आवडत होता. पण त्यांचं लग्न मोडलं होतं. केवळ एका संशयावरून तो वैशालीला नाही नाही ते बोलला होता. वैशाली त्याच्या नाटकाची नायिका होती. पण काही वेळा नाटकाचा नायक प्रदीप तिला स्कूटरवरून तालमीला घेऊन येत असे. तो लिफ्ट देतो म्हणून महेशला संशय आला. वास्तविक प्रदीपदेखील अतिशय सभ्य होता. महेशने संशय व्यक्त केला आणि वैशाली व महेशचे भांडण झाले. नेमके दुसऱ्याच दिवशी महेशला वैशाली व प्रदीप मार्केटमधे दिसले. त्यामुळे त्याचा संशय अधिकच घट्ट झाला. झाले, त्याने लग्नच मोडले. महेश वैशालीला सोडून निघून गेल्यावर साऱ्या कॉलेजचे लक्ष वैशालीवर होते. तिने शांतपणे एम.ए. च्या टर्म्स भरल्या आणि एम.ए. झाल्यावर आई वडिलांनी पाहून दिलेल्या स्थळाशी लग्न केले.

महेश बी.एस्सी. झाल्यावर दुसऱ्या शहरात निघून गेला होता. त्याची नाट्यचळवळ मात्र सुरूच होती. त्याने लिहिलेल्या, दिग्दर्शित केलेल्या नाटकांच्या जाहिराती येत होत्या. वैशालीजवळ आजही त्याचा फोन नंबर होता. महेश कधीतरी फोन करेल असे तिला वाटले होते. पण त्याचा फोन कधीच आला नाही. वैशालीनेही नाही केला. का कोण जाणे, पण आज मात्र तिला त्याची फार आठवण येत होती. त्याने दिग्दर्शित केलेल्या नाटकांच्या जाहिरातीही हल्ली दिसेनाशा झाल्या होत्या. घरातील दोन्ही मुलींची लग्नें झाल्यामुळे वैशालीच्या जीवनात आता एक मोठी पोकळी निर्माण झाली होती.

त्यामुळेच कदाचित तिला अस्वस्थता आली होती. तिने कपाटात जपून ठेवलेली जुनी डायरी शोधून काढली. त्यातुन महेशचा नंबर घेऊन तो आपल्या मोबाईलमध्ये भरला. फोन करावा की नाही असा थोडा वेळ ती विचार करत बसली.

'महेश त्यावेळी तसे वागला. पण आता तो बदलला असेल. २०-२५ वर्षात त्याच्या आयुष्यात काय घडलं असेल? त्याला कधी वाटलं नसेल का मला फोन करावा?' वैशालीने हिंमत करून फोन डायल केला. चार रिंग गेल्या. पलीकडून फोन उचलला गेला. वैशाली श्वास रोखून होती. पलीकडून महेशचा आवाज आला, अगदी क्षीण. "हॅलो" वैशालीच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले.

"महेश, मी वैशाली बोलतेय. वैशाली इनामदार."

"खरंच तू मला फोन केलायस?" क्षीण आवाजात तो म्हणाला.

"कसा आहेस तू?"

"मी बरा नाही." महेश म्हणाला, "पण तुझा फोन आल्यामुळे जरा बरं वाटत आहे. वैशाली मला माफ कर. हे शब्द उच्चारल्याशिवाय मी मरू शकलो नसतो."

"काय बोलतोयस रे हे महेश?" वैशालीला अगदी अनपेक्षित शब्द समोर आले होते.

"वैशाली, मला कॅन्सर झालाय. लास्ट स्टेजमध्ये मी हॉस्पिटलला आहे. तू काळजी करू नकोस. तू संसार छान केलास. तसाच कर. जास्त बोलवत नाही. ठेवतो फोन. आता मला मोक्ष मिळेल. वैशाली, तू माफ केलंस ना?" वैशाली 'हो' म्हणाली.

ती संध्याकाळ फक्त अश्रूंची होती. दोनच दिवसांनी तिने पेपरमध्ये बातमी वाचली 'सुप्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक महेश कुलकर्णी यांचे निधन'. वैशालीने महेशचा नंबर डिलीट केला.

बाहेर भरून आलेल्या आभाळाखाली जाऊन उभी राहिली. पावसाच्या सरींमध्ये भिजायचं होतं तिला, आभाळ मोकळं होईपर्यंत!

**मेघना साने**

ठाणे, महाराष्ट्र




# कृष्णवेणू

हृदयाच्या खोल तळाशी
घुमते आहे विरही कृष्णवेणू
मन कृष्ण झाले
झाली कृष्णच तनू

कृष्ण कोण? कोण राधा?
ही कोणती सांग ना जडली बाधा
कोण तू देही विदेही
की मी झाले राधा राधा राधा

आक्रोश मनाचा
कल्लोळ, काहूर, विकल्प मनाचा
मी नसे तुझी...
तरीही तू माझा माझा माझा



नसतो भेटत कृष्ण असा
मागितला कृष्ण तरी नाही मिळत
कृष्ण असतो ध्यानी मनी चित्ती
कृष्ण असते अनामिक भीती

तरी...हवीहवीशी प्रेमभक्ती
ऐक ना...ही घुमते ना कृष्णवेणू
हृदयाच्या खोल तळाशी
सांग...जडले नाते कसे
या मनाचे त्या मनाशी

भेट घडावी या आत्म्याची त्या
आत्म्याशी
ही केवळ सांगड अद्वैताची
कृष्णच ही सारी सृष्टी
कृष्ण...हा सर्वव्यापी
हो...कृष्ण भेटे अनुताप सरता

जेव्हा होते मन राधा,तन राधा
अंतरंग राधा राधा राधा...

**प्रिया कालिका बापट**
**पणजी-गोवा**



# सुखशांती स्थान

स्थान निसर्ग सुखशांतीचे
खळखळ नादे गीत झरे
कडेकपारीतुनी दरवळे
जलतृण गाती गोड स्वरे

कलह मत्सर ताणतणाव
संगतीत विसरूनी जाते
निर्मल सृष्टी रूप पाहून
अनुभूती लोभस मनी येते

पवन स्पर्शता पुष्प ताटवे
भान हरपुनी नृत्य करी
निरव शांतता प्रसन्नतेने
वृक्षपर्णही ताल धरी



ओला हिरवा चारा खाऊन
गुरे पाखरे शांतवती
स्वर ताल अन् लयबद्धता
निसर्ग संगीत ऐकवती

सुखशांती सहवास मिळता
स्मृतीगंधही परिमळतो
मन गुंजारव करीता वेगे
भाव निरागस प्रगटतो

**सौ. तृप्ती सरदेसाई**
**बोरिवली मुंबई**



# निरोप

काळ्या ढगाच्या कुशीला येतो उजेडाचा गंध
दूर चालल्या पायांना रूते आठवांचा बंध
झाडे, फुले,शेत,माती आणि नात्यांचा खळाळ
दूर दूर जाई वाटे येता निरोपाची वेळ

ओल्या डोळ्यांसमोरुनी काही धावतेच पुन्हा
भरलेली ती घागर दारी प्राजक्ताच्या वेणा
कुठे काही संपलेले कुठे काही जोडलेले
येतो कसला दरवळ असे काय उरलेले

आत कशाला राखावे डोळे भरून वाहावे
फक्त खुणेसाठी काही थोडे जपून ठेवावे
नात्यांच्या या आभाळात माझ्या मनाचा चांदवा
सारे सोडून जाताना लखलखत रहावा

**चंचल काळे**
**(देवगड पुणे प्रवास)**



# नकोच आता

नकोस देऊ नवे बहाणे पुन्हा नव्याने नकोच काही
असेच भेटू नदीकिनारी बनून वारे दिशात दाही

नकोत लाटा, विरुद्ध वाटा, नकोत काही निरर्थ बाता
अशीच देऊ कधी खुशाली, उरात वचने भरून येता

नकोच आता आठवणींच्या तीरावरती सागर भरती
नकोच सारे शब्दखेळ अन नकोच आता वचने भलती


गंधावरती स्वार होऊनी उडून जाऊ अपुल्या गावी
तरी पाहूया वळणावरती कुठे प्रवासी दिसता कोणी

जे जे होते अपुले अपुले आता तुकडे तुझे नि माझे
बेत उद्याचे पुसून टाकू उगाच त्याचे कशास ओझे

वाळूमधला किल्ला अपुला माझ्यासाठी ठेवी राखून
मारव्यातली तान मात्र ती दोघांना दे अर्धी वाटून

सारे काही जपलेले ते लपवून ठेवू कुठे तळाशी
एकांताच्या स्वैरपटावर सहवासाच्या रेशीमगाठी

रत्ने चौदा त्यात हलाहल ही निघते की
अमृत प्राशून तृप्त होऊ दे मग रिचवूया विष प्यालेही




**दीपा मिट्टीमनी**



# पुस्तकं

ती वाचायची पुस्तकं
लहान मोठी, काही सुंदर काही बरी
वाचता वाचता ओळींतून उतरुन
अलगद उभी राहायची ती
त्यांच्या चार पानांमध्ये
नांदत असलेल्या आयुष्यांत.

जगायची मग ती पुस्तकं
आयुष्यांसारखी,
कथांतले पात्र जोडायचे नातं तिच्याशी,
एकेक नातं ती जिवंतपणे अनुभवायची
त्यांची स्पंदन तिच्या हृदयात जागी व्हायची
आणि त्यांचे अश्रू तिच्या डोळ्यात.



जगायची ती त्यांची आयुष्यं
सुखदुःख हृदयात जिवंत ठेवत.
कथा संपली तरी
माणसं जिवंत राहायची तिच्या मनात

मुरू द्यायची ती
त्या सर्वांचे संघर्ष, तगमग
व्यथा आणि आनंद.
भोगायची ती त्यांचे जन्मच जणू.
पेलायची ती त्या अनुभवांचा भार.

संदर्भ सुटून जात हळूहळू
कथा विसरली जाई
पण त्यातून उरलेले शहाणपण मात्र
जमा होई मनाच्या कोपऱ्यात.

असे कितीतरी जन्म भोगून झाले तिचे.
अन असे पुस्तकरूपी परकायाप्रवेश!

कधी कधी अडीअडचणीला
मार्ग दाखवत, सांत्वन करत.
गाठीला बांधलेले असे त्यांचे अनुभव.
पण तिला आताशा नाही सोसवत

असे पुन्हा पुन्हा नवीन जन्म घेणं.

आता ती फारसं काही वाचत नाही
या त्या पुस्तकांमध्ये रमत नाही
आता तिला ओढ लागली आहे
आकाश प्रतिबिंबित करणाऱ्या
शांत तळ्यात मन बुडवून बसायची.

सगळी काळजी, मरगळ
सगळी धग आणि सगळे रंग
त्या शांततेत विरून जातील
आणि तिचं मन नितळ निळं
होऊन जाईल आभाळासारखं!



(‘कॅलिडोस्कोप’ या कविता संग्रहात पूर्वप्रकाशित)

श्रद्धा भट



# भेटवस्तू

आपण कुणाला भेट (gift ) द्यायची असेल तर ती भेटवस्तू एका box मध्ये ठेवतो. तो box आपण सुंदर कागदाने व रिबिन किंवा आणखी काही तरी लावून सजवतो. ते करण्यावर वेळ व पैसेही घालवतो. तसेच, आत्मा ही परमेश्वराने आपल्याला दिलेली मौल्यवान भेटवस्तू आहे. ती शरीररूपी खोक्यात घालून दिली आहे. तो खोका डोळे, कान, नाक, हात, पायरूपी गोष्टीनी सजवला आहे. जन्मापासून तो खोकाच सजवण्याचे काम आई. वडील, आजी, आजोबा व नंतर आपण स्वत: करत असतो. आणि त्याचेच कौतुक करण्यात आपले आयुष्य घालवतो. त्यात आणखी त्याला नवीन नवीन कपडे, दागिने, यांनी सजावट करत राहतो. सर्व सामान्य माणसाना आतल्या भेटवस्तूची जाणीवच नसते.

फार थोडे सज्जन असे असतात की त्यांना याची जाणीव होते हा खोका इतका सुंदर तर यातील भेटवस्तू कशी असेल असे वाटते. त्यांना या शरीररूपी खोक्यावर वेळ व पैसे घालवण्यात अर्थ नाही हे लक्षात येते. आतल्या भेटवस्तू पाशी पोचण्याचा ते प्रयत्न करतात. ते हा शरीररूपी खोका फाडून म्हणजे त्याची आसक्ती सोडून, देहबुद्धी सोडून आत असलेल्या आत्मरूपी भेटवस्तूला जाणण्याचा प्रयत्न करतात. ही गोष्ट सोपी नसते. बाहेरचे देहरूपी आवरण इतके आकर्षक असते की ते फाडायला बराच काळ जावा लागतो. त्यानंतर एकात एक असलेले ५ खोके फाडून टाकणेही जरूरी असते. अन्नमय कोशाचा, प्राणमय कोशाचा, मनोमय कोशाचा, विज्ञानमय कोशाचा खोका फाडून टाकावा लागतो. पण मग त्याची जर दुर्दम्य इछा असली तर तो पाचवा खोका फाडून ती सदवस्तू प्राप्त करण्यात यशस्वी होतो. आणि मग काय,


आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे!!

आनंदाचे डोही आनंद तरंग!

अशी त्यांची चिरकाल अवस्था होते.

पण असा एखादाच. त्याला म्हणतात संत, जीवनमुक्त, सद्गुरू.

**रेखा देवधर**



# Anderson Japanese Gardens

Rockford, Illinois

Anderson Japanese Garden is breathtakingly beautiful, especially during fall. The vibrant foliage, serene landscapes, and tranquil water features create a stunning oasis.



Magical paths through different parts with wonderful views at every turn.







A must-visit for nature lovers and photography enthusiasts. Don't miss the teahouse and serene seating areas.

**Sonal Agashe**



# सत्य - शिव - सुंदर

निसर्गाचे सान्निध्य सर्वांनाच फार आवडते, भावते. निसर्गासारखा आदरातिथ्य करणारा दुसरा कुणीही या जगात नसणार. किती अगत्यशीलता असते त्याच्यात! सनईच्या स्वरांसारखं वाऱ्याच्या मंद लहरींनी, नाजुक स्वरांनी आपल्या कानांना तृप्त करणं, त्याच्या गारव्याच्या हस्तांदोलनातून प्रेमळपणा दाखवणं, आपल्यासाठी सृष्टीच्या रचनांची कितीतरी विविधता करून ठेवणं...केवढा हा उत्साह! उत्साहाचे बिंदू दुसऱ्यांना देण्याचे केवढे हे दातृत्व. आपण नुसतं बघायचं अन् घ्यायचं असतं. अनुभवायचं असतं. कितीतरी नाती आपण त्याच्यात बघू शकतो.

निसर्गात गुरू शोधणारे श्रीदत्त दिगंबर आपल्याला माहितच आहेत. गुरू या नात्याने ज्ञानदान करायचे म्हटले तरी सढळ हाताने, समजावणीच्या सुरात; तर कधी वेळ पडलीच तर लटका राग आणून दान देणारा आईव्यतिरिक्त जर कोणी असेल तर तो निसर्गच आहे.

मित्रत्त्वाच्या नात्याने केलेला खट्याळपणा तरी किती वर्णावा. कधी पावसाच्या टपोऱ्या थेंबाने चिंब करणार; तर कधी टपकन बोर- जांभूळ टपलीत पाडणार. ममतेच्या नात्याने बघितले तर हिरवळीच्या कुशीत घेणार, खाऊची खैरात तर विचारूच नका. पित्याच्या नात्याने धडा शिकविण्यासाठी कधी कठोर बनलेला निसर्गही आपण पाहतो. भगिनी रुपात तो सृष्टी बनून येतो आणि बंधू या नात्याने दादागिरी करतो, तर कधी हट्टीपणाही तितकाच करतो.

निसर्गासारखा सोबती असल्यावर म्हणेल का कुणी एकटं एकटं वाटतं म्हणून?

निसर्ग गोष्टीवेल्हाळ तर इतका की त्याच्या संगतीत तासन् तास निघून जातात. वेळेचे भान राहत नाही. पहाटे रामप्रहरी उठलं तरी पाखरांची किलबिल आहेच सोबतीला. उगवत्या सूर्याची पूजा अर्चना करण्यासाठी केवढी लगबग चाललेली असते त्याची! एखाद्या पाहुण्याच्या आगमनाने आनंदीत झालेली ही सृष्टी बघितली, की पार जुन्या काळात जाऊन पोहोचतो आपण. ज्या काळात 'अतिथी देवो भव' मानले जायचे. आज ते वाक्य पुस्तकातच राहिले आहे.

आपल्या घंट्यांचा आवाज करत गाई वासरं चरायला जातात. जाताना हंबरत, साद घालतच घराबाहेर पडतात. जणूकाही घराबाहेर पडताना 'सांगून जायचं' हा संस्कार त्यांच्यात उपजतच असावा. खरं तर त्या परमेश्वराचे आभारच मानायला हवे. एवढे नाना प्रकारचे पशुपक्षी' झाडे वेली त्याने आपल्यासाठीच निर्माण केले. संत तुकारामांनी उगाच नाही 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' म्हटले.

पण दुर्दैव! एवढे सगळे असूनही मानव नुसता धावतो आहे. कशासाठी धावतो आहे? त्या धावण्यापायी त्याच्याकडे फुरसतच नाही हे सर्व न्याहळायला. निसर्ग भरभरून देत असतो. पण घेणाऱ्यांची झोळी मात्र मजबूत असावी. नाहीतर ‘देणाऱ्याचे हात हजारो दुबळी माझी झोळी’ असा अनुभव यायचा. म्हणून एवढेच सांगावेसे वाटते, की निसर्गाकडे डोळसपणे पहावे. त्याच्याकडून घेण्यासारखे बरेच काही आहे. एकदा का घेता येऊ लागले, की त्याच्याकडून ‘देणाऱ्याचे हात’ ही आपल्याला घेता येतील. मग सर्व चैतन्यमय होऊन जाईल.

पावलोपावली जाणवणाऱ्या या चैतन्याच्या खुणा कुणाच्या? त्या जगन्नियंत्याच्या; आणि मग शेवटी येतं नातं- ईश्वर-भक्ताचं. भक्तांच्या डोळ्याने न्याहाळला निसर्ग, तर जाणवते त्याचे विराट रूप. बघण्यासाठी मात्र करावे लागतात अर्जुनाचे डोळे अन् अनुभवास येते सत्य-शिव-सुंदर!




**शुभदा पालखे**
**पुणे बाणेर**



# परिचित युद्धातील एक अपरिचित योद्धा

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील प्रेरणादायक क्रांतिकारक म्हटलं तर कुणा एकाबद्दल सांगणं खरंतर अवघड आहे. कारण मंगल पांडेपासून ते सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद फौजेतील एखाद्या अनाम सैनिकापर्यंत आणि आगरकरांपासून ते गांधीजींच्या भारत छोडो आंदोलनातील सामान्य नागरिकापर्यंत प्रत्येकाची कहाणी तितकीच प्रेरणादायी आहे. पण आज मला इथे सांगावंसं वाटतंय ते एका फार परिचित नसणाऱ्या क्रांतिकारकाविषयी! ज्यांनी पहिल्या महायुद्धाच्या काळात भारतातबाहेरून ब्रिटिशांवर हल्ला चढवाला. यांनी केवळ रक्तरंजित क्रांतीच नाही तर हरित क्रांती सुद्धा घडवून आणली कारण हे एक कृषी वैज्ञानिक पण होते. दोन वर्षांपूर्वी यांचा पुतळा देखील मेक्सिकोत उभा केला आहे. अनेक दशकं परदेशात घालवून केवळ मातृभूमीचाच विचार करणाऱ्या महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या या थोर क्रांतिकारकाचं नाव आहे डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे!



**मेक्सिको येथे डॉ. खानखोजेंच्या पुतळ्याचे अनावरण करताना भारताचे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला**
**सौजन्य: ओम बिर्ला यांचे X अकाउंट**

७ नोव्हेंबर १८८४ ला वर्धा इथे जन्मलेल्या पांडुरंगला देशभक्तीचे बाळकडू आजोबांकडून मिळाले होते. त्यांचे आजोबा १८५७ च्या उठावात तात्या टोपेंच्या नेतृत्वाखाली इंग्रजांविरुद्ध लढले होते. १८९६-९७ साली पडलेला दुष्काळ आणि त्याकाळात इंग्रजांकडून होणारे अनन्वित अत्याचार याचा परिणाम शाळकरी पांडुरंगाच्या मनावर झाला. तेंव्हाच क्रांतिकार्यात स्वतःला झोकून देण्याचा निर्णय त्याने घेतला. फ्रेंच राज्यक्रान्ती आणि अमेरिकन स्वातंत्र्य लढ्याचा त्यांच्यावर प्रभाव होता. पुढे स्वामी दयानंद सरस्वती आणि त्यांच्या आर्य समाजीय विचारांनी ते भारावून गेले. शाळेत असल्यापासून केलेल्या अनेक सरकारविरोधी कारवायांमुळे इंग्रजांचे त्यांच्यावर विशेष लक्ष होते. म्हणून लोकमान्य टिळकांच्या सल्ल्याने त्यांनी जपानला जाऊन युद्ध शास्त्राचा अभ्यास करायचा निर्णय घेतला. १९०६ साली जपानला गेले पण अपेक्षेप्रमाणे जपानकडून फारशी मदत मिळाली नाही. तिथेच

त्यांची भेट डॉ. सुन यात सेन आणि निर्वासनात राहणारे त्यांचे क्रान्तिकारक यांच्या बरोबर झाली. चिनी क्रान्तिकारकांना इंग्रजी शिकवण्याच्या बदल्यात त्यांच्याकडून लष्करी प्रशिक्षण मिळायचे. डॉ. सुन यात सेन यांना 'रिपब्लिक ऑफ चायना' चे संस्थापक मानलं जातं. अर्थात, हा काळ माओची कम्यूनिस्ट क्रान्ती होण्याच्या फार आधीचा काळ आहे. डॉ. सुन यात सेन यांच्याकडून त्यांच्या क्रान्तिकारक विचारांना खूप उत्तेजन मिळालं.

अशाप्रकारे वर्षभर जपान मध्ये घालवल्यावर एके दिवशी वर्तमानपत्रात जाहिरात पाहिली, 'भूकंपानंतर अमेरिकेत सॅन फ्रॅन्सिस्कोच्या उभारणीसाठी बांधकाम मजूर हवे आहेत'. लगेच ते त्यांच्या चिनी मित्रांबरोबर सॅन फ्रॅन्सिस्को इथे जहाजाने जाण्यासाठी निघाले. तिकिटाचेही पैसे नव्हते म्हणून त्याच जहाजावर मजुरी केली. पण तिथे पोहोचल्यावर किरकोळ शरीरयष्टीमुळे बांधकाम मजूर म्हणून काम मिळालेच नाही. मग कधी रेस्टॉरंटमध्ये वेटर तर कधी हॉस्पिटल मध्ये अटेंडन्ट अशी कामं करत काही पैसे साठवून बर्कले येथे कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या कृषी शाखेत प्रवेश घेतला. जपानमध्ये असताना डॉ. सुन यात सेन यांनीच खानखोजेंना राष्ट्राच्या विकासात शेतीचं महत्त्व सांगितलं होतं. तेंव्हाच कृषी विषयात शिक्षण घेण्याचा त्यांचा निर्णय झाला होता. बर्कले येथे कृषी शाखेत प्रवेश घेतल्यानंतर वर्षभरातच माऊंट तमालपैस मिलिटरी अकॅडमीमध्ये प्रवेश घेतला. इथेच अनेक मेक्सिकन क्रान्तिकारकांच्या संपर्कात ते आले. तेथील शिक्षण पूर्ण झाल्यावर ओरेगॉन येथे एका लाकडाच्या वखारीत काम करत त्यांनी अनेक भारतीयांना त्यांच्या क्रान्तिकार्यात जोडून घ्यायला सुरुवात केली. त्यातूनच 'इंडियन इंडिपेन्डेन्स लीग'ची स्थापना झाली. पुढे लाला हरदयाळ यांच्या संपर्कात ते आले आणि गदर पार्टीच्या स्थापनेत महत्त्वाची भूमिका बजावली. नंतर त्यांनी वॉशिंग्टन स्टेट कृषी महाविद्यालयातून एम. एस. सी. आणि मिनेसोटा विद्यापीठातून पी. एच. डी पूर्ण केले.

भारताबाहेरून ब्रिटिशांवर हल्ला चढवून त्यांची सत्ता उलथवून टाकावी या उद्देशाने गदरच्या क्रांतिकारकांना अमेरिकेत शस्त्र चालवण्याचे, बॉम्ब बनवण्याचे प्रशिक्षण त्यांनी दिले. मोठ्या प्रमाणात शस्त्रे गोळा केली. हा सगळा काळ होता १९१३-१४ चा.  लवकरच पहिल्या महायुद्धाला सुरुवात झाली आणि 'गदर'च्या हालचालींना वेग आला. वेगवेगळ्या मार्गांनी अनेक क्रांतिकारक भारताकडे निघाले. तशी ब्रिटिशांना शंका आली. अनेक नेत्यांची धरपकड सुरू झाली. पण तरीही न डगमगता डॉ खानखोजे आपल्या कामगिरीवर निघाले.
आधी तुर्कस्तानात काही जर्मन अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्या फौजेबरोबर गदरचे सैन्य घेऊन इराण, अफगाणिस्तान मार्गे बलुचिस्तान सीमेवर इंग्रजांबरोबर ते लढले. यावेळी इंग्रज सैन्याचा सेनापती होता जनरल डायर.

याच जनरल डायरने नंतर जालियनवाला बागेत हजारो निष्पाप लोकांचा जीव घेतला. या युद्धात काबूलचा काही भाग जिंकण्यात गदरच्या सैनिकांना यश आले. परंतु पुढे दुर्दैवाने शस्त्र आणि मनुष्यबळ दोन्ही कमी पडल्याने या युद्धात यश मिळाले नाही. त्यात डॉ खानखोजे जखमीही झाले त्यातूनच पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पराभव झाला आणि तिथून मिळणारी मदत देखील बंद झाली.

यानंतर मात्र भारतात परतणं शक्य नव्हतं आणि अमेरिका, युरोप मधून डिपोर्ट करण्याची शक्यता होती म्हणून मेक्सिकोमध्ये आश्रय घेतला. माऊंट तमालपैस मिलिटरी अकॅडमी मध्ये असताना मेक्सिकन क्रांतिकारकांबरोबर झालेल्या ओळखीचा त्यांना इथे उपयोग झाला. तोपर्यंत मेक्सिकन क्रांती यशस्वी होऊन त्यांच्यापैकी काही जण मेक्सिकन सरकारमध्ये कृषीमंत्री, सिनेटर अशा प्रभावशाली पदांवर होते. पण मेक्सिकोमधला सुरुवातीचा काळ अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत, अगदी उपाशी राहून देखील काढावा लागला . अखेरीस १९२४ मध्ये तेथील चापिंगो येथे नॅशनल स्कूल ऑफ अग्रिकल्चर मध्ये प्रोफेसर म्हणून नोकरी मिळाली. पुढची दोन तीन दशके त्यांनी कृषी संशोधन आणि हरित क्रांती यावर लक्ष केंद्रित केले. विशेषतः मका आणि गहू यांच्यावर अनेक प्रयोग करून त्यांच्या अनेक संकरित जाती शोधून त्याचे उत्पादन वाढवण्यात यशस्वी झाले. राज्यक्रान्तीनंतर मेक्सिकोच्या उभारणीत विशेष करून तिथल्या गरिबीवर मात करण्यात याचा फार उपयोग झाला. पुढे मेक्सिको सरकारच्या कृषी खात्यात डायरेक्टर म्हणून काम पाहिले. त्यांच्या शोधकार्याचा वापर, नोबेल विजेता आणि हरितक्रांतीचा प्रणेता नॉर्मन बोरलॉ याने त्याच्या शोध कार्यासाठी केला. म्हणजे हरित क्रांतीचे खरे जनक डॉ खानखोजे यांनाच म्हटले पाहिजे. असो.

मेक्सिकोमधेच इतके वर्ष नोकरी, तिथेच विवाह करून पत्नी आणि दोन मुली असा संसार, थोडक्यात तिथलं आयुष्य आता सुरळीत चालू असूनही भारताबद्दलची ओढ स्वस्थ बसू देत नव्हती. आपल्या ज्ञानाचा मातृभूमीसाठी कसा उपयोग होऊ शकेल याचा ध्यास त्यांना होता. मधल्या काळात अनेक वेळा परत जाण्याचा प्रयत्न देखील केला पण इंग्रजाची नजर असल्यामुळे यशस्वी होऊ शकला नाही. नंतर १९४७ मधे भारत स्वतंत्र झाल्यावर मात्र त्यांचा निर्णय पक्का झाला. तत्कालीन मध्य प्रदेशचे कृषी मंत्री रा. कृ. पाटील यांच्या मदतीने १९४९ मध्ये भारतात आले. पण अजूनही इंग्रज सरकारने बनवलेल्या काळया यादीत त्यांचे नाव असल्याने मुंबई पोलिसांनी त्यांना अटक केली. नंतर चौकशीअंती त्यांना सोडूनही दिले. त्यांनी भारत सरकारच्या शेती, ग्रामविकास यासारख्या उपक्रमांमध्ये मोलाचे सल्ले दिले.

मेक्सिकोमधल्या जबाबदाऱ्या हळूहळू संपवून १९५५ मध्ये नागपूर येथे ते कायमचे परतले आणि पुढचे आयुष्य त्यांनी तिथेच घालवले. सरकारने दिलेली आर्थिक मदत सुद्धा त्यांनी नाकारली आणि ते पैसे सरकारने कृषी संशोधनासाठी वापरावे अशी सूचना केली. पुढे १८ जानेवारी १९६७ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली.

ज्या काळात भारताबाहेर पडून गदर पार्टीच्या माध्यमातून संपूर्ण लढा उभा करण्याचा प्रयत्न त्यांनी केला तो म्हणजे नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्याही ३०-४० वर्षे आधीचा काळ! नेताजी आणि त्यांच्या आझाद हिंद फौजेचा लढा हे काम तर अफाट आहेच आणि बहुतेक सर्व जणांना त्याबद्दल माहितीदेखील आहे. पण दुर्दैवाने फार कमी लोकांना डॉ. खानखोजे किंवा त्यांच्यासारख्या क्रान्तिकारकांबद्दल ठाऊक आहे. त्याकाळात त्यांनी केलेला प्रवास हा पासपोर्ट शिवाय, कधी कुणाचे परवानापत्र घेऊन तर कधी त्याशिवाय आणि कधी तर पकडले जाऊ नये म्हणून खोट्या ओळखपत्रावरसुद्धा होता. आपला लढा यशस्वी होऊ शकला नाही याची डॉ. खानखोजेंना कायम खंत होती. पण खरंतर स्वातंत्र्य मिळवण्यासाठी मोठं एक युद्ध लढलं गेलं. अशा अनेक लढाया हा त्या युद्धाचा भाग होत्या आणि कोणत्याही एका लढाईने ते युद्ध जिंकलं असं म्हणता येणार नाही. अनेक अनाम लढाया आणि गुमनाम लढवय्यांचे त्याग याने अंतिम युद्धात विजय प्राप्त झाला. कित्येक दधिचिंच्या आत्मसमर्पणातून मातृभूमीच्या रक्षणासाठी वज्र निर्माण झालं.

सावित्री सोहनी या त्यांच्या मुलीने लिहिलेल्या 'I Shall Never Ask For Pardon' या डॉ. खानखोजेंच्या चरित्रात त्यांच्या जीवन संघर्षाची माहिती मिळते. २०२२ मध्ये भारताचे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या हस्ते मेक्सिकोत त्यांच्या पुतळ्याचे अनावरण झाल्यापासून हे नाव जास्त चर्चेत आलं. कारण काहीही असो या निमित्ताने एका परिचित युद्धातील एका अपरिचित योद्ध्याची ओळख आपल्याला झाली यातच आनंद.

**समीर जिरांकलगीकर**





## सफर देशोदेशीची

यावर्षी आपण 'सफर देशोदेशीची'! हे एक आगळं वेगळं सदर चालवलं. श्री माधव मनोहर जोशी यांचे हे सदर त्यांनी केलेल्या प्रवासाच्या अनुभवावर आधारित आहे. श्री माधव जोशी लेखक आहेत. त्यांच्या ८ कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. तसेच ते लेख, कथा आणि कवितेतून सतत व्यक्त होत असतात. कामानिमित्त त्यांचे काही भारताच्या पूर्वेकडील देशात बरेचदा जाणे झाले. या सफरींमध्ये त्यांना जे अनुभव आले आणि या देशांचे भारताशी असलेले जे सांस्कृतिक किंवा ऐतिहासिक दुवे त्यांना सापडले त्यावर त्यांनी 'रचना'साठी दर अंकात लेखमाला लिहिली होती. त्या सदराअंतर्गत हा शेवटचा लेख आहे. आशा आहे वाचकांना हे सदर नक्कीच आवडले असेल.



## दक्षिण कोरिया

**(एक गूढ देश)**


शिकागोच्या महाराष्ट्र मंडळाच्या रचना ह्या त्रैमासिकासाठी 'सफर देशोदेशीची' ह्या नावाची लेखमाला जी आपण २०२४ ह्या वर्षात वाचत आहात, त्यात मी आत्तापर्यंत इंडोनेशिया, थायलंड आणि व्हिएतनाम ह्या ३ देशांवर असलेल्या भारतीय संस्कृतीच्या प्रभावाबद्दल लिखाण केलेलं होतं, त्याला वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळाल्याचे मला संपादकांकडून कळले होते. त्यासाठी मी सर्व वाचकांचे आभार मानतो. त्याचबरोबर ह्या त्रैमासिकासाठी मला माझे विचार मांडण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी मासिकाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचेही आभार मानतो.

आज आपण ह्या लेखमालेतील चौथा आणि शेवटचा लेख वाचणार आहात. हा लेख दक्षिण कोरिया ह्या देशात असलेल्या भारतीय संस्कृतीच्या प्रभावावर आधारित आहे. दक्षिण कोरियातील सुमारे १२ ते १५ टक्के लोकांचे आडनाव "किम" असे आहे. आपल्याला कदाचित हे वाचून आश्चर्य वाटेल की ह्या सर्व किम आडनावाच्या लोकांचे DNA आपल्या उत्तर भारतीय लोकांशी बऱ्याच प्रमाणात जुळणारे आहेत. तसेच हे बहुतेक सर्व किम आडनावाचे जे लोक आहेत, त्यांचा वर्ण इतर कोरियन लोकांसारखा पिवळट गोरा नसून तो बऱ्यापैकी भारतीय गव्हाळ वर्णाच्या जवळपास जाणारा आहे. तसेच इतर कोरियन लोकांप्रमाणे ह्या किम आडनावाच्या लोकांची नाके नकटी नसून ती तुलनेने बरीचशी भारतीय लोकांच्या नाकाच्या ठेवणीप्रमाणे आहेत. ह्या मागचे

कारण काय, असे कसे झाले, का झाले, कोणामुळे आणि केव्हापासून झाले हे जाणून घ्यायचा प्रयत्न मी केलेला होता आणि त्यातून मला जो उलगडा झाला तोच  मी ह्या लेखाद्वारे सादर करत आहे.

आमच्या कंपनीने माझ्यावर निर्यातीची जबाबदारी सोपवल्यावर मी सुरुवातीला दक्षिण पूर्व (आग्नेय) आशियावर लक्ष केंद्रित करायचे ठरवल्याचे आपण माझ्या पहिल्याच लेखात वाचले असेलच. मी सुरुवातीला इंडोनेशिया, थायलंड, फिलिपाइन्स, तैवान, व्हिएतनाम, मलेशिया अशा देशांवर लक्ष केंद्रित केले आणि ह्या सर्व देशांतून चांगला प्रतिसाद मिळायला लागल्यावर मात्र आता दक्षिण कोरियाकडे लक्ष द्यावे असे आमच्या टॉप मॅनेजमेंटने मला सांगितले. आमच्या कंपनीत टेक्सटाईल्स मशिनरी पार्ट्स बनत असत आणि आम्ही साहजिकच टेक्सटाईल मशीनरी मॅनुफॅक्चरर्स असोसिएशन (TMMA) ह्या संस्थेचे सभासद होतो. त्यांच्या ऑफिसात जाऊन मी दक्षिण कोरिया बद्दलची माहिती मिळवायला सुरुवात केली. ह्या असोसिएशनच्या एका पुस्तिकेत म्हटलं होतं, की दक्षिण कोरिया हा देश भारतीय मालाच्या निर्यातीसाठी एक अवघड देश आहे! तेथील लोकांचे इंग्लिश भाषेशी फारसे सख्य नसून ते का कोण जाणे असे समजतात की भारत हा एक अत्यंत मागासलेला देश असून भारतात अजूनही भर रस्त्यावरून वाघ, सिंह, घोडे, हत्ती फिरत असतात वगैरे. (अर्थात माझी ही  माहिती मी सन १९९८,१९९९ साली मिळवलेली होती, त्यात अलीकडे फरक पडला असू शकेल). त्याच बरोबर त्यात असेही लिहिले होते, की ह्या देशातील लोक पक्के आतल्या गाठीचे असून ते पटकन व्यक्त होत नाहीत; त्यामुळे त्यांच्या मनात नेमके काय चालले आहे ते तिऱ्हाईताला समजणे कठीण असते म्हणून. हे सारे वाचून मला मोठे नवल वाटले. आता कसेही करून आपण तेथे जायचे आणि यशस्वी होऊनच दाखवायचे असा चंग मी मनात बांधला. असोसिएशनच्या त्या पुस्तिकेत दिलेल्या तेथील आयातदारांच्या यादीतील काही नावे आणि त्यांचे फॅक्स नंबर मी टिपून घेतले आणि आमच्या ऑफिसात येऊन त्या सर्व नंबरवर एक आमच्या कंपनीची माहिती सांगणारे पत्र त्यांना फॅक्सने पाठवले. त्या पत्रात मी 'आमची कंपनी कोरियासाठी एजन्टची नेमणूक करू इच्छित आहे आणि आपल्याला आमचा एजन्ट व्हायचे असल्यास कृपया फॅक्सने तसे कळवावे' असे लिहिलेले होते.  पुढील ४ दिवसात त्यातील एका कंपनीने फॅक्स द्वारा आमचा एजंट होण्याचे कबूल केले आणि त्या कंपनीने माझ्या नावाने एक इन्व्हिटेशन लेटर पाठवले व त्याच्या जोरावर मला दक्षिण कोरियाचा व्हिसा मिळाला आणि मी सेऊलला जायला सज्ज झालो.

तोवर ह्या देशाबद्दलची जवळपास नगण्य माहिती मला होती. जे काही थोडे फार माहित होते ते असे होते की मूळच्या कोरियाचे आता दोन भाग झाले असून ते दक्षिण आणि उत्तर कोरिया ह्या नावाने ओळखले जातात; तसेच ह्या दोन देशात वितुष्ट आहे. उत्तरेकडील भागावर कम्युनिस्ट राज्य असून दक्षिण कोरिया मात्र अमेरिकन प्रभावाखालील असून तेथे लोकशाही आहे. उत्तर कोरियामध्ये सुद्धा भरपूर किम ह्या आडनावाचे लोक राहतात; परंतु उत्तर कोरिया हा कम्युनिस्ट राजवटीखालील एक हुकूमशाही देश असल्याने तेथे नक्की काय चालत असते ते जगाला फारसे कधीच कळू शकत नाही. तेथे एका पक्क्या पोलादी पडद्याआड सारा कारभार सुरु असल्याने आपण इथे फक्त दक्षिण कोरियाबद्दलचीच माहिती घेऊया.



कोरियातील किम हाई गया येथील सूरी रत्नाचे स्मारक ^



सूरी रत्नाचा पारंपरिक फोटो ^

तसेच मला हेही माहित होते की कोरिया हा देश चीनच्या भूमीला लागून असून तेथे चिनी लोकांचे आणि संस्कृतीचे प्राबल्य आहे. तसेच तेथे बौद्ध धर्मालाही मान आहे हेही मला ठाऊक होते. तसे पाहिले तर चीन ह्या देशातही गेल्या शतकाच्या मध्यापर्यंत बौद्ध धर्माचा प्रचंड पगडा होता; तसेच त्यांच्या काही बौद्ध मठातून गणपतीच्या मूर्तीसुद्धा बसवलेल्या होत्या. मी स्वतः चीनमधील शांघाय येथे असताना तेथील एका बौद्ध मठात लाकडावर कोरलेली गणपतीची मूर्ती पाहिलेली आहे. परंतु पुढे १९४९ साली तेथे माओ त्से तुंगच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्टांचे एकछत्री राज्य सुरु झाल्यावर तेथे धर्माच्या सर्व कर्मकांडांवर अघोषित बंदी घातली गेली. कम्युनिस्ट लोक 'आम्हाला धर्म नाही' असे अभिमानाने सांगतात. आणि त्याचबरोबर कोरियातीलसुद्धा बरेच लोक 'आम्हाला धर्म नाही' असे सांगतात.

२० व्या शतकाच्या अखेरीस इंटरनेट हा शब्द फारसा कोणालाच माहित नव्हता, तेव्हा ह्या देशाची माहिती कशी काढावी हा प्रश्न मला पडला होता. आमच्या ट्रॅव्हल एजंटने जेव्हा मला व्हिसा मिळवून दिला त्यावेळेस माझ्या विनंतीनुसार त्याने कोरियन कॉन्सुलेटमधून त्या देशाची काही माहितीपत्रके आणून दिली. परंतु ती सारी माहितीपत्रके टुरिस्ट लोकांच्या माहितीसाठी असल्याने माझा उद्देश फारसा सफल झाला नाही. मला त्या देशाचा पुरातन इतिहास जाणून घ्यायची उत्सुकता होती. तेव्हा माझी ही जिज्ञासा त्या देशातच गेल्यावर पुरी करून घ्यायची असे मी मनोमन ठरवले. अखेर १९९८ च्या जुलै महिन्यात मी सर्वप्रथम सेऊलच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरलो, आणि सर्व प्रक्रिया पार करून बाहेर उभ्या असलेल्या आमच्या नवनिर्वाचित स्थानिक  एजंटला भेटलो. त्याने स्वतःची ओळख करून देताना म्हटलं, "मी, बी सी किम, वेलकम टू कोरिया." किम हे आडनाव असलेल्या पहिल्या कोरियन माणसाशी माझी झालेली ती पहिली भेट. पुढील माझ्या एकूण ६ दौऱ्यात मी असंख्य किम आडनावाच्या लोकांना भेटणार आहे ह्याची मला सुतराम सुद्धा कल्पना त्यावेळेस असणे शक्य नव्हते. हा किम सर्वसाधारणपणे आपल्याकडील बंगाली किंवा आसामी माणसाच्या चेहरेपट्टीसारखी चेहरेपट्टी असलेला मध्यम वयीन गृहस्थ होता. त्याचे इंग्लिशचे ज्ञान जेमतेमच होते; परंतु संवाद साधू शकत असल्याने मी खूश झालो. उंची सुमारे सवा पाच फूट असावी, रंग गव्हाळ, नाक अपरे, हसतमुख चेहरा असे त्याचे व्यक्तिमत्व होते. एकंदरीत प्रथम दर्शनी माझे त्यांच्याबद्दलचे मत चांगले झाले. त्याने गाडीने मला "कोरियाना" नावाच्या एका सुरेख हॉटेलात सोडले व दुसरे दिवशी सकाळी ८ वाजता तयार राहण्यास सांगून तो निघून गेला.

दुसरे दिवशी सकाळी ८ वाजता मला भेटायला श्री. किम हॉटेलात आला. त्याच्याबरोबर त्याचा एक सहकारी सुद्धा आला होता. त्याचे नाव श्री. हान असल्याचे किमने मला सांगितले. हा जो हान नावाचा किमचा सहकारी होता,

तो एक अतिशय देखणा, उंचापुरा तर होताच परंतु त्याच्या चेहऱ्याचे हॉलिवूडचा प्रसिद्ध नट ग्रेगरी पेक ह्याच्याशी विलक्षण साम्य होते. तसेच हा हान खूप व्यवस्थित इंग्लिश बोलू शकत होता; त्यामुळे मला आता ह्या लोकांशी संवाद साधायला त्रास पडणार नसल्याने आनंद झाला. मी तयारच होतो. तो मला म्हणाला की आपली पहिली मिटिंग जी सकाळी १० वाजता होती तिच्यात थोडा बदल होऊन ती आता दुपारी २ वाजता आहे म्हणून. म्हणजेच आमच्याकडे भरपूर वेळ होता. मग आम्ही तिघे जण माझ्याच हॉटेलातील कॉफीशॉपमध्ये जाऊन गप्पा मारू लागलो.

सुरुवातीला माझ्या कुटुंबाबद्दल आणि मग भारताबद्दल काही जुजबी प्रश्न किमने विचारले. मग त्याने मला विचारले, “तुमच्या मुंबईपासून आयुथय्या किती लांब आहे?” ते ऐकल्यावर मला काहीच कळेना. सर्वात आधी हा जे म्हणतोय ते ‘आयुथय्या’ म्हणजे काय इथपासून मला प्रश्न पडला. मग त्याने एका कागदावर आयुथय्याचे स्पेलिंग लिहून दाखवल्यावर मला कळले की तो बहुदा आपल्या अयोध्येबद्दल विचारत असावा! हा गृहस्थ एकदम आपल्या अयोध्येवर का घसरलाय तेच मला कळेना! मी त्याला म्हटलं, “मुंबईहून अयोध्या खूप लांब आहे, पण तुम्ही एकदम अयोध्येविषयी का विचारताय? आतापर्यंत मी नाना देशातून हिंडलोय, तिथले लोक मला आमच्या ताजमहाल, किंवा अजिंठ्याची लेणी किंवा काश्मीर अशा ठिकाणांबद्दल विचारतात. तुम्ही एकदम अयोध्येवर कसे काय आलात ?”



किम सुरो ^ सूरी रत्ना उर्फ हिओ ^

त्यावर त्याने दिलेले उत्तर ऐकून मी चक्रावूनच गेलो. तो म्हणाला, “माझे आडनाव किम आहे. हा जो माझा सहकारी मिस्टर हान आहे त्याची बायको ही माहेरची किम ह्या आडनावाची आहे.”

“बरं ,मग ? त्याचा अयोध्येशी काय संबंध ?” माझी पृच्छा.

“आहे, आहे. आज आमच्या दक्षिण कोरियात सुमारे १५ टक्के लोकांचे आडनाव किम असे आहे. आम्हा साऱ्या किम आडनावाच्या लोकांचे तुमच्या आयुथय्याशी नाते आहे. बहुदा ह्यामुळेच, आम्ही बहुतांश किम आडनावाचे लोक तुमच्यासारखे सावळ्या रंगाच्या कातडीकडे झुकणारे आहोत.” किम म्हणाला.

आता मात्र मी अगदी आश्चर्यचकित झालो. ह्या किम आडनावाच्या लोकांचे आपल्या अयोध्येशी कसे काय नाते असू शकते हेच माझ्या डोक्यात काही केल्या शिरेना! मग ‘प्रति ग्रेगरी पेक’ उर्फ मिस्टर हान ह्याने मला खूपच चांगल्या इंग्लिशमध्ये जे काही सांगितले ते ऐकून मी अगदी थक्क झालो. तो म्हणाला, “अगदी थोडक्यात तुम्हाला सांगतो,

की इसवीसनाच्या पहिल्या शतकात तुमच्या अयोध्या नगरीची सूरीरत्ना नावाची राजकन्या जलमार्गाने आमच्या इथे थेट कोरियात आली. तिने आमच्या किम सुरो ह्या नावाच्या एका राजकुमाराशी विवाह केला. ह्या लग्नापासून त्या दोघांना एकूण १० मुलगे व २ मुली झाल्या. लग्नानंतर किम सुरोने सूरीरत्नाचे नाव बदलून 'हिओ व्हॅन्ग ओके' उर्फ हिओ असे ठेवले. हे दोघे नवरा बायको पुढे दीडशे वर्ष जगले! त्यांच्या १० मुलांपासून झालेली पुनरुत्पत्ती सारीच किम ह्या आडनावानेच ओळखली जाऊ लागली. किम सुरो आणि सूरीरत्ना उर्फ हिओ ह्यांची सारीच्या सारी मुले ही हिओच्या प्रमाणेच सावळ्या रंगाची होती, तसेच सर्वांची नाके सुद्धा हिओ प्रमाणे सरळ होती ! आमच्या सारखी चपटी नव्हती. किम सुरो आणि हिओच्या मिलनानंतर ह्या सूरीरत्ना उर्फ हिओने आमच्या इथल्या राज्य पद्धतीत आमूलाग्र बदल केले. ती पुढे कधीच माहेरी तुमच्या भारतातील अयोध्येला परत गेली नाही, इथेच १५७ वर्षांची होऊन मरण पावली. ती जेव्हा इथे आली, त्यावेळेपर्यंत आमच्याकडे सुसंस्कृतपणाचा अभाव होता. ह्याच्या उलट तुमचा भारत हा त्यावेळेस खूपच पुढारलेला देश होता.

तुमच्याकडे राजाची कर्तव्ये काय असतात, त्याने कसे राज्य करावे, राज्यातील प्रत्येक नागरिकाची राज्याप्रती काय कर्तव्ये असतात इत्यादींबद्दल सारे लिखित स्वरूपात उपलब्ध होते, तर आम्ही सारे ह्याबाबतीत अगदीच अनभिज्ञ होतो. तुमच्या सूरीरत्ना उर्फ हिओने आम्हाला हे सारे राजकीय ज्ञान शिकवले. थोडक्यात काय, तर आमच्या माहिती साठी तिने एक राज्यव्यवहारकोश तयार केला. त्यामुळे आम्ही कोरियन लोक तुमचे व विशेष करून अयोध्या नगरीचे ऋणीच आहोत! कारण ही सूरीरत्ना तुमच्या अयोध्या नगरीतून इथे आलेली होती. तसेच मी तुम्हाला आणखी एक गोष्ट सांगू इच्छितो व ती म्हणजे आमच्याकडील बऱ्याच किम आडनावाच्या लोकांचे DNA हे तुमच्या उत्तर भारतीय लोकांशी मिळतेजुळते आहेत. ह्यावर अलीकडील काळात बरेच संशोधन झालेले आहे. गिमहाई गया उर्फ किमहायी गया ह्या नावाच्या आमच्या एका गावात सूरीरत्ना आणि तिचा नवरा किम सुरो हे राज्य करत असत. (कोरियात बरेचदा ग चा उच्चार क असाही करतात, म्हणून गिमहाई ह्याचा उच्चार किमहाई असाही होतो, आणि माझ्या मते किमहाई हेच बरोबर असले पाहिजे कारण तेथील लोकांचे आडनाव किम असे असते !) तेथे आजही एक भव्य स्मारक मंदिर आहे, त्यात हिओ उर्फ सूरीरत्नाने तिच्याबरोबर भारतातून आणलेले काही दगड आणि एक पॅगोडा ठेवलेला आहे.

मी असे ऐकलेलं आहे की ते दगड बरेच ठिसूळ आहेत व त्याचे चूर्ण तुम्ही हिंदू लोक कपाळाला भस्म म्हणून लावता! तिच्या जलप्रवासात काही विघ्ने येऊ नयेत म्हणून म्हणे तिने तसे दगड स्वतःबरोबर गलबतातून आणलेले होते व त्याचे थोडेथोडे भस्म करून ती रोज स्वतःच्या कपाळाला लावत असे. त्यातलेच उरलेले दगड किमहाई गयेतील देवळात ठेवलेले आहेत. त्याला आम्ही आमच्या भाषेत 'पासा सुक' असे म्हणतो. आज तेथे काही पूजा अर्चा होत नाही,पण तो एक टुरिस्ट स्पॉट झालाय."

हे सारे ऐकत असताना मला एकावर एक आश्चर्याचे धक्के बसत होते. (असेच धक्के मला इंडोनेशियाबद्दल किंवा व्हिएतनाम बद्दलचा खरा इतिहास जेव्हा सर्वप्रथम कळला तेव्हाही बसले होते!) भारत स्वतंत्र झाल्यानंतरच्या पहिल्या पिढीचा मी प्रतिनिधी आहे,

आणि आम्हाला जो इतिहास शाळेत असताना शिकवला गेला, तो अर्ध सत्य स्वरूपाचा होता, असे नुकतेच समजू लागले आहे.
आपल्याकडे आपल्या इतिहासात आपल्याला कधीही कोरियाबद्दलची ही माहिती शिकवलीच जात नाही! आम्हाला त्यावेळेस शाळेतील इतिहासात इंग्लंडवर कोणकोणत्या राजांनी, राण्यांनी राज्य केले ह्याची साद्यन्त माहिती शिकवली, नेपोलियनने काय काय केले ते शिकवले, शेक्सपियर शिकवला, मुघल सम्राटांबद्दल तर काय विचारूच नका! मुघलांच्या बद्दल असलेल्या प्रेमाचे भरते ओसंडून जाईल की काय इतके चांगले लिहिलेले धडेच्या धडे आमच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातून असत. थोडक्यात, अर्धवट आणि चुकीचा इतिहास आम्हाला शिकवला गेला. सध्या काय परिस्थिती आहे ते मला माहित नाही. त्यामागचे कारण काय असेल हे त्यावेळचे आपले भारत सरकारच जाणे! आपल्या पूर्वेकडील देशांवर ऐतिहासिक काळात आपला कसा कसा प्रभाव पडला होता हे आपल्याला शिकवतच नाहीत, हे आपले दुर्दैव! आपला देश स्वतंत्र होऊनही आपल्याला एके काळी इंग्रज जो त्यांना सोयीचा असलेला इतिहास आपल्यास शिकवत असत, तोच इतिहास 'मागील पानावरुन पुढे चालू' ह्या न्यायाने अजूनही शिकवला जातोय, हे समजल्यावर फार दुःख होते. एकेकाळी जवळपास सर्वच्या सर्व आग्नेय आशियाई देशांवर भारतीय हिंदू सनातनी सम्राटांचे प्रभुत्त्व होते, हे आम्हाला कधी शिकवतच नाहीत.
आपल्या दक्षिण भारतातील चोला ,पंड्यान, श्रीविजया इत्यादी सम्राटांनी सागर उल्लंघून आपल्या आग्नेयेला असलेल्या भूप्रदेशांवर त्यांच्या सत्ता स्थापन केलेल्या होत्या व त्यांनी तिकडे हिंदू व पुढे बौद्ध धर्माचा प्रसार केलेला होता हे आपल्याला शिकवतच नाहीत. तर ते असो. ह्या विषयावर खूप काही लिहिता येईल, परंतु हा विषय इथे मला अधिक उगाळायचा नाहीये. गंमत म्हणजे ह्या कोरियात कोणत्याही भारतीय राजाने आक्रमण करून तेथे राज्य स्थापलेले नव्हते तर अयोध्येच्या एका कोवळ्या राजकन्येने लढाई वगैरे काहीही न करता, आपल्या सनातनी शुद्ध वर्तनाच्या आधारावर म्हणजेच अहिंसेने इथे राज्य करायला सुरुवात केली होती अशी मोलाची माहिती मला मिळाली.

मग मी हानला म्हटलं ,"सर, हे सारे माझ्यासाठी एकदम नवे आहे. दुर्दैवाने आमच्याकडे बहुतांश लोकांना हे सारे ज्ञातच नाहीये. ह्याबद्दलची अधिक माहिती तुम्ही मला सांगाल का ?"

त्यावर हान म्हणाले, " कोरियातील शाळांमधून हा इतिहास सर्व विद्यार्थ्यांना शिकवण्यात येतो. आमच्या कोरियन भाषेत १३ व्या शतकात ईल युऑन नावाच्या एका महान बौद्ध भिक्षूने एक महाकाव्य ह्याच विषयावर लिहिले त्याचे नाव आहे 'समगुक युसा'(Samguk Yusa). त्या महाकाव्यात सूरी आणि किम सुरो ह्यांच्या प्रेमाची कहाणी तर वर्णिली आहेच; पण त्याचबरोबर तत्कालीन कोरियन जीवनपद्धतीचीही माहिती त्यातून मिळते. तसेच सूरीरत्नाने भारतातून कोरियात आणलेल्या चांगल्या प्रथा, राज्यव्यवहारकोश इत्यादींचे सुरेख वर्णन ह्या ग्रंथात आहे."

" सर, समगुक युसा ह्याचा अर्थ काय? त्याचे इंग्लिश भाषांतर कोणी केलेले आहे का ?ते मला वाचायला मिळू शकेल का ?" मी विचारले.

“समगुक युसा ह्याचा शब्दश: अर्थ ‘उरलेल्या ३ राजवटींची कहाणी.’ इंग्लिश भाषांतर उद्या मी तुम्हाला वाचायला देईन. पण ते भाषांतर चांगले नाहीये. आमच्याकडेच एका शिकाऊ विद्यार्थिनीने ते केलेलं आहे. पण ते वाचून तुम्हाला बऱ्यापैकी माहिती मिळेल.” हान  म्हणाला.

त्याने सांगितल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी हान ह्याने  मला ते भाषांतरित ‘समगुक युसा’ पुस्तक दिले. ते चक्क ४०० पानी पुस्तक होते. त्यात इंग्लिश व्याकरणाच्या खूप चुका होत्या. परंतु एकंदरीत मला त्यातून बऱ्यापैकी माहिती मिळाली. मी त्यातील बऱ्याच माहितीची नोंद माझ्या एका डायरीत करून ठेवली होती. माझा दौरा संपायच्या आधी मला ते पुस्तक किम , हानला परत द्यावे लागले.

माझ्या त्या पहिल्या दौऱ्यानंतर मला त्यानंतर एकूण ६ वेळा कोरियात जावे लागले. प्रत्येक वेळेस मी जाताना माझी आधी नोंद करून ठेवलेली डायरी बरोबर नेत होतो. तेथे पोचल्यावर किम किंवा हान मला न चुकता ते भाषांतरित पुस्तक समगुक युसा देत असे व मीही त्यातील पुढील माहिती माझ्या डायरीत टिपून ठेवत असे. मी एक इतिहासात रमणारा माणूस असल्याने मी माझ्या स्वतःच्या माहितीसाठी ते सारे टिपत होतो. माझ्या अशाच एका दक्षिण कोरियाच्या दौऱ्यात मी पुसान उर्फ बुसान ह्या शहराला भेट दिली. (कोरियामध्ये जसा ग चा उच्चार क , किंवा ज चा उच्चार य असा होऊ शकतो, तसाच बरेचदा प चा उच्चार ब असाही होतो! फारच विचित्र भाषा आहे ती! म्हणूनच मी पुसान उर्फ बुसान असे लिहिले आहे). हे शहर सेऊल ह्या त्यांच्या राजधानीच्या शहरापासून सुमारे ४५० किलोमीटर्स दूर आहे. मला इतिहासाची आवड असल्याचे एव्हाना  किम आणि हान ह्या दोघांना ठाऊक झाले असल्याने हान हे मला म्हणाले की किमहायी गया हे गाव इथून (बुसान पासून) जवळच तर आहे. आपण तेथे जाऊया का? मी अर्थातच पटकन त्यांना हो म्हटल्यावर ते मला तेथे घेऊन गेले. तेथे असलेल्या एका स्मारकापाशी ते लोक मला घेऊन गेले. तेथे एकावर एक असे पाचसहा ओबडधोबड दगड रचून ठेवलेले आहेत. तेथे असलेली पाटी फक्त त्यांच्याच स्थानिक भाषेत असल्याने मला काहीही कळणे शक्यच नव्हते. परंतु हान मला म्हणाला की हे तेच दगड आहेत जे २००० वर्षांपूर्वी हिओ उर्फ सूरीरत्नाने अयोध्येतून आणलेले होते. तसेच, ह्याच ठिकाणी म्हणे किम सुरो राजाचा राजवाडा होता.



कोरियन राष्ट्राध्यक्षाची पत्नी अयोध्येत आली असताना ^

त्या स्थळापासून थोड्याश्याच अंतरावर एक छोटीशी टेकडी होती. तिची उंची फार फार तर पुण्याच्या पर्वतीपेक्षा थोडीशीच जास्त होती. त्या टेकडीकडे बोट दाखवून हान मला म्हणाला की हीच ती टेकडी जिच्यावर किम सुरो जन्मला आणि सूरीरत्नासह १५७ व्या वर्षी मरण पावला. समगुक युसाच्या इंग्लिश भाषांतरात मी त्या टेकडीबद्दल वाचले असल्याने मला त्या टेकडीचे महत्व लगेच लक्षात आले. एक ऐतिहासिक स्थळ ह्याच दृष्टीने

मी ते स्थळ त्यावेळेस पाहिले होते. अर्थात त्यावेळेस, ह्या विषयावर आपण काहीतरी लिहावे असे काही माझ्या मनात अजिबात नव्हते.

जेव्हा जेव्हा पेपरमध्ये किंवा टीव्हीवर दक्षिण कोरियाबद्दलची काहीही बातमी येत असे तेव्हा मी अतिशय उत्सुकतेने ती वाचत किंवा पाहत असे. पुढे २००१ साली दक्षिण कोरियाच्या दिल्लीतील वकिलातर्फे एक निवेदन आपल्या तत्कालीन केंद्र सरकारला दिले गेले. त्यात त्यांनी थोडक्यात अयोध्येच्या ह्या सूरीरत्ना नावाच्या राजकुमारीबद्दलची माहिती देत पुढे म्हटले होते की बहुसंख्य कोरियन लोकांना अयोध्येबद्दल फारच ममत्व वाटते. त्यासाठी अयोध्येत सूरीरत्नाचे एखादे स्मारक उभारावे. त्याचा सारा खर्च कोरियन सरकार देईल. आपल्या सरकारने ही विनंती मान्य केली व अयोध्येतील शरयू नदीच्या तीरावर असलेल्या रामकथा पार्क मध्ये सूरीरत्नाच्या नावे एक संगमरवरी शिळा उभारली गेली. त्यावर सूरीरत्ना पहिल्या शतकात कशी जलमार्गाने कोरियात गेली, तिथे तिने कसे कार्य केले ह्याबद्दलची त्रोटक माहिती कोरली गेली. तसेच सूरीरत्नाने कोरियातील 'किमहायी गया' ह्या गावच्या किम सुरो नावाच्या राजकुमाराशी प्रेमविवाह करून पुढे कोरियन लोकांना राज्य कसे चालवायचे ते शिकवले तेही तेथे नमूद केले होते. तसेच तिने सनातन धर्माचा प्रसार तेथे केला असेही लिहिले होते. त्याच वेळी आपली अयोध्या व कोरियातील किमहायी गया ह्या दोन शहरांना 'भगिनी शहरे' ( Sister Cities ) असा किताब देण्यात आला.



कोरियन शिष्टमंडळाची दिल्लीत स्मारकासाठीची भेट ^



कोरियन राष्ट्राध्यक्षांच्या पत्नीने अयोध्या येथे दिवाळीत केलेले शरयू नदीचे दीप पूजन ^

त्यानंतर २०१४ ला आपल्याकडे झालेल्या केंद्रीय सत्तापालटानंतर कोरियन सरकारला मनापासून वाटू लागले की दिल्लीत नव्याने आलेले सरकार हे स्मारक अधिक भव्य रीतीने उभारण्यासाठीच्या आपल्या मागणीकडे जास्त सहानुभूतीने पाहिल म्हणून. त्यानुसार मार्च २०१६ ला कोरियातून ३८ जणांचे एक मोठे शिष्टमंडळ भारतात आले. हे शिष्टमंडळ आधी अयोध्येला भेट देऊन आले. त्यावेळेस त्यांनी उत्तर प्रदेशाचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अखिलेश यादव ह्यांची भेटही घेतली होती.

मग हे शिष्टमंडळ दिल्लीत आले. त्यांनी आपले पंतप्रधान श्री. मोदी ह्यांची भेट घेऊन त्यांच्याकडे कोरिया-भारत मैत्री पर्वासाठी अयोध्येत सुरीरत्नाचे भव्य स्मारक बांधावे अशी मागणी केली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे २००१ साली उभारलेले शिळास्मारक हे शरयू नदीच्या अगदी काठावर उभारलेले असल्याने एखाद्या पुरात तिला धोका निर्माण होण्याचा संभव होता. म्हणून एखाद्या सुरक्षित स्थळी भव्य स्मारक उभारण्याची मागणी त्या शिष्टमंडळाने तेव्हाचे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. अखिलेश यादव व आपले पंतप्रधान श्री. मोदी ह्यांना केली. ह्या दोघांनीही कोरियन शिष्टमंडळाच्या ह्या मागणीला मान्यता दिली.

पुढे मे २०१७ ला मोदी ह्यांनी दक्षिण कोरियाला भेट दिली असता हा विषय परत पुढे आला. त्यावेळेस ह्या गोष्टीला मूर्त स्वरूप देण्यासाठी मोदींनी अयोध्येतील साकेत तीर्थ येथील यात्री केंद्राजवळची मोठी जमीन ह्या स्मारकासाठी देण्याचे निश्चित केले.

त्याच वर्षी म्हणजे २०१७ च्या ६ नोव्हेंबरला दिवाळीच्या दिवशी अयोध्येतील दीपोत्सव पाहण्याच्या मिषाने कोरियाच्या राष्ट्राध्यक्षांची पत्नी श्रीमती किम जुंग सुक ह्या अयोध्येत आल्या होत्या. तेव्हा त्यांच्या हस्ते ह्या स्मारकाची पायाभरणी करण्यात आली. ह्या स्मारकाचे डिझाईन एका कोरियन आर्किटेक्टने केलेलं आहे. त्यासाठी भारत सरकारने ३० कोटी रुपये मंजूर केल्याची बातमी २ आणि ७ नोव्हेंबर २०१७ च्या 'हिंदुस्थान टाइम्स' ह्या वृत्तपत्रात छापून आलेली आहे. २०१७ नंतर आता दरवर्षी शेकडो कोरियन नागरिक अयोध्येला भेट द्यायला भारतात येतात. ते स्मारक करोना मुळे कामात खंड पडल्याने पूर्ण व्हायला वेळ लागला. परंतु पुढे सन २०२२ साली ते पूर्ण झाले.



अयोध्येतील कोरिया ने बांधलेले सूरी रत्नाचे स्मारक ^

माझ्या एकूण ६ वेळच्या दक्षिण कोरियातील दौऱ्यात मी सातत्याने समगुक युसा ह्या कोरियन ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर वाचत राहिलो आणि त्यातील बऱ्याच गोष्टींची नोंद माझ्या डायरीत करत गेलो. ह्या ग्रंथातील माहिती खूपच मनोरंजक आणि उद्बोधक अशीच आहे. त्यानुसार, इसवी सन ००५० च्या सुमारास अयोध्येतील तत्कालीन राजा जो होता त्याला स्वप्नात येऊन देवाने दृष्टांत दिला. (दुर्दैवाने त्या राजाचे नाव समगुक युसा मध्ये दिलेले नाहीये.) त्या स्वप्नानुसार राजाला म्हणे देवाने स्वप्नात येऊन सांगितले की तुझी सूरीरत्ना नावाची जी एकुलती एक मुलगी आहे तिचा जन्मच मुळी आपल्या सनातन धर्माच्या प्रसारासाठी झालेला आहे. देवाने राजाला असेही (स्वप्नात) सांगितले, की तुझी मुलगी १६ वर्षांची झाल्यावर तिला पूर्वेकडील एखाद्या बंदरातून लाल रंगाचे शीड असलेल्या गलबतात बसव. मग, ते गलबत वाऱ्याच्या दिशेने जसे हाकारले जाईल तसे जाऊ दे.

बऱ्याच दिवसांच्या अशा पूर्व दिशेकडील प्रवासानंतर एके दिवशी ते गलबत कोणत्यातरी पूर्वेकडील एखाद्या देशाच्या किनाऱ्याला सुखरूप लागेल.

जिथे ते सुखरूप लागेल, तिथेच तुझ्या मुलीला खाली उतरू दे. त्या भूप्रदेशाचा जो राजकुमार असेल तो तिच्या प्रेमात पडेल आणि ते दोघे लग्न करतील. पुढे त्या अनोळखी देशात तुझी मुलगी आपला सनातन धर्म रुजवेल आणि वाढवेल. तिकडे, दक्षिण कोरियातील किमहाई गया येथील टोळी प्रमुखाला अश्याच प्रकारचे स्वप्न पडले . त्यात त्याने पाहिले,

की आजपासून सुमारे तेराचौदा वर्षांनंतर पश्चिमेकडून लाल रंगाचे शीड असलेले एक गलबत येईल आणि त्यातील एका तरुणीच्या बरोबर तुझ्या मुलाचे लग्न लावून दे. त्यामुळे तुझे टोळीचे राज्य स्थिरावायला मदत होईल! त्याचबरोबर, ती तरुणी तुझ्या टोळीचे रूपांतर एका संपूर्ण राज्यात करेल.

अयोध्येचा राजा मात्र स्वप्नात हे पाहिल्यावर नाही म्हटलं तरी थोडासा चिंतीत झाला. त्यावेळेस त्याची मुलगी लहान होती, परंतु पुढे ती १६ वर्षांची झाल्यावर तिच्या १६ व्या वाढदिवसाच्या दिवशी राजाच्या स्वप्नात परत देव येऊन त्याने 'त्या' स्वप्नाची आठवण करून दिली. राजाने मोठ्या कष्टी मनाने ओरिसातील एका बंदरातून आपल्या लाडक्या सूरीरत्नाला निरोप दिला. ह्या सूरीरत्नाचा जलप्रवास अतिशय कष्टप्रद असाच होता. राजाने तिच्याबरोबर तिचे गलबत ज्या बंदराला लागेल तेथे धर्मप्रसारासाठी राजकन्येबरोबर दोन सनातनी विद्वानसुद्धा पाठवले होते, परंतु जलप्रवासात ते दोघेहीजण मरण पावले. त्यांच्या मृत्यूच्या आधी त्यांनी सूरीरत्नाला आपल्या सनातन धर्माबद्दल बरीच माहिती दिलेली होती. जलप्रवासात गलबत फारसे हलू नये



कोरियन शिष्टमंडळ भारतात आले असताना ^

म्हणून अयोध्येच्या राजाने पांढुरक्या रंगाच्या पाचसहा मोठ्या वजनदार शिळा गलबतावर ठेवलेल्या होत्या. (त्याच अजूनही किमहाई येथे मला बघायला मिळाल्या! आता त्या इतक्या ठिसूळ झाल्या आहेत की त्याला बोट लावले तरी त्याचा भुगा होतो, आणि तेच भस्म म्हणून अजूनही बरेचसे किम ह्या आडनावाचे लोक तेथे लावतात! एकेकाच्या श्रद्धा असतात, झाले!) पुढे कित्येक महिन्यांच्या जीवघेण्या अखंड प्रवासानंतर ते गलबत अखेरीस कोरियातील किमहाई गया ह्या बंदरात जाऊन उभे राहिले, आणि दैवगतीनुसार सूरीरत्नाचे लग्न तेथील राजकुमार किंवा खरं म्हटलं तर तेथील टोळी प्रमुखाच्या मुलाशी, म्हणजेच किम सुरो ह्याच्याशी मोठ्या थाटामाटात लागले ! त्याकाळी कोरियातील जनता अगदीच अप्रगत अवस्थेत होती. पुढे ह्या सूरीरत्नाने अयोध्येतील राज्यव्यवहारकोशाचे स्थानिक भाषेत भाषांतर करवून घेतले आणि त्यानुसार राज्य कारभार करायला सुरुवात झाली. ह्या जोडीला एकूण १० मुलगे आणि २ मुली झाल्या.

ह्या दहाही मुलांच्यापासून पुढे निर्माण झालेली सर्व प्रजा ही किम ह्याच आडनावाने ओळखली जाऊ लागली. ही सूरीरत्ना आपल्या दैनंदिन जीवनात सनातन धर्माचे अगदी कसोशीने पालन करत असे. तिचे तसे करणे पाहून तिच्या पतीनेही तिच्याप्रमाणेच सारे करायला सुरुवात केली. थोडक्यात किम सुरोने सनातन धर्माचाच स्वीकार केला. त्यांची सर्व १० अधिक २ मुलेही सनातन धर्माप्रमाणे जीवन कंठू लागली. हळूहळू 'यथा राजा,तथा प्रजा' ह्या उक्तीनुसार बऱ्याच नागरिकांनी सनातन धर्माचे निष्ठेने पालन करायला सुरुवात केली.

हळूहळू सूरीरत्नाने तेथे काही हिंदू मंदिरांची उभारणी केली. (दुर्दैवाने आज तेथे त्यातील एकही मंदिर अस्तित्वात नाहीये. ह्याला कारण बहुदा सूरीरत्नाच्या मृत्यूनंतर पुढील काळात तिने सुरु केलेल्या सनातन धर्माच्या प्रसाराचे कार्य मंदावले आणि त्याच सुमारास बौद्धांचा धर्म प्रसार जोरात सुरु राहिला, हेच असावे). तेथे पूजा अर्चा करण्यासाठी कोणीही पुजारी मिळणे अशक्य झाले होते. त्याकाळी बरेच बौद्ध भिक्षु त्यांच्या धर्म प्रसारार्थ चीन देशात जात असत. त्यातीलच काही भिक्षु चीनच्या उत्तर पूर्वेला असलेल्या कोरियात सुद्धा जाऊन पोचले होते. सूरीरत्नाने त्यांची गाठ घेत त्यांना विनंती केली की त्यांनी हिंदुस्थानातून काही सनातनी ब्राह्मण पुजाऱ्यांना कोरियात पाठवायची व्यवस्था करावी म्हणून! बौद्ध भिक्षूंच्या ध्यानात आले की ह्या राणीचे जर आपण ऐकले, तर आपल्याला अनायसेच राजाश्रय मिळेल आणि त्या अनुषंगाने आपल्याला पुढेमागे बौद्ध धर्माचाही प्रसार करता येईल! म्हणून त्यांनी सूरीरत्ना राणीची ही विनंती मान्य केली आणि काही ब्राह्मण पुजाऱ्यांना तिकडे पाठवायची व्यवस्था जरूर केली. मधल्या काळात बौद्ध धर्माचाही प्रसार कोरियात सुरु राहिला. त्यांच्या तसे करण्याला सूरीरत्नाचा विरोध नव्हता, ह्याचे कारण बहुदा सनातन धर्मातील मान्यतेनुसार विष्णूच्या दशावतारात बुद्धाला सुद्धा नववे स्थान देण्यात आलेले आहे! पुढे पुढे हिंदू मंदिरात पूजा करण्यासाठी हिंदुस्थानातून कोणीही तिकडे जाईनासे झाले. ह्याच्या उलट बौद्ध भिक्षुंचे आवागमन मात्र व्यवस्थित सुरूच राहिल्याने बौद्ध धर्म तिकडे भक्कमपणे रुजला, फोफावला; पण हिंदू धर्मसुद्धा थोडाफार तगून राहिला. नाही म्हटलं तरी सर्व किम आडनावाचे लोक स्वतःला सूरीरत्नाचे वंशज म्हणून अभिमानाने जगत राहिले. आणि हा प्रकार आज एकविसाव्या शतकातही टिकून आहे.


अयोध्येत उभारलेले सुरीरत्नाचे स्मारक

हा सर्व इतिहास अजूनही दक्षिण कोरियातील शाळांतून विद्यार्थ्यांना शिकवण्यात येतो. तसं पाहिलं तर आजच्या घडीला दक्षिण कोरियात सनातन धर्म उघडपणे कुठेच दिसत नाही; परंतु किम आडनावाच्या लोकांच्या मनात मात्र अयोध्येबद्दलचे प्रेम जिवंतच आहे. कोरियाच्या सुदैवाने त्यांच्यावर चीन आणि जपान सोडले तर इतर कुठल्याही देशातील आक्रमकांनी (विशेष करून इस्लाम पंथीयांनी) स्वारी केली नाही. चिनी आणि जपानी आक्रमक हे तर बौद्ध धर्मीयच असल्याने अशा आक्रमणानंतर कोरियात पाळल्या जात असलेल्या सनातन व बौद्ध धर्मावर कधी गदा आली नाही. ते असेच सुखेनैव सुरु राहिले.

आजच्या घडीला दक्षिण कोरियात बरीच बौद्ध मंदिरे आहेत. कोणत्याही कोरियन बौद्ध मंदिरात गेलात तर तुम्हाला तिथे चार लोकपाल (दिशा रक्षक?) पाहायला मिळतात. पण तेथील लोक स्कंद, यम , ब्रह्मा ह्यांनाही पूजतात. पुरातन अशी कोणतीही हिंदू मंदिरे आज तेथे अस्तित्वात नाहीयेत.

माझ्या दक्षिण कोरियातील सहा दौऱ्यांच्या वेळी मला तेथे काही नव्याने बांधलेली हिंदू देवळे पाहायला मिळाली. इस्कॉन संप्रदायाने तेथे श्री. राधाकृष्ण मंदिराची उभारणी केलेली आहे. अतिशय स्वच्छ आणि मन प्रसन्न करणारे वातावरण ह्या मंदिरात आहे. इस्कॉनच्या प्रथेनुसार अतिशय विलोभनीय अशा मूर्ती ह्या मंदिरात पाहायला मिळतात आणि वर्षभर इथे नानाविध सनातनी सण साजरे केले जातात. अगदी जगन्नाथाची रथयात्रासुद्धा येथे काढण्यात येते. इथे लंगरची सोय सुद्धा आहे. कोरियात राहणारे आणि कामानिमित्त ये जा करणारे सारे भारतीय लोक ह्या मंदिरात आवर्जून जातातच; परंतु किम ह्या आडनावाचीही बरीच मंडळी ह्या मंदिरात उपस्थिती लावतात. हे मंदिर शिखांच्या गुरुद्वाराला लागूनच आहे.

माझ्या शेवटच्या दक्षिण कोरियाच्या दौऱ्याच्या वेळी मला तेथे नव्याने उभारलेल्या शीख गुरुद्वारातही जाता आले. सन २००४ ला त्याची उभारणी तेथे झाली. त्याचे नाव आहे गुरुद्वारा श्री. सिंग सभा साहिब. हा गुरुद्वारा सेऊलच्या उत्तरेला असलेल्या ग्योनगी प्रांतातील पोचीऑन शहरी आहे. हा दुमजली असून आतील भिंतींवर सर्व शीख गुरु आणि शिखांच्या देदीप्यमान इतिहासातील नानाविध प्रसंगांची सुरेख चित्रे चितारलेली आहेत. इथेही मोफत लंगर सेवा देण्यात येते. आतमध्ये शीख व्यक्तींना जवळपास मोफत राहण्याचीही चांगली सोय आहे. एक अतिशय साधी बांधणी असलेला हा गुरुद्वारा बाहेरून हे मंदिर असावे असे वाटतच नाही. एखादे गोडावून असावे असेच वाटते; पण आतमध्ये गेल्यावर मन अगदी प्रसन्न होते. आतमध्ये गुरु ग्रंथ साहेबाचे सतत कीर्तन सुरु असते. इथेही बरीच कोरियन मंडळी आवर्जून येत असतात.


सेऊल जवळच्या हायेबांगचोन भागात असलेले श्री, राधा श्यामसुंदर मंदिर खूप सुरेख आहे. इथे नित्यनेमाने पूजाअर्चा तर होतेच पण दिवाळी, जन्माष्टमीचे उत्सव मोठ्या दिमाखात साजरे होतात. दर रविवारी इथे योगाचे वर्ग, हिंदी भाषेचे वर्ग इत्यादी चालवण्यात येतात.

मुख्य सेऊल शहरात असलेले लक्ष्मी नारायण मंदिर सुद्धा आवर्जून पाहावे असेच आहे. तसेच सेऊलच्या जवळील सेओचो येथे हिमालयन मेडिटेशन आणि योग साधना मंदिरात नित्यनेमाने योगाभ्यास शिकवण्यात येतो. ह्याचे वैशिष्ठ्य म्हणजे इथे योग शिकण्यासाठी कोरियन लोकच बहुसंख्येने येतात. सेऊलच्या जवळ असलेल्या जोंगनो जिल्ह्यात साम्गाकासान गेमसेवनसा असे विचित्र नावाचे बौद्ध मंदिर बघण्यासारखे आहे. ह्या मंदिराचा परिसर म्हणजे एक राष्ट्रीय उद्यान असल्याने अतिशय रम्य असे वातावरण इथे आहे. ह्या बौद्ध मंदिराची उभारणी ५०० वर्षांपूर्वी करण्यात आली. जवळच बुखानसान नावाच्या डोंगरातील बीबॉन्ग नावाचे एक उंच हिरवेगार शिखर असून त्यावरून अतिशय आल्हाददायक गार वारे सतत वाहत असतात. अर्थात मी त्यांच्या उन्हाळ्यात तेथे गेल्याने शिखर हिरवे गार होते. थंडीत हा सारा भाग बर्फाखाली जात असतो.

ह्या बौद्ध मंदिरात राहण्याची उत्तम सोय आहे. अर्थात त्यासाठी आगाऊ नोंदणी आवश्यक आहे.

दक्षिण कोरियात बऱ्याच ठिकाणी बौद्ध मंदिरे आहेत. ह्याच्या तुलनेत पुरातन हिंदू मंदिरे जवळपास नगण्यच आहेत. ह्याचा अर्थ हिंदू सनातन धर्माची ध्वजा पुढे चालवण्यासाठी हिंदुस्थानातून कोणीही तिकडे जायला उत्सुकच नसायचे.

ह्याच्या उलट सम्राट अशोकाच्या प्रोत्साहनामुळे बौद्ध भिक्षु संपूर्ण आशिया खंडात धर्म प्रसारासाठी भ्रमण करत राहिले. एवढे सगळे असूनही येथील किम ह्या आडनावाचे लोक मात्र हिंदुस्थान आणि अयोध्या ह्या त्यांच्यासाठी पवित्र भूमीशी अजूनही चिकटूनच आहेत, हे पाहून मला खूप बरे वाटले. पुढे आमचा एजन्ट श्री. किम हा जेव्हा सर्वात प्रथम हिंदुस्थानात आला तेव्हा मी त्याला घेऊन अयोध्येला गेलो होतो. परंतु त्यावेळेस तेथील रामजन्मभूमीचा वाद मिटलेला नसल्याने अयोध्येतील निम लष्करी फौजांचा बंदोबस्त पाहून किम नाराज झाला होता. तोवर तेथे शरयू नदीच्या काठी सूरीरत्नाचे पहिले स्मारक सुद्धा उभारण्यात आलेले नव्हते. तसेच तेथील स्थानिक लोकांना मी जेव्हा सूरीरत्नाबद्दल , किंवा तिच्या राजवाड्याबद्दल विचारणा केली तेव्हा यच्चयावत सर्वांनी त्याबद्दल काहीही माहिती नसल्याचे सांगितले. आपल्याकडील शाळेतून हा इतिहास शिकवण्यातच न आल्याने तो कोणालाही माहीतच नव्हता! असो. ह्याबद्दल अधिक काही न बोलणेच बरे. आपल्या देशाची इभ्रत राखण्यासाठी मी आपल्याकडील लोकांना सूरीरत्नाची काहीही माहिती नसल्याचे किमला अजिबात कळू दिले नाही, फक्त तिच्या वडिलांचा त्या काळचा राजवाडा जमीनदोस्त झाल्याचे त्याला सांगून कशी तरी वेळ मारून नेली !




तसे पहिले तर हिंदुस्थानातून फार मोठ्या संख्येने भारतीय पर्यटक कधीच दक्षिण कोरियात जात नाहीत. असे असल्याने एक सेऊल सोडले तर तिथल्या इतर कुठल्याही शहरात भारतीय रेस्टोरंटस अजिबात नाहीयेत. सेऊल मध्ये मात्र एकदोन भारतीय, एक नेपाळी, एक बांगलादेशी आणि एक बर्मीज रेस्टोरंट आहे आणि ही सर्व इंडियन रेस्टोरंट ह्या नावावरच चालतात. सेऊल च्या बरोबरच मी बुसान, जेजू बेट, जॅओंगजू , इंचियोन, डायेगु अशा काही शहरात कामानिमित्त गेलो. आता सेऊलचा आंतरराष्ट्रीय विमानतळ हा इंचियोन येथे हलवण्यात आलाय. त्यामुळे माझ्या शेवटच्या दोन दौऱ्यांत मी इंचियोन येथे उतरलो. इथून सेऊल सुमारे एक तासाच्या अंतरावर आहे. वाटेत समुद्रावरचा एक खूप लांबलचक पूल लागतो. ते पाहून मला नवी मुंबई आणि मुंबईची आठवण आली. जेजू बेट हे एक अप्रतिम बेट आहे, ते सेऊलपासून सुमारे ८५ किलोमीटर्स दूरवर आहे. इथले निसर्ग सौंदर्य अप्रतिम असून जगातील नवीन सात आश्चर्यांपैकी ह्या बेटाला एक असा दर्जा प्राप्त झालाय.

स्वतः सेऊल शहरात पाहण्यासारखी बरीच ठिकाणे आहेत. म्येओंगदोंग नावाचा भाग शॉपिंग करण्यासाठी नंदनवन असाच म्हटला जातो. तसेच नामसान सेऊल टॉवर, ओल्ड ट्रॅडिशनल खेडेगाव, म्युझियम, स्थानिक राजवाडा, लोटे टॉवर , इट्टवोन इत्यादी जागा बघण्यासारख्याच आहेत. इथल्या स्थानिक राजवाड्यासमोर दिवसातून दोन वेळा चेन्ज ऑफ गार्डस हा कार्यक्रम पाहायला खूप गर्दी जमते. लंडनमधील बकिंगहॅम पॅलेसच्या धर्तीवरील हा कार्यक्रम खूप शानदार असतो.


नामसान सेऊल टॉवर हा एक २३६ मीटर्स उंच टॉवर असून हा १९६९ साली कम्युनिकेशन टॉवर म्हणून बांधण्यात आला.

वर जाण्यासाठी केबल कार उपलब्ध आहे. तेथे दर्शक सज्जा, तसेच विशिंग पॉन्ड आहे. ह्या पॉन्ड मध्ये खूप लोक काहीतरी मागणे मागून पैसे टाकतात! तेथे टाकण्यात आलेल्या नाण्यांचा उपयोग चीनमधील आणि आग्नेय आशियातील गरीब मुलांच्या शिक्षणासाठी करण्यात येतो. इथे मी आमच्या किमला विचारलं, की ह्याचा उपयोग दक्षिण कोरियातील गरीब मुलांसाठी का करत नाहीत? त्याने उत्तर दिले, की दक्षिण कोरियात कोणीच गरीब नाहीये! आणि ही गोष्ट खरी आहे. माझ्या सहाही दौऱ्याच्या वेळी मला तेथे एकही भिकारी आढळला नाही. कुठेही झोपडपट्टी सदृश काहीही दिसले नाही.

ह्या टॉवर जवळील ऑबझर्व्हेटरी जवळ एक मोठा हॉल असून त्यात कोरियाच्या गेल्या ६०० वर्षातील ऐतिहासिक गोष्टी बघायला मिळतात. तेथेच एक नाटकाचा हॉल आहे. मला किम तेथे घेऊन गेला असताना तेथे एक नृत्यनाट्य सुरु होते. हॉलमध्ये कमीतकमी २५०, ३०० प्रेक्षक उपस्थित होते. त्यात मी एकटाच परदेशी इसम होतो! समोर नेमके काय चालू आहे ते मला कळणे अशक्यच होते. किम म्हणाला की त्यांच्या इतिहासातील कोणत्या तरी एका कथेवर नाट्य सुरु होते. त्या नाटकाच्या शेवटी त्यातील सूत्रधाराने किम जवळ येऊन विचारले की मी कोणत्या देशातून आलोय म्हणून! किमने मी भारतीय असल्याचे सांगितल्यावर त्या सूत्रधाराने तसे जाहीर केले आणि अचानक लाईटचा फोकस माझ्यावर आला. सर्व लोक माझ्याकडे बघत टाळ्या वाजवू लागले. मी उभे राहून कंबरेतून वाकून साऱ्यांना मानवंदना दिली. नाटक संपल्यावर एकाने एक अभिप्रायाचे पुस्तक माझ्याकडे देत त्यावर माझा अभिप्राय लिहायची विनंती केली. मी तेथे काय लिहिले ते काही आता नीट आठवत नाही, परंतु LONG LIVE INDIA SOUTH KOREA FRIENDSHIP असे लिहिल्याचे मात्र आठवत आहे! असो.

ह्या दक्षिण कोरियातील एकंदर साऱ्या गोष्टी पाहून मी खूपच प्रभावित झालो. त्याहूनही मला ही सूरीरत्नाची कहाणी मनाला खूपच भावली. आणि म्हणूनच तिच्या त्या कहाणीवर आधारित अशी 'सूरीरत्ना' ह्याच नावाची एक कादंबरी मी नुकतीच लिहून पूर्ण केलेली आहे. बघूया आता तिचे प्रकाशन कधी होतंय ते! एकंदरीत दक्षिण कोरिया हा एक नयनरम्य असा देश आहे. ह्या देशात सखल भाग कमी असून शहराबाहेर पडलात की सतत डोंगरदऱ्या लागतात. उन्हाळ्यात उबदार वातावरण तर थंडीत प्रचंड थंडी असे हवामान तेथे असते. एकदा तेथे भेट देऊन बघण्यासारखा नक्कीच हा देश असल्याने ज्यांना भ्रमंतीची आवड आहे अशा लोकांनी त्यांच्या ट्रॅव्हल बकेट लिस्टमध्ये ह्या देशाचे नाव टाकायला काहीच हरकत नाही.


**माधव मनोहर जोशी.**



# माझी टोकियोवारी !

सूर्याची तीव्र किरणे डोळ्यावर पडली आणि मी खडबडून जागा झालो. नक्कीच दहा वाजले असणार. मुंबई-सिंगापूर-टोकियो प्रवासाने दमून गेल्यामुळे जाग आली नसणार. जपानचे लोक फारच शिस्तबद्ध असतात. वेळेवर परिषदेला पोचलो नाही तर आत घेणार नाही. एवढ्या दूर ज्यासाठी आलो आहे त्या परिषदेत सहभागी होऊ शकणार नाही या विचाराने मी अस्वस्थ झालो. माझ्या डोळ्यासमोर कुठल्याशा हॉलिवूड चित्रपटातला एक जपानी सामुराई येऊन माझा रस्ता अडवत असल्याचा भास झाला. मी डोळे चोळत घड्याळाकडे पाहिलं. सकाळचे ५.४५! मला वाटले मी घड्याळाची वेळ देशाच्या वेळेनुसार बदललेली नाही. मग पुन्हा फोनमधील सर्व देशांच्या वेळा दाखवणाऱ्या घड्याळात






वेळ पाहिली तर खरंच पहाटेचे पावणेसहा वाजले होते आणि लख्ख ऊन पडले होते. लक्षात आले की इथे पहाटे ५ वाजता सूर्योदय होतो. उगवत्या सूर्याच्या देशात पहाटेच्या सूर्यानेच जणू माझे स्वागत केले!

वैद्यकीय परिषदेतील विचार-विमर्षाइतकीच किंवा त्याहून अधिक मला उत्सुकता होती ती जपानमधील लोकसंस्कृतीची किमान थोडी तरी ओळख व्हावी याची. जपानी मनुष्य हा वक्तशीरपणा, शिस्तबद्धपणा आणि कामाबद्दलच्या नैतिकतेसाठी प्रसिद्ध आहे. ते पदोपदी जाणवते. त्याबरोबरच सामाजिक शिष्टाचार सुद्धा पाळणारा आहे. एखादी वस्तू विकत घ्यायची असेल आणि सामान्य जपानी माणूस समोर उभा असेल तर सांगायचे कसे हा यक्षप्रश्न उभा रहायचा. बऱ्याच लोकांना इंग्लिशचा गंधही नाही. आणि आपल्याला जपानी भाषेचे 'ओ का ठो' कळत नाही. मग महाविद्यालयातील नाटकांमध्ये शिकलेल्या अभिनय कलेचा पूर्ण वापर करून केलेल्या इशाऱ्यांचाही काहीही उपयोग झाला नाही. त्यांचे चेहेरे पाहून त्यांना काही कळले नाही हे मला लक्षात आले. अचानक त्यातील एकाने मोबाईल पुढे केला. गूगल संभाषक कामाला आला; आणि १५-२० मिनिटाच्या अथक प्रयत्नानंतर त्यांच्या लक्षात आले मला काय पाहिजे ते; आणि माझा जीव भांड्यात पडला.

इलेक्ट्रिक वस्तूंच्या बाबतीत जपानने बरीच प्रगती केली आहे. कारखान्यातील रोबोट पासून टॉयलेट कमोड पर्यंत सर्वत्र अत्याधुनिक तंत्रद्यानाचा वापर केला आहे. टॉयलेट सीट ने माझे विशेष ध्यान आकर्षित केले. बसल्यावर आपोआप सिटच्या तापमानात बदल, वेगवेगळ्या दिशेचे आणि वेगाचे पाण्याचे फवारे हे सगळे पाहून जपानसारखे या जागेचे  चोचले दुसरे कोणी पुरवत नसणार अशी मला खात्री पटली.



जपानमधील खाणे हे एक विशेष आकर्षण होते. सुशी, रामेन, टेम्पुरा अशी नावे ऐकून त्याबद्दल फार कुतूहल होते. पंजाबी चायनीज आणि जैन आम्लेट मिळणाऱ्या देशातून आल्यामुळे मला सुशी पण शाकाहारी मिळू शकत असेल असा भाबडा समज होता; पण सुशी, रामेन हे सारे माशांचेच पदार्थ आहेत हे समजल्याने माझ्यासारख्या शाकाहारी प्राण्याचा हिरमोड झाला. शाकाहारी पदार्थ ही संकल्पना त्यांच्या कल्पनेतही नाही हे," कॅन व्हाइट ब्रेड बी ॲडेड इन व्हेज फूड ?" या शेफच्या प्रश्नाने लक्षात आले.



मग भातावर दिवस काढत असताना रात्री एका भारतीय खानावळीचा पत्ता मिळाल्यावर आम्हाला जो आनंद झाला तो शब्दात सांगण्यासारखा नाही. त्या खानावळीत नेपाळी गाणी  लागली होती. लोकांचीही भाषा नेपाळी होती. जेवण तसे ठीक होते पण आम्हाला ते पंचपक्वान्नासारखे वाटले. खानावळीपासून विद्यार्थी आणि आमचा प्रवासी वाहनचालक हे बरेच नेपाळी होते. टोकियो फिरताना नेपाळी व्हॅनचालकाशी गट्टी  जमली. तो हिंदी चांगले बोलत होता. गप्पिष्ट होता. १०-१२ वर्षांपासून तिथे राहत होता. त्याची शिस्त, अणुबॉम्बच्या हल्ल्यानंतर त्यांनी स्वीकारलेली संस्कृती, वर्क-कल्चर याबाबत नवनवीन माहिती कळत  होती. तो मिस्टर लामा चांगलाच शिकलेला वाटत होता. मी सहजच विचारले विद्यार्थी म्हणून टोकियोला आले आहात तर वाहनचालक म्हणून का काम करत आहात ?


एक लांब श्वास घेऊन तो म्हणाला, “दहा वर्षांपूर्वी इंजिनीअर म्हणून इथे आलो होतो. पहिले सहा वर्ष कारच्या कंपनीमध्ये कामाला होतो. दिवसभर कामाच्या व्यापात सहा वर्ष कसे गेले कळले नाही. नंतर एक घटना घडली, कोणत्या तरी कारच्या बॅच मध्ये एअरबॅग  डिफेक्टिव्ह सापडली. ती संपूर्ण बॅच परदेशातून परत मागवावी लागली.




आणि त्याच्या निर्मितीमध्ये सहभागी असलेल्या १०० इंजिनीअरांना कामावरून काढून टाकले". त्यातलाच एक लामा होता. आपले काम, त्याचे परफेक्शन याबाबत हे लोक इतकी टोकाची भूमिका घेऊन आहेत की त्या सर्व १०० इंजिनीअरांना जपानमध्ये इंजिनीअर म्हणून काम करता येणार नाही असा शेरा सर्टिफिकेट वर मारला .

" मग तुम्ही परत का नाही गेलात?" "प्रयत्न करून पहिला पण बाकीच्या देशातील वातावरण, काम आवडले नाही मला. टोकियोच आवडते. मग मी पर्यटनाचा व्यवसाय चालू केला. बरं चाललंय. ताणपण कमी आहे." आणि तो भविष्याचे प्लॅन सांगू लागला. मी त्याच्याकडे पाहतच राहिलो. "चुकीला माफी नाही " हे एका चित्रपटातील वाक्य डोक्यात घोळायला लागले. एका चुकीसाठी पूर्ण करियर संपवणारं जपान आणि तरीही आनंदाने राहायला स्वीकारणारा तो लामा हे सर्व मला अनाकलनीय होते .


"साब, शिबुयु क्रॉसिंग आ गया." प्रथमच मला एवढे जपानी लोकं त्या पादचारी मागाहून जाताना दिसले. असे म्हणतात की एकावेळी ३००० लोकं हा रस्ता पार करतात. आतापर्यंत रिकामे रस्ते पाहून मला प्रश्न पडला होता की हे टोकियोतील करोडो लोकं आहेत कुठे ? आता कळल की कामावरून सुटून मेट्रोमधून बाहेर पडल्यावर ते शिबुयु क्रॉसिंगवर दिसतात. नाहीतर ते कामावर, घरी किंवा मेट्रोमध्येच सापडतात. टॅक्सी आणि खाजगी वाहने त्यावरील करामुळे सामान्य जपानी माणसाच्या परवडण्याच्या पलीकडे असतात त्यामुळे रस्ते बरेच रिकामे वाटले. किंवा मुंबईची रहदारी आणि गर्दी रोज पाहिलेल्याना ही शिबुयु क्रॉसिंग च्या गर्दीचे फारसे विशेष वाटणार नाही. इथल्या माणसांना विरार लोकलमधील गर्दी दाखवण्याची धमाल पर्यटनाची आयडिया अचानक डोक्यात आली. तिथे जवळच ' हाचिको' नावाच्या कुत्र्याचा पुतळा होता. मालकाच्या मृत्यूनंतर ९ वर्षे तो या ठिकाणी त्याची वाट पाहत होता. लोकं त्या पुतळ्याजवळ फोटो काढत होते. आम्हीही काढले. स्वामीनिष्ठा साजरा करणे हाही जपानी संस्कृतीचा एक भाग होता.





दुसऱ्या दिवशी वैद्यकीय परिषदेचा समारोप झाल्या झाल्या आम्ही ४ सहकारी पुन्हा टोकियो दर्शनास निघालो. टोकियो स्काय ट्री, एक ६३४ मीटरची उत्तुंग इमारत. जगातील सर्वात उंच टॉवर आणि जगातील तिसऱ्या क्रमांकावरील उंच इमारत.

३५० आणि ४५० मीटर वरून टोकियो न्याहाळताना कानात गाणे गुंजत होते, “आज मे उपर, आसमाँ नीचे ..." ते रेखीव,अत्याधुनिक इमारतींनी सजलेले ते नव्या युगातील टोकियो! महायुद्धानंतर हे सर्व राखरांगोळी झाले होते. फिनिक्स पक्ष्याप्रमाणे जपानी माणसाने कष्टाने परत हे वैभव उभे केले. ह्या आधुनिक शहरात दूरवर एक प्राचीन मंदिर दिसत होते. खऱ्या प्राचीन जपानी संस्कृतीचे दर्शन तर अजून झालेच नव्हते, दिसत होते ते आधुनिक जपान. दूरवर एक पर्वत मेघांमध्ये दडलेला दिसत होता. एखाद्या धीरगंभीर बौद्धभिक्षूप्रमाणे समाधिस्त वाटत होता. माउंट फिजी ! एक जिवंत ज्वालामुखी .. बघण्याची खूप इच्छा होती पण यावेळी ते जमण्यासारखे नव्हते. मग आम्ही कमीतकमी एखाद्या जवळच्या मंदिराला भेट देऊन जपानी संस्कृतीचे दर्शन घ्यावे असे ठरले.



सेनसोजी मंदिर, टोकियो मधले सर्वात पुरातन बौद्धमंदिर! सहाव्या शतकापासून ते जपानी वास्तुशात्राचा अप्रतिम नमुना म्हणून प्रसिद्ध होते. महायुद्धानंतर त्याला परत उभे केले होते. मंदिराच्या दोन्ही बाजूला बरीच छोटी दुकाने होती. जपानी भेटवस्तू नीटनेटक्या पद्धतीने मांडल्या होत्या. कमालीची स्वच्छता होती. मंदिरात दर्शनासाठी भक्त शांतपणे आणि संयमाने रांगेत उभे होते. इथे मला पहिल्यांदा जपानी पोशाख ‘किमोनो’ घातलेले लोक दिसले. आपला नंबर आल्यावर भक्तिभावाने नमस्कार करून परतत होते. भक्तिभावाने नमस्कार करणारे ते जपानी आजोबा आणि हजारो किलोमीटर दूरवर गणेशमंदिरात नमस्कार करणारे आपले आजोबा, मला सारखेच वाटले. वंश, धर्म ,देश याच्यापलीकडे सर्वात एक समान गोष्ट आहे ... मानवी भावना .

त्या मंदिरात मला तीच मनाची शांतता लाभली जी कॉलनीतल्या गणेश मंदिरात लाभायची. मग मी उगाचच रस्त्यावरच्या  जपानी लोकांकडे पाहून ते भारतात असते तर कसे वागले, बोलले असते असा विचार करायला लागलो. मग थोड्यावेळात मला सर्व माणसे सारखीच वाटायला लागली. ही अशीच उचलून भारत, जपान, यूरोप किंवा अमेरिकेत ठेवली तरी काही फरक पडणार नाही. शेवटी सर्व मनुष्य समानच वागणार. देश, धर्म,वंश यांच्या सगळया मर्यादा मनुष्यनिर्मितच आहेत. अचानक खांद्यावर पडलेल्या थापेने मी तंद्रीतून जागा झालो. परतायची वेळ झाली होती. फार कमी वेळ होतो इथे असे वाटते होते.

पुढ्याच्या वेळी नक्की संपूर्ण जपान पाहायचे मनोमन निश्चित करत परत फिरलो . विमानात डोळा लागला असताना ‘किमोनो’ घालून नमस्कार करणारे जपानी आजोबा, सामुराई, वेगाने रास्ता ओलांडणारी जपानी लोकं, शांतपणे हसणारा लामा असे अनेक चेहरे वेगाने नजरेसमोरून जात होते. आणि





उगवत्या सूर्याच्या देशातून मी परत निघालो होतो ...पण नक्कीच थोडा सूज्ञ होऊन . म्हणतात ना केल्याने देशाटन ...

**डॉ. क्षितीज चंद्रकांत जोशी**



## Gold Rush

42nd wedding anniversary in Lake Tahoe and Reno, Nevada

We recently celebrated our slightly belated 42nd wedding anniversary in the beautiful Lake Tahoe, NV. While the 42nd anniversary might not be a traditional milestone, it holds deep significance—marking over four decades of love, respect, and the shared experiences of being first-generation Indians navigating life's journey in pursuit of the American Dream. It feels like just yesterday that we took our marital vows on September 3, 1982, in Mumbai, promising to stand by each other through both joy and sorrow.

Lake Tahoe, the largest alpine lake in the U.S., boasts a rich history spanning thousands of years. The original inhabitants of the region were the Washoe tribe, who lived off the land through fishing and hunting. During the California Gold Rush in the mid-1800s, the surrounding forests were logged extensively to provide timber for mining and railroad construction. Today, Lake Tahoe is a popular destination for visitors who come to enjoy its pristine waters, scenic hiking trails, and world-renowned skiing.

We spent our time at Lake Tahoe hiking and exploring the breathtaking Emerald Bay, where we climbed several hundred feet to take in nature's beauty. The views were simply spectacular, with Emerald Bay offering a picturesque scene, complete with a small island and a historic mansion on it.

We also made a stop in Reno, Nevada, a city with a history as colorful as Tahoe's. Named after General Jesse L. Reno in the mid-1800s, Reno's early development was influenced by the nearby gold and silver rush in Virginia City. With the arrival of the Union Pacific Railroad, Reno grew as a major transportation hub. In the mid-20th century, the liberalization of gambling helped Reno flourish as a gambling mecca. While gambling has since declined, the city is transforming into a hub for technology and culture, spurred by significant investments from companies like Tesla.

Our time in Reno included a leisurely walk along the Truckee River and a visit to the famous Reno Arch. We also toured the National Automobile Museum, which houses an incredible collection of 200 cars, including a 24-karat gold-plated 1921 Rolls Royce, a luxurious 1931 Mercedes, and a Ford Model T mail truck. One of the highlights was seeing a 100-year-old electric car produced by a Detroit company, which used traditional

batteries to achieve a 50-mile range. The museum also features century-old locomotives that have been carefully preserved—true marvels of engineering history.

Reflecting on our journey, Sunanda and I feel incredibly fortunate. We came to this country in search of our 'gold' ,metaphorically speaking, and found something far more precious: a loving family that includes our two sons, a wonderful daughter-in-law, and our granddaughter Ketki, who is the icing on the cake. We are blessed with good health—having recently completed a 5K run—and are now enjoying our golden years.

As we look back, we are filled with gratitude for the many blessings, the numerous opportunities we got to grow professionally, the fortunate twists of fate, and the unwavering support of our friends and family.

We found our gold.

Rajeev Gokhale





# वरुडचे अतिप्राचीन श्रीराम मंदिर

नगरपालिकेच्या जुन्या इमारतीजवळ गेलो की एक सुंदर नक्षीकामाचा नमुना असलेला मंदिराचा उंच कळस दृष्टीस पडतो. त्याच्या अवतीभोवतीच्या घरांच्या असलेल्या दाटी मधून रस्ता शोधत एका बोळीतून डावीकडे वळल्यावर एक भव्य पुरातन मंदिर दिसून येते. राजस्थानी खरपाच्या दगडांनी बांधलेलं पुरातन श्रीराम मंदिर. या मंदिराच्या आत राम, लक्ष्मण व सीता यांच्या संगमरवर पांढऱ्याशुभ्र दगडाच्या मूर्ती उभ्या आहेत. उंच निमुळत्या घुमटाच्या आत एका खरपाच्या चौथऱ्यावर या तीन देखण्या मूर्ती रथावर विराजमान असून त्यांच्या खालच्या पायरीवर राधा व कृष्णाच्या संगमरवरी मूर्ती सुद्धा स्थानापन्न आहेत.



सर्वांनी भरजरी वस्त्र परिधान केले असून राम-लक्ष्मण यांच्या हाती धनुष्य आहे. मंदिराच्या बांधणीच्या पद्धतीवरून राजस्थानच्या कारागिरांनी वरुडला येऊन हे मंदिर बांधले असावे.

या पौराणिक मंदिराचा अधिक ऐतिहासिक तपशील अभ्यासला असता अशी माहिती समोर आली, की जवळच वरुडला लागून असलेल्या मध्य प्रदेशातील उज्जैन येथे त्या काळात संपन्न झालेल्या एका कुंभ मेळाव्यात राजस्थानच्या जयपूर येथून काही नागा साधू सहभागी होण्याकरिता येऊन गेलेत. त्यामध्ये राजस्थानचे अंबरदास महंत महाराज व त्यांचे सोबती सहभागी होते. कुंभमेळ्याची समाप्ती झाल्यावर हे नागा साधू पर्यटन म्हणून महाराष्ट्रातील पठाराच्या रांगांनी नटलेल्या सुजलाम्-सुफलाम् अशा वऱ्हाड प्रांतात आलेत. पठारावरील वनांमधून जडीबुटीचे शोधार्थ भरपूर भ्रमण करून झाल्यावर विश्रांती म्हणून वरुडच्या मध्यभागी चुडामन नदीच्या काठावर वसलेल्या एका उंच गढीच्या पायथ्याशी या साधूंनी आश्रय घेतला. वरुडच्या मध्य भागातून वाहत असलेल्या चुडामन नदीचा स्वच्छ, सुंदर असा रमणीय परिसर पाहून आकर्षित झालेले साधू काही दिवसांच्या विश्रांती नंतर येथेच रममाण झाले. तेथेच त्यांनी आपला छोटेखानी मठ स्थापन केला. तो अंदाजे सतराव्या शतकातील काळ या नागा साधूंच्या मठामुळे या ठिकाणी विविध साधुसंतांचे जाणे येणे सुरू राहीले.

या मठाचे संस्थापक अंबरदास महाराज हे संत कबीरांचे गुरुवर्य रामानंद संप्रदायाचे सेवक होते. रामानंद प्रवर्तित त्या संप्रदायाचे प्रस्थ त्या काळात राजस्थानच्या जयपूर भागात मोठ्या प्रमाणात होते. मर्यादा पुरुषोत्तम श्री राम व सीता या संप्रदायाचे आराध्य दैवत मानले जायचे. 'ओम श्रीरामाय नमः' हा गुरुमंत्र तेव्हाचे या संप्रदायाचे प्रचारक आपल्या शिष्यांना प्रदान करायचे. त्या रामानंद संप्रदायाचा प्रचार व प्रसार भारतभर करण्याच्या हेतूने त्यांची एक शाखा अंबरदास महंत महाराजांनी या भूमीत स्थापन केली. तेव्हा त्यांनी श्रीराम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्ती जयपूर वरून आणून एक छोटेखानी मंदिर बांधले होते. तो सतराव्या शतकाच्या सुरुवातीचा काळ असावा. ब्रम्हचारी असलेल्या अंबरदास महंत महाराजांनी वरुड परिसरात आपला शिष्य परिवार तयार करून मठाधिपती म्हणून ते स्थानापन्न झाले.





संत्रा नगरी वरुडच्या भूमीत पहिल्या श्रीराम मंदिराची स्थापना केल्यावर पुढील काही वर्षात वार्धक्यामुळे अंबरदास महाराजांचे निधन झाले. रामानंद संप्रदायाच्या प्रथेनुसार श्रीराम मंदिराच्या परिसरातच त्यांची समाधी बांधण्यात आली. देहत्यागापूर्वी त्यांनी आपल्या विश्वासातील लालदास उर्फ गोधडदास या आपल्या शिष्याला गादीचा वारस नेमला होता. लालदास उर्फ गोदडदास महाराजांनी पुढे या मंदिराच्या जीर्णोद्धाराचा शुभारंभ केला; परंतु बांधकाम पूर्णत्वास नेण्यापूर्वीच ते स्वर्गवासी झाले. त्यानंतर काही वर्षे मंदिराचे बांधकाम अपूर्णावस्थेत राहिले. त्यांनीच नेमून दिलेल्या आपल्या उत्तराधिकाऱ्यांपैकी जगन्नाथ ऊर्फ सुरानंददास व गरीबदास उर्फ पूर्णदास, मुरलीधर दास तसेच मोहनदास यांनी आपापल्या परीने त्यांच्या काळात या मंदिराचा उर्वरित जीर्णोद्धार सुरू ठेवला. प्रत्येकच उत्तराधिकाऱ्यानी मंदिराच्या परिसरात विविध मूर्तींची स्थापना केली. त्यामध्ये राधाकृष्ण मंदिर, गरुड मंदिर, श्रीगणपती व श्रीहनुमान मंदिर तसेच विविध

तीर्थयात्रेवरून साधू-संतांनी आणलेल्या विविध रंगांच्या शाळीग्राम मूर्त्यांची स्थापना सुद्धा या परिसरात दिसून येते.

मंदिराच्या इतिहासात होऊन गेलेल्या पाच उत्तराधिकाऱ्यांच्या समाधी आजही चांगल्या अवस्थेत आपल्याला या परिसरात पाहायला मिळतात.

मंदिरातील लोखंडी संदुकातील जुन्या दस्तऐवजांचा शोध घेतला असता कोणताही लिखित पुरावा उपलब्ध नसला तरीही सहा-सात हस्तलिखित पोथ्या मात्र जीर्ण अवस्थेत आढळून आल्या. या हस्तलिखितांची सुरुवातीचे पाने व काहींची शेवटची पाने गहाळ असल्याने त्यांचा नेमका विषय कोणता हे कळत नाही.

त्यामध्ये एक रामचरित्रमानस या ग्रंथाची जुनी प्रत असून, 'भक्तमाला' या हिंदी पौराणिक ग्रंथाची टीका लिहिली आहे.

प्रस्तुत ग्रंथ अठराशे शहाण्णव मध्ये ज्येष्ठ महिन्यात शुक्ल पक्षी सप्तमीला लिहून पूर्ण केला असा उल्लेख आढळतो. त्यावरून ते एकशे पंचवीस वर्षांपूर्वीचे हस्तलिखित असून उर्वरित जीर्ण झालेली, पानांचे तुकडे पडलेली हस्तलिखिते एकशे पन्नास वर्षांपूर्वीची असावीत.

या मंदिराचे संस्थापक अंबरदास महाराजांच्या नंतर त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांपैकी मोहनदास महंत यांच्या कुटुंबातील सध्या हयात असलेले श्री. दिलीप महंत यांना या मंदिराचा उत्तराधिकारी म्हणून सूत्रे सोपवली होती. मोहनदास महाराज हे दिलीपराव महंत यांचे काका होते. राजस्थान येथील जयपूरचे मूळ निवासी असलेले दिलीपजी महंत यांना बालपणी चौथी किंवा पाचवीत असताना त्यांच्या आजीने सहज फिरून येऊ म्हणून सोबत घेऊन वरुडच्या मंदिरात आणले आणि इथल्याच शाळेत नाव टाकून कालांतराने आजी व नातू येथे स्थायिक झालेत. पुढे शालेय शिक्षण घेतानाच दिलीप महंत यांनी त्यांचे काका मोहनदास महाराज यांचेकडून पूजा पाठाचे विधीवत ज्ञान प्राप्त केले. सोबतच त्यांचा विश्वास सुद्धा संपादन केल्याने त्यांनी दिलीप महंत यांना मोठे झाल्यावर या मंदीराची जबाबदारी सोपवून ते स्वर्गवासी झाले.

या मंदिराची कोणताही ट्रस्ट किंवा संस्था रजिस्टर केली नसून, आजही या मंदिराची नोंद दिलीपराव महंत व त्यांचे कुटुंबीय यांच्या नावाने शासकीय कार्यालयात आढळते.

परंतु आपण गेल्यावर या वरूड परिसरात आपले नाव अमर राहावे म्हणून मोहनदास महाराजांनी मंदिराच्या मालकीची पंधरा हजार स्क्वेअर फूट जागा एकोणीसशे सत्यांशी साली वरुडमधे नव्याने निर्माण झालेल्या संत श्री गजानन महाराजांच्या मंदिरासाठी त्या संस्थेला दान केली. आज त्याच जागेवर सुंदर असे संत श्री गजानन महाराजांचे भव्य मंदिर उभे असून संत्रा नगरीच्या अध्यात्म क्षेत्रात मोलाची भर घालीत आहे.

जवळपास वयाच्या साठीत पोहोचलेले दिलीपजी महंत  महाराज नित्यनेमाने आजही मंदिराच्या सेवेत असून दरवर्षी विविध उत्सव या मंदिरात मोठ्या उत्साहाने साजरे करतात. त्यामध्ये श्रीरामांच्या जन्मानिमित्त संपन्न  होणारा श्री राम जन्मोत्सव असून,

या उत्सवामध्ये रामाच्या तीर्थ स्थापनेपासून तर नऊ दिवस विविध आध्यात्मिक कार्यक्रम तसेच रामायणाचे पारायण सुद्धा अतिशय भक्ती भावाने केले जाते. तसेच भगवान श्रीकृष्णाचा जन्माष्टमी उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. त्याचबरोबर  परिवर्तनीय एकादशी आणि त्यानिमित्त रामढोलाचे आयोजन  होत असते. वसंत पंचमी निमित्त केसरी भाताचा भोग  सुद्धा चढविला जातो. दिवाळीच्या दुसऱ्या

दिवशी गोवर्धन पूजा करून भव्य अन्नकुटाचे आयोजन केल्या जात असते. या मंदिराच्या परिसरात वर्षभरात होणाऱ्या विविध उत्सवामध्ये परिसरातील हजारो भाविक महाप्रसादाचा लाभ घेत असतात.
वरुड परिसरातील विविध धार्मिक व सामाजिक संस्था सुद्धा आपले कार्यक्रम व उपक्रम या मंदीराच्या सभागृहामध्ये आयोजित करून सामाजिक एकोपा निर्माण करीत असतात. विदर्भाचा कॅलिफोर्निया म्हणून प्रसिद्ध असलेल्या संत्रा नगरी वरूड मधील एकमेव व सर्वात पौराणिक अशा या श्रीराम मंदिराने वरुडच्या  धार्मिक इतिहासात आपली उल्लेखनीय नोंद केली आहे.



**अजय देशपांडे**

**(पत्रकार व साहित्यिक)**

**जि. अमरावती**



# संवाद

ओसरीवरच्या पहिल्या पायरीवर काठीचा आवाज आला, की दोन सुरकुतलेले नक्षीदार हात धावायचे पाणी आणायला कोपऱ्यातल्या खुंटीला पगडी भेटायची आणि कोपऱ्याला काठी काकणांची किणकिण आणि तांब्या ठेवल्याचा पुसटसा आवाज एवढाच काय तो संवाद...

"आज्जू, तू कधी बोलत नाहीस का आबांशी?" तर म्हणायची "बोलतच तर असते सारखी"

आजोबांच्या खोलीत आरामखुर्चीची करकर सुरु व्हायची अंगणातल्या तुळशीपुढची वात मंद फडफडायची, की इकडे माजघरात चुलीवर आधणं चढायची तिने पानं वाढायला घेतली की आबा पानावर हजर मी विचारायचे "तुम्हाला कसं कळालं? जेवण तयार आहे ते" आबा म्हणायचे "आत्ताच आजीने नाही का सांगितले"
मी बुचकळ्यात पडायचे....

आणि एक दिवस खुर्चीची करकर थांबली पगडी खुंटीवर तशीच आणि काठी कोपऱ्यात त्या दिवसापासून आजी नुसती बोलती आहे....
ओसरीच्या पायरीशी, काठीशी, पगडीशी आजकाल मी बोललेलं काहीच कळत नाही तिला.

**दीपा मिट्टीमनी**



# झगमगाट

स्मिता नेहेमीप्रमाणेच रात्रीचं सारं आवरुन बाहेर आली. पोर्चमधला आकाशदिवा आता काढून ठेवला पाहिजे असा विचार करत बागेतल्या दिव्यांचं बटण तिनं बंद केलं. दिव्याच्या माळेचं बटणही बंद केलं. गेट बंद आहे का ते ही बघितलं. नेहेमीप्रमाणे रातराणीचा सुगंध दीर्घ श्वासाबरोबर खोल आत घेतला आणि ती घराचा दरवाजा लावायला माघारी वळली. तशी ती एकदम दचकलीच.

एक १२/१३ वर्षांचा मुलगा दरवाजाच्या थोडं बाजूला बागेतच मान खाली घालून , घाबरुन उभा होता. अंग आक्रसून.... ती ओरडलीच एकदम, "अरे, कोण आहेस तू? काय करतोयस? कुणी पाठवलं तुला?" तिचा हात गळ्याकडे गेला. हातात बांगड्या ही होत्या. चोरी बिरी करायला कुणी दबा धरुन बसलंय की काय? तिच्या मनात आलं. त्या पोराची एकदम गोगलगाय झाली. " काकू मी  चोर न्हाई. मला मारु नका. मी रोज येतो हितं."  घाबरत पण एका दमात तो बोलला.

" रोज? का?" आणि तिचं लक्ष  त्यानं  हातात लपवलेल्या गोष्टींकडे गेलं.

"काय आहे हातात?" तिनं बळ एकवटून दरडावून विचारलं.

त्यानं हात पुढे केले. हातात पुस्तक, पेन, वही होतं. ते धीटपणे दाखवत तो बोलला, " काकू , मी रोज येतो हितं अभ्यास कराया..  घरी लाइटी न्हाईत. बाबाकडं पैसं न्हाईत. मला दिसभर शाळा न् काम बी कराया लागतंय थोडं. रातच्याला आई बी लवकर उरकून घेती कामं. आमचं बाळ बी रडाया लागतं अंधार बगून. मला दुसरा येळ न्हाई अभ्यासाला."  हितं झगमगाट दिसला. बागेतले लाईट, दिव्याच्या माळा, आता आकाश दिवा. मी रोज येऊन अभ्यास करतो दोन तास अन् निमूट जातो घरला. मी काई चोर न्हाई  काकू. " आई म्हणती, "अभ्यास केलास तर मोठा हुशील अन् मोठ्या घरात ऱ्हाशील."

स्मिताला त्या आकाशदिव्याच्या उजेडात पहाट झाल्यासारखंच वाटलं. "बरं बरं एकाच जागी बसत जा. कुणाला आणू नको कधी बरोबर. " ती म्हणाली. आठ दिवस खरंच तो मुलगा येतोय का अभ्यासाला बघून तिनं खात्री करुन घेतली. मग शेखरला सांगून पोर्चमधे ट्यूब लावून घेतली. एक जुनं टेबल अन् खुर्चीही सापडली तिला घरात बाहेर ठेवण्यासाठी. कधी खाऊ, पाणी, स्वेटर असंही काही देऊ लागली कौतुकानं.

आता तो रोज येऊन शांत मनानं  अभ्यास करु लागला. तिला कधी अभ्यासातल्या अडचणीही विचारु लागला....तिलाही आता उत्साह आला लहानपणी केलेला अभ्यास अन् वेगवेगळी सुभाषितं आठवताना!!

**संजीवनी कुलकर्णी**



# मनी वसे ते स्वप्नी दिसे

वारा प्यायलेल्या वासरासारखी झाडे हालत होती. त्यांच्या भयानक सावल्या 'निशिगंध' बंगल्यावर पडत होत्या. मग त्या सावल्यांबरोबर' निशिगंध' बंगलाही थरथरायला लागला. त्याची थरथर वाढायला लागली तशी आजींना जाग आली. आपल्या लटपटत्या पायांनी त्यांनी उठायचा प्रयत्न केला. क्षणभर त्यांना वाटले की त्यांच्या व्हर्टिगोमुळे घर फिरल्यासारखे वाटत असेल. पण आजोबांनाही क्षणभर थरथर जाणवली. ते म्हणाले, "उठा, उठा....सगळेजण बाहेर चला." आजी आपले लटपटते पाय विसरून जोऱ्यात ओरडल्या, "भूकंप! भूकंप!"

त्यांच्या तोंडच 'भूकंप भूकंप' ऐकून सावी पळत सुटली. कुठे पळावे हे ही तिला सुचत नव्हतं. आई धावतेय पाहून शोमाने भोकाड पसरले. सावीने तिला पटकन उचलून घेतले. सुयोग मात्र मागच्या अंगणात जावून उभा राहिला. नक्की काय झालं याचा कानोसा घेत. कारण हा भूकंपाचा एरिया नव्हता.

एका मिनिटात एवढं सगळं घडून गेलं. आता सर्व पूर्वस्थितीत आले. पण सगळे काहीही न बोलता नुसते बसूनच राहीले. कुणालाही कशाचेच भान नव्हते. सुयोग दार उघडून बाहेर गेला. आजोबा अंगणात गेले. सावी शोमाला शांत करत चहा करायला वळली. मनातली भीती एवढी होती की चहा कसा करावा ते ही तिला कळत नव्हते. मग रडणाऱ्या शोमाला तिच्या आवडीचे बिस्कीट दिले. बिस्कीट दिल्यावर शोमा शांत बसली. आजी आपल्या लटपटत्या पायांनी चालत जाऊन डायनॉसोर घेऊन आल्या. त्यांना माहित होतं, नवीन खेळणं दिसलं की शोमा रडणं विसरते. आणि झालंही तसंच. शोमा खेळण्यात गुंतली.

शेवटी चहाचं आधण गॅस वर पडलं. सवयीने आलंही टाकलं गेलं. चहाच्या सुगंधाने सर्वांच्या चित्तवृत्ती प्रसन्न झाल्या. सगळे चहाचीच वाट पाहत होते. चहा पोटात गेल्यावर सर्वांच्या चेहेऱ्यावर तकाकी आली. तोंडातून शब्द फुटायला लागले. सुयोग म्हणाला," तसा धक्का जोरदार होता, पण भूकंप काही वाटला नाही." सावी म्हणाली, "आजी भूकंप म्हणून ओरडल्या म्हणून मी धावत सुटले." आजोबा म्हणाले, "थोडी थरथर होती बंगल्याला." त्यांनी आजीची बाजू सावरून घेतली.

'बाहेरचे काय म्हणतात ते'?' सावीच्या मनात भूकंपाची धड धड होती. तिने धडधडत्या मनाने दार उघडलं. पण अजूनही कुणाच्या बंगल्याची दारं उघडली नव्हती. आजी वाट पाहत होत्या. त्यांची पण निराशा झाली. पण मन धास्तावलं होतं. नक्की भूकंपच होता. कुणाला फारसा जाणवलाच नसावा..जाऊ दे झालं...आपले पाय दाबत त्या पायाची थरथर कमी करण्याचा प्रयत्न करत होत्या.

बाहेर काही लोकांचा गलबला ऐकू आला म्हणून आजोबा बाहेर गेले पण त्यांना कुणीच दिसले नाही. 'निघूनही गेले असतील' असं मनाशी म्हणत आजोबा घरात परतले. सुयोगही विचारात पडला, मित्रांना फोनवर भूकंपाबद्दल विचारले तर ' काही लक्षात आले नाही' असे उत्तर मिळाले.

आजोबा घरात येत सुयोगला म्हणाले..."काही माणसं इथे येऊन गेली असं वाटतं, तू गलबला ऐकला असशीलच." 'हो ऐकला मी पण गलबला... कोण होते ते? बहुतेक भूकंपामुळे ते घाबरले असावेत." असं म्हणत तो अंघोळीला गेला. जाता जाता सावीला म्हणाला, 'सावी, डबा तयार झाला का?' किचनमधून काही उत्तर आले नाही म्हणून त्याने आत डोकावून पाहिले तर सावी खिडकीतून बाहेर एकटक पाहत होती. त्याने ओळखलं की ही घाबरलीय. डबा तयार नाही.
"सावी, काय थंडगार वारा सुटलाय नाही?" सुयोग म्हणाला. त्यावर "काय डोंबलाचा थंडगार वारा? इथे भूकंपाच्या विचाराने जीव धडधड करतोय. काही सुचत नाहीय, डबा पण झाला नाहीय. सारखा .. भुकम्प नजरेसमोर येतोय". सावी म्हणाली. "डबा नाही झाला तर राहू दे, मी बाहेर खाईन. अगं, भास झाला असेल आजीला." सुयोग म्हणाला खरा पण 'भास झाला तर सगळ्यांनाच कसा होईल?' असा विचार करत तो अंघोळीला गेला खरा पण लगेच बाहेर येत म्हणाला, "अगं सावी, माझा टॉवेल कुठे आहे?" "अहो, तुम्हीपण गोंधळलेलेच आहात. टॉवेल तुमच्या खांद्यावरच आहे." सावी म्हणाली. "अरे? असं कसं झालं?" सुयोग मनात म्हणाला.

'सुयोग सावी चा जोडा अगदी लक्ष्मी-नारायणाचा आहे'असं आज्जी म्हणत. त्यांना शोभेशीच शोमा गोड बाहुली होती. आज्जी तिला 'शोमा गुडिया' म्हणत.
आजोबा रिकामं तबक घेऊन आले. "अरे बागेत फुलेच नाही!"
आजी लटपटत्या पायाने फिरत होत्या. त्या म्हणाल्या,"अहो सकाळीच पाहिले मी. बागेत खूप फुले होती. मी देवाच्या पूजेला आणणारच होते. पण आता पाहते तर एकही फूल नाही. कुणी तोडतांना दिसले पण नाही."
आजोबा म्हणाले, "अगं, ती लोकं येऊन गेली, त्यांनी तोडली असतील."

"इतकी फुले तोडून नेली, काही विचारले पण नाही. आता देवाला काय वाहणार? कप्पाळ!"
सुयोग म्हणाला, "आई, घाबरलीस का? नेली फुलं तर नेऊ दे. आपण फूलपुडी मागवू. आणि भूकंपाने बंगला हादरला नाही. अगं कुणीतरी फटाक्यातला बॉम्ब फोडला असेल. शिवाय मिलिट्रीचा कॅम्प जवळच आहे. ती शक्यता नाकारता येणार नाही." आजोबा विचार करत होतेच. त्यांना सुयोगचं म्हणणं पटलं. ते निश्चिन्त झाले. सावीच्या जीवात जीव आला. आजोबा वयाच्या मानाने तरुण दिसत. आपली प्रकृती ते राखून होते.

सावीला एकदम आठवले, मोड आलेले मूग कुठे दिसत नाहीत! मग शोधाशोध सुरु झाली. आजी म्हणाल्या, "अग सावी, मटकी बाहेर कोणी ठेवली?" सावी लगेच पळाली. कारण डबा, नास्ता सगळच राहिलं होतं. "तुमच्या गोळ्यांची वेळ झाली. चला चला मी आत्ताच नाश्ता तयार करते. कांदा, टमाटा केव्हाच चिरून ठेवला आहे."

तितक्यात काहीतरी पडल्याचा आवाज आला. कुणाला काही वाटले नाही पण आज्जीला फ्लॉवरपॉट फुटल्याचा आवाज आला. फुटलाच होता. बाजूला होता, कुणाचा धक्का किंवा वाराही नव्हता. मग फ्लॉवरपॉट पडलाच कसा? ह्या विचाराचा भुंगा आजींना पोखरत राहिला. त्या उठून हळूहळू बागेत झोपाळ्यावर झोका घेण्यासाठी जायला लागल्या. आजोबांनी हातात काठी दिली. त्यांना पाहून सावी म्हणाली, "तुम्ही जा झोपाळ्यावर. मी तुमच्या गोळ्या आणि नाश्ता तिथेच आणून देते."
" नको, मी इथेच बसते." आजींच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत हे आजोबांना त्यांचा चेहरा पाहून जाणवलं. "काही चिंतेचं कारण नाही...सुयोगने सांगितलं ना? मग?"
"पण डोळ्यासमोर सावल्या फिरतात.त्याचं काय?"
आजोबा विचारात पडले...."अगं...डोळ्यात मोतीबिंदू आहेत, म्हणून असेल."
"हं...असेल..."
जेवणानंतर झोपण्याची वेळ असे. खूप विचार करून आलेल्या मानसिक श्रमाने आजी चटकन झोपी गेल्या. पण काही वेळातच...."खून...खून" असं ओरडतच उठल्या.
काय झालं? सगळ्यांच्या चेहऱ्यावर हाच प्रश्न होता. आजी अगदी थरथर कापत होत्या.
"अरे...झोपाळ्यावर खून झालाय. जा...पोलिसांना लवकर बोलवून आणा."
आजोबांनी आजींच्या डोळ्यावर पाण्याचा शिपका मारला.
सुयोग ऑफिस मध्ये होता. सावीने बाहेर बागेत डोकावून पाहिलं झोपाळ्यावर. तिथे काहीच नव्हतं.आजोबांना असं काही घडलं नाही हे माहीत होतं. ते म्हणाले,"स्वप्न पडलं तुला",
त्यावर आजी चटकन म्हणाल्या," नाही नाही...खरंच! खून झाला....रक्त पण आलं... आणि बघा, घरात अजूनही काळ्या सावल्या फिरत आहेत."

सावीने घाबरून इकडे तिकडे पाहीले. तिला काही दिसले नाही. शोमाला पण काही दिसले नाही. "सावली नाहीये आजी. गेली ती. तू घाबरु नको हं!" ती म्हणाली.

"अग, चल, आपण बागेत पाहून येऊ. मी काही रोपं आणली आहेत, ती लावतो. किती छान सुवास येतोय ते बघ." आजोबा म्हणाले.

सावीने आज्जीना हाताला धरून बागेत नेलं. वास्तविक सावी पण घाबरली होती. आजोबा सावीला धीर देत म्हणाले, "अगं, तिला तसं नुसतं वाटतंय. शेजारी पाजारी बायका काही गप्पा करतात, तेच मनातून स्वप्नात जातं. तू घाबरू नकोस."

आजी कुठल्याशा तंद्रीत असल्यासारख्या म्हणाल्या," पण मी म्हणते हा इतका सुंदर बंगला तुम्हाला कमी किमतीत का दिला?"

"अगं ते लोकं परदेशात गेले त्यामुळे भारतात बंगला ठेऊन ते काय करतील?"

आजींना पटलं की नाही देव जाणे. त्यांच्या चेहऱ्यावरून काही कळलं नाही. त्या घरात आल्या. आजोबा कुदळ शोधत होते. "अगं बागेत ठेवली होती कुदळ. तू पाहिली का?" आजींना घरातच कुदळ दिसली. आजोबाही विसरतात म्हणा की, "अहो, कुदळ घरातच आहे" त्या म्हणाल्या.

दुपारचं खाणं तयार आहे हे सांगायला सावी आली. " चला मटकीची उसळ केली आहे."

सुयोगला त्याच्या बरोबर पाव आवडतात. आता तो आला की ऑर्डर करेल की लगेच पाव येतील घरपोच. काही कष्टाचं काम नाही. शरीराला कष्टच नाही. पण एक मात्र खरं की ह्या बंगल्यात आल्यापासून सर्वांचं जेवण वाढलय." बंगला मोठा, फिरणं होतं. बागकाम केल्या जातं. मग भूक लागते. आजींना मात्र मनात भीती असल्याने जेवण जात नव्हतं हेही खरं!

अजूनही भूकंपाबाबत कुणाला कळलं नव्हतं. सावीला सगळ्यांना विचारायचं होतं, "तुम्हाला काही जाणवलं का भूकंप वगैरे?" नाहीतरी ५-६ ही वेळ फिरण्याचीच होती. रात्रीच्या स्वयंपाकाला अजून वेळ होता. आजी आणि ती दोघीही बाहेर पडल्या. आजोबा निवांत झोपाळ्यावर बसले होते. सुयोग नुकताच ऑफीसमधून आल्याने तो जाणार नव्हता. इतक्यात रुपाली आणि सरोज आल्या. त्यांनी विचारले, "काल तुमच्या बंगल्या समोर गर्दी कशाची होती? काही कळलं का? कारण...."

"कारण काय ग?"आजीनी विचारले.

"काही नाही..काही नाही" रुपाली लगेच म्हणाली.

फिरताना मग आजी मागे राहिल्या. त्यांना भेटायला समोरच्या बंगल्यातल्या आजी आल्या. मग त्यांच्या गप्पा रंगल्या.

"हा बंगला कधीचा विकल्याच जात नव्हता. बरं झालं तुम्ही घेतला ते. कुणी काही कुणी काही म्हणत होते." आजी सतर्क झाल्या, "काय म्हणत होते?" त्यांनी विचारले. समोरच्या आजी जरा जवळ सरकल्या. मग इकडे तिकडे पाहून म्हणाल्या, "असं म्हणतात बाई की 'निशिगंध' बंगल्यात खून झाला होता." आणि मग कानावर हात ठेऊन पुढे म्हणाल्या, "खरे खोटे देव जाणे! तुम्हाला काही अनुभव आला का हो? नाही म्हणजे तुम्ही आता तिथे राहता म्हणून विचारले हो."

आजी कावऱ्याबावऱ्या झाल्या. बाकीच्यांना काही अनुभव आला असेल का?

समोरच्या आजींनी  सरळ विचारले, "तुमच्या बंगल्यात म्हणे भूकंप झाला. असं कुठे असतं का? भूकंप तर सगळ्या  गावात होतो ना?"

' म्हणजे यांची घरे हलली नाही तर!' आजी विचारमग्न झाल्या. मनात धडधड वाढली. कधी एकदा घरी जातो असं त्यांना वाटायला लागलं. पण उठताच येत नव्हतं. विचारांनी त्यांना ग्लानी आल्यासारखे वाटले. कश्याबश्या काठीच्या आधाराने त्या उठल्या आणि घराच्या दिशेने जायला निघाल्या. दुसऱ्या आजी अजून बोलतच होत्या, पण आजींना ते आता काही समजत नव्हतं. त्यांना खून झालेला दिसत होता!

आजी घरी आल्या. त्यांच्या पाठोपाठ सावी आलीच. खरं म्हणजे आजींना एकटं सोडायचं नाही असं सुयोगनं सावीला सांगितलं होतं. बंगल्यात आल्यावर आजींची भिरभिरती नजर झोपाळ्यावर गेली. त्यावर आजोबा निवांत झोका घेत होते.

सावीला घाई असल्याने ती किचनकडे वळली. आजच स्वयंपाक करायचा. उद्या बाई येणारच आहे.

रात्री आजींच्या काळजीने कुणालाच झोप लागली नाही. बाहेर काळी मांजर सारखी फिरत होती. ते जरा विचित्रच वाटत होतं. आजोबांनी तिला हुसकून लावायचा प्रयत्न केला पण ती परत परत घरात येत होती.

शोमा म्हणाली, "अगं ती गौरीची माऊ आहे, पण राहते आपल्याचकडे."

सकाळ चांगली उगवली. शेजारच्यांनी स्वयंपाक, झाडझूड करायला कामवाली बाई पाठवली. चहा घेत असतानाच ती आली. नवे फॅशनचे दागिने, चमकीचा ड्रेस, डोळ्यात बदाबदा काजल, ओठांवर लिपस्टिक.... खरं म्हणजे ती जरा विचित्रच वाटत होती. पण 'आलीया भोगासी' म्हणत आजींनी तिला नाव विचारलं आणि म्हणाल्या,

"तुला काय काय काम करता येतं?"

"लईच सारं. सांगाल ते करते म्या. सांगून तर पहा."

"बरं, बरं. पण आधी नाव तर सांग."

"सीता. आयनं ठेवलं, पन आजीला आवडलं न्हाय...म्हनली..., सीता नाव कुणी ठेवत न्हाय. सीतेचा त्रास नशिबी नको म्हनून."

तिचं बोलणं अर्धवट तोडून सावी म्हणाली, "बरं, घरातलं सगळंच करावं लागेल. जे सांगू ते."

"आता सैंपाक करू का?"

"चालेल.चल तुला स्वयंपाकघर दाखवते." सावी म्हणाली.

"ह्याले किचन म्हनत्यात बाई", सावी चाट पडली.

"चपात्या करते. भाजी कोंची करू ते काढून ठिवा." सावी फ्रीज मधली भाजी काढत होती तर सीता म्हणाली, "कढई घ्या बाई. मले काय मालूम नाई."

सावीला तिच्या प्रकृतीकडे पाहून वाटलं की ती खूप काम करेल. काही दिवस बरे गेले. सीताच्या खाण्याच्या सवयी चांगल्या होत्या. तिला सगळं ताजं लागायचं. एकदा सकाळी पोळ्यांचा कुस्करा करायला लावला तर म्हणाली, "माझी माय बोलली, शिळं खायचं न्हाय." मग सर्वांनी शिळा कुस्करा खाल्ला आणि सीताने दूध-ब्रेड खाल्ले. पण करणार काय? हळू हळू तिचे रंग दिसायला लागले. आज हे काम केलं तर उद्या दुसरं. स्वयंपाकही खूप तिखट करायला लागली. आजी तिला म्हणाल्या, " इतकं तिखट कशाला करते?" सीताने उत्तर दिले, " आजीबाय, आमाले तिखटाचं लागते. पोटभर जेवलं की कसं काम सुचते." सावी मनात म्हणाली, "काम सुचते की नाही काय माहीत. पण झोप मात्र छान लागते!"

एकदा सीता म्हणाली, "आजी, स्मशानभूमीजवळ घर काऊन घेतलं? रोज पहाटे धूर निघते. ८-९ मुडदे तरी जळत असतील. चांगल्या ठिकाणी घर घ्यायचं नं!"

"कुठं धूर निघतो?" असं म्हणत आजी बाहेर गेल्या तर खरंच खूप धूर निघत होता. आजी चिंताग्रस्त झाल्या. सावीला कळलं तर ती घाबरेल म्हणून सुयोग एकटा असताना त्यांनी विचारलं, "इथे धूर कशाचा येतो? सीता म्हणते इथे स्मशान आहे."

“अगं, स्मशानभूमी गावात कशी असेल? प्रयोगशाळा असावी. तिथे कॉलेज आहे ना!"

"अरे ती सीता सारखी चित्रविचीत्र गाणी म्हणते, माझ्याकडे विचित्र नजरेने पहाते. गाणं तरी कोणतं म्हणते माहित आहे का? ते 'जिंदगी मौत ना बन जाये संभालो यारो' आहे ना, ते! इतकी भीती वाटते ना!"

"तिला सांग, तिथे एक कॉलेज आहे. प्रयोगशाळेतून धूर येत असेल. तिचं गाणं बंद होईल बघ. तिच्याकडे फार लक्ष  नको देऊ, आई!"

सीताचा स्वयंपाक कोणालाच आवडत नव्हता. सगळं काम एकटीला होत नव्हतं, म्हणून स्वयंपाकाला दुसरी बाई बोलावली. दुसऱ्या बाईला पाहताच आजींच्या पोटात गोळाच आला. तिची भेदक नजर, काम सांगितलं की ते रोखून पाहणं, दबकत दबकत चालणं, पायातल्या तोरडयांचा आवाज... आजी जास्तच घाबरायला लागल्या. वय झालं म्हणून असेल असे सगळ्यांना वाटले. पण कदाचित वेगळेच कारण असेल!

आजी बाहेर बागेत गेल्या. शोमा खेळत होती. कुंपणाबाहेर सरोजताई आणि रूपाताई बोलत होत्या. आजी कुंपणाजवळ जाऊन उभ्या राहिल्या.

"अगं पण ती मीना तर म्हणते ती आत्महत्या होती. कुणी खून म्हणते, कुणी आत्महत्या... काहीतरी वेगळंच घडलय नं पण. ह्यांनी कसा घेतला हा बंगला?"

"अगं त्यांना माहित नसेल जाऊ दे. सुखाने राहतात ना आता मग झालं!"

आजी खूप घाबरल्या. पाय जास्तच लटपटायला लागले. कशाबश्या काठी आणि शोमाच्या आधाराने त्या बंगल्यात पोचल्या. काही सुचतंच नव्हतं. एक मन म्हणालं की सगळ्यांना सांगावं. पण नंतर विचार केला की नको, सगळे घाबरतील. रात्री केव्हातरी त्यांना झोप लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी आजी उठल्या आणि जोऱ्यात ओरडल्याच. सगळे धावत आले.

आजीनी दाखवलेल्या दिशेला सगळ्यांनी पाहिले. आजी त त प प करत 'खून खून' ओरडत म्हणाल्या, "अरे, झोपाळ्याकडे बघा ना", आणि धाडकन खाली पडल्या. सुयोग पळत आला. त्याने आजींच्या चेहऱ्यावर पाणी मारले. आजी 'रक्त.... रक्त..." असे म्हणतच उठल्या. सावी म्हणाली, "अहो, ते शोमाचे रंग आहेत, रक्त नाही."

"मग काय स्वप्न पडलं की काय मला?" आजी म्हणाल्या.

शेजारचे जोशी काका गोंधळ ऐकून पळत आले होते. त्यांना काहीतरी वेगळेच जाणवले. ते आजोबांजवळ आले आणि म्हणाले, "काका, दत्ताचे पारायण करा. तिन्हीसांजेला रामरक्षा म्हणा. सगळी इडापीडा टळेल बघा."

कुणीतरी आपल्याला सहानुभूती दाखवली म्हणून आजोबांनाही बरे वाटले.

सावी आणि सरोज ताईंनी आजींना घरात आणलं. सावीने आजींना सरबत दिलं. त्यांच्या चेहऱ्यावर 'किती छान आहे सावी' असा भाव पाहून सावीलाही बरं वाटलं. सरबत पिऊन आजी शांत झाल्या. आजोबा जोशी काकांशी बोलत होते. सरोजताई, रूपाताई आपआपसात बोलत होत्या.

एकूण गोंधळ पाहून शोमा रडायला लागली. हे सर्व पाहून आजी सावरून बसल्या. 'अगं, मी ठीक आहे, मला कुठे काय झालं?' असं दर्शवून उठण्याचा प्रयत्न करत होत्या, पण त्या परत कोसळल्या. रूपा आणि सावीने त्यांना सावरले. वातावरण जरा भीतीदायकच होतं. पण सकाळ असल्याने ते जाणवत नव्हतं. सुयोग काळजीतच होता. तेवढ्यात जोशी काकांना घेऊन आजोबा आले. पारायणाची तारीख पक्की करून गेले. बाहेरचे माणसं घरात आले, तशा बायका बाहेर गेल्या.

मध्यंतरी तुझी आई म्हणत होती, रडण्याचा आवाज येतो, सावल्या दिसतात. म्हंटलं पारायण करून टाकावे. देवाचं करायला काही हरकत नाही. आजोबा सुयोगला म्हणाले. पण सुयोगच्या मनात मानसोपचार तज्ज्ञाला दाखवावे असा विचार सुरु होता. आजी सुशिक्षित होत्या. त्या डॉक्टरकडे गेल्या.

डॉक्टर म्हणाले, “माणसाचं मन, मेंदूचं रसायन असंच आहे. भयानक प्रसंग समोर आले की ते 'ॲड्रिनॅलीन' तयार करतं. मग जीव धडधड करतो. रक्तातली साखर वाढते. त्या प्रसंगाचा माणसावर परिणाम होतो.” आजींचा पाय थरथर कापणे त्याचाच परिणाम होता.

सुयोगने आजींना मानसोपचार तज्ञाकडे नेलं तेव्हा डॉक्टरने आजींना खूप प्रश्न विचारले. “आजी, तुम्हाला या घराबद्दल कुणी काही सांगितले का? तुम्हाला भयानक असं काही कळलं का? घाबरू नका, आपण त्यावर इलाज करू.”

“काही कुणी सांगितले असेल ते जर भयानक असेल तर माणूस त्याचाच विचार करतो. इतका विचार करतो की ते त्याला जळी स्थळी काष्ठी पाषाणी तेच दिसतं. कंसाला कसा श्रीकृष्ण दिसत होता तसं.”

“ते खरंच आहे. मला शेजारच्यांनी सांगितलं की... की ह्या घरात खून झालाय. सरोजताई म्हणाल्या की आत्महत्या केलीय. बंगला तुम्ही कसा घेतला? मला भीती वाटत राहिली.”

डॉक्टर म्हणाले,” त्यांनी सांगितलं ते स्वप्नातही दिसलं, आणि मनाने त्यावर विश्वास ठेवला.” हे सगळं आजींना पटलं

डॉक्टर म्हणाले, “असे प्रसंग मनातून लगेच काढून टाकून नेहेमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा.”

सर्वांना ते पटलं .सर्व शांत मनाने घरी गेले.

आजी शिकलेल्या होत्या. त्यांनाही ते पटलं होतं. त्याप्रमाणे त्या वागत होत्या. त्या बरोबरच मनाला शांती देण्यासाठी दत्ताचं पारायण झालं. रामरक्षा सुरु होती.

डॉक्टरांनी निदान केलं होत ‘डील्युजनल डिसॉर्डर’, यालाच पॅरानॉईड डिसॉर्डर असेही नाव आहे, यात व्यक्तीला खऱ्या आणि काल्पनिक गोष्टींमधला फरक कळत नाही. याचाच एक प्रकार म्हणजे बिझार (विचित्र) टाईप डील्युजन. यामध्ये खऱ्या आयुष्यामध्ये कधीच घडू शकणार नाही अश्या गोष्टी खऱ्या वाटू लागतात. उदाहरणार्थ, एलियन्सशी मैत्री. हा आजार झालेल्या व्यक्ती नेहेमीच्या आयुष्यात अगदी नॉर्मल वागतात.

मनावरचं भीतीच सावट हळू हळू नाहीस झालं होतं आणि सगळेच जण पुन्हा निःशंक मनाने घरात रमले.

**सौ. प्रतिभा जोशी**



# फू...... फू..... फू.....!

“पियुष, काय करतोस तू... ही बिस्किटे घे.”

पियुषचे मात्र एक ना दोन. मावशीने हाक मारलेली त्याचा कानात गेलीच नाही. खिडकीत बसून एकटक बघत होता तो. कोपऱ्यावरून वळणाऱ्या प्रत्येक वाहनाकडे. किती उशीर झाला. शमा होती इतकावेळ. ती पण गेली तिच्या मावशी बरोबर. तिची मावशी आणखीन थोडी उशीरा का नाही आली? राहुलचे बाबा तर किती लवकर आले आज ऑफिसमधून. त्याला बरं नव्हतं ना म्हणून झोपेच्या आधीच नेलं घरी. माझे बाबापण असेच आले होते मला खूप खोकला सर्दी झाली होती ना, त्यादिवशी. आज नाही बाबा येणार. आईच येणार मला न्यायला. सारिकाची आई रोजच्याच वेळेला आली. माझीच आई का नाही आली अजून...? आई, ये ना लवकर. बघं ना सगळे गेले घरी. मी एकटाच राहिलो.”

“हे घे, बिस्कीटे खा. मी जाते हं...!” असं म्हणून नंदामावशीने दोन बिस्किटे पियुषच्या हातावर ठेवली. डोक्यावरून हात फिरवला आणि हात हलवीत ‘बाय बाय’ म्हणत गेली देखील बाहेर.

‘नंदामावशी दिवसभर असते. संध्याकाळी सगळं आवरून जाते निघून. तोपर्यंत सगळी मुलं जातात घरी. मला आवडते ती. काकूंना बरं नसतं ना म्हणून आता ती शेवटपर्यंत थांबते. आधी काय करायची, आम्ही झोपलो, की नंदामावशी घरी जायची. आता नाही लवकर जात.’

“आली आली, स्कुटी आली, नाही... आईची नाही.? का उशीर करतेस गं तू ?????”

पाच वर्षाचा पियुष अगदी रडवेला झाला. टचकन आलंच बाहेर, सुं सुं... ही झालं. खरंच आज रेखाला - पियुषच्या आईला नेहमीपेक्षा उशीर झालाच होता. सहसा असं ती करीत नाही. असेल काही काम. सगळी मुलं गेली आणि पियुषचा धीर सुटत चालला.

“पियुष, काय करतोस?” काकांची हाक आली.

“काही नाही.” फक्त इतकेच उत्तर पुरते काकांना. जोवर मुलं काही उद्योग करीत नाहीत तोवर काका खूष असतात. मधून मधून अंदाज घेत असतात बास इतकेच. हळू हळू म्हटलं तरी दोन्ही बिस्किटे फस्त झाली खरी, तरीही येऊ नये का आईने. पियुषला समजेना काय झालं असेल?

‘सुहासदादा कसा एकदा उशिरा आला... खूप खूप उशीर झाला होता त्याला.... आणि त्याला कोणीतरी पाडलं होतं. त्याला खूऽऽऽप लागलं आणि नंतर तो आलाच नाही घरी. त्या दिवशी किती लोकं आले होते आमच्या सोसायटीत. बाबा पण लवकर आला. माझ्याशी बोलला पण नाही आणि गेला दादाच्या घरी. लगेच आला

आईजवळ. मला आईने घरात बसायला सांगितलं म्हणे जायचं नाही बाबांच्या मागे. रागावली मला. अस्सा राग आला ना आईचा.'

अजून का नाही आली? तिला नसेल ना कोणी धक्का दिला. पाडलं नसेल ना आईलापण?'
मन वेडं असतं. नको तेच डोक्यात येतं हेच खरं. लहान असला म्हणून काय झालं? पियुषला आईची काळजी की काय, ते वाटायला लागलं होतं. समोरच्याच घरातल्या सुहासदादाला उशीर इतका झाला, की नंतर तो पियुषला दिसलाच नाही.
'सुहासदादाला लागलं होतं म्हणे. मी त्याला फुंकर मारणार होतो. बाबाला नाही का मी फुंकर मारून बरं केलं. कपाटाच्या दारात बाबाचं बोटं चेमटलं होतं ना, तर त्याचा हात दुखत होता. नखंच निघालं. मी सकाळी फुंकर मारून त्याला ऑफिसला पाठवायचो आणि संध्याकाळी आल्यावर बाबा म्हणायचा, "पियुष ये लवकर, फुंकर मार, माझा बाऊ लवकर बरा कर." 'फू फू' केल्यावर त्याचा बाऊ बरा झाला, अगदी खरंच! तसंच, सुहासदादाच्या बाउला मी बरं केलंच असतं; पण आई ना अशी आहे. तिने तर मला इथे काकूंच्या घरी आणलं आणि गेली घरी. त्या दिवशी तर अस्सा राग आला मला आईचा. मी जाणारचं नव्हतो घरी.

काकू खूप लाड करतात माझे. मी इथेच काकूंच्या घरी राहणार होतो; पण आली की आई मला घ्यायला. मगं काय गेलो घरी. त्याचं काय की.. शेजारच्या मीराताई घरी आल्या होत्या. त्या आईच्या जवळ येऊन म्हणाल्या, 'सुहासला आणणार आहेत. पियुषला सोडून ये तू'. मी पळालो घरात. तर ओरडली आई मला. मी सांगितलं तिला. 'बाबाचा बाऊ मी बरा केला तस्सा त्याचाही करतो ना. जोरात फू फू मारेन मी दादाच्या बाऊला. मला नाही जायचं काकूकडे. मग, नाही का राग येणार मला आईचा. सुहास दादा मला खूप खूप आवडतो. नक्की त्याला 'फू' मारल्या असत्या मी जोरात. आई ना, अशी वागते कधीकधी. नाही ऐकलं तिने. पण, आज काय झालं तिला? बाऊ नसेल ना झाला आईला??'

शेंडा लालीलाल व्हायला लागला होता एका मुलाचा. नाकाखालून दोन्ही हात जोरात फिरवले गेले होते दोनतीनदा. एकदा शु जोरात लागली, तेव्हा स्वारी पळाली. जशी गेली तशी आली धावत आणि बसली परत खिडीकीत. आता मात्र अगदी कहर झाला असेच केले आईने. किती वाट बघायची. मी सुहासदादा बरोबर खेळत असतो, आई हाक मारते आणि लगेच आलो नाही तर मला रागावते. येऊ देत तिला. मी आज रागावणार. नाहीतर बोलणार नाही मी आईशी. यायला काय होतं.... आई, ये ना.
इकडे काकू स्वयंपाक घरात गेलेल्या पियुषला कळलं. त्याने डोकावलं आत तर काका काहीतरी शोधतं होते आणि काकू चहा करायला गेल्या. कसला आवाज झाला म्हणून लगेच पियुषने खिडकीतून बघितलं. काही नव्हतं, एक जुनाट टेम्पो आवाज करीत जोरात गेला. आली का नाही?

'ये ना गं आई लवकर....' आता मात्र आईशी बोलायचं नाही. आज काकूकडेच राहणार मी. आली आली... च्! आईची स्कुटी नाही, रिक्षा आली, आणि इथेच का थांबली? आईची स्कुटी कुठे? आई कशाला रिक्षाने येईल? सकाळी तर गेली स्कूटीवर मला इथे सोडून. ओ, थांबली की ही रिक्षा. कोण आलं असेल? मला काय करायचं. कोणीतरी असेल.

कोपऱ्यावरून काहीच येताना दिसत नाही. ही तर निमामावशी, आईच्या ऑफिसमधली. ती का आली? आणि आई कुठे?

तिला कोणी पाडलं नसेल ना? नाही नाही. आई येणार. हो यायलाच हवी. सुहासदादा सारखं नाही लागलं तिला. मी बरं करणार तिला. पुन्हा परत दिसला नाही दादा. आई दिसणार ...येणार.... हो येणार... मावशीने पैसे नाही दिले रिक्षावाल्या काकांना. मग, आत कोणाशी तरी काय बोलली. उघडलं की तिने फाटक.'
रिक्षात कोण आहे? हीच साडी. थोडाच पाय काय बाहेर काढते. ये ना बाहेर. हो! हीच साडी नेसून आई गेली होती ऑफिसला. रिक्षात आई आहे? उतरत का नाही ती. बाहेर पण नाही आली. आली तर तिला मी दिसेल की. का नाही येत? आई गं... नको मीच जातो खाली. तिला 'फू' मारून पटकन बरं करतो. काय झालं असेल? रक्त आलं असेल का? जातोच पळत.'
तेव्हढ्यात बेल वाजली. "पियुष...आई आली असेल रे. ये इकडे." असं काकू म्हणायच्या आत पियुष दारात.

काकूंनी दार उघडलं तर दुसरीच बाई दारात." मी रेखाची मैत्रीण, नीलिमा. पियुषला न्यायला आले." काकूंनी दार उघडलं आणि त्यांच्या हाताखालून स्वारी पळाली देखील खाली.
"पियुष... थांब. जायचं नाहीस तू." काकूंनी जोरात हाक मारली, पण ऐकेल कोण.
" जाऊ देत त्याला. रेखा खाली आहे रिक्षात. मी जाते खाली"
"अगं. रेखाताई दिसतात खाली. रिक्षातून डोकावलं बघ त्यांनी, मला हात केला. जाऊ देत त्याला. दे पिशवी त्याची." काकांनी खिडकीतून डोकावून बघितलं रेखाला आणि काकूंनी पिशवी निलिमाच्या हातात दिली.

रिक्षात आईला बघून इवलासा घायाळ जीव भाड्यांत पडला. "किती उशीर झाला बघ. ती ट्यूब लागली खांबावरची. त्याच्या आधी यायचं असतं ना. तूच म्हणाली होतीस मला एकदा. तुला बाऊ झाला का? वर कां नाही आलीस? आई, कुठे बाऊ झाला. दाखव. मी 'फू' मारतो. बाबा सारखा छोटाच आहे ना. किती उशीर केलास यायला. मी घाबरलो ना. मला वाटलं सुहास दादा सारखा मोठा बाऊ झाला आणि तुला घरीच येता आलं नाही तर, मग??? आणि माय लेकरांचे डोळे वाहू लागले. पियुषने तर हंबरडा फोडला. आई....."

नीलिमाही आली. रिक्षा घराच्या दिशेने निघाली देखील. पियुला थोडं रडू दिलं. कुशीत शिरला आईच्या तो. तीही हलली खूप. ओसरला पहिला ओघ.

"पियुष, राजा.... मला बाऊ झाला, तोही आपल्या बाबासारखाच. छोटासा. अरे, मी ऑफिसमध्ये जिन्यावरून पडले. फक्त दोनचं पायऱ्या राहिल्या आणि पाय मुडपला. हा बघ, थोडा सुजलाय ना. रक्त पण नाही आलं. तू 'फू फू' करून माझा बाऊ बरा करायचा हं."

पियुने डोळे पुसले आणि पटकन रिक्षात खाली बसला. आईचा पाय आपल्या इवल्या मांडीवर घेतला आणि सुरु केलं तिथेच त्याने...."फू.......... फू......... फू........."



**वंदना धर्माधिकारी, पुणे**
vandana10d@yahoo.co.in




# मी कवयित्री.....

मी कवयित्री
मना- मनातली
पाला पाचोळ्यातही
हास्य वेचणारी
उन्हात चांदण्या शोधणारी

मी कवयित्री
विस्तारलेल्या जगातले
सार असणारी
सगळ्यांपासून दूर तरीही
सर्वांमध्ये उरणारी...

मी कवयित्री
नभामधल्या चांदण्या
मुठीत घेऊन फिरणारी
फुंकर मारून चांदण्या
पानभर पसरणारी



मी कवयित्री
फुला पानात रमणारी
फुलपाखराप्रमाणे
जिथे-तिथे भिरभिरत
रंग ठेवत जगणारी..

मी कवयित्री..
कवितेला जगणारी
आत्मरूपी ज्योतिला
शब्दांचे तेल घालत
समईतील प्राण तेवत ठेवणारी...

**स्वप्नाली देशपांडे**
**नवी मुंबई**




# आशय तोच आविष्कार भिन्न

काही वर्षांपूर्वीची माझी एक कविता. मुक्तछंदातली. आज तोच विषय, तोच मूड असा व्यक्त करून पाहिला.

ही पहिली कविता ........

## भेट



आज तुझा निरोप घेतांना  
मनात बहरून आली आहे तुझी ही भेट  
एखाद्या फुलझाडासारखी.  
वाटा वेगळ्या होतील,  
दिवस-वर्षे जातील.  
पुन्हा भेटू तेव्हाही  
या भेटीचे हे फुलझाड  
असेच असेल फुललेले माझ्या मनात.  
तोवर झडून गेलेला असेल  
दिखाऊ शब्दांचा फूलबहर  
आणि सळसळत असेल फक्त  
मौनाची समजूतदार पालवी !!

आणि ही आताची.......

## बहर

सखे, निरोपाच्या क्षणी
फांदी-फांदीला बहर
भेटीगाठींच्या स्मृतींचा
गच्च दाटला मोहर
वाटा वेगळ्या होतील
दिस-महिने जातील
तरी तुझ्या-माझ्या मनी
याचा फुलोर राहील



तिन्हीसांजेला दूरच्या
जेव्हा कधी भेटशील
माथ्यावरती आपल्या
हीच सावली राहील
तेव्हा कुठे कळ्या-फुले
काय कारण शब्दांचे
पानापानातून मूक
ऊन झरेल प्रेमाचे

**सुरेखा काळवीट**



# तू असताना

तू असताना पाहू कशाला
चंद्र सागरा उगाच मी
स्वभाव दोन्ही एक जाहले
दिसले मज ते तुझ्या मनी

तू असताना अंबधिस त्या
उगाच का मी न्याहळावे
शब्दसमुद्री लाटांचे तव
तुषार अंगी झेलावे



तू असताना उगा करूका
हितगुज मी त्या पर्णांशी
भाव वाचिते उगाच नयना
एकरुप मी हो तुजशी

गर्द वेळूच्या बनात सळसळ
सांग सुखद ती कधी भासे
साथीला असताना तू रे
कृष्ण सखा मी तुज समजे

**शुभदा पालखे**
**बाणेर,पुणे**



# वारी

“पायात जोडवी नाही घालत माऊली?”  आवाज आला तशी अलिशा वर बघू लागली, एक पोरसवदा सावळा उंच मुलगा, मळखाऊ सदरा, विटकी जीन्स, गळ्यात तुळशीमाळ घालून गर्दीत तिच्या मागेच उभा होता! आज वारी लोणी काळभोर इथे मुक्कामी होती, तिथल्याच मंदिरात रात्री कीर्तन सुरु होतं, म्हणून अलिशा इतर मंडळींसोबत बसली होती…पाय दुखत होते म्हणून बसल्या बसल्या ती हलके पाय चेपत होती…

ह्या आगाऊपणाचे तिला फारसे वाटले नाही, देहू ते लोणी काळभोर तिच्या ते अंगवळणी पडले होते!  हे लोक चट्कन हक्क गाजवतात परक्यावर, मदत करतात तशी टीका देखील सढळपणे करतात, कुतूहल दाबून ठेवत नाहीत, सगळं थेट! हा मुलगा त्याला अपवाद नव्हता! मात्र वारकरी वाटत नव्हता!

पुन्हा वर बघून उत्तर द्यावं तर दिसेनासा झाला, तेवढ्यात कोणी पायाला स्पर्श केला अलिशाच्या! गांगरून खाली बघितलं तर चक्क तोच मुलगा, हलके हलके तिचे पाय चेपून देत होता! त्याच्या स्पर्शाने ती अवघडून गेली…ही अंगचट तिला वेगळीच वाटली…

“अहो, काय करताय? पाय कसला धरलात?” काहीशा वैतागाने बोलली…

“माऊली, निवांत बसा, परका समजू नका, थोडं पुण्य जमा करतोय बघा, सेवा करून, पाय दुखतात ना? देतो चेपून, तुम्ही ऐका, महाराज कीर्तन लै गोड करत्यात…बसा बसा अशा टेकून बसा…म्या अबीर, म्या पन वारीत चालतोय, नारायण शेवेत हाय जी…”

“ओह, हम्म…” का कोणास ठाऊक अलिशाने त्याला पाय चेपू दिले, तो ज्या प्रकारे कमी हलक्या दाबाने पाऊल चेपत होता, तिच्या मान्सल तळव्यात पेर रुतवून हलके दाबत होता, अगदी प्रत्येक शीर माहित असल्यागत, घोटा,पाऊल हलके घुसळत, त्याने कुठूनसे एक बाम काढून तिच्या पायाला लावले आणि त्याच्या मांडीवर तिची पाऊले ठेऊन तोही कीर्तन ऐकू लागला…सगळे अगदी सहज, त्यात कोणताही वासनेचा अंतर्भाव नव्हता, कोणताच अविर्भाव नव्हता. अलिशा किंचित शहारली, सैलावली, तरी सावधपणे तिने पाय परत जमिनीवर ठेवले. मागे टाळ मृदूंग दुमदुमत होता, त्यात तिचे चोरटे थँक यू हरवलेच बहुदा, त्याच्या कानापर्यंत पोचायच्या आधी! त्याने मंद स्मित करत पुन्हा हरिनामाचा ठेका धरला!

रात्री निजानीज सुरु झाली, अलिशा बॅकपॅक घेऊन एका कोपऱ्यात विसावली. दुसऱ्या दिवशी आन्हिकं आटोपून, ट्रक मधून नवीन कुर्ता काढून जुना त्यात टाकून ती पुन्हा दिंडीत सामील झाली…

‘बोला पुंडलिक वरदे हाऽऽरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम! बोला पंढरीनाथ महाराज की जय! तुकाराम महाराज की जय!’

‘जय हरी विठ्ठल, जय जय विठ्ठल, विठ्ठल विठ्ठल…’

सर्वदूर गुलालासारखा उधळलेला नामगजर, एकच नाद… पांडुरंगाचा!

लाखो पाऊले चालत निघालेली, एकच वाट- भक्तीची, एकच ध्येय- विठुरायाचे दर्शन! कोणताच दंभ नाही, दर्प नाही की अहंकार नाही, प्रत्येकाची व्यथा निराळी, कथा निराळी तरी प्रत्येकाची पाऊले एकाच वाटेने निघालेली, ओठी हरिनामाचा गजर! प्रत्येक पाऊल भक्तिमार्गावर, प्रत्येक गाव, शहर, रस्ता भक्तिमय, प्रचंड जनसागर नामगजरात भिजून गेलेला!

आज जरा हळूच चालावे असे ठरवून अलिशा चालू लागली, तिच्या दिंडीतल्या इतर बायका देखील चालत होत्या, रख्मा आणि सिद्धी तिला दिंडीत भेटल्या होत्या, त्यांचा आधार होता, मात्र त्यांचे आणि तिचे जग खूप खूप निराळे होते!

आज त्या दोघी पहाटे उठून लवकर चालायला लागल्या होत्या, त्यामुळे इतर गर्दीचा आधार घेत ओठातल्या ओठात जय हरी विठ्ठल पुटपुटत अलिशा निघाली...

अलिशा मकरंद प्रिया! पत्रकारितेची विद्यार्थिनी! टाइम्स ऑफ इंडिया, पुढे वॉशिंग्टन पोस्ट अशा नामवंत संस्थांसोबत काम केलेली, संस्कृतचा प्राध्यापक असलेला जर्मन नवरा आणि ती, अमेरिकेत गेली दहा एक वर्ष राहणारी ती एक बेदरकार मुलगी! मूळची बांद्रयाची, प्राध्यापक आई वडिलांची एकुलती एक लेक! जगभर फिरलेली!

रख्मा मूळची देहूची, आता पिंपरीला स्थायिक, नवऱ्याने टाकली, स्वत:ला पोसून एकटी राहणारी!

सिद्धी जेमतेम तेवीस चोवीसची, दरवर्षी आजी आजोबा वारीत सामील होत, कोविडने दोघांना हिरावून नेले, म्हणून पहिल्यांदाच वारीत आली होती! आकुर्डीपासून चालू लागली होती...

प्रत्येकीची गोष्ट निराळी...प्रत्येकीला विठ्ठलाला विचारायचा जाब निराळा!

अलिशा चालू लागली तसा दिवस उजाडू लागला. नाश्ता करून निघाली. ओळखीचा कोलाहल सभोवताली होता.मनातला कोलाहल आणि भोवतीचा निराळा, दोन्हीच्या गुंगीत ती चालत राहिली...

दुपार होऊ लागली तसे नारायण सेवक दिंड्यांमधून पाणी, सरबत वाटू लागले, जेवणाचे द्रोण रस्त्याच्या कडेने वाटले जाऊ लागले, आपापल्या दिंड्यांचे नियम सांभाळत मंडळी चालत होती, थांबत होती...जेवणं आटोपून पुन्हा चालू लागत होती! यवत गाठायचे होते! नारायण सेवक बघून अलिशाला अबीर आठवला! काल घडल्या प्रकारानंतर पुन्हा दिसला नव्हता तो. असे डोक्यात यायला आणि दुरून अबीर यायला एकच गाठ पडली! गर्दीत ओळखीचा तोंडवळा दिसला की उगीचच हायसं वाटतं, तसेच काहीसे अलिशाचे झाले! “माऊली जेवल्या का?” अबीरने सहज विचारले,

अनोळख्या उत्साही स्वरात अलिशा हसून हो म्हणाली! ‘एवढे अगदी काय?’ असे आतून वाटत असताना तिला अचानक त्याचे असे दिसणे हायसे वाटत होते!

“तुम्ही आता कोणत्या दिंडीत चालणार? का तुम्ही ट्रक मधून येता?” अलिशाने प्रश्न केला

“माऊली चालतोय मी असाच, कोणाला मदत लागली, काही दुखलं खुपलं तर सेवा करत करत म्या बी चालतोय...” अबीर आणि तिची पावले सहज एकत्रित पडत दोघेही चालू लागले. तोही फार मोठ्याने न बोलता चालत होता,

त्याचा अवतार कालच्यासारखाच होता, पुन्हा विटकी जीन्स मात्र कुर्ता आज श्रीखंडी रंगाचा होता...

"कितवी वारी तुमची अबीर?"

"जी तशी पहिलीच...नारायण सेवक म्हणून, आधी आईच्या पोटातून गेल्तो, मग आज्याच्या खांद्यावरून एकदा...पहिल्यांदा जातोय..."

बोलताना त्याचे स्वरयंत्र किंचित वर खाली होत होते, गळ्यात तुळशीमाळ होती, पायात कोल्हापुरी चपला होत्या, खिशातून मोबाईलचा आयत दिसत होता. पाठीवर एकही बॅकपॅक नव्हती, पिशवी नव्हती, बहुदा सामानासोबत असेल. अलिशाकडे बरेच  सामान होते, वॉकिंग शूज, बॅकपॅक, त्यात एक पाण्याची बाटली, तीन चार प्रोटीन बार, टिशू, टूथब्रश, पेस्ट, कंगवा, लिपबाम, औषधं, मोबाईल, वॉलेट, पासपोर्ट, तिची कॅन्सरच्या रिपोर्ट्सची फाईल आणि मुंबईच्या फ्लॅटच्या किल्ल्या. डीएसएलआर कॅमेरा आणि एक पुस्तक. दिलीप चित्रेंचे 'सेज तुका.'

पाच फूट सहा इंचाची छबी, कृश देह, बारीक कापलेले केस, गोरटेला वर्ण आणि निळी करडी 'ओस्प्री मीरा २२' बॅकपॅक...उठून दिसावी इतका वेगळा अवतार होता तिचा वारीत!

अबीर अगदीच सडा, सहा फुटी देह, शिडशिडीत, सावळा सुकुमार रंग, कुरळे केस, काही रुपेरी तारा अधून मधून डोकावणाऱ्या! मोठाल्या ढांगा टाकत अगदी चार दिवसात अंतर पार करेल पंढरपूरपर्यंतचे असेच वाटत होते; मात्र तो हळुवार अलिशाच्या सोबतीने चालत निघाला होता. साडेचार पाचला वारीचा वेग मंदावला, वाटेतले गावकरी चहा घेऊन सेवेस आतुर होतेच, यवत आता दूर नव्हते... अबीर कुठूनसा दोन चहाचे कप घेऊन आला, झाडाच्या आडोशाला थांबून दोघे चहा पिऊ लागले.

"तुम्ही एवढी मोठी पिशवी का घेतली सोबत माऊली? इतकं ओझं घेऊन कशाला चाललाय?"

"अरे, सामान लागत राहतं, मला सवय नाही ह्या सगळ्याची, मी माझे माझे समान सोबत ठेवते इतकंच"

"तरी ओझं लै आहे बघा पाठीवर, दिसतंय की!"

"तुझी पिशवी कुठे आहे?"

"जी फार लागत नाही, वारी समद्यांना खाऊ पिऊ घालिते, तो बोलावतो तशी खातीर पण करतोय, फकस्त इस्वास हवा! आपणपण झोकून द्याया हवं मंग त्यो झेलील ना! ताठा ठेविला की त्याला पन वाटतंय झाड उभं हाय तर चिंता न्हाय! झुकलं की बरं पडतं, ओझं राहत न्हाई! इस्वास लै सोप्पा असतोय, पाऊल टाकितो ना, त्या सहजतेने ठिवून द्यायचा! आपन लै चिकित्सा करतोय, पृथ्वी गोल कशी, तिचा येग किती? पाऊल कसं टाकू? त्याला कोणत्या बुटाने झाकू? किती खाल्लं की बरं, किती पानी प्यावं? काहीच्या काही मोजू लागलोय आपन, म्हणजे मोजायचं त्यो कुटे काय बोलतोय? इतकी रानफुलं असत्यात पठारावर, किती असली तर सुंदर दिसत्यात? इतक्या चांदन्या असल्या की रात्र नटते? किती काजवे पेटले की रान जादुई व्हतंय? किती थेंब पडले की पाऊस, पाऊस व्हतो?

मंत्रचाळी प्राणी असतोय माणूस बघा! अगदी लहान लेकरागत, एक दोन तीन मोजू लागला की त्योच नाद! एकमेकांना भेटावं बोलावं वाटलं की मद्ये आकडे - फोनचे ओ,

मग जगातला समदा तंत्रज्ञाचा पसारा  गनितावर! अर्रर! पन मर्दा, ईठू काय मागितो व्हय? शबूद पन न्हाय, शांत समाधानात ऱ्हावा! त्याला भेटा किंवा नको, त्यो ते पन सांगत न्हाय! तुक्याला ते समजलं, ज्ञानोबाला आधीच उमगलं मात्र आपन असे इथेच, निस्ते चालतो पन ईठू गावल कसा, त्याचे काय न्हाय! आतली कविता नीट उमगली पायजे न्हवं? आतल्या गाभाऱ्यात ईठू हवा, त्यो गाभारा इतका कचऱ्याने भरलेला आनी आपल्याला रस्त्यावरली घान खुपती...आतली बोचकी, ओझी फेकली की काय लागतं मानसाला? भडाभडा बोलून टाकावं भ्या, सोडून द्यावा राग! तो सोबत असतोय कायम!
चला माऊली यवत गाठायला हवं..."

अलिशाला अजबच वाटत राहिला हा, नेमके वय समजेना, मुद्दा कळेना, सामान कुठे विचारलं तर काहीही बोलतोय ! तरी त्याची सोबत होती, वाट सहज सरत होती! दिवसभरात ती फारशी दमली नव्हती! पाय दुखले नव्हते. साडेसहापासून जलद गतीने चालत मंडळी यवत मुक्कामी पोचली. जेवणं, कीर्तन आणि निजानीज, रोजचा क्रम साधारण ठरलेला!

आज कीर्तन ऐकायचे नव्हते, ती व्हरांड्यात बसून डायरी लिहीत होती, रोजची सवय, वारीचे अनुभव टिपून ठेवत होती! गेली दोन तीन दिवस. त्यात सतत अबीरचा उल्लेख होता! मोठाच विलक्षण मुलगा, बोलायला लागला की नेमकं कशाबद्दल बोलतोय कळेना, वय फारसे वाटले नाही, तरी काहीतरी संचित होते त्याच्याकडे, त्यातूनच बोलत असावा बहुदा...स्वतःबद्दल काही विचारावे सांगावे, तर तसे काही संभाषण होत नाही, मात्र मनकवडा आहे पक्का, काल पाय चेपून दिलेन, आज सोबत होता दिवसभर. तिच्या मनात यायच्या आधीच गरज ओळखून हा पठ्ठ्या मदत करत होता. मधूनच कुठे गायब होई, मग परत येतो अगदी सहज. काय तर म्हणे तिच्याकडे ओझे जास्त होते! ह्याला काय ठाऊक किती बॅगेज होते तिचे! इमोशनल, फिजिकल...

वरवंड, उद्वाडा करत करत तीन दिवसांनी पालखी बारामतीत शारदा विद्यालयात पोचली! दोन दिवस रख्मा सिद्धी मुक्कामी पण दिसल्या नव्हत्या. अलिशा काहीशी भिरभिरली गर्दीत. सहसा सगळे मुक्कामी भेटत...बारामतीत रख्मा दिसली! बघताच अलिशाला मिठी मारली! "माऊली कुठे होतात? दिसला नाही दोन दिवस"

"अगं मी तेच विचारणार होते!"

"अहो माझी चुलती आलेली भेटायला, तिच्या घरी गेले, आज सोडलंय चुलत्याने परत"

"अच्छा असं मध्येच जाता येतं का कुठे? मला माहित नव्हतं!"

"हा म्हणजे काही कोणी बोलत न्हाई, सांगून जायचं म्हणजे सोप्पं पडतं"

सिद्धी देखील तेवढ्यात आली, "माऊली! हे मलम ठेवा, मी काल घेऊन आले तुमच्यासाठी!"

अबीरने लावून दिले असे अलिशा बोलणार होती, मात्र राहून गेलं ते, बाकीच्या गप्पात!

ती बोलत होती खरी, मात्र मनात विचारांची चक्र सुरूच होती, खरेतर ही कोण माणसे होती?

अगदी दहा दिवसापूर्वी त्यांचे- तिचे जग इतके भिन्न होते आणि आज त्यांचे तोंडावळे बघून हायसे वाटत होते! त्यांचे हसणे लोभसवाणे वाटत होते! मन आणि दृष्टी त्यांच्यासाठी आसुसत होती! त्यांना तिच्यात विठ्ठल कसा दिसत होता कोणास ठाऊक, तिला मात्र अजून दिसला नव्हता!

अलिशा नुकतीच कर्करोगातून मुक्त झाली होती. तात्पुरती कदाचित... सहा किमो सायकलने केस गेले होते, त्वचा काळवंडली होती, पुरती रया गेली होती! खांद्याची हाडं वर वर आली होती आणि गालफडं बसली होती! हळूहळू ट्रीटमेंट संपली, केस अर्धे पिकलेले, अर्धे काळे परत आले, वर्ष सरलं कॅन्सर फ्री होती!

आजारपणात दिलीप चित्रेंचं 'सेज तुका', नुसतं पारायण केलं! सरेंडर काय प्रकार आहे? एवढी कशी कोणी लीनता अनुभवू शकतं? झोकून द्यायचे, विसंबून राहायचे कसे? स्वतःच्या कर्तृत्वात अढळ उभं राहायला शिकल्यावर स्वतःवर विसंबून न राहता मऊ होऊन शरण जायचे त्या परमात्म्याला,कसे? कोण असतो तो? असेल जरी कोणी मोठी शक्ती, ती आपल्याला कशाला मदत करेल? विश्वाचा इतका पसारा, काहीच गरज नाहीय आपल्याकडे लक्ष देण्याची! मलाच का कॅन्सर झाला?? अलिशाचे प्रश्न तिला भेडसावत होते! शेवटी तिने अवचित निर्णय घेऊन टाकला, वारीला जायचा! मार्टिन येऊ शकणार होता, समर ब्रेक होता खरेतर, तिला एकटीला वारी करायची होती. बोस्टन एअरपोर्ट ते मुंबई,मग देहू अशी येत आता गेले अनेक दिवस वारीत चालत होती! तिला उत्तरं नव्हतीच मिळाली, प्रश्न वाढले होते! लोकांचे साधे राहणे, देवभोळेपण, तिला झेपत नव्हते! प्रश्न न करणे तिला गावंढळ वाटत होते! तिच्यातले कुत्सितपण कमी होत नव्हते, भोवतीचे चांगुलपण तिला अजिबात उमगत नव्हते! का लोकं इतकी चांगली आहेत हेच समजत नव्हते!

"चला माऊली..." अबीरची हाक आली तशी भानावर आली, रख्मा आणि सिद्धी पुन्हा थोड्या पुढे मागे होत्या, ती एकटीच चालत होती आजपण...विचारांत चालताना नामजप अलगद मिटून गेला ओठांवरून, गर्दीतले एकटेपण तिला तसे नवीन नव्हते मात्र असे ह्या अबीरचे येणे जाणे तिला नवीन होते! आज इंदापूरला निघाली होती पालखी!

"माऊली किती इचार करता! लक्ष कुठे?" अबीर जवळ येत पुन्हा बोलू लागला! त्याचे ओघवते बोलणे तिला आवडू लागले होते! म्हणजे तो आकर्षक होता, वगैरे म्हणून नाही, तो एक मित्र होता, त्याचा आधार होता...भले त्याचे पूर्ण नाव तिला ठाऊक नव्हते मात्र त्याचे तसे तिला देखील न विचारणे तिला आवडत होते! फार गुंतागुंत नव्हती!

अलिशा समजुतीचे हसून त्याच्यासोबत चालू लागली...

"माऊली पाच दिवसांनी वखरी येईल मग पंढरपूर! तुम्ही काय मागणार पांडुरंगाला?"

"प्रश्न आहेत बघ, तुझे वय माहित नाही, मी बेचाळीस वर्षांची आहे, अर्धवट मोठी, म्हातारी नाही अजून! मला कर्करोग झाला होता, आता बरी आहे असे म्हणतात डॉक्टर,मात्र मला प्रश्न आहे की मलाच का हा सगळा त्रास झाला? का एवढ्या वेदना? मी काही कोणाचे बरे वाईट केले नाही तरी मीच का भोगू? हे वय आहे? आता कुठे आर्थिक स्थैर्य लाभले,अजून कितीतरी देश बघायचे आहेत, पुस्तकं वाचायची आहेत, लेखन करायचे आहे!

ही काय कटकट मध्येच? मला मनःशांती हवी! हक्क आहे माझा! खरेतर वारी वगैरे मला फारसा रस नव्हताच! दिलीप चित्रेंचं 'सेज तुका' वाचलं आणि प्रश्न अधिक गहिरे झाले! काय आहे शरणागती? असे कसे विसंबून राहता येईल कोणावर?
प्रश्नांचा हार घालणार आहे बघ विठ्ठलाला मी!"
अलिशा अचानक सगळे एका झटक्यात बोलून गेली आणि मग लागलीच पश्चाताप झाला तिला, ओव्हरशेरिंगचा! तिचे नेहेमीचे होते ते! समोरच्याचा अंदाज न घेताच त्याच्यावर असे डाऊनलोड करणे!
अबीर तिच्या सोबत निमूट चालत होता, ती थांबली की एखाद पाऊल हळू घेत परत चालू लागत, त्याचे काहीच म्हणणे नव्हते तिच्या त्राग्यावर! वाटले कॅन्सर वगैरे ऐकून काही सहानुभूती तरी देईल... एक क्षण तिलाच खजील झाले! सहानुभूतीची कसली अपेक्षा करत होती ती!
हा ठोंब्या रोज भेटला की इतकी बडबड करत होता, नको तेवढे ज्ञान पाजळत होता, आज काय कुलूप ह्याच्या तोंडाला!
अबीर रोज तिच्यासोबत चालू लागला,जेवण चहा नियमित आणून द्यायचा, हक्काने पाय चोळून द्यायचा, तिचे कपडे धुवायला घेऊन जायचा. बोलायचा काहीच नाही, म्हणजे रोजचे माऊली हे, माऊली ते असे वरवरचे बोलायचा मात्र तिच्या प्रश्नांवर काहीच वाच्यता नाही...पाच दिवसांनी वखरी आली आणि उद्या पंढरपूर! रस्ते सजलेले, उत्साह सर्वदूर होता...अलिशा मात्र खजील होती! रिक्त होती! अजून काहीच हाती लागलं नव्हतं तिच्या! कोणताच साक्षात्कार तिला झाला नव्हता! प्रश्न रोज पाठीवरून प्रवास करत होते!
पहाटे पहाटे रख्मा आली, "माऊली उजाडायच्या आधी निघू, गर्दी व्हायच्या आधी पोचू! चला!"
वेस ओलांडून पंढरीत अलिशा शिरली, गर्दीच्या लोंढ्यासोबत चंद्रभागेपाशी पोचली. त्या हिरवट,कळकट पाण्यात शिरावे न शिरावे, न समजून तशीच उभी राहिली...रख्मा भक्तिभावाने पाण्यात उतरली. तितक्यात मागून अबीर आला, "आता तरी ओझं द्या माझ्याकडे, जा माऊली पाण्यात उतरा की!" हक्काने तिच्याकडून बॅग काढून घेत अबीर काठाशी उभा राहिला. हलकेच अलिशा पाण्यापाशी गेली, घोटे बुडतील इतपत, तिचे गोरे पाऊल त्या शेवाळी पायरीवर उठून दिसत होते,अजून पुढे सरकली, गार पाण्याने पोटऱ्यांना मिठीच घातली,हळूहळू सगळा शीण पाण्यात मिसळून वाहून गेला! करत करत ती छातीपर्यंत पाण्यात गेली, 'मानलं तर हे पाणी गढूळ आहे, मानले तर पवित्र, सगळा खेळ मनाचा, आपण फार अडकतो ह्या धारणांमध्ये...कर्करोग म्हंटल तर रोग नाहीतर एक संधी, पुनर्जन्माची! नव्याने गाभाऱ्याची, मनाची पुनर्बांधणी करण्याची! आधीचे संभ्रम विभ्रम मोडून काढण्याची! धारणा नव्याने तपासून बघण्याची! चित्रे जसा तुकाराम मांडतात, तुकाराम कसा म्हणतो, "टू अरेंज वर्ड्स, इन सम ऑर्डर/ इज नॉट द सेम थिंग, ऍज द इनर पॉईज/ दॅट्स पोएटरी"
आत होता विठ्ठल, तिथे वारी करून पोचायला हवं, मनातली चंद्रभागा स्वच्छ वाहू द्यायला हवी!
अलिशा वाकून पाण्यापाशी थांबली, डोळे मिटून डोके पूर्ण पाण्याच्या पृष्ठभागाखाली बुडवले! मनातला कोलाहल मिटला एक क्षण! श्वास रोखून डोक्यावरून पाणी जाऊ दिलं आणि हुंदका फुटला म्हणून डोळे मिटून ओलेत्याने

उभी राहिली पात्रात! सभोवताल विरघळून गेला होता! होती फक्त ती! शांत! मनातला सगळा आकांत मिटला! होती फक्त तुकोबाची कविता!

ती तशीच चालत घाटापाशी आली! एक क्षण समजलंच नाही, कारण गर्दीत अबीर नव्हता! तिची बॅग नव्हती! तिचे ओझे घेऊन हा गायब झाला होता! अबीर! बस्स इतकीच ओळख! नाव, गाव, पत्ता काहीच ठाऊक नाही! आता फोन देखील नव्हता त्यामुळे आता करायचे काय! एक क्षण तिला सुचलेच नाही! अख्खा घाट पिंजून काढला तरी अबीर सापडेचना! अशीच ओलेत्याने अलिशा भिरभिरत्या नजरेने फिरत राहिली, तितक्यात रख्मा आली कुठूनशी.

“माऊली, अहो! चला!” “अगं तो मुलगा बॅग घेऊन गेलाय! माझे सगळे चोरले त्याने! घरी कशी जाऊ?”

“माऊली, असे वंगाळ बोलू नका, तुमच्याकडूनच कुठे राहिली असेल बॅग, इथे तुम्ही एकट्याच होता, तुम्ही ओल्या कपड्यात किती वेळ बसणार? ही साडी नेसा, तिने अलिशाला बळे बळे स्वतःची साडी चोळी दिली, डाळिंबी रंगाचे पातळ आणि कसूटीचा खण ल्यालेली अलिशा निराळीच दिसत होती! रख्मा आणि सिद्धीने बळेच दोन्ही दंडाला धरून अलिशाला मंदिरात नेले! तिथे पांडुरंग एकटाच आहे हे बघून अलिशाला आश्चर्य वाटले! रखुमाईचे निराळे मंदिर आहे, ती देखील एकटीच उभी ठाकली आहे...असा शेवट असतो? इतका तुटक? संपली वारी?

गर्दीतून ढकलत वाट काढत तिघी पुन्हा आडोशाला आल्या, तर अलिशाचे कपडे कोणी नीट वाळत घातलेले, आणि खांबाला टेकून तिची बॅग!

तिच्या डोळ्यात खळ्ळकन पाणीच तरळले!

आतल्या वस्तू जशाच्या तशा...

मात्र  ते ओझं हलकं भासत होतं...

अबीर तिला कुठेच दिसला नाही, तिची परत वारी सुरु झाली, तिच्यातल्या विठ्ठलाची आठवण घेऊन ती परतली, त्याचा चेहरा थेट अबीरचा होता!

(ही कथा अक्षयभाषा कथास्पर्धा २०२३ ची विजेती कथा आहे.

ही कथा अक्षयभाषा कथास्पर्धा ई-पुस्तक मध्ये पूर्वप्रकाशित करण्यात आली आहे.)

**प्राजक्ता पाडगांवकर**



# अहंकार

अहंकार हा माणसाचा शत्रु आहे असं म्हटलं जातं. अहंकार म्हणजे 'मी' पणा. म्हणजे 'मी म्हणतो ते आणि तेच बरोबर आहे, 'मी' मला वाटतं तसंच करणार, माझ्यापेक्षा जास्त कुणाला समजत नाही, वगैरे वगैरे भावनांचा समुच्चय नाही का? अहंकारी माणूस 'मी' पणा किंवा स्वत:चे स्वतंत्र अस्तित्त्व विसरून समुदायात 'दुधात साखर विरघळली तरी साखरेचा गोडवा दुधाला लाभेल' अशी भावना न बाळगता स्वत:चे स्वतंत्र अस्तित्त्व अबाधित राखण्याचा प्रयत्न करीत असतो. याचा परीणाम म्हणजे सोबती दुखावले जातात, संघटना मोडकळीला येते, कधी कधी अहंकारी माणूस एकटा पडतो. अहंकारामुळे हाहा:कार माजतो. अशा माणसाच्या हातात अधिकार नसतील तरी तो त्याच्या कार्यपरिघात अहंकारी वृत्ती दाखवित असतोच. अधिकार हातात असले तर त्याच्या अहंकाराला तीक्ष्ण धार चढते. एखाद्या दरिद्री माणसापासून ते पंतप्रधानापर्यंत सर्वांना कमी जास्त प्रमाणात अहंकार असतोच असतो. म्हणजे अगदी 'दीवार' मधील 'मैं फेके हुए पैसे लेता नहींI' असं सांगणाऱ्या बुटपॉलीशवाल्याला सुद्धा अहंकार आहे असं नाही म्हणणार मी. तो स्वाभिमानाचा भाग झाला. अधिकारी व्यक्तींना असलेला अहंकार तर आपण नित्य पहातो.

हा अहंकार कधी बरं शिरकाव करतो माणसात (आणि काही प्रमाणात समुदायाने रहाणाऱ्या प्राण्यातसुद्धा)? मला वाटतं बाळ जेव्हा २ ते ३ वर्षाचे होते तेव्हा त्याला स्वत्वाचे भान येते. आपण म्हणजे कोणी एक स्वतंत्र व्यक्ती आहोत, आपल्यालाही मत असायला हवे, आपल्याशी संबंधित निर्णय आपल्याला न विचारता होता कामा नयेत, आपले मत आग्रहाने मांडून आपण स्वतंत्र व्यक्ती असल्याचे सिद्ध केले पाहीजे, अशा भावना त्या बाळाच्या मनात येऊ लागतात.  त्याचे दृश्य परिणाम म्हणजे बाळ विनाकारण आणि वरकरणी त्रागा करू लागते, त्याचं नेहेमीचं खाणं किंवा खेळणी फेकून, मोडून देऊ लागते. अमुक एक गोष्ट करायची का असं विचारलं, की नकार देऊन दुसरी करायची असं सांगणे. 'माझं(च) म्हणणं ऐका' असा एकंदरीत सूर असतो.

तर असा हा अहंकार सर्वांच्यात कमी अधिक प्रमाणात असतो व प्रसंगानुरूप कमी अधिक प्रमाणात तो दिसतो.  हे प्रमाण कमी किंवा अधिक, केव्हा व का होते याचा मी विचार करीत असता मला पुढील गोष्टी लक्षात आल्या.

१.सर्वप्रथम मी माझ्याबद्दल काही कल्पना करून घेतो. म्हणजे माझी शारीरिक परिस्थिती, बौद्धिक, आर्थिक, सामाजिक स्तर या बद्दल कल्पना करून घेतो. या कल्पना वस्तुस्थितीला धरून असतीलच असे नाही. त्या खरे-खोटे, चूक-बरोबर यांचं मिश्रण असतात. शिवाय त्या परिवर्तनशील म्हणजे बदलणाऱ्या असतात.  म्हणजे मी प्रसंगानुरूप त्या बदलत असतो.

२. तसंच, मी माझ्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचं माझ्या नजरेतून त्यांच्या शारीरिक परिस्थिती, बौद्धिक,
आर्थिक, सामाजिक स्तर यांचं मूल्यमापन करतो आणि त्यावर ठरवतो की ही व्यक्ती माझ्यापेक्षा श्रेष्ठ आहे की कनिष्ठ.

३. तसंच, त्या व्यक्तीशी मी कोणत्या संदर्भात व्यवहार करतो आहे हे लक्षात घेतो.

४. वरील तीन गोष्टींचा एकत्र परिणाम म्हणून मग मी हे ठरवितो की आत्ता या क्षणी मी त्या व्यक्तीशी किती अहंकाराने वागावे की नाही आणि किती प्रमाणात वागावे.

अहंकाराबद्दल वरील सर्व विवेचनावरून आणि आपल्याला आधीच माहीत असल्याप्रमाणे अहंकारी वृत्ती वाईट असे आपल्या सर्वांचे मत असते. परंतु मला थोडा वेगळा विचार मांडायचा आहे.

अहंकार असणे अगदीच वाईट नाही. फक्त त्याची मात्रा कधी किती असावी याचा तोल राखणं हे अतिशय महत्वाचे आहे.

आता असं पहा, आपली मी पणाची भावनाच आपल्याला आपली स्वतंत्र ओळख देते. ही भावना व्यक्ती व्यक्तीतील शारीरिक, बौद्धिक, आर्थिक, सामाजिक फरकामुळेच निर्माण होते. सगळे दिसायला, वागायला आणि बौद्धिक, आर्थिक, सामाजिकदृष्टया एकसारखेच असते तर दोन व्यक्तींमधे स्त्री व पुरूष याव्यतीरिक्त काहीच फरक उरला नसता. समाजधारणाच झाली नसती. या नवऱ्याची ही बायको किंवा या बायकोचा हा नवरा असा फरकच करता आला नसता. कुटुंबव्यवस्थाच तयार होऊ शकली नसती. जशी प्राण्यांच्यात जवळ जवळ नसतेच. कळप करून जगणाऱ्या प्राण्यांच्यात प्राथमिक अवस्थेत असते तेवढीच. जर कुणालाच मी पणाची भावना नसेल तर? 'मी' हा 'कुणीतरी' आहे, 'कोणीही' आहे असं नाही. प्रत्येक 'मी' हा दुसऱ्या 'मी' पेक्षा वेगळा नाही असं झालं तर?

तर म्हणून अहंकार असणे किती महत्त्वाचे आहे हे आपण पाहीले. समजा मी एक चित्रकार आहे. माझ्या प्रत्येक चित्राच्या खालच्या कोपऱ्यात मी माझी सही का करतो? लोकांना कळायला, की हे मी काढले आहे; आणि माझी अशी ही एक शैली आहे, की जी इतर चित्रकारांपेक्षा वेगळी आहे. हीच गोष्ट प्रत्येक कलाकाराच्या बाबतीत असते. इतकंच काय, दारू पिण्याच्या बाबतीत सुद्धा लोक स्वत:ला इतरांपेक्षा वेगळे समजतात. कोणी म्हणतो, 'मी फलाण्या व्हीस्कीशिवाय इतर व्हीस्कीला हात लावत नाही'. कोणी म्हणतो, 'मी एकदा प्यायला बसलो की ५ पेगशिवाय उठत नाही'. तिखट खाण्याच्या बाबतीतसुद्धा तेच. कोणी म्हणतो, 'मी कोल्हापुरी लाल रश्श्यातली नुसती तर्री खातो'. कोणी म्हणतो, 'मला मामलेदार मिसळ कमी तिखट वाटते'. हे लोक कमी तिखट खाणाऱ्याला तुच्छ समजतात. कुणी म्हणतो, 'मी कुमार गंधर्वांचंच गाणं ऐकतो. बाकी कुणाला गाताच येत नाही'. कुणी म्हणतो, 'आपण कुणाच्या वाटेला जात नाही पण आपल्या वाटेला कुणी गेलं तर आपण त्याला सोडत नाही'.

असे प्रत्येकाचे खाणे, पिणे, कपडयांची निवड, रहाणी, वागण्याची पद्धत, स्वत:चं नाव, आडनाव, मूळ गाव अशा अनेक बाबतीत स्वत:ची अशी खासियत असते. निदान त्याला तरी तसं वाटतं आणि ते जपणे हेच जणू त्याचे जीवनध्येय होतं, त्याचं जणू व्यसन होतं, अस्मिता होते.

तर हा जो अहंकार आहे हा एकाच वेळी असायला हवा आणि नसायलाही हवा. जरा विचित्र वाटतं नं?

**असायला का हवा ?**

आपली एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून ओळख असणे आवश्यक आहे. ज्ञानाच्या, अनुभवाच्या आणि अधिकाराच्या पातळीनुसार कनिष्ठ व्यक्तीने श्रेष्ठ व्यक्तीचा आदर राखणे आवश्यक आहे.

**नसायला का हवा ?**

जरी आपली एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून ओळख असणे आवश्यक आहे; तरी प्रत्येकजण वेगळा आहे इतकेच स्थापित करण्याएवढी वेगळी पुरेशी आहे. अतिरेक केला, की हा अहंकार गर्व किंवा दुराभिमान या पातळीवर जातो आणि इतरांना टोचतो, तीव्र दु:खदायक सुद्धा होतो.

आता गंमत अशी होते की साधारणपणे प्रत्येक मनुष्याकडे काही ना काही तरी एक कौशल्य, अनुभव, समज, अभ्यास असतो. तो त्या बाबतीत स्वतःबद्दल अहंकार बाळगून असतो. पण त्याला दुसऱ्या क्षेत्रातील काही माहित नसेल, समजत नसेल, तरी त्याचा स्वतःच्या क्षेत्रातील अहंकार इतर क्षेत्रात पण प्रगट होतो / होऊ शकतो. असं होतंय याची त्याला जाणीव असेलच असं नाही. मग त्याचे दुसऱ्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीशी खटके उडू लागतात.

आता अतिरेक झाला आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार कोणाचा? तर हा अधिकार नसून ही तर प्रत्येकाची स्वत:ची जबाबदारी आहे; आणि अतिरेक झाला आहे की नाही हे ठरविण्याचा सोपा निकष म्हणजे जर आपल्या अहंकारामुळे समोरची व्यक्ती दु:खी झाली असेल तर अतिरेक झाला. म्हणून आपल्याला आपल्या अहंकाराची तीव्रता समोरची व्यक्ती दु:खी होणार नाही इतकी कमी करावयास हवी. आता समोरची व्यक्ती दु:खी झाली आहे हे कळण्याइतकी संवेदनशीलता आपल्यात असलीच पाहीजे.

काय पटतंय का '**मी**' काय म्हणतो ते ?

**हेमंत साने**

**ठाणे, महाराष्ट्र.**



# नदीष्ट : वाहून नेणारी धार आणि तारणारा काठ!

एखादेच पुस्तक जागे करते.खडबडून.मग तंद्रीत ओढून नेते. मागोमाग.. वाट पुसत जावे स्वतःस.तसे! याच अस्सल तीव्र धारेचे पुस्तक म्हणजे.. नदीष्ट!

श्री. मनोज बोरगावकर लिखित हे पुस्तक म्हटले तर कादंबरी; म्हटले तर अनुभवकथन; किंवा ललित गद्य सुद्धा. पण फॉर्म दुय्यम ठरावा इतका आशय अस्सल आहे. महापुरात दुथडी भरून वाहणाऱ्या नदीने बिनधास्त शिरावे वावरात, वाड्यात..तसा हा आशय! तो फॉर्मच्या चिंध्या उडवत वेढून टाकतो मनाला आपल्या पुराने.. किंवा महापुराने!
गोष्ट म्हणजे इतकीच की लेखक अनेकवर्षे नदीवर पोहायला जातात. नाद असतो नदीचा म्हणून नदीष्ट! पोहायला जाताना, येताना, पोहताना बरंच काही दिसतं. आत अंकुरत जातं. उमलून येतं. पशूपक्षी दिसतात. माणसं भेटतात. मनात साठतात. लिहते करतात.

कोण आहेत ही माणसं? रेल्वे स्टेशनवर भीक मागणारी सकीनाबी, मासे पकडणारा झिंगा भोई बामनवाड, तृतीयपंथी सगुणा, सर्पमित्र प्रसाद, दूधवाला कालुभैय्या आणि त्याची प्रेयसी, भिकाजी, वयोवृध्द दादाराव आणि स्वतः पांढरपेशा लेखक. या प्रत्येक माणसाची एक 'स्टोरी' आहे. एक कैफियत आहे. एक आर्जव आहे. ती लेखकाच्या तल्लख आणि करुणेने भिजलेल्या लेखणीतून अलगद मनात प्रवेश करते.
हे लोक कितीतरी वेळा आपणही आजूबाजूला पाहिलेत; पण आपण पाहून न पाहिल्यासारखे केलेत. ते आपल्या जाणिवेतून मनात आले नाहीत. कारण आपल्या मनात त्यांच्यासाठी जागाच उरलेली नाही. तसे पाहिले तर भवतालच्या चकाचक चौंधळीत आणि काळाच्या धुमशानीत त्यांना कुठे जागा राहिली आहे? घरही नाही मुख्य प्रवाहात. आडोशाला उभी असतात. आपल्या सहानुभूतीच्या सिग्नलला!
मात्र आईसारखी नदी त्यांना सामावून घेते, दिलासा देत सांत्वन करते. कोणतेही समुपदेशन चार्जेस न लावता. म्हणून नदीची ओढ आहे त्यांना.

हिंसा, क्रौर्य, विकृत कामुकता, तुटलेपण यांनी डागण्या दिल्यात यांच्या आयुष्याला. नियतीने त्यांना खूप झुंजवलय. जितकं समाजाशी तितकं स्वतःशीही! डाग आहेत अंगावर, मनात गाऱ्हाणी आहेत. थिजून गेलीत ही माणसं. प्रमाण भाषा विसरलीत. त्यांना फक्त नदीच्या प्रवाहाचा आवाज येतो ऐकू येतो; आणि कदाचित नदीला

त्यांचा. म्हणूनच नदी हा आधार आहे. थीम आहे सगळ्याची. मुख्य पात्र आहे. तिला एक स्वतःचे कॅरेक्टर आहे. स्वतःची भूमिका या अर्थी! नदीचीही स्वत:ची तक्रार आहे.
तिचा अस्तित्वासाठी पोटतिडकीने लढा चालू आहे. ती आई आहे. ती आई होती म्हणून घनव्याकुळ रडणारे कोणी आहेत का? इतकाच प्रश्न विचारते आहे.

साचलेलं भोगलेलं अपार दुःख वाट सोडून चुकल्या मांजरागत आपल्या दाराशी येतं तेव्हा दचकतो आपण. कोण आलंय आपल्यात? वर्तमानाच्या खुंटीला धरून तपासतो स्वतःला. एक विदेही सुन्नपणा अनुभवतो, की भवताल असा डसला नाही म्हणून आपल्या सुशेगादपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करतो. जगतोय खरंच की थिजून गेलोय आपण? नदीसारखे किनारे आणि काठ भिजत का नाहीत आपले? कोणती तहानलेली जमीन करुणेने भिजवताही येत नाही आपल्याला याचे दुःखही मोठेच. खंत ही तशीच.

पांढरपेशा चाकोरीने फक्त इवेंट्स साजरे होत राहतात का? एकामागून एक...बारसे ते श्रद्धांजली! निसर्ग, नद्या, अवकाश फक्त ट्रॅव्हल पॅकेजेस पुरते उरलेत का? नाडलेले, अभागी लोक आज नको इतके प्रवाहापासून विलग का वाटू लागलेत? आजूबाजूला इतके विद्रूप होत जाणारे जग, आपले मन, किमान कान मागत आहे याची आपल्याला ना जाणीव ना खंत! असे अनेक अव्वल प्रश्न ही कादंबरी उपस्थित करते.
अवघ्या १६६ पानांची कादंबरी. पण या लघु आकारात आपल्या संवेदनांना बधीर करून टाकण्याची पुरेपूर क्षमता आहे. लेखकाने ठासून भरलेला गोळाबारुद प्रत्येक प्रकरणात हमखास उडतो आपल्या अंतरंगात!

शैली म्हणाल तर मनोगत आहे बरचसं. आपण कसा मराठी, इंग्रजी, हिंदीमिश्रित विचार करतो. तशीच भाषा आहे. अटेम्ट, कातील, सोलुशन, चार्जिंग, कॉस्च्युम असे शब्द वारंवार येत राहतात. त्यामुळे भाषा सजवली नाही, ते एक बरिक बरेच झाले. नाहीतर नदीत पोहता पोहता उगाच धोंडे लागले असते.

निसर्ग, चिंचा, रानमांजर, हरणाचे पाडस, माकडे , गवत, साप, नाग सर्व अस्सल अवतरतात. झू मधले वाटत नाहीत.

कळ उठवण्याची या पुस्तकाची क्षमता अफाट आहे. प्रसरणशीलता ही नदी सारखीच. अनेक राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. मिळत आहेत. भारतातील अनेक भाषेत गेली आहे. जात आहे. अनेक विद्यापीठातही. तसेच चार वर्षात चौदा आवृत्त्या.

नदी वाहून आणते, नदी वाहूनही नेते, नदी वाहत राहते..फक्त! गोष्टी सांगत जाते. संस्कृतीच्या कहाण्या विणत राहते. नदी तिथेच असते; पण मनाच्या पात्रात बरेच काही सोडून जाते. हे बरेच काही..पुन्हा आयुष्याला वाहते करेल?..नदी होण्यासाठी आपली! आतून वाहणारी बारमाही!

भिकाजीची गोष्ट वाचता वाचता...सुचलेल्या कवितेच्या शेवटची दोन कडवी-

"असण्याचे सुटते ना कोडे
ना नसण्याचे हशील
नदीसारखे वाहते आयुष्य
होऊन नदीष्ट
मरेपर्यंत..!

नदी मेली तर पुरणार कसे
खोलगट वाळूत फक्त
उरतात गेल्याचे ठसे
त्यापायी माती
मरेपर्यंत..!"

(नदिष्ट मनोज बोरगावकर ग्रंथाली प्रकाशन)

**समरेंद्र निंबाळकर,**
**मुंबई**



# तन मनाचा भोवरा



**(रश्मी वडवळकर )**

यावर्षी आम्ही एक विशेष सदर चालवलं. त्याचं नाव आहे 'तन मनाचा भोवरा'. या लिखाणामागची लेखिकेची भूमिका येथे देत आहोत. समाजामध्ये विविध स्तरांवर काम करत असतांना असंख्य स्त्रियांचा सहवास लाभला. तेंव्हा जाणवले की बहुतेकांना मानसिक विकारांबद्दल अज्ञान असते.

मन निकोप, सुदृढ, सकारात्मक, आनंदी करण्यासाठी काही प्रयास करावे लागतात याची त्यांना जाणीवच नसते. घर स्वच्छ आणि नीट राहण्यासाठी आपण धडपड करत असतो. परंतु 'मन' जे दिसत नाही, ज्याला आकार नाही, जे हातात येत नाही, जे दुखावले गेले तर त्यातून रक्त येत नाही. जे घुस्मटले तरी ते दुसऱ्यास जाणवत नाही. जे आत्महत्येच्या विचारांपर्यंत पोचलेले अत्यंत जवळच्या व्यक्तीससुद्धा उमगत नाही. जे वाईट विचारांकडे, व्यसनाकडे झुकत चाललेले स्वतःला सुद्धा कळत नाही. अशा 'मन' या गोष्टीकडे आपले पूर्ण दुर्लक्ष आहे. खरंतर बाकी सर्व ऐहिक गोष्टींचा आनंद, तृप्ती, समाधान, या एका मनावरच अवलंबून असते. मन सुदृढ असेल, तर माणसांची कार्यक्षमता वाढते.

इतरांप्रमाणे माझ्याही मनात या विषयांबद्दल एक धूसर अस्पष्टता होती. परंतु नांदेड मधील एक तरुण, उत्साही, धडपडे, संवेदनशील व्यक्तिमत्व, मानसोपचारतज्ञ डॉ. मोहित सोलापूरकर ह्यांच्याशी या विषयाबाबत चर्चा झाल्यानंतर असे वाटले की, 'जे जे आपणासी ठावे ते ते दुसऱ्यांशी सांगावे, शहाणे करून सोडावे सकळ जन'. डॉ. मोहित सोलापूरकर यांनी हाताळलेल्या केसेसमधील मूळ 'गाभा' तसाच ठेऊन त्याला काल्पनिक गोष्टीचा साज चढवला आहे. केवळ पेशन्टबद्दलची गुप्तता बाळगावी आणि सामान्य वाचकांच्या मनाच्या गाभाऱ्यात थेट पोचता यावे म्हणून केलेला खटाटोप आहे हा. 'मानसी'च्या प्रत्येक अंकात एकेक केस उलगडत जाणार आहे. याद्वारे अशा प्रकारचे मानसिक आजार असू शकतात याची जाणीव वाचकांना व्हावी व स्वतःच्या आणि आजूबाजूच्या व्यक्तींच्या बाबतीत जागरूकता आणि संवेदनशीलता निर्माण व्हावी ही एकमेव तळमळ.

'रचना'च्या टीमने अशा सदरासाठी जागा राखली त्याबद्दल आभार. ज्या डॉ. सोलापूरकरांचे बोट धरून या विषयांच्या डोहात उतरता आले त्यांचे मनःपूर्वक आभार.

या मनोगताचा शेवट या काव्यपंक्तीने करते आहे.

'मानभांग, आधी-व्याधी, नाना व्याप जाण

कुणी किती सोसायचे नाही मोजमाप

सुखे एकरंगी, दुःखे अनंत-अपार

माननीय थांबवरी मनांची फुंकर'



## पोस्ट पार्टम डिप्रेशन

(केस नं. १३)

**"अग कीर्ती, लक्ष कुठे आहे तुझं?"** सलीलने तंद्रीत बसलेल्या कीर्तीच्या डोळ्यासमोर चुटक्या वाजवल्या. तिच्यासमोरील चहा, ब्रेकफास्ट तसाच थंडगार झाला होता. तिने नजर वळवून सलीलकडे बघितले आणि एकदम हमसून रडायलाच लागली. **"माझ्या करिअरचे कसे होईल सलील ?"** तिच्या अशा आकस्मिक वागणुकीमुळे सलील थोडा गोंधळून गेला. पण लगेच स्वतः ला सावरून तिला समजावणीच्या सुरात म्हणाला. **"होईल सगळे नीट, काही काळजी करू नकोस."**

**"पाच महिने म्हणजे मोठाच गॅप पडला नां? थोडी सवय मोडलीय सर्व गोष्टींची एवढेच; आणि आपल्या जुही बाळाला सांभाळण्यासाठी आई-बाबांचाही भक्कम आधार आहेच ना! माझा जरी सारा दिवस ऑपरेशनमध्ये बिझी असला; तरी जसं जमेल तशी मी मदत करेनच की, आणि रविवार तर आहेच ना हक्काचा."**

सलील जरी कीर्तीला समजावत असला तरी त्याला आपल्या शब्दातला फोलपणा जाणवत होता. कारण नेमकी मदत काय आणि कशी करणार ह्या कीर्तीची ते त्याचे त्यालाच उमगत नव्हते.

डॉ. कीर्ती प्रसिध्द बालरोग तज्ज्ञ. प्रसन्न तजेलदार व्यक्तिमत्त्व. पेशंट तपासण्याचा अदम्य उत्साह. ज्या उत्साहात दिवसाची सुरुवात तोच उत्साह घरी परतल्यावरही कायम असायचा. अचूक रोगनिदान आणि उपचाराची तत्परता यामुळे तिच्या भोवती प्रसिध्दीचे एक वलय निर्माण झाले होते. बालपेशंटशी वागतानाचे ममत्त्व आणि लाघवी बोलणं हे तिचं वैशिष्ट्य होतं. ओपीडीमध्ये दिवसाला ४०/५० पेशंट तपासणे हा तर तिच्या सवयीचाच भाग होता.

सलीलच्या डोळ्यासमोर कालचा दिवस तरळला.

लगबगीने कीर्ती ओपीडीला निघाली. नवव्या महिन्यापर्यंत ओपीडीतले आणि अड्मिट केलेले पेशंट कीर्तीने पाहिले. नंतरचे पाच महिने, बाळंतपण, बाळाची काळजी स्वतःची विश्रांती ह्यात गेले. गेल्या १०/१२ दिवसांपासून 'मॅडम आज येणार आहेत' असा निरोप रिसेप्शनवरून जात होता. बाळंतपणानंतरचा पहिला कामाचा दिवस. सलीलने तिला ओपीडीमधे सोडले होते.

कीर्ती खुर्चीत बसली. पाच महिन्याच्या गॅपनंतर डॉ. कीर्ती खुर्चीत बसली होती. पेशंट तपासायला सुरुवात करायची होती. अनामिक अस्वस्थतेने तिला घेरले. थोडा चहा मागवला आणि पेशंटना आत पाठवायला सांगितले.

तिला नेहमीप्रमाणे कामात विश्वास वाटेना. मनामधे चलबिचल चालू होती. ताप बरोबर मोजला ना? औषधे बरोबर तर लिहिली आहेत ना? काही विसरले तर नाही ना? अशा नानाविध शंकाकुशंका तिच्या मनात येऊ लागल्या. अशा मनोवस्थेत असतानाच एका चार वर्षाच्या बाळाची केस तिच्यासमोर आली. त्याला दम्याचा त्रास होता. तिने डॉक्टर या नात्याने त्याच्यावर तर उपचार केले; पण नंतर तिच्या मनात शंका यायला लागल्या माझ्या जुहीला दमा झाला तर? अचानकच तिला परत धडधडायला लागलं. तिने त्या दिवशीच्या सर्व अपॉइंटमेंटस कॅन्सल केल्या. त्यांना दुसऱ्या दिवशी यायला सांगितले.

ती घराकडे निघाली. अचानक तिला भरून आले. उरलेला पूर्ण दिवस तिने कसाबसा घालवला.

दुसऱ्या दिवशी सकाळी एका वेगळ्याच प्रश्नाने तिला ग्रासले. कालचे आणि आजचे असे पेशंट आपल्याच्याने हाताळणे शक्य होईल का? या विचाराने तिला घाबरल्यासारखे झाले. तिने रिसेप्शनवर फोन लावला आणि सगळ्या अपॉइंटमेंटस कॅन्सल करायला लावल्या. सलील हतबल होऊन पहात राहीला. रोजच काहीना काही कारणाने ‘आजचे मरण उद्यावर ढकलणे’ सुरू झाले.

खरे तर सलील, कीर्तीचे छानसे चौकोनी, उच्च मध्यमवर्गीय कुटुंब. त्यात जुहीसारख्या गोड बाळाची पडलेली भर. पण सगळे घरातले वातावरण बदलतच गेले. सकाळचा चहा, नाष्टा, जेवण न चुकता सोबत घेणारी कीर्ती, घडलेल्या घडणाऱ्या घटनांवर तावातावाने चर्चा करणारी कीर्ती, बोलकी प्रसन्न कीर्ती -अबोल होत चालली. नीटसे जेवेनाशी झाली. तिचे डोळे सतत पाणावलेले राहू लागले.

मानसोपचार तज्ज्ञ पण आणि जवळचा सहकारी मित्र पण असलेल्या डॉ. शिरीषकडे कीर्तीला न्यावे लागले त्याला कारणही तसेच घडले.

त्या दिवशी रात्री दिवसभराच्या कामाच्या व्यापाने गाढ झोप लागली होती. पहाटे ६ च्या सुमारास जुहीच्या रडण्याने जाग आली. मी पटकन उठलो; आणि बाजूला पाहिले तर जुही कीर्तीच्या कुशीत भुकेने टाहो फोडून रडत होती.

आणि कीर्ती कशाचीच जाणीव नसल्यागत भकास नजरेने भिंतीकडे पहात बसली होती. माझ्यातल्या डॉक्टरला परिस्थितीची जाणीव लगेच झाली. शंकेची पाल चुकचुकली. डॉक्टरने, शिरीषने काही तपासण्या केल्या डॉ. शिरीष आणि डॉ. सलील ह्यांच्या मनातली शंका खरी ठरली होती. कीर्तीला 'पोस्ट पार्टम डिप्रेशन'चा त्रास सुरू झाला होता. कीर्तीच्या परिवारात तिच्या मावशीला तिच्या बाळंतपणानंतर सुध्दा असाच त्रास झाला होता.

कीर्तीला डॉक्टरांनी प्रिस्क्रीप्शन दिले आणि दोन आठवड्यानंतर यायला सांगितले. नियमितपणे डॉ. शिरीषकडे भेटी, तपासण्या चालूच होत्या. औषधे चालू होती. किर्तीची अस्वस्थतता, बैचेनी, नैराश्य, भूक, झोप सर्व काही त्रास टप्प्याटप्प्याने ओसरले.

कीर्ती आणि सलीलच्या चहासोबतच्या गप्पा पूर्वीसारख्याच रंगायला लागल्या. त्यात आणखी जुहीच्या बोबड्या बोलाची भर पडली होती. कीर्तीचा ओपीडीचा हॉल सुध्दा पूर्वीसारखाच ओसंडून वाहू लागला व कीर्तीच्या वाढत्या कीर्तीची साक्ष देऊ लागला.

साठा उत्तराची कहाणी सफल संपूर्ण तर झाली पण ह्याचा मथितार्थ काय ?

मनोविकार हे कधीही, कुणालाही होऊ शकतात. डॉक्टर आहे, सुशिक्षित आहे म्हणून मनोविकार होणार नाही असे नाही.

आनुवंशिकता अशा मनोविकारांना कारणीभूत ठरू शकते.

आईने बाळाचे सर्व प्रेमभावनेने करावे. ममत्त्व द्यावे ही भावना झाली. पण कधी कधी ही भावना मेंदूपर्यंत पोचवणारी सिग्नल्स काम करीत नाहीत. ही मनोविकारातली एक अवस्था.

**रश्मी वडवळकर**
mandarpan16@yahoo.com



# पुन: एकदा 'वस्त्रहरण'

नाट्यप्रयोगाची काटेकोर नाट्यसमीक्षा न करता केवळ त्याचा आस्वाद घ्यावा, मनमुराद हसावं, नाट्यप्रयोग पुरता अनुभवावा; अशी नाटकं मराठी व्यावसायिक रंगभूमीवर क्वचितच येत असतात. 'वाऱ्यावरची वरात', 'कथा अकलेच्या कांद्याची', 'ऑल दी बेस्ट', 'यदा कदाचित'... ही नमुन्यादाखल काही उदाहरणं. 'वस्त्रहरण' हा नाट्यप्रयोगही या यादीत सन्मानानं सामील झालाय. निखळ मनोरंजन करणं, हा प्रमुख हेतू असणारं 'वस्त्रहरण' या नाट्यप्रयोगात 'न हसणारा प्रेक्षक दाखवा आणि दहा हजार जिंका', असं आव्हान करायलाही हरकत नाही. 'वस्त्रहरण' या नाटकाबाबत अनेक किस्सेही घडलेले आहेत. 'वस्त्रहरण व्हाया लंडन' या गंगाराम गवाणकर यांच्या मुलाखतीच्या कार्यक्रमात असे अनेक किस्से सांगून श्रोत्यांना ते, पोट दुखेपर्यंत, हसवतात.

काळाच्या कसोटीवर उतरणारीही काही नाटकं मराठी रंगभूमीवर अजूनही प्रयोगांकित होत असतात. 'एकच प्याला', 'सौभद्र', 'सुवर्णतुला' सारखी संगीत नाटकं काय किंवा 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'इथे ओशाळला मृत्यू' सारखी ऐतिहासिक नाटकं काय...किंवा 'लग्नाची बेडी', 'तो मी नव्हेच', 'नटसम्राट', 'ती, फुलराणी' सारखी सदा टवटवीत नाटकं काय...पिढ्यांमागून पिढ्या या नाटकांना रसिकाश्रय लाभला. काही नाटकं अभिनेत्यांना, अभिनेत्रींना आव्हानात्मक वाटतात... म्हणून ती नव्या पिढीतील कलावंत आवर्जून करू पाहतात. त्यात 'नटसम्राट', 'ती फुलराणी' सारखी नाटकं आहेत. पाश्चात्यांकडे जसा 'शेक्सपिअर' आव्हानात्मक तसे आपल्याकडे विजय तेंडुलकर, महेश एलकुंचवार, मोहन राकेश, गिरीश कर्नाड, वि. वा. शिरवाडकर सारख्या नाटककारांची नाटकं रंगकर्मींचा कस पाहणारी. कालौघात आपलं विचारधन चिरतरुण राखणारी.

'वस्त्रहरण' ही काळाच्या कसोटीवर तगून आहे. नुसतंच तगून नव्हे, तर नवनव्या कलावंतांना ते करून पहावंसं वाटतं, यातच त्याचं 'प्रयोगशीलत्त्व' स्पष्ट होतं.

कोकणी माणसाची प्रवृत्ती, त्याचं नाट्यवेड, त्याच्या परंपरा, सोयर-सुतकादी कल्पना, त्याचं दारिद्र्यातही राजासारखं जगणं, 'बोला'चाच मोठेपणा मिरवणं (बोलण्यात कंजुषी न ठेवणं), त्याचा साधाभोळेपणा आणि फणसासारखा रसाळपणा जोवर कायम आहे, तोवर 'वस्त्रहरण'ला 'जरा'ची भीती नाही, ते 'अजर'च राहील. फेब्रुवारी १९८० मध्ये 'ओम नाट्यगंधा' या संस्थेद्वारा 'वस्त्रहरण' व्यावसायिक रंगभूमीवर आलं. त्यानंतर मच्छिंद्र कांबळी यांच्या 'भद्रकाली प्रॉडक्शन'ने ते साता समुद्रापार नेलं. हजारोने त्याचे प्रयोग झाले. आता ५०००हून अधिक प्रयोगानंतरही 'भद्रकाली प्रॉडक्शन'तर्फे ते नवीन संचात पुन: एकदा- प्रसाद कांबळी यांनी - व्यावसायिक रंगभूमीवर आणलं आहे.

'वस्त्रहरण' काय आहे, हे 'महाभारत' जाणणाऱ्यांना पुन: सांगायची गरज नाही. 'वस्त्रहरण' नाटकात स्थानिक मंडळी हे नाटक करायला घेतात, तेव्हा त्यात काय काय आणि किती विघ्नं येतात,
त्यातून सरपंच कसं निभावून नेतो, याचा अत्यंत मनोरंजक आणि मालवणी वृत्तीचा प्रवास आहे. तात्या सरपंच हा या 'वस्त्रहरण'चा एकखांबी तंबू. मास्तर ही कनात आणि बाकी कलावंत - पात्रं यामुळे या तंबूला शोभा येते. यातील पात्रांना स्वत:चा 'ठसा' उभारण्यासाठी यात अगदी थोडीशीच 'जागा' आहे. पण कलावंत तयारीचे असले की अशा जागा ते आपल्या सजग, कल्पक अभिनयानं चपखलतेनं भरतात.

'वस्त्रहरण'चं दिग्दर्शन केलं होतं ते रमेश रणदिवे यांनी. आज ते आपल्यात नाहीत. तसे तात्या सरपंच अजरामर करणारे मच्छिंद्र कांबळी, गोप्या करणारा दिलीप कांबळी आणि आणखीही काही कलावंत पडद्याआड गेले. आत्ताच्या प्रयोगाचं- दिग्दर्शन नव्हे तर- तालमी घेतल्या त्या मंगेश कदम यांनी. लंडनला 'वस्त्रहरण' पहिल्यांदा गेलं, तेव्हा दिलीप कांबळीला हिथ्रो विमानतळावरून भारतात परत धाडलं गेलं होतं. तेव्हा गोप्याची भूमिका मंगेश कदम यांनी केली होती. त्यावेळेपासून 'वस्त्रहरण'च्या दिग्दर्शनाची घडी त्यांना माहीत असल्यानं या प्रयोगासाठी त्यांनी तालीम मास्तराची भूमिका बजावली. मात्र ते सृजनशील दिग्दर्शक असल्यानं त्यांनी त्यात काही, आपले असे पंचेस् दिले आहेत. उदा. भीमाच्या श्रेयनामावलीत ओळखीच्या वेळी त्याला गदा दोन मांड्यात पकडायला लावणं, शरीरसौष्ठव स्पर्धेत 'मसल पॉवर' दाखवणाऱ्या पोझेस भीमाला देणं... हे उदाहरणादाखल...

संगीत हे आधीच्याच प्रयोगाप्रमाणं आहे. कारण संगीत हा या नाटकाचा अविभाज्य भाग आहे. मैताला गेलेली 'संगीत मंडळी' नाट्यप्रयोगाच्या ठिकाणी आल्यावर 'आम्ही जातो अमुच्या गावा'च्या चालीत नांदी म्हणताना ऐकणं... हा त्या 'वस्त्रहरण'च्या घटिताचा भाग आहे. तालीम मास्तरांनी (मंगेश कदम यांनी) त्यात 'आयपीएल'ची सिग्नेचर ट्यून जोडून भीमाला गदेनं 'ड्राईव्ह' करायला लावलंय, तो पंचही मस्त, हास्याचा 'षट्कार' खेचतो. 'चला हवा येऊ द्या'नं रसिकांच्या ठायी स्वत:चं स्थान निर्माण करणारे तुषार देवल यांनी संगीतसाथ केली आहे. ती अप्रतिमच आहे. पात्रपरिचयाच्या वेळचं संगीत किंवा लावण्यांचं संगीत, तात्यांनी शड्डू ठोकण्या वेळचं त्यांचं 'टायमिंग' लाजबाब.
जी संगीताची गोष्ट तीच नेपथ्याची. इथं नेपथ्य 'आमचे आम्हीच' म्हणून सांगितलं जातं. पण 'नाटकातल्या नाटका'चं नेपथ्य ज्यानं केलं, त्यांचा उल्लेख होणं आवश्यक. त्याच्या कल्पकतेला दाद द्यायला हवी. पडद्याऐवजी रिबीनीच्या केलेल्या वापरानं नाटककाराचा, पडदा पडल्यावरही, पडद्यामागचं नाटक दाखवण्याचा, नाटकातल्या नाटकाचा, हेतू साध्य झाला. 'नेपथ्य माझ्या खिशात आहे' असं सांगत, त्यानं रिबीन काढून आपली कल्पना सांगितल्यावर रणदिवेंनाही दिग्दर्शन करणं सोयीचं झालं होतं, हे लक्षात घ्यायला हवं.

श्रेयनामावलीत वेशभूषाकाराचा उल्लेख नाहीए. तात्या सरपंचाचे बुशशर्ट, धोतर आणि बंडी तर मास्तरांचा बुशशर्ट, धोतर आणि कोट हे कोकणातील इरसाल व्यक्तिमत्त्वाचे प्रतिक. गोप्याची ढगळ, खाकी हाफ पॅण्ट आणि हाफ शर्ट हे त्याला कुणीतरी कणवेपोटी दिल्यासारखेच. त्यामुळं त्याचं पोरकेपण अधिक गडद होणारं.

द्रौपदीकाकूचं नऊवारी लुगडं आणि ते नेसण्याची पद्धत खास मालवणी. नाटकातल्या नाटकातील इतर पात्रं ही महाभारतातल्या पात्रांना शोभणारी वस्त्रं आणि दागिने, मुकुट यासह सज्ज. यात मंजुळाबाईची वेशभूषा हीच तेवढी या प्रयोगात 'वेगळी' ठरते. एखाद्या शहरी 'इव्हेन्ट'मध्ये 'आयटम साँग' करणाऱ्या कलावतीसारखी वेशभूषा असणारी नर्तकी, ते कपडे परिधान करून कोकणातल्या नाटकाला येऊन बसणं अशक्यप्राय वाटतं. पण मंजुळाबाई साकारणाऱ्या रेशम टिपणीस यांच्या एकूणच अदाकारीनं, वेशभूषेचं हे 'वेगळे'पण रसिक विसरून जातात.

कलाकारांनी आपापल्या भूमिका 'समजूतदार'पणे केल्या आहेत. 'समजूतदार' यासाठी म्हटलं, की रसिक प्रेक्षकांच्या प्रतिसादानं एखादा जरी कलावंत 'सुटला' तर प्रयोगाचा 'तोल' जाईल. सुदैवानं हा 'प्रायोगिक तोल' साऱ्याच कलावंतांनी बाळगलाय. (याला मंगेश कदम यांची 'तालीम मास्तरकी'ही कारणीभूत असावी.) तात्या सरपंचाची भूमिका करणारे दिगंबर नाईक यांच्या यापूर्वीच्या मालवणी भूमिका पाहिलेल्या आहेत. मालवणी भाषेचा लहेजा त्यांनी उत्तम पकडला आहे. मच्छिंद्र कांबळी यांनी अजरामर केलेला आणि आपल्या अभिनयशैलीचा अमीट ठसा उमटवणाऱ्या भूमिकेचं आव्हान स्वीकारणं, हे सोपं काम नव्हे. दिगंबर नाईक यांनी तात्या आपल्या शैलीत, संवादाच्या द्रुतलयीत, पंचेस देण्याच्या चतुराईत लक्षणीय केला. (गाऱ्हाणं घालताना त्यांचे द्रुतलयीतील स्पष्ट शब्दोच्चारण आणि लय, मच्छिंद्र कांबळींची प्रकर्षानं आठवण करून देणारी). सगळी जबाबदारी आपली समजून, वासरात लंगडी मायच्या हुशारीनं वावरणारे, आपलं शाळेतल्या बाईंवरचं प्रेम लपवून ठेवणारे, शारीरिक कवायतींना आपल्या वागण्यात, चालण्यात आणि शिट्टीला 'शिस्ती'साठी वापरून घेणारे मास्तर समीर चौगुले यांनी उत्तम प्रकारे दर्शवले.

भीमाचा आरडाओरडा, त्याचा संताप, चीड आणि अन्यायाविरोधातील त्याचा राग मनमीत पेम यांनी 'सर्वांगा'नं दर्शवला. आपल्या भूमिकेचा 'बाज' नेमका काय आहे, याची त्यांना नेमकी जाण होती. किशोर चौगुले यांनी दुर्योधन साकारताना संवादाची विशिष्ट लकब राखत, चालण्यातही 'आब' आणला.

विदूर- तात्या आणि संगीत साथीदार यांची देवाण-घेवाणही हास्यकारक. मयुरेश पेम यांचा दु:शासन पात्र परिचयात लक्षणीय ठरतो, तो त्यांच्यातील नृत्यलयीमुळे. देवेंद्र पेम यांचा धर्म द्युत प्रसंगात धमाल आणतो. सतत मद्याच्या अंमलाखाली असणारा आणि झुलत राहणारा अर्जुन अंशुमन विचारे यांनी मस्तच केला.

मुकेश यादव यांचा गोप्या तर अविस्मरणीय. त्यांनी आपल्याला मिळालेल्या संधींचा खास उपयोग केला.

त्याच्या अभिनयातील निरागसपणा, लवचिकपणा आणि सहजता, त्याला अल्प संवाद असूनही, रसिकांच्या लक्षात राहतो. प्रणव रावराणे (प्रॉम्प्टर), प्रभाकर मोरे (धृतराष्ट्र), सचिन सुरेश (देव-भीष्म), शशिकांत केरकर (शकुनी), विश्वजित पालव, मिथिल महाडेश्वर (राक्षस) यांच्याही भूमिका सुरेख झाल्या. किशोरी अंबिये यांनी केवळ आपल्या आवाजानंच तात्या सरपंचाना आपल्या मुठीत ठेवल्याची जाणीव एकाच प्रसंगातून दाखवून दिली. द्रौपदीकाकूंचा वचक आणि खमकीपणा त्यांनी दाखवलाच, पण लाजतानाचा त्यांचा हावभाव आणि आंगिक अभिनय लाजवाब. वस्त्रहरणासाठी उत्सुक असणारी मंजुळाबाई रेशम टिपणीस यांनी रंगवली. त्यांची नृत्यंही ठसकेबाज झाली.

या साऱ्याच कलावंतांचा सांघिक प्रयत्न, परस्परांमधील देवाण-घेवाण, लय राखणं आणि विनोदाच्या पातळीचं भान ठेवत अभिनय करणं यामुळे हे 'वस्त्रहरण' मनोरंजक होतं, रसिकांना मनमुराद हसवतं.
ज्या नाट्यरसिकांनी 'वस्त्रहरण' अजून पाहिलं नाही, त्यांनी ते आवर्जून पहावं.
ज्यांनी ते पाहिलंय ते पुन: एकदा 'वस्त्रहरण'चा मनमुराद आनंद घेण्यासाठी पुन: एकदा पाहतीलच, याची खात्री वाटते.

**अरूण घाडीगावकर**

**हडपसर, पुणे**

email : arunghadigaonkar636@gmail.com



# द अनटोल्ड स्टोरी ऑफ नथुराम गोडसे - आढावा

मी ' The Untold Story Of Nathuram Godse' या नाटकाचा आढावा लिहिला आहे. या नाटकाबद्दल तुमचे मत कळवा.

आम्ही शॉम्बर्ग, इलिनॉय येथे श्री. पोंक्षे यांनी सादर केलेले 'मी नथुराम गोडसे बोलतोय' हे नाटक पाहिले. याच नाटकाच्या आधीच्या सादरीकरणामुळे लोकांमध्ये प्रचंड उत्सुकता, संमिश्र प्रतिक्रिया, आणि वाद निर्माण झाले होते. त्यामुळे या नाटकाबद्दल एक प्रकारची रहस्यमयता तयार झाली.

महात्मा गांधींची ३० जानेवारी १९४८ रोजी हत्या झाली. भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अवघ्या सहा महिन्यातच ही घटना घडली. गांधींच्या मृत्यूनंतर संपूर्ण देशात गोंधळ माजला आणि हिंसाचार उफाळून आला, जो बराच काळ सुरूच राहिला. महात्मा गांधी हे भारताचे अत्यंत आदरणीय नेते होते. त्यांनी असहकार आणि अहिंसेच्या आधारे स्वातंत्र्य चळवळ लढून ब्रिटीशांना भारतातून बाहेर काढण्याची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. या पार्श्वभूमीवर, 'गांधींची हत्या का झाली?'असा प्रश्न अनेकांच्या मनात येतो.

हे नाटक, गांधीजींच्या हत्येची जबाबदारी घेणाऱ्या नथुराम गोडसे यांच्या दृष्टिकोनातून ही कहाणी मांडते. गोडसे यांना न्यायालयात दोषी ठरवून फाशीची शिक्षा सुनावली गेली होती. आश्चर्याची बाब म्हणजे गोडसे यांच्या म्हणण्यानुसार त्यांना गांधींविरुद्ध कोणतीही वैयक्तिक वैरभावना नव्हती, उलट त्यांनी गांधीजींनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी दिलेल्या महत्वाच्या योगदानाबद्दल सखोल आदर व्यक्त केला आहे. मग नथुरामने गांधींची हत्या करण्याचा निर्णय का घेतला असेल?

ही कहाणी १९४७ मध्ये झालेल्या भारताच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर उलगडत जाते. या फाळणीनंतर भारत आणि पाकिस्तान हे दोन स्वतंत्र देश तयार झाले. काही नेत्यांनी त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेपोटी घेतलेल्या या निर्णयामुळे मोठ्या प्रमाणात स्थलांतर, नरसंहार आणि पाशवी क्रौर्य घडले. सुमारे ७० लाख हिंदूंना त्यांच्या घरांमधून बेदखल केले गेले, आणि असंख्य लोक मारले गेले, महिलांवर तर भयानक अत्याचार झाले. नथुराम यासाठी गांधींना जबाबदार धरतात, कारण त्यांच्या मते, गांधींच्या फाळणीला पाठिंबा देण्याच्या हट्टामुळेच ही शोकांतिका घडली. हे दुःख कमी होते की काय या उपर भारताच्या संसदेला पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्यायला भाग पाडले गेले.

या घटनांमुळे अस्वस्थ झालेल्या नथुरामला स्वतःच्या हातात सूत्र घेऊन कारवाई करणे भाग पडले. ते एक निष्ठावान भारतीय होते, अखंड भारत झालेला पाहणे आणि सिंधू नदी परत मिळवणे या इच्छेशिवाय त्यांचा दुसरा कोणताही स्वार्थी हेतू नव्हता.

प्रमुख भूमिकेतील अभिनेत्याचा अभिनय उच्च दर्जाचा होता, आणि सहाय्यक कलाकारांनीही नाटकाचा संदेश प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्याचे चांगले काम केले. रंगमंचाचे नेपथ्य प्रभावी होते, ध्वनी आणि प्रकाशयोजना यांचा वापर महत्वाच्या घटना परिणामकारक होण्यासाठी उत्तमरीत्या केला गेला. त्यामुळे गोळीबार, घोषणा आणि फाशीची दृश्ये अतिशय नाट्यमय झाली.

पटकथेत काही जागा, क्षण असे होते की तिथेच नाटकाचा शेवट झाला असता तर ते अधिक प्रभावी ठरले असते. नाटक त्याच्या स्वाभाविक शेवटाच्या पुढे जाऊन थोडे लांबले आहे असे वाटले.

'The Untold Story of Nathuram Godse' हे नाटक १९९८ पासून सुरू आहे आणि याचे १२०० हून अधिक प्रयोग सादर झाले आहे. या नाटकाला संमिश्र प्रतिक्रिया, विरोध आणि वादांना तोंड द्यावे लागले आहे. हे नाटक लोकांना एक तर खूप आवडतं किंवा ते पूर्ण नापसंत करतात, मध्यम मार्ग नाही. उत्तर अमेरिकेत आणखी पाच शो झाल्यावर हे नाटक थांबणार आहे.

ही अनकही कहाणी प्रभावीपणे सादर केली गेली होती. त्यामुळे सर्वजण नक्कीच याविषयी विचार करते झाले आणि आपापसात चर्चाही करत होते. हे या नाटकाच्या यशाचे लक्षणच नाही का?

(या लेखात व्यक्त केलेली मते, विचारसरणी आणि दृष्टिकोन हे या समीक्षण लिहिलेल्या लेखकाचे नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.)

**राजीव गोखले**



# पाईनटॉप – एक सहल

पाईनटॉप व सरोवराचा परिसर हे नव्हावो काऊंटी शहर, अरिझोना, यूएसए येथे स्थित आहे. हा परिसर फिनिक्स, जेथे माझे वास्तव्य आहे, तेथून ३०० कि. मी. च्या अंतरावर आहे. सात हजार फुट उंचीवर असल्यामुळे हा थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखला जातो. शुक्रवारी दुपारी ३ वाजता तीन कुटुंबांचे सदस्य आपापल्या कारने पाईन टॉपच्या सहलीला निघालो. आमच्या गटात तीन ज्येष्ठ, सहा वयस्क व सहा मुले होती. कोविडची साथ अजूनही गेलेली नसल्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने मन साशंक होते पण सर्वांनीच लसीच्या दोन्ही मात्रा घेतल्या होत्या. परंतु तरीही अतिरिक्त काळजी म्हणून प्रवास दरम्यान कोणीही गाडीच्या बाहेर पडायचे नाही असे सर्वानुमते ठरले. संध्याकाळ होता होता आम्ही सर्व जण राहण्याच्या ठिकाणावर पोहचलो. तेथील घरात प्रवेश करून जेव्हा जेवणाच्या टेबलजवळ पोहचलो तर तेथे एक सूचना पत्रक दर्शनीय भागी ठेवलेले दिसले. त्यातील मजकूर अतिशय सुंदर असल्यामुळे मला आवडला. तो शेअर करत आहे.



**आमचे राहण्याचे ठिकाण**

'सुस्वागतम'

अभ्यागतांनी कृपया याची नोंद घ्यावी - 'आपण येथे येण्याच्या आधी आम्ही सर्व दिव्यांची बटण, सर्व दरवाजे व खिडक्यांच्या मुठी, व्हॅक्यूम क्लिनरची मूठ, सर्व नळांच्या तोट्या तसेच सर्व वस्तू ज्यांना तुमचा स्पर्श संभवतो ते निर्जंतुक केले आहेत. हे सर्व करताना आम्ही मुखपट्टी व हातमोज्यांचा वापर केला आहे.

येथे ठेवलेल्या स्वागत-टोपलीत ठेवलेल्या पदार्थांचा आनंद घ्यावा.

आपली सुट्टी आनंदात जावो.'

कोविड विषाणूच्या संकटाचा मुकाबला करण्यासाठी घेतलेल्या सुरक्षिततेचा व काळजी घेऊन दिलेल्या ह्या सुखद सूचनेचा आनंद घेत व मालकाच्या कल्पकतेला दाद देत सर्वांनी आपापल्या खोल्यांमधे बस्तान मांडले. करोनाच्या संकटात आमची सहल असल्यामुळे नाश्ता, भोजन इत्यादिची सोय येथील तात्पुरत्या घरातच करण्याचे सर्वानुमते ठरले होते. त्यासाठी लागणारा किराणा माल तसेच शाकाहारी व मांसाहारी भोजनास लागणा-या वस्तू देखील आम्ही बरोबर आणल्या होता. गप्पा गोष्टीतच रात्रीच्या भोजनाची तयारी करण्यात आली. ज्येष्ठ व मुले यांनी आपापल्या आवडीच्या बैठ्या खेळांचे डाव मांडले. भोजन झाल्यावर मात्र सर्वांनीच 'शुभ रात्री' केले.
दुसरे दिवशी सर्वांनी सरोवरा काठी फेरफटका मारण्याचा




सरोवराचा परिसर

कार्यक्रम ठरविला होता. त्यानुसार आम्ही सकाळचा नाश्ता वगैरे आटोपून सरोवराकाठी जाण्यास निघालो. हे स्थळ अतिशय प्रेक्षणीय होते. सोबतच्या छायाचित्रावरून याची कल्पना येईल. दीड-दोन तास मनसोक्त भटकंती करूनच आम्ही दुपारच्या भोजनासाठी परत आलो. त्या रात्री उशिरापर्यंत वयस्क विरुद्ध मुले असा 'डम्ब शॅरडचा' खेळ रंगला. विषय होता हिंदी चित्रपटांची नावे. तो संपल्यानंतरच सर्वजण झोपण्यासाठी गेले.
तिस-या दिवशीचा मुख्य कार्यक्रम होता घोडेस्वारीचा!
त्यामुळे मुलांबरोबर वयस्क देखील अतिशय उत्सुक होते. आदल्या दिवशीच आरक्षण केले असल्यामुळे आम्ही ठरलेल्या वेळेवर





घोडेस्वारीचा आनंद

पोहचलो. प्रत्येकास त्यांच्या उंचीनुसार घोडा देण्यात आला होता. त्यावर चढणे सुलभ व्हावे यासाठी खास मचाण देखील केलेले होते. आम्ही सर्व एका रेषेत चालणार होतो. सर्वात पुढे व मध्यावर असे दोन घोडेस्वार मार्गदर्शक आम्हाला देण्यात आले होते. एक तासाच्या फेरफटक्यात आम्ही कधी चढावावर तर कधी उतारावर, खळखळ वहाणा-या ओढ्यातून व जमलेल्या बर्फावरून आणि दाट झाडाझुडूंपांतून प्रवास केला. हा अनुभव सर्वांसाठी अविस्मरणीय व नाविन्यपूर्ण होता.

आमच्यापैकी एका कुटुंबाला मुलाच्या शाळेमुळे लवकर परत जाणे भाग होते. त्यामुळे संध्याकाळचा वेळ त्या मंडळींचा निरोप घेण्यातच गेला. रात्रीच्या भोजनानंतर झोपेला जाण्यापूर्वी मात्र सगळे गप्पा गोष्टीत रंगले व ज्येष्ठांनी पत्त्याचा डाव मांडला.

तिस-या दिवशी सकाळीच नाश्ता आटोपून आम्ही दहा वाजण्याच्या सुमारास पाईन टॉपचा परिसर सोडला व फिनिक्सला जाण्यासाठी मार्गस्थ झालो.

**मनोहर देवकर**



# एक प्रवास

पहिलं पाऊल टाकलं तिनं, वय वर्ष एक, तिचा हा प्रवास;

ती निघाली आता, पंख पसरीत विशाल,

स्वप्नांच्या देशी करत चाल, अनोख्या भूमीत करते कमाल।

दर पावलात नवा शोध, नवा अनुभव तिची वाट पाहतो,

धाडसाने ती चालते पुढे, नव्या मार्गावर नवी गोष्ट रचते।

पडद्यातून पाहते जग, तिचा अनुभव अपार,

मागच्या अंगणात पक्ष्यांचं गाणं, मंद वाऱ्याचं तिला सुंदर आमंत्रण।

हृदयात आनंद, श्वासात सजीवता,

तिला सापडतो खजिना चहूबाजूला सदा।

तिचं हसतं रूप, तिचा तेजस्वी हास्य,

नव्या सफरीला तिचं अपार साहस।

तिच्या डोळ्यांत एक विश्व विश्वासाचं,

कारण प्रत्येकामध्ये आहे एक कोलंबस जग जिंकण्याचं।

**राजीव गोखले**



# घडा वाहत असतांना……

घडा वाहत असतांना : पानझडीत निष्पर्ण झालेली उदास झाडे शोकसभांना

टाकून माळरानात भटकत असतात

घडा वाहत असतांना………..

घडा वाहत असतांना: ऋतूंचे श्वास गिळून प्रवासी निघून गेला असतो.

मागे राहिलेले त्याच्या पावलांचे केवळ ठसेच असतात.

घडा वाहत असतांना…………

घडा वाहत असतांना : कधीही नसतेच सागराइतके आभाळ एकाकी

सागर आणि आभाळ आपल्या सारखेच असतात.

घडा वाहत असतांना………..

घडा वाहत असतांना : शिवारात नांगर चालत असतो

अशावेळी असंख्य पक्षी झाडांच्या डहाळीवर विसावलेले असतात

घडा वाहत असतांना…………………

घडा वाहत असतांना : शिखरांचेही बळी कुणीतरी घेत असतो

ते कुणीतरी आपल्यापैकीच असतात

घडा वाहत असतांना…………

घडा वाहत असतांना : कुणीतरी पाठशिवणीचा खेळ मांडत असतो


नकळत तेव्हा सवंगडीच डाव सोडून जात असतात

घडा वाहत असतांना…………………

**डॉ. राजेंद्र लीला-धन मुंढे**
**वर्धा**



# दिवाळी गरिबीची



अंधारल्या आयुष्याची, अंधारात दिवाळी
कोण लावतो कुणाच्या, दारासमोर समई

श्रीमंतीच्या महालाला, दिव्याची रोषणाई
गरिबीत, मातीच्या पणतीला, तेलाची टंचाई

गरिबाच्या झोपडीत, आरास अंधाराची
कोण विचारतो गरिबाला, कां आहे उपाशी

फराळाच्या वासाने, मनी काहूर माजतं
झोपतो उपाशी, लेकरू आईच्या कुशीत

भुकेल्या लेकराचं पोट भरलं, पाण्याच्या घोटान
का रं देवा तू लिहिलं, गरिबीच अस फुटकं प्राक्तन

घासातला घास दे तू, गरीबाच्या भुकेल्या लेकरास
लक्ष्मीच्या पावलांनी येईल श्रीमंती, तुमच्या घरास


**दिपक वाकडे**



# आई

आई दोन अक्षराचा
शब्द होतो लहान!
त्यात सामावला आहे,
भारी अर्थ महान!

वाट चुकलेल्या लेकराला
आई घेते पदराखाली
जगाने धिक्कारले तरी
लेकरावर धरते मायेची सावली



आई नसणाऱ्याला
असते मायेची तहान
त्यासाठी ते जीव
फिरतात रानोरान

प्रत्येकालाच आई आपली
सर्वस्व वाटते
जी संस्कार करून घडविते
तीच खरी 'सुमाता' असते

आईमध्ये जग सर्व
व्यापलेले असते
ती मात्र जगामध्ये
कधीच मिळत नसते

**अनघा भट**



## बांध पापण्यांचे

रोखता मला न आले, अश्रू त्या क्षणाचे
भावबंधनाचे, ते भाव माझ्या मनातले
तुटले स्वप्न जेव्हा, तू नव्हतास सोबतीला
दुःख माझ्या रितेपणाचे, होते सांगायचे तुला
एकटीच मी जळणारी पणती, घराच्या कोपऱ्यात
काळोखाने व्यापलेली मी, होती एक पाऊलवाट
रोखता मला न आले, पाऊल माझेच चालतांना
क्षितिज माझे मीच झाले, नवा सूर्य प्रसवतांना
होते शेवटचे ते क्षण, तुझ्या माझ्या प्रीतीचे
अश्रू अडवू न शकले, बांध माझ्या पापण्यांचे

**दिपक वाकडे**
Nagpur, Maharashtra
Email:- dipakwakde329@gmail.com



## Music And Its Impact On Life

My journey of music started from a very tender age of 2 years old. My grandfather used to arrange music concerts, so I was very fortunate to witness the pure magic of Indian classical music having the very front view in every concert. I guess I was blessed with a 'almost' perfect pitch and Rhythm since my birth. Because apparently I had started singing the lines exactly like they were sung By  Pt Prabha Karekar's 'Priye paha'. Then started some music competitions and after a landslide victory in one of the music competition one of my school teacher approached my mom and my classical music training started.

Slowly with my family's love of deep music I was always in a music concert. Listening to maestro's like Pt Jasraj.  Pt Bhimsen Joshi, Pt Ravi Shankar, Pt Shiv Kumar Sharma, Pt Hari Prasad Chaurasiya and the list goes on. When I got my certification, I had a choice of performing or teaching, I Preferred teaching music. It was my childhood dream to be a teacher. Started teaching in Marathi shala in USA for their cultural  aspect and other community activities and gave a platform to my students to perform thereby enhancing their career and confidence and building morale by teaching Abhangs and Bhajans using the base of classical indian music. My students follow my passion to learn the values and principles of Indian classical music thereby  passing the torch to the next generation. I strongly believe its very important to instill good values and principles in the next generation by introducing them to the concept of Indian classical music. Since being in a foreign country we are surrounded by various other activities. I also believe Indian music has an unbelievable depth and is highly spiritual and meditative. Hence all the young as well as the older students of mine are very consistent in learning because they have understood my philosophy in teaching and learning indian music. I am very thankful to my parents to introduce me to this opportunity to present our oldest tradition and culture.

On that note music is purely therapeutic. In Indian classical music there are 2 branches: North Indian and South Indian. Both have a system called 'Raags' which means a set of notes sung in a typical way and with a framework of pattern. Thus it's based on certain Dynamics and Principles. Certain ragas are noted to cure certain ailments in our bodies.

As I mentioned earlier, it is meditative. Certain frequency hits your mind and body in a certain way. For instance ‘Raag Hansdhwani’ is said to activate the energy center Muladhara chakra, associated with the innocence and wisdom of the mind. Used as a therapy for heart disease and nervous irritability, neurosis, worry and distress. It's also said ‘Raag Darbari kanada’ can help one open crown chakra. Chakras are the energy points situated in every body on which our mind and body functions. If one has trouble expressing their feelings or has a tough time speaking up, Raag Durga helps to balance throat chakra. Continuous practice of these raags or raagas helps balance our mind which inherently helps in our focus and thereby increases our capacity of decision making.

Scientifically It is said that even just by listening one can start to feel calm and peaceful instantly as it helps connect new brain neurons. So I can only imagine by singing or practicing what impact it can have on us. These studies are just surfacing because awareness is recently spreading around the world. Even the western world has started adapting these concepts of chakra balancing and mindfulness. I am very proud to be a part of such a deep tradition granted it's a very slow process and its impact is lifelong. In short what yoga exercise is for the body, Indian classical music is exercise for the brain.

Anuradha Kulkarni




# पिंकीची भाऊबीज....

एकदा काय गंमत झाली
दिवाळीतली भाऊबीज आली
पंपूनं उठवलं पिंकीला
आणि म्हणाला पिंकीला...

आजतरी लवकर पांघरुण काढा
तेलाची बाटली शोधून काढा
खसाखसा तेल चोळ
अन् मस्तपैकी घाल आंघोळ

पिंकी खूप रागावली
चादर दूर फेकली
तरातरा गेली
तेलाची बाटली आणली



अख्खी बाटली उघडली अन्
पंपूच्या डोक्यावर मोकळी केली
तेल सगळं घरंगळलं
अंगभर पसरलं , खसाखसा चोळलं
अन् बापरे!
पंपूनं झालं अस्वल, एकदम काळं काळं
डोक्यावर वाढले केस, पाठी पोटावर केस
हातापायावर केस, सगळ्या तोंडावर केस

बाबा आले, आई आली
बाळ, मोत्या, मनी आली

आई म्हणाली पिंकीची
घाई सगळी जन्माची
केस वाढण्याचं तेल माझं
वाया सगळं घालवलं

पंपूचं अस्वल हसलं
पिंकीच्या जवळ आलं
पिंकीला केल्या गुदगुल्या
पिंकी लागली हसायला

पंपू म्हणाला पिंकीला
कारण नसतं हसायला
पिंकी आमची सारखी हसते
स्वप्नात सुद्धा खुदखुदते

**संजीवनी कुलकर्णी**



# मला वाचवा

लोकसंख्येचा भार कमी करून,
वसुंधरा म्हणते मला वाचवा

मानवनिर्मित प्रदूषण कमी करून
जल ध्वनी म्हणतात मला वाचवा

बहुविध धूर, वायूंचे नियंत्रण करून
हवा म्हणते मला वाचवा

निर्दयी कुऱ्हाड मारण्यापासून
झाड म्हणते मला वाचवा



पाठीवरचा पुस्तकांचा भार कमी करून
विद्यार्थी म्हणतो मला वाचवा

अत्याचार करणाऱ्या नराधमापासून
वृद्ध माता आणि मुलगी म्हणते मला वाचवा

विषवल्ली पसरल्या गेलेल्या भ्रष्टाचारापासून
सामान्य माणूस म्हणतो मला वाचवा

गर्भातच नाळ तोडणा-या मातेपासून
गर्भकन्या म्हणते मला वाचवा

**अनघा भट**



# दीन

मळकट राकट शरीर

दणकट राबते हात

राबण्यासाठी सरसावून पसरलेले

काम द्या, काम द्या.

पोटाला अन्न द्या

अंगावर कपडा असू द्या

डोळे ओढतात आत,

फुटतोय, ठणकतोय कण न् कण

असहाय्यता असहाय्यता

मन भडकून उठते, भाबडे मन

क्रोधित हात, मुठी आवळतात


काम द्या, काम द्या

पोटाला अन्न द्या

तळमळतं मन

तुटतात आतडी

असल्या व्यथा पाहण्याची



कुणालाच नाही गोडी

मस्त मजेत गाडी पळते

भुर्रकन उडवीत धुरळा दूर

उठतात पत्थर, भंगतात मने

अविचाराचं  व्याकुळतेचं घडतं द्वंद्व

घायाळ मने, रक्ताळलेली शरीरे

ठेचाळलेले हात

मुठी वळतात, खवळतात मने

तळमळ तगमग क्षणभर

एकच आचका, मुठी उघडतात

बंद मुठीत असते

फक्त रक्ताळलेली माती


फक्त रक्ताळलेली माती

**कै. सौ. मिनाक्षी भांबुरे पाटील**





दीपा मिट्टिमनी



# फक्त क्षितिजापर्यंत..

काहीही न बोलता,न विचारता

हातात हात घेऊन चालत रहा माझ्यासोबत

फक्त क्षितिजापर्यंत..

एकमेकांच्या विवंचना

उधळून देऊ क्षितिजावर, त्याचाच तर उद्या पाऊस पडेल

आणि हजारो मनांची रानं भिजतील


आपणही मग नव्याने भेटू

नव्याने बोलू,नव्यानेच हसू आणि एकमेकांसाठी

नव्यानेच असू

तुझ्यात मी दिसेन मला,

माझ्यात तू दिसशील तुला, मग "मी" आणि "तू" ची असंख्य फुले उधळून देऊ..



त्याचेच तर उद्या रंग होतील

आणि हजारो मनातील इंद्रधनुष्य रंगतील

आता आपण एकच असू आणि आपल्यातल्या प्रत्येक कवितेचा

साक्षीदार ,एखादा रंगहीन इवलासा पक्षी असेल

त्याच्या चोचीमध्ये देऊन टाकू

आपले सगळे शब्द..

त्याला ही होऊन जाऊ दे कायमचा रंगी

सृष्टीभर पेरेल तो  एकेक शब्द

मग सगळीकडे उगवतील

हिरव्यागार कविता

सुंदर नक्षीदार रांगोळीसारखं नातं असावं

पण स्पर्श होताच  फिस्कटण्याची जर भिती


नको असेल तर, कधी-कधी असही चालणं

आवश्यक आहे रे,

काहीही न सांगता,न विचारता

हातात हात घेऊन

फक्त क्षितिजापर्यंत...



**स्वप्नाली देशपांडे**

**नवी मुंबई बेलापूर**



# लावणी : भुरळ घाली मनी!

काही व्यक्ती, काही कला, एखादी अजोड कामगिरी अजरामर असते. ती आठवताच, समोर येताच मन प्रफुल्लित होते, शरीर रोमांचित होते. लावणी ही अशीच एक अदाकारी! मानवाला रोमांचित करणारी, प्रोत्साहित करणारी अशी! लावणी म्हटली, की अगदी वयस्कर माणसाच्या भावनाही उचंबळून येतात.

'कारभारी दमानं, होऊ द्या दमानं...', 'पिकल्या पानाचा देठ की हो हिरवा', 'या रावजी, बसा भावजी', 'बुगडी माझी सांडली', 'काल रातीला सपान पडलं', 'नका सोडून जाऊ रंग महाल', 'लटपट लटपट तुझे चालणे मोठे नखऱ्याचे,' 'आता हिरीला इंजन बसवा', 'राजसा जवळी तरी बसा' इत्यादी शेकडो लावण्या अशा आहेत त्या ऐकल्या नाहीत, आवडल्या नाहीत असा माणूस सापडणार नाही. लावणी कुठूनही कानावर पडो, तत्क्षणी मानवाची पावलं अडखळतात. कान त्या शब्दांकडे धावतात. कलाकार समोर नसला तरी तिची अदाकारी समोर येताच मनात एक प्रकारची हूरहूर लागते. पाय तिथून निघत नसले तरीही ते शब्द पुटपुटत माणूस पुढे निघतो.

लावणीकाराचे शब्द, शब्दांची अफलातून जुळवाजुळव करून लिहिलेली लावणी, त्या शब्दाला मिळालेला खटकेबाज आवाज, त्या शब्दाला जिवंत करणारी नृत्यांगनेची अदाकारी, ढोलकीची थाप, घुंगरांचे 'छन छन छनन' हे आवाज सारं काही विलोभनीय, चैतन्यदायी असते. गीतकाराचे शब्द खटकेबाज असतात. ते शब्द गेय प्रासयुक्त असून कान तृप्त करणारे असतात. सोबतच नृत्याचे लटके, झटके डोळ्याचे पारणे फेडतात. नयनांचा तिरपा कटाक्ष आणि दुसऱ्या क्षणी नाजुकतेने डोळा लवविणे ही कलाकारी थेट काळजाला घायाळ करते. ढोलकीवर पडणारी थाप थिरकायला बाध्य करते नि वेगळ्याच विश्वात नेते. हा सारा अनुभव आल्हाददायक असतो. वातावरण धुंद करणारा असतो. लावणीत धुंदी आहे, कैफ आहे, मस्ती आहे, लटका राग आहे, कौतुकासह आग्रह आहे, वर्णन आहे. लावणीत केवळ आणि केवळ शृंगार आहे हा समज तसा बरोबर नाही कारण अनेक लावण्या ह्या भक्ती, हास्य, करुणा, वात्सल्य यासोबतच बीभत्स रस घेऊन सादर होत असतात. 'कसं काय पाटील बरं हाय का, काल काय ऐकलं, ते खरं हाय का?' ह्या लावणीतील खट्याळपणा सादर करताना नर्तिकेच्या हालचाली आणि हावभाव प्रेक्षकांना जाम आवडतात. एवढेच नव्हे तर ही लावणी ऐकणारा एखादा पाटील चिडत नाही, संतापत नाही आणि मान तर मुळीच खाली घालत नाही; उलट आपण एखादी उत्कृष्ट कामगिरी पार पाडल्याप्रमाणे मिश्यांना पीळ भरत नर्तिकेच्या दिशेने नोटा उधळतो. ही जशी शब्दांची कमाल आहे तशीच कलाकाराची वेड लावणारी अदा आहे.

लावणी कैक वर्षांपासून रसिकांच्या मनावर अधिराज्य करीत असली तरीही लावणी नेमकी केव्हा जन्माला आली हा निश्चित संदर्भ कुठे आढळत नाही. शृंगारिकता, धार्मिकता आणि सामाजिकतेचे भान हेही लावणीच्या मांडणीत आढळून येतात. एक उल्लेख असा आढळतो की, वीरशैव संत शाहीर मन्मथ स्वामी यांनी पहिली लावणी रचली ती सोळाव्या शतकात! अर्थात ही लावणी भक्तीरसाने युक्त आहे. यामागील आख्यायिका

अशी, की महालक्ष्मी ही कराडला कशी आली ते सांगताना तिचे गुणगान करण्यासाठी रचलेली ही लावणी! लावणीतील भक्तीरस हा विषय समोर येताच त्या संदर्भात विचार करणे क्रमप्राप्त आहे.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांनी ज्ञानेश्वरीच्या सोळाव्या अध्यायात 'लावणी' शब्द वापरुन लिहिलेली ओवी अशी...

*तेया निरोपनाचेनि नावे। अध्यायपद सोळावे।*
*लावणी पाहता जाणावे। मागितला वरी।*

ह्या ठिकाणी मांडणी अथवा रचना या अर्थाने लावणी शब्द वापरलेला आहे.

*'लई दिसाची हौस राया*
*चला आता पुरी करु*
*चला जेजुरीला जाऊ'*

किंवा राम जोशी यांनी शिवकथा, कृष्णकथा, पंढरपूर क्षेत्र वर्णन, गिरी बालाजी, रामकथा अशा विषयांवर आध्यात्मिक, भक्तीयुक्त अशा लावण्या लिहिलेल्या आहेत. कार्यक्रम विनाविघ्न पार पडावेत म्हणून श्रीगणेशाला आवाहन केले जाते आळवले जाते त्याला गणाची लावणी असे म्हटले जाते.

*१) आधी गणाला रंगी साजला नाही तर रंग पुन्हा सुना सुना॥*
*२) रंगराज आज महाराज गणपती*
*३) महाराज गवरिनंदना अमरवंदना दैत्य कंदना हे मंगळमूर्ती*

अशा लावण्यांनी स्तवन केल्यानंतर मुख्य कार्याला सुरुवात करण्याची परंपरा आजही जपल्या जाते.

लावणी म्हणजे जनतेच्या करमणुकीसाठी गीत, संगीत आणि त्याला अनुरूप आणि प्रेक्षकांना आवडेल, भावेल, प्रेक्षक थिरकतील, नाचतील असे एकूणएक अविष्कार!

राजे- महाराजे आणि त्यांचे सरदार तसेच युद्धभूमीवरुन परतलेल्या सैनिकांच्या श्रमपरिहारासाठी जे करमणूक प्रधान कार्यक्रम आयोजित केले जात त्यात लावणी हाही एक धम्माल प्रकार असे. लावणी या शब्दाची उत्पत्ती कशी झाली किंवा लावणी शब्दाच्या अर्थाचा विचार केला तर शेतात बियाण्यांची, रोपांची लावणी करताना उत्स्फूर्तपणे गायिले जाणारे गीत म्हणून लावणी! लवण म्हणजे सुंदर आणि त्यावरून लावणी! लावणी सादर करताना नृत्यांगना स्वतःचे शरीर जागोजागी लववते किंवा 'कंबर हलवी शंभर जागी लवून' म्हणून लवणी या शब्दापासून लावणी हे नाव मिळाले असावे. लावणीत प्रामुख्याने महिला सौंदर्याचे वर्णन असल्यामुळे तिला सौंदर्य अर्थात लावण्य किंवा लावणी हे नाव मिळाले असण्याची शक्यता आहे. म.वा.धोंड लावणीची व्याख्या करताना म्हणतात,'सर्व सामान्यजनांच्या मनोरंजनासाठी रुचतील अशा लौकिक, पौराणिक वा आध्यात्मिक विषयावर रचलेली, ढोलकीच्या तालावर विशिष्ट ढंगाने म्हटलेली खटकेबाज व सफाईदार पद्मावर्तनी वा भृंगावर्तनी जातिरचना म्हणजे लावणी!' राम जोशींच्या दुष्काळ ग्रस्तांसाठीची लावणी असेल, बदलता काळ ह्या विषयावर अनंत फंदी यांची लावणी असेल हे सारे, लावणी समाजजीवनात किती खोलवर गेली आहे, तिचा आवाका किती मोठा आहे हे दर्शविते.

लावणीकार म्हटले की अनेक नावे ठळकपणे समोर येतात. राम जोशी, अनंत फंदी, होनाजी बाळा, सगनभाऊ, प्रभाकर, पट्ठे बापूराव, शाहीर हैबती यांच्यासह ग.दि.माडगूळकर, पी. सावळाराम, कवी संजीव, जगदीश खेबुडकर, शांता शेळके, म.पां. भावे, ज्ञानोबा उत्पात, ना.धों. महानोर, बाबा सौदागर, राम मोरे, चंद्रकांत जोशी, दादा कोंडके इत्यादी गीतकारांची नावे समोर येतात. या सर्वांच्या शब्दांना जिवंत करणाऱ्या गायक-गायिकांमध्ये सुलोचना चव्हाण हे एक प्रमुख नाव आहे. त्यांनी आगळ्यावेगळ्या ठसक्यात गायलेल्या लावण्या रसिकांच्या काळजावर अधिराज्य गाजवतात. ग.दि. माडगूळकर यांच्या

*फड सांभाळ तुऱ्याला गं आला*
*तुझ्या ऊसाला लागल कोल्हा*

या लावणीला ज्या ठसक्यात गायले आहे ते अफलातून आहे, अवर्णनीय आहे. तसेच जगदीश खेबुडकर या सदाबहार गीतकाराच्या लावणीलाही सुलोचना बाईंनी अत्यंत नजाकतीने पेश केले आहे त्यामुळे ते श्रवणीय होऊन बसले आहेत. 'मला हो म्हणतात लवंगी मिरची...' सुलोचनाबाईंच्या आवाजाने मराठी गीत विश्वात ठसका उडवून दिला होता.

*राजसा, जवळी जरा बसा*
*जीव हा पिसा तुम्हा वीणा।...*

कविवर्य ना.धों. महानोर यांच्या रचनेला स्वरबद्ध कोमल आणि दशकानुदशके श्रोत्यांच्या दिलावर हुकुमत गाजविणारा आवाज भारतरत्न लतादीदींनी दिलेला आहे.

*या रावजी बसा भाओजी*
*कशी मी राखू तुमची मर्जी?*

ही लावणी मराठी रसिक कधी तरी विसरू शकेल? जगदीश खेबुडकर यांच्या रचनेला आशाबाईंनी तितक्याच सशक्तपणे पेश केले आहे. या लावणीवर सुरेखा पुणेकरांची अभिनय क्षमता कुणी विसरतो म्हटलं तरी शक्य नाही. काही वर्षांपूर्वी अमृता खानविलकर या नटीच्या फडकत्या अभिनयाने साकारलेली लावणी रसिकांच्या हृदयात कायम वास्तव्याला आहे. गुरु ठाकूर यांच्या शब्दांवर आवाजाचा साज चढवला होता बेला शेंडे यांनी! नटरंग चित्रपटात गुरु ठाकूर यांनी लिहिलेल्या लावणीला बेला शेंडे आणि अजय-अतुल यांनी आवाज दिल्यानंतर सोनाली कुलकर्णीच्या मदमस्त अभिनयाने एक वेगळी उंची गाठली होती.

लता मंगेशकर, आशा भोसले, सुलोचना चव्हाण, वैशाली सामंत इत्यादी अनेक गायिकांच्या आवाजाने ही कला सर्वत्र पोहचविली. जयश्री गडकर, उषा चव्हाण, माया जाधव, सुरेखा पुणेकर, सोनाली कुलकर्णी, दिपाली सय्यद इत्यादी जुन्या-नव्या अशा कितीतरी नायिकांनी लावण्या पेश करुन रसिकांची मने जिंकली आहेत. ही कला जिवंत ठेवण्यात शेकडो गायक- गायिका, लावणीकार, नृत्यांगना यांनी अहोरात्र कष्ट घेतले आहेत आणि ही कला अत्यंत लोकप्रिय केली आहे. हे विसरून चालणार नाही.

पौराणिक कथांवरही अनेक लावण्या रचलेल्या आहेत. ज्यामध्ये प्रामुख्याने रामायण, महाभारत, शिवशंकर यांच्या कथांचा संदर्भ घेऊन रचनाकारांनी कथापर श्रवणीय लावण्यांची निर्मिती केली आहे. राम-रावण युद्धात

इंद्रजिताचा वध झाला. त्याचा एक हात त्याच्या महालासमोर येऊन पडला त्यावेळी त्याची पत्नी सुलोचना ही सती जायला सिद्ध होते त्या संदर्भातील एक रचना...

*दशमुख लंकेशाची स्नुषा सुलोचना एक सती*
*भुज पाहूनी करी अकांत पडिले इंद्रजित रणी पती।।*

राम जोशी यांच्या लावण्या कृष्ण कथेवर अधिक आहेत. गौळणीसह कृष्णलीला हा संदर्भ त्यांच्या लावणीत अधिक येतो. सगनभाऊ हा कलावंत जातीने मुसलमान परंतु मराठी भाषेची सखोल जाण असणारा असा! सगनभाऊ त्यांच्या रचनेत देवधर्माचे गुण गातो. विठ्ठलभक्तीत रमणारे हे लावणीकार जसे बाजीरावांवर लावण्या लिहितात तशाच 'अर्ज विनंती ऐका...', 'आम्ही मुशाफिर लोक, काशीचे राहणार' अशा धार्मिक लावण्याही लिहितात.

महाराष्ट्रातील संत परंपरा वंदनीय आहे. अशा महत्त्वाच्या स्थळांची महती सांगणाऱ्या 'स्थानमहिमापर' सुश्राव्य लावण्या ऐकायला मिळतात. त्यात पंढरपूर, तुळजापूर, गाणगापूर, माहूर अशा अनेक स्थानांचं महत्त्व वर्णन केलेले आहे. पुणे येथील शनिवार वाड्याचे महत्त्व अधोरेखित करणारी लावणी आहे; तर मायानगरी, मोहनगरी मुंबईचे स्थान विशेष विशद करणाऱ्या मुंबईच्या लावणीत पठ्ठे बापूराव लिहितात...

*मंबई नगरी बडीबाका, जशी रावणाची लंका*
*वाजतो डंका डंका चहु मुलकी*
*रहायला गुलाबाचा फुलकी*
*मुंबई नगरी सदा तरणी...*

लावणी म्हटलं, की ती कडे पाहायचा एक परंपरागत दृष्टिकोन आहे. लावणी म्हटलं, की ती ऐकताना थिएटरमध्ये टोप्या वर उडायलाच हव्यात, टाळ्यांचा कडकडाट व्हायलाच हवा, शिट्ट्यांच्या आवाजाने कान किट्ट झालेच पाहिजेत, डोक्यावरील पटके उंचच उंच फडकायलाच हवेत, लोकांनी ताल धरायलाच हवा असे घडत असताना कलाकरांनाही त्यामुळे वेगळाच जोश येतो, स्फूर्ती येते, वेगळेच चैतन्य पसरते आणि लावणीचा फड जोरात येतो. अशा वातावरणामुळे लावणी कार्यक्रम फक्त पुरुषांनीच पाहावयाचा असतो असाही एक संकेत आहे. खास करुन तमाशाचे फड जेव्हा गावोगावी जातात तिथे लावण्या गायल्या जातात तिथे हवसे, गवसे सारेच गर्दी करतात; परंतु तीच लावणी जेव्हा सिनेमामध्ये समाविष्ट असते तेव्हा ती स्त्री- पुरुष, आबालवृद्ध सारेच पाहतात. पुरुषांसाठी लावणी कार्यक्रम या परंपरेला छेद देत काही वर्षांपासून खास महिलांसाठी लावण्यांचे स्वतंत्र कार्यक्रम आयोजित केले आहेत ही बाब लावण्यांची वाढती लोकप्रियता दर्शवणारी आहे. लावणी ऐकताना महिलांचाही जोश पाहण्यासारखा असतो. ऐकणाऱ्या महिलाही न थांबता टाळ्या वाजवतात, तरूणी शिट्ट्या वाजवतात, उठून नाचायला लागतात ही गोष्ट बदलत्या रुचीचे, काळाचे द्योतक आहे. त्याचप्रमाणे आधुनिक लावण्याही तितक्याच लोकप्रिय होताना दिसत आहेत.

या लावणींचे वेगवेगळे प्रकार लक्षात येतात. छक्कड लावणी हा प्रकार तसा पूर्वापार आहे कारण पूर्वीच्या

तमाशांमध्ये ह्या लावण्या 'नाच्या' हे पात्र असे तो ही लावणी सादर करीत असे.

विशिष्ट प्रकारचे हावभाव करीत रंगमंचावर आगळ्यावेगळ्या चालीने चालताना सहा ओळींचे कडवे असणाऱ्या लावणीला 'छक्कड लावणी' म्हणण्याचा प्रघात पडला असावा. 'जुन्नरी लावणी' यातून उपदेशात्मक भाग सादर केला जातो. या प्रकारात अनंत फंदी यांची 'उपदेशपर फटका' ही लावणी सर्वश्रुत आहे. कथेला प्रमुख मानून ही लावणी सादर करताना कथेचा सारांश यात वर्णिला जातो. तमाशात वगाची लावणी हा प्रकार रसिकप्रिय आहे. दुःख, विरह, आठवणी, मनोभावना व्यक्त करणाऱ्या, चालीला महत्त्व देणाऱ्या ज्या लावण्या असतात त्यांना 'वालेघाटी' लावणी म्हणून ओळखल्या जाते.

*नार लावण्यरुपी हो मी*
*माझी प्रीत तुम्हाला वाहिली*
*तुमची साथ आठवली की*
*कधी जीवनाची होती या काहिली...* अशा भावना या रचनांमधून समोर येतात.

*'शालू हिरवा पाचु नि मरवा वेणी तिपेडी घाला*
साजणी बाई येणार साजण माझा....' कवयित्री शांता शेळके यांच्या या लावणीतून साजणाला भेटण्यासाठी उतावीळ झालेल्या सजणीची मनोगाथा, हुरहूर, तळमळ, अगतिकता व्यक्त होते.

ज्ञानोबा उत्पात ह्यांनी लावण्या रचताना सूर,लय आणि शब्द ह्यांना समोर ठेवलेले दिसून येते. ते स्वतः लावण्या सादर करीत तेव्हा श्रोते देहभान विसरुन जात. अशीच एक लावणी...

*उभी राहून माडीवरती वाट पाहिली काल*
*वाटलं होतं तुम्ही याल*
*राया वाटलं होतं तुम्ही यालं....*

पंढरपूर नगरीचे लावणीकार म्हणजे रविराज सोनार! रविराज यांच्या लावण्यांमध्ये प्रतीक्षा, मिलन, विरह, शृंगार, आव्हान या सोबत विविध प्रतिकांनी मुक्त संचार केलेला दिसून येतो.

उदाहरणार्थ...*कुशीत असूनही माझ्या राया*
*स्वप्नात आला तुम्ही*
*इष्काच्या दरबारी गोंधळ झाला*
*कसं सांगू तुम्हाला*

'बरखा सातारकर' या चित्रपटात साकार झालेली इलाही जमादार यांची लावणी एका विवोहोत्सुक ललनेची कासावीस रसिकांना मंत्रमुग्ध करते...

*करीन म्हणते लगीन औंदा गाठीत आले विशी*
*सांगा राहिल राया कशी कपाविना बशी*

याच धर्तीवर सासरी जायला तयार असलेल्या रमणीची अगतिकता या ओळीत वाचायला मिळते,

*नांदायला नांदायला नांदायला*
*मला बाई जायाचं नांदायला*

नवऱ्याने अंगी बाणलेल्या व्यसनाने त्रस्त असलेली एक गृहिणी जेव्हा तो इसम ते व्यसन सोडतो तेव्हा आनंदित झालेली ती रोमांचित होऊन म्हणते...

*माझ्या नवऱ्याने सोडली या दारू*
*बाई देव पावलाय गं...*

'पिंजरा' हा चित्रपट पाहिला नसेल असा त्या काळातील चित्रपट रसिक शोधून सापडणार नाही. आजही या चित्रपटाचं गारुड रसिकांच्या मनावर राज्य करते आहे. श्रीराम लागू असतील, संध्या असेल किंवा निळू फुले असतील या सर्वांच्या अभिनयाने हा चित्रपट एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवला होता. त्यासोबत त्यातली गाणीही तितकीच लोकप्रिय झाली होती. गीतकार जगदीश खेबुडकर, संगीत राम कदम, गायिका उषा मंगेशकर यांच्या अप्रतिम कलाकारीवर संध्या या नर्तिकेने जो नृत्याचा नि अभिनयाचा साज चढविला होता तो शब्दातीत आहे...

*तुम्हावर केली मी मर्जी बहाल*
*नका सोडून जाऊ रंगमहाल*

प्रियकराच्या जाण्याची चाहूल लागताच कासावीस होणारी, तळमळणारी, वियोगाने जीवाची काहिली होणारी प्रेयसी आर्त आवाजात विनवणी करते ते सारं विलोभनीय आहे, उत्कंठावर्धक आहे..

तमाशाने लावणी आणि लावणीने तमाशा लोकप्रिय केला, गावोगावी पोहचवला. गावोगावच्या जत्रा तमाशा आणि लावणीशिवाय होतच नसत. आजही होत नाहीत. भि.शि.शिंदे तमाशा नि लावणीबद्दल लिहितात,
'लावणी हा मुख्यतः गेय प्रकार आहे. लावणीची रचना बव्हंशी आठ मात्रांच्या पद्मावर्तनी व क्वचित सहा मात्रांच्या भृंगावर्तनी वृत्तात म्हणजे तालमय जातिवृत्तात असते. लावणीच्या गायनात कडे, ढोलके, टाळ, तुणतुणे, खंजिरी यांची साथ असते. कमरेला ढोलके बांधून हलगीच्या साथीने झांज, तुणतुणे, खंजिरी यांच्यासह लांब हाळी देऊन उंच खड्या आवाजात विशिष्ट प्रकारच्या ढबीत लावणी म्हणत...'

मंगला बनसोडे, काळू बाळू कवलापूरकर, चंद्रकांत ढवळपूरीकर लता महाडिक, गुलाबराव बोरे, कांताबाई सातारकर इत्यादी अनेक तमाशांमध्ये लावणीला प्राधान्य मिळत असे. नर्तिकेची घट्ट नेसलेली पैठणी, चमचमणारी नाकातील नथ, केसांच्या आंबाड्यावरील गजरा, गळा खुलविणारे तऱ्हेतऱ्हेचे दागिने, पायातील घुंगरपट्ट्यांचा खुळखुळ नाद, कमरेचा पट्टा, कोपरापर्यंत भरलेल्या बांगड्यांची छणछण, कपाळावर ठसठशीत कुंकू, लालचुटूक ओठ इत्यादी अलंकारांनी सजलेली, ठुमकत ठुमकत येणारी, विजेच्या चपळाईने गर्रकन गिरकी घेणारी नर्तकी समोर आली की दाटून येणाऱ्या भावना साद घालतात,

*ती पाहताच बाला, कलिजा खलास झाला*
*छातीत इष्क- भाला, की आरपार गेला...*

म.पा.भावे यांची 'बाई, औंदा लगीन करायचं' तर कवी संजीव यांची 'अत्तराचा फाया तुम्ही, मला आणा राया', गदिमांच्या 'बुगडी माझी सांडली' या लावणीने तर सोंगाड्या चित्रपटातील 'अहो राया मला पावसात नेऊ नका' अशा अनेक लावण्या रसिकश्रोत्यांची दाद मिळवतात.

काही लावण्या पुरुष प्रधानही आहेत बरे... जशी ही... समोर बसलेल्या रसिक श्रोत्यांमध्ये एक नवखा असेल किंवा लाजरा बुजरा असेल अशी आसामी नर्तिका हेरते आणि तरीही तिला त्याच्या बसण्यातला डौल, त्याचं हसणं, बघणं आवडते. त्याची हालचाल पाहून ती भान विसरून त्याला चिडविण्यासाठी, डिवचण्यासाठी ती मोठ्या जोशात गाते....

*'कुन्या गावाचं आलं पाखरू*
*बसलंय डौलात न् खुदुखुदू हसतंय गालात...*

लावणी मंत्रमुग्ध, बेभान करणारी आहे, नाचायला, डोलायला, हसायला, रडायला, बागडायला, उड्या मारायला लावणारी आहे.

लावणी वाचण्यात ती मजा नाही; तर लावणी गायली जाताना पाहण्यात खरी मजा आहे. त्या वातावरणाचा जो अनुभव असतो तो विस्मरणीय, मनासह शरीरात प्रचंड कालवाकालव करणारा असतो. लावणीचा आस्वाद घेताना नाचता आलं नाही, शिट्टी वाजवता आली नाही, पैसे उधळता आले नाही तरीही एक दाद मात्र नक्की देता येईल ती म्हणजे मुक्त हस्ते टाळी नाद आणि 'ऐका....' या सादेला 'होऊन जाऊ दे एक फक्कड' अशी दाद!



**नागेश सू. शेवाळकर**
वाकड, पुणे



# ..... आणिक स्मृती ठेवूनी जाती

'होणार सून मी त्या घरची' या टीव्ही मालिकेत सहा सासूबाईबरोबर सुखाने नांदणारी सून आपण पाहिली. आपण त्या अनुभवाने सुखावतो. प्रत्यक्षात असे घडलेले असू शकते... नव्हे घडले आहे थोड्याफार फरकाने. पालघर जिल्ह्यातील उमेळा या छोट्याशा गावातील एक भगिनी. सौ. अंजली अशोक मुळ्ये. एक सख्खी सासूबाई आणि दोन चुलत सासूबाई अशा तीन सासूबाई घरात असताना अत्यंत लीनतेने, चतुराईने, कार्यक्षमपणे त्यांचेबरोबर प्रेमाचे संबंध राखून जीवन यशस्वी केलेली एक स्त्री.

वयाच्या सतराव्या वर्षी पुणे येथील माहेर सोडून उमेळा या छोट्या गावात आलेल्या या सासुरवाशिणीने आल्या आल्या डोक्यावर हंडा घेऊन विहीरीवर जाऊन पाणी आणायला काही तक्रार केली नाही. एकांतातील मोकळेपणा मिळत नाही म्हणून कधी तक्रार केली नाही. उलट काहीतरी करावं म्हणून त्याच गावातील पोस्टात अर्धवेळ क्लार्क म्हणून काम करायला सुरुवात केली. त्याकाळी हे पोस्ट ऑफिस म्हणजे घरातूनच चालवायचे असे! नंतर ते ग्रामपंचायतीत स्थलांतरीत झाले. यथावकाश पुढील परीक्षा देऊन अंजलीताई पूर्ण वेळ क्लार्क म्हणून पोस्टात नोकरीला लागल्या. नोकरीत असताना आणि निवृत्त झाल्या नंतरही अनेक समाजिक कामात त्यांनी स्वतःला वाहून घेतले. उदाहरण द्यायचे झाले तर नामांकित यात्रा कंपनीबरोबर सहलीला जाणे अनेकांना शक्य होत नाही. त्यांचेसाठी ना नफा ना तोटा या तत्वावर बस बुकिंग करून, ओळखीच्या ठिकाणी निवासाची व्यवस्था करून कमीत कमी खर्चाने सहली आयोजित करून अनेकांना त्यांनी आनंद दिला आहे. ग्राहक पंचायतीचे वाटप केंद्र स्वतः अनेक वर्षे त्यांनी सांभाळले. महिलांसाठी वाचनालये यासारखे काही उपक्रम सुरू केले. जेष्ठ नागरिक संघाच्या माध्यमातून अनेक नामांकित वक्ते आणून त्यांच्या ज्ञानाचा लाभ नागरिकांना
करून दिला. मात्र हे सर्व करताना प्रापंचिक जबाबदारी देखील समर्थपणे पार पाडली. अंजलीताईंचे वैशिष्ट्य म्हणजे विश्रांतीची गरज त्यांना भासली नाही कारण 'कामात बदल म्हणजेच विश्रांती' हे त्यांचे सूत्र होते.

अर्थात अशी सून कुणाला नाही आवडणार? कदाचित तीन सासूबाईबरोबर सलोख्याचे संबंध असणे याचे हेच एक गमक असेल! नंतरच्या काळात प्रकृती साथ देत नसूनही घराच्या अंगणातील त्यांनीच फुलवलेल्या बागेत त्या रमत असत. वसई येथे पाणी क्षारयुक्त.

असे असूनही काही तंत्र वापरून त्यानी एरवी न जगणारी अनेक फुलझाडे लावून त्यांचे संगोपन केले. मात्र ती काय क्लृप्ती आहे हे त्यांनी उघड केले नाही. "माझ्या प्रेमामुळे ती जगतात" हे त्यांचे उत्तर असायचे. एक

आदर्श असे नातेसंबंध अंजलीताईनी तीनही सासूबाई बरोबर राखले जेणेकरून ‘अंजली शिवाय पान हलत नाही!’ अशी तिघींची अवस्था होती.

अशा अनेक भगिनी सर्वत्र आढळतात पण त्यांचे कौतुक होत नाही किवा त्यांच्या मुलाखतीदेखील कुणी घेत नाही. महिलादिनाच्या निमित्ताने या कर्तबगार भगिनीला प्रणाम म्हणून हा लेख मी लिहिला होता. अभिमान वाटावा अशी बाब म्हणजे अंजलीताई माझ्या मामी होत्या. माझे मामा श्री. अशोक मुळ्ये यांच्या त्या सुविद्य पत्नी. मामाच्या गावाला जाऊ या, हे बालगीत ऐकले की मामाच्या घरी जे काही लाड होतात ते डोळ्यासमोर येतात. उपरोक्त श्री. अशोक मामानी माझे खूप लाड केले हे तर वास्तव आहे. तथापि मामाच्या गावाचे ते सुख मी पुरेपूर अनुभवले त्याचे श्रेय अंजलीमामींना जाते. दुर्दैवाने आज त्या आपल्यात नाहीत.

त्यांच्या अखेरच्या आजारपणाच्या टप्प्यात त्या इस्पितळात असताना मी बाहेरगावी दौऱ्यावर होतो त्यामुळे त्यांचेशी बोलणे भेटणे झालेच नाही. मात्र मी मुंबईत आल्यावर लगबगीने त्यांना भेटायला वसई येथे इस्पितळात गेलो त्यावेळी त्या बेशुद्ध अवस्थेत होत्या. त्यामुळे मला त्यांनी ओळखण्याचा प्रश्नच नव्हता. मी त्यांच्या जवळ जाऊन उभा राहिलो. संपूर्ण आयुष्यभर काम, काम आणि काम करीत रहाणाऱ्या मामीला त्या स्थितीत पाहून डोळे डबडबले. जेमतेम मी अर्धा मिनिट तिथे उभा असेन आणि मामीने कायमचे डोळे मिटले. जणू काही भाच्याच्या भेटीसाठी ती थांबली होती.’ अशी पाखरे येती, आणिक स्मृती ठेवुनी जाती ‘ हेच खरं!.

**चंद्रशेखर ठाकूर**

chandrashekharrthakur@gmail.com



# कॅलेंडर

सुर्योदय झाला. सुरेख सोनेरी किरणांनी एका नवीन दिवसाची सुरुवात झाली. कालचा दिवस खरंच भूतकाळात जमा झाला. आजचा दिवस नवीन उमेद, नवीन उत्साह घेऊन आलाय, त्याचे स्वागत करु या.

तुम्हाला आठवत का? पूर्वी एक टेबलावर ठेवायचे (भिंतीवरही लावता येत असे) लाकडी कॅलेंडर असायचे. त्यात ठळक अक्षरात पुठ्ठ्याच्या कागदावर, तारखा लिहलेल्या असत. ते पान रोज सकाळी बदलावे लागायचे. जणू सुचवायचे, की 'कर आता आजच्या दिवसाची आखणी.' तेव्हाचे जीवनही रोजच्या दिवसाची जाणीव करून देणारे शांत आणि म्हटले तर थोडे संथच होते. येणाऱ्या रोजच्या दिवसाला दिशा देण्यासाठी विचार करायला वेळ होता.

त्या कॅलेंडर च्या खालच्या भागात लहान अक्षरात महिना व वर्ष दर्शवणारे पुठ्ठयाचे कागद असत. ह्यातून येणारा प्रत्येक दिवस किती महत्वाचा आहे हे ठळकपणे सूचित होत असे.

असे तीस दिवस जर आयुष्य मिळून महिना बदलायची संधी मिळाली तर आपण मनातल्या मनात नक्कीच गेले तीस दिवस काय केले ह्याचा हलकासा विचार नक्की केला असेल.

त्यानंतर एक कप्पा वर्ष बदलण्यासाठी पण असायचा. अजून एक वर्ष संपले सागणारा.

नंतर कितीतरी प्रकारची एक पानी,सहा पानी अशी विविध प्रकारची कॅलेंडर आलीत. त्यावर सुरेख चित्रे,छान छान सुभाषिते व माहिती लिहलेली असे.

नंतर आले बारा पानांचे 'कालनिर्णय' आणि जीवनाचा एक अविभाज्य भागच झाले. नावही किती समर्पक दिले आहे उलटणाऱ्या काळाचे भान ठेऊन 'योग्य निर्णय घ्या' सांगणारे.
प्रत्येक तारखेखाली महत्त्वाची तिथी, जयंती महत्वाचे सण अधोरेखीत केलेले हे भिंतीवरील कालनिर्णय आजही आपण वापरतोच की.

घरोघरी पंचांगाप्रमाणे तिथी बघायचे तर आता कालौघात जमा झाल्यागत झाले आहे. अजूनही आपण तिथीने कामे करतो; पण ते बघायला नवीन पध्दतीचे कॅलेंडर उपलब्ध झाले आहे.

आता मात्र हळूहळू आजच्या काळात हे बारा पानांचे महिना उलटणारे कॅलेंडर सुध्दा बाद झालेय,एवढी जीवनाची गती वाढली आहे. काही नियम, स्वतःच्या उन्नतीसाठी बंधन वगैरे ठरवेस्तोवर आठवडेच्या आठवडे निघून जातात. ती सूर्याची मऊ मऊ सोनेरी किरणे अंगावर घ्यायच्या आधीच माणसाची माध्यान्ह झाली असते. त्या वेगाच्या भोवऱ्यात आपण नेमके कुठे आहोत? काय मिळवलय? काय गमावलय? हे कळेकळेस्तोवर जीवनातला बराचसा काळ मात्र गमावून बसतो.

वेळेलाच हातावर बांधून घेतलंय आपण. भिंतीवरच्या शांतपणे काळवेळ सांगणाऱ्या कॅलेंडरकडे बघायला वेळ कुठे आहे?

आपल्या हाताने त्यावरची तारीख बदलायला वेळच नाही कोणाजवळ. तारीख स्वतःहूनच बदलते आहे. एक एक दिवस उलटून भूतकाळात जमा होतोय. सुखी जीवन करायच्या गडबडीत सुखी जीवन जगायचंच राहून जातंय का? 'सुखी माणसाचा सदरा' अंगावर चढवायचाच राहतोय बहुतेक.

बदलत्या काळात, तारीख लक्षात नाही ठेवली तरी, रोज उगवत्या केशरी सुंदर सूर्याला बघा. त्याची ऊर्जा घ्या. अजून एक सुंदर पहाट आपल्या जीवनात आली आहे ते सुख, तो आनंद भरभरून अनुभवा. त्या सोनेरी किरणांची ऊब मनात साठवून पुढची वाटचाल करा.

आपण कॅलेंडरने नोंद नाही ठेवली, तरी काळ पुढे सरकतच राहणार!



**अलका धाराशिवकर**

शिकागो



# दिवाळी सोहळा २०२४ : तेजोमय नादब्रह्म हे!

लखलखत्या तेजाचा संदेश घेऊन आलेली दिवाळी सर्वांनी कुटुंब आणि मित्र मंडळींसह याही वर्षी जोरात साजरी केली असेलच. खरंतर कॅलेंडरवरची दिवाळी असते फक्त पाच दिवसांची. पण मराठी घरांमधली आणि मनांमधली दिवाळी मात्र नंतरही कित्येक दिवस सुरू असते. कधीपर्यंत.... तर दिवाळीसाठी केलेला डब्यातला शेवटचा बेसनलाडू संपेपर्यंत ... खास दिवाळीसाठी आणलेली सुगंधी तेलाची बाटली आणि उटणे संपेपर्यंत.... घरावरची दीपमाळ उतरेपर्यंत... आणि याच चालीवर म्हणायचे झाले, तर महाराष्ट्र मंडळ शिकागोचा दिवाळी कार्यक्रम संपन्न होईपर्यंत!

अनेक वर्षापासूनची MMC ची समृद्ध परंपरा म्हणजे मंडळाचा दिवाळी कार्यक्रम. मायदेशातल्या दिवाळीची आठवण करून देणारा हा कार्यक्रम दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दिवाळी हा आनंदाचा, तेजाचा सण. भोवतीचा अंधार नाहीसा करून आसमंत उजळून टाकणे हा स्वभाव जसा दिव्यांचा तसाच स्वरांचाही. म्हणूनच यावर्षीची दिवाळी तेजोमय करण्याबरोबरच स्वरमय करण्याचे कार्यकारिणीने ठरवले आणि त्यासाठी आयोजन केले 'स्वरविहार' या संगीतमय कार्यक्रमाचे. पं. राजेंद्रजी कंदलगावकर यांचा हा कार्यक्रम यावर्षीचे प्रमुख आकर्षण होते.

सुरुवातीला २०२४ चे अध्यक्ष समीर बोंगाळे यांच्या प्रस्तावनेनंतर कार्यक्रमाला सुरूवात झाली ती शिकागोच्या प्रतिभावंत अशा स्थानिक कलाकारांच्या सादरीकरणाने.

मीनाक्षी हेडाऊ यांच्या गणेशवंदना, भजन आणि भक्तिगीताने वातावरण मंगलमय झाले; तर अनुराधा कुलकर्णी यांनी गायलेल्या 'रूपेरी वाळूत..' ने रसिकांना थिरकायला लावले. पूर्वार्धातील या सादरीकरणात विशेष दाद घेऊन गेली ती शिकागो मराठी शाळेतील बच्चे कंपनी अर्थात सान्वी आणि ओवीया बनकर. या दोघींनी गणेशवंदनेवरील नृत्य सादर केले. राधिका वैद्य यांचे 'मन मंदिरा' आणि रेशमा लोकगरीवार यांचे 'मी हाय कोली' ही दोन वेगळ्या धाटणीची नृत्ये प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली. त्यानंतर कुशल अभिनेत्री आणि नृत्यांगना म्हणून सुपरिचित असलेल्ल्या मधुरा साने आणि त्यांची छोटी शिष्या समायरा बोंगाळे या गुरूशिष्यांच्या जोडीच्या शास्त्रीय नृत्याने सर्वांची मने जिंकली. कार्यक्रमाचा पूर्वार्ध संपला तो अशा विविधरंगी सादरीकरणाने.


मध्यांतरात एकमेकांना शुभेच्छा देत सुग्रास भोजनाच्या साथीने गप्पा रंगल्या. सजावट टीमने केलेल्या सुंदर सजावटीसमोर फोटो घेत अनेकांनी ही दिवाळी संस्मरणीय केली.

सोहळ्याचे प्रमुख आकर्षण पंडित राजेन्द्रजी कंदलगावकर यांच्या स्वरांनी कार्यक्रमाचा उत्तरार्ध रंगला. भारतरत्न स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी यांचे शिष्य असलेल्या राजेंद्रजींच्या गायकीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. आपल्या महाराष्ट्रामध्ये संगीताच्या नानाविध परंपरा आहेत. त्यातली भरजरी शालूप्रमाणे किंवा लखलखत्या दागिन्यांप्रमाणे श्रीमंत असलेली परंपरा म्हणजे संगीत नाटक. 'कट्यार काळजात घुसली', 'मंदारमाला' या गाजलेल्या संगीत नाटकांतील लोकप्रिय पदे राजेंद्रजींनी सादर केली. त्याचप्रमाणे 'माझे माहेर पंढरी', 'इंद्रायणी काठी', 'तीर्थ विठ्ठल क्षेत्र' विठ्ठल' इत्यादी अनेक भक्तिगीते गात जवळजवळ दोन तास श्रोत्यांना स्वरानंदात चिंब भिजवून टाकले. त्यांच्या साथीला असलेल्या स्वानंद कुलकर्णी (हार्मोनियम) आणि सचिन पावगी (तबला) यांनीही कार्यक्रमाची रंगत वाढवली.

सरतेशेवटी दिवाळीच्या जल्लोषात मावळत्या कार्यकारिणीला सन्मानित करूणे आणि नवीन अध्यक्ष आणि कार्यकारिणीचे स्वागत करणे या औपचारिकतेनंतर सोहळ्याची सांगता झाली.

दिवाळी आली की घराचा कोपरा न् कोपरा आपण लख्ख करतो. तसाच मनाचा प्रत्येक कोपरा लख्ख करायचा असेल तर स्वरांसारखे दुसरे साधन नाही. त्या स्वरांना जर भक्तीची जोड दिली तर माऊली म्हणतात त्याप्रमाणे 'हरिपाठ किर्ती मुखे जरी गाय। पवित्रचि होय देह त्याचा।'

अशा उजळलेल्या तनामनात आशा,आनंद आणि सदिच्छांचे असंख्य दिवे घेऊन नवीन वर्षाला सामोरे जाण्यासाठी प्रत्येकाने एकमेकांचा निरोप घेतला!



**शिल्पा देशपांडे**



# दिवाळी कार्यक्रम २०२४- आढावा

सण हा मांगल्याचा, प्रेमळ आप्तजनांचा.

दिवाळी म्हणजे दीपावली. दिव्यांच्या ओळी.

दीपावली हा भारतवासीयांचा प्राणशक्ती संचारीत तेजाचा उत्सव आहे. श्री लक्ष्मीचे मुख्य रूप तेज आहे. अग्नी, सूर्य, चंद्र या तीन तेजाच्या सहाय्याने आपल्या सर्व कार्याचा निर्वाह होत असतो. देहाच्या पंच भौतिक पणतीत आत्मज्योती तेवते. परमेश्वराच्या अमृत भक्तीने अंतरंगातील जीव व ब्रम्हाचे ऐक्य होते. त्यावेळी खरा ज्ञानदीप उजळतो, प्रकाशतो तेंव्हा ब्रम्हानंदाच्या मंदिरातील महासुखाची दिवाळीच असते. असे ज्ञानेश्वर माऊलींनी म्हंटले आहे.

दिवाळी आपल्यातील नवचैतन्य जागवणारा एक महत्त्वाचा सण आहे. दिवाळी सण सर्वांच्या आयुष्यातील अंधार दूर करून प्रकाश निर्माण करणारा आहे. हा सण अंधारावर प्रकाशाचा विजय याचे प्रतीक मानला जातो.

दिवाळी हा सण आपल्याला प्रेम व एकतेचा संदेश देतो.

महाराष्ट्र मंडळ शिकागो तर्फे दिवाळी उत्सवाचे आयोजन केले होते. महाराष्ट्र मंडळाचे volunteers कार्यक्रम स्थळी उपस्थित राहून आपापली काम करण्यात मग्न होते. आम्ही उभयतां थोड लवकरच कार्यक्रम स्थळी पोहोचलो होतो. बाकी सर्व मंडळी हळू हळू येत होती. सगळी कडे उत्साहाचे वातावरण दिसत होते.

महाराष्ट्र मंडळ शिकागो सजावट टीम च्या वतीने हॉल मध्ये शिरताच कमळावर आरूढ लक्ष्मी ची मूर्ती विराजित केली होती. पद्मधारीणी, कमला असेच त्या मूर्तीचे रूप भासत होते. सभोवताली फुलांच्या रांगोळ्या, दिव्यांची आरास केली होती. सगळे नमस्कार करून पुढे जात होते. पुढे जाताच सजावट टीमने अतिशय सुंदर देखावा तयार केला होता.आपल्या शिकागो नगरीचे यथार्थ चित्रण तिथे दिसत होते.

आकाश कंदील, फुलांच्या रांगोळ्या, मंगल तोरण, दिवे अतिशय उत्तम प्रकारे त्यांची आरास तयार करण्यात आली होती.

नंतर बरोबर १०.३० मिनिटांनी स्थानिक कलाकारांच्या कलागुणांनी नटलेला सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार होता.सगळी मंडळी हॉल मध्ये एकत्रित झाली होती.

महाराष्ट्र मंडळ शिकागो चे अध्यक्ष श्री. समीर बोंगाळे ह्यांनी सगळ्यांचे स्वागत करून कार्यक्रमाचे स्वरूप समजावून सांगितले.

सौ. शिल्पा देशपांडे ह्यांच्या कडे कार्यक्रमाच्या सूत्र संचालनाची जबाबदारी होती.

कार्यक्रमाची सुरुवात गणेश स्तवनाने झाली. सौ. अनुराधा कुलकर्णी ह्यांनी गणेश वंदना सादर केली.

नंतर मराठी शाळा शिकागो च्या वतीने गणपतीचे स्तुती पर नृत्य सादर केले. छोट्या मुलींनी छान सादरीकरण केले.






त्या नंतर नृत्य नाट्य अकादमी तर्फे कथ्थक नृत्य सादर केले. गुरू आणि त्यांची शिष्या दोघींचे समन्वय पूर्वक नृत्य मनाला भावून गेले.

नंतर मी स्वतः मिनाक्षी हेडाऊ हिने 'ज्योती कलश छलके' गीत सादर केले.

नंतर राधिका वैद्य हिने 'मन मंदिरा' ह्या गाण्यावर अप्रतिम, सुंदर नृत्य सादर केले.



संत एकनाथ महाराजांचा अभंग 'देह शुद्ध करुनी' मी स्वतः गायले.

असे नृत्य आणि गाणी एका नंतर एक सरस सादर झाली. आणि प्रेक्षकांची वाह वाह मिळवत टाळ्यांच्या गजरात पहिल्या भागाचा कार्यक्रम संपन्न झाला.

हा सुंदर कार्यक्रम झाल्यानंतर सर्व मंडळींनी भोजनाचा आस्वाद घेतला.

नंतर कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते, ते म्हणजे पंडित राजेंद्र कंदलगावकर ह्यांचे स्वरांची तेजोमय मैफिल 'स्वर विहार'.

सौ. शिल्पा देशपांडे ह्यांच्या कडे निवेदनाची जबाबदारी होती. त्यांनी आजच्या मुख्य कलाकारांचा परिचय करून दिला.

भारत रत्न पंडित भीमसेन जोशी ह्यांचे ते शिष्य आहेत. अनेक ठिकाणी त्यांचे कार्यक्रम झाले आहेत. रागांमधील स्वरांची नजाकत त्यातील भावछटांसह पेश करण्याचे त्यांचे कसब वाखाणण्यासारखे आहे.

पंडित राजेंद्र कांदळगावकर यांनी कार्यक्रमाची सुरुवात एक बंदिश गाऊन केली. आदरणीय किशोरीताई आमोणकर ह्यांची ती बंदिश होती. त्यानंतर राग ललत पंचम वर आधारित कट्यार काळजात घुसली नाटकातील ‘तेजो निधी लोहगोल’ हे पद सादर केले.

नंतर ‘इंद्रायणी काठी देवाची आळंदी’ हा अभंग सादर केला.  ज्ञानेश्वरांपासून आलेली आर्त हाकेचा, अभंग ऐकल्या नंतर भास झाला. राग भीम पलास वर आधारित अभंग सुद्धा गायला.
भगवंताची परिपूर्ण शक्ती कोणाकडून जाणून घ्यायची असेल तर आई लक्ष्मीला आपण शरण जायला हवं. सकल गुणांनी परिपूर्ण अशी माता लक्ष्मी तिचे गुणगान व्हायलाच हवं. ‘भाग्यदा लक्ष्मी बारंम्मा’ हे कन्नड भाषेतील गीत त्यांनी प्रस्तुत केले. त्या नंतर देवीचे अजून एक गाणे म्हंटले ‘माता भवानी काली’.
शास्त्रीय संगीतातील अग्रणी विदुषी आशा खाडिलकर ह्यांचे ‘सोहम हर डमरू बाजे’ हे नाट्य गीत प्रस्तुत करून राजेंद्रजी ह्यांनी प्रेक्षकांची वाह व्वा मिळवली.
पंडित भीमसेन जोशी ह्यांचे शिष्य असल्याने त्यांनी पुढचे गीत ‘बाजे रे मुरलिया बाजे’ सादर केले.
भावगीत, भक्तीगीत, नाट्यगीत, अभंग, बंदिश, ठुमरी असे विविध गाण्यांचे पैलू त्यांनी उलगडून दाखवले. एका नंतर एक अप्रतिम अशी स्वरांची मैफिल प्रस्तुत करून आम्हाला मंत्रमुग्ध करून टाकले.
खरोखरच पंडित राजेंद्रजींनी त्यांच्या स्वर विहारात चिंब भिजवून टाकले.
एकाहून एक सरस अशी स्वरांची मैफिल सादर करून राजेंद्रजींनी मन तृप्त करून टाकले. सुगम संगीता बरोबरच शास्त्रीय संगीताचा कलाविष्कार आम्हाला अनुभवायला मिळाला.
कार्यक्रमाची सांगता "कैवल्याच्या चांदण्याला भुकेला चकोर" राग भैरवी ह्या भजनाने झाली.
अप्रतिम निवेदन, अप्रतिम तबला वादन, अप्रतिम हार्मोनियम वादनाने कार्यक्रमाची रंगत द्विगुणित झाली.
त्या स्वरांची शिदोरी घेऊनच आम्ही सगळे प्रेक्षक आपापल्या घरच्या दिशेने मार्गस्थ झालो.

**मीनाक्षी हेडाऊ**



# दिवाळीनिमित्त हॅंड पेंटेड गिफ्ट बॅग



अर्चना मुंगे



## Diwali 2024 in Maharashtra Mandal Chicago

Teamwork rocks and again demonstrated well by ‘Sajavat team’ of MMC 2024.

‘Lakshmi in the Lotus’ was the idea and the work started towards it by looking at various different videos, taking measurements etc.
Thanks to Shalaka for coordinating and special thanks to Jayashree Yadav who provided us with this beautiful blissful Murti.

Diwali in Chicago made it perfect by our next decor idea represented. Thanks, Kabori for getting those monuments. Well done on ‘lights around the Chicago downtown’ theme!

Thanks, Ruchira for making such beautiful station - which has been the uniformed signature of 2024 to display station.




Thank you very much Sameer Bongale for timely help to get the truck for loading the backdrop.




Thanks, Rahul Thatte, for being with us to be ready to load the stuff in his car and to ensure logistics work well.

Faral, Kandil, dive, Samai, rangoli and flowers - all together make the “Diwali माहोल” and the ultimate grace of Diwali which is brought by all the family friends who gathered in their colorful, wonderful attire.

Thanks all for supporting, spending time and efforts in creating such wonderful outcome.

I would like to thank all “volunteers” who helped through this journey. This is how it started, so I used the word as volunteers.

We really were unknown or known just by faces to each other, however, it was a seed of friendship, and I wish it grows year after year 🌳

Sameer Bongale  
Rahul Thatte,  
Shalaka Sawant,  
Brijen Sawant  
Kabori Patil  
Aarti Khot  
Milind Patil  
Pallavi Betsur  
Mandar Pandit  
Soumil Pandit  
Sonali Deshpande  
Ashwini Mhaske  
Namrata Bhuleskar

Ruchira Karandikar
Suchita Labade
Minal Aroskar
Jayashree Yadav

Thanks, each one of you for taking forward every smallest step to make this दिवाळसण as another precious collection in our memory.

With this, I, Manisha Pandit want to also ask for forgiveness in case anyone got hurt by me, unintentionally.

As Ulka says, “चूक भुल द्यावी घ्यावी” same I echo - माझ्याकडून बोलण्यात, कामात काही चुक झाली असेल तर मोठ्या मनानी मला माफ करा.


And thanks to each one of the Chicago MMC members for encouraging and giving me opportunity to lead. I will never forget these beautiful moments spent in MMC.

2025 ची टीम सज्ज आहेच पुढील सूत्र हाती घ्यायला आणि मदतीचा हात कायम पुढे असेलच.

**मनिषा पंडित गजेंद्रगडकर**



## शब्दकोडे




**उभे शब्द्**


1. भ्रमर, भुंगा
2. अपमानकारक, काळिमा लावणारा
3. आवेगाने, जोराने आश्रू ढाळत
4. आमंत्रण, बोलावणे
5. दारात
6. दादाची बायको
10. मूठ भरून
11. सुकुमार, देखणा
12. अगतिकता, स्वाभिमान शून्यता
13. उद्याच्या नंतरचा दिवस
14. तुकडा
17. गर्दी करून
19. भार ठरवण्याचे साधन

20. उत्तर भारतातील पवित्र नदी
21. समशेर, मोठी कट्यार, खड्ग
22. कापडी आवरण, बुरखा
24. एक लवचिक पदार्थ, पुसून टाकण्याचे साधन

आडवे शब्द

1. माळा, माडी
3. लाकडाचा पातळ तुकडा
5. दहशत, दरारा, दडपण
7. वेतनवाढ
8. शरीरात रक्त पसरवणारी नाडी
9. मळ धुण्याचे रासायनिक साधन

11. ___ दहा तोंडे होती
13. जनतेने एकत्र येवून सुरु केलेले सावकारी दुकान
15. घोड्याला चाल शिकवणारा
16. पैशाच्या देवघेवीचा धंदा
18. वार्याचा भोवरा, तुफान
20. हिंदुस्तान
22. अनुमती, मान्यता
23. छोटे व मोठे, सर्व वयाचे
25. अलंकार, आभूषण
26. चंचल, उथळ
27. रबिन्द्रनाथ ___, बंगाली साहित्यिक



**संकलन-अभिजित रायरीकर**



# टोमॅटोची चटणी

दिवाळी साजरी करताना पंचपक्वान्नांनी भरलेल्या ताटात एक आंबट-गोड चटणी जर असेल तर त्या ताटाच्या चवीची लज्जत अजूनच वाढते.

म्हणूनच आज रत्नांगीच्या रसोईमधून तुमच्या भेटीसाठी आणली आहे एक मस्त पाककृती; ती म्हणजे लाल टोमॅटोची चटणी! ही पाककृती सांगितली आहे माझी हसरी मैत्रीण अवनी देशपांडे हिने!



साहित्य -

४-५ बेडगी मिरच्या, ६ मध्यम टोमॅटो, १ हिरवी मिरची, ३ लसूण पाकळ्या, चवीप्रमाणे मीठ, साखर, २ टेबलस्पून तेल.

कृती -

१. भांड्यात तेल गरम झाल्यावर, सर्व साहित्य घालून शिजवून घ्यावं.
२. थंड झाल्यावर मिक्सरमधून एकत्र करून घ्यावं.

मस्त आंबट-गोड चटणी तय्यार! ही तुम्ही पॅटीस, डोसा, जेवणाबरोबर खाऊ शकता.

नोट -

मला कढीपत्ता आवडतो, आणि घरचा आहे, म्हणून मी वरून मोहरी आणि कढीपत्त्याची फोडणी दिली.

धन्यवाद!

**रत्नांगी निलेश मालपेकर**



# खमंग रुचकर झटपट मिरची

साहित्य :

६ ते ७ जाड हिरव्या मिरच्या, ४ टेबल स्पून बेसन, ४ टेबल स्पून तेल, १ टेबल स्पून मोहरी, १ टेबल स्पून खसखस, १ टेबल स्पून ओवा, १/२ चमचा हळद, ३ टेबल स्पून धने पावडर, ३ टेबल स्पून सुके खोबरे किस, चवीप्रमाणे मीठ, १ टेबल स्पून दाण्याचा कूट, थोडा हिंग, थोडी चिरलेली कोथिंबीर, १ टेबल स्पून आमचूर पावडर किंवा थोडा लिंबाचा रस.



कृती :

मिरच्या स्वच्छ धुवून पुसून घ्याव्यात. मिरचीचे देठ काढायचे नाहीत. नंतर बेसन पॅन मध्ये मंद आचेवर ५ मिनिटे भाजून घ्यावे. ते एका बाऊल मध्ये काढून थंड करायला ठेवावे.

नंतर तेल पॅन मध्ये घालून त्यात मोहरी, खसखस, ओवा, हिंग, हळद, सुके खोबरे किस घालून ते सगळे ५ मिनिटे परतावे. नंतर त्यात धने पावडर, तिखट दाणे कूट आणि भाजलेले बेसन, चवीनुसार मीठ घालून थोडे खमंग होईपर्यंत परतावे. नंतर चिरलेली कोथिंबीर आणि आमचूर पावडर किंवा लिंबाचा रस टाकावा आणि थंड करायला ठेवावा.

मिरच्यांना मधोमध काप देऊन थोडे मीठ लावून घ्यावे आणि मग तयार केलेले सारण मिरची मध्ये भरावे. परत २ चमचे तेल पॅन मध्ये गरम करून त्या मध्ये मिरच्या घालून झाकण ठेऊन मंद आचेवर ५ मिनिटे वाफवून घ्यावे. मध्ये एकदा झाकण काढून थोड्या परतवावे. चांगली वाफ आली की गॅस बंद करावा.

जेवणात तोंडी लावायला ह्या खमंग रुचकर मिरच्या वाढाव्यात. एकदा नक्की करून बघा, नक्कीच तुम्हाला आवडतील.

**मिनाक्षी हेडाऊ**



# दही पालक

## साहित्य-

पालक - १ कप

मिरची - १

लसूण- १-२ पाकळ्या

दही- 3

चवीनुसार मीठ

## कृती-

पालक निवडून घेऊन स्वच्छ धुऊन घ्यावा. साधारण एक मोठा कप एवढी पालकाची हिरवी पाने घेऊन ती बारीक चिरून घ्यावी. एका वाडग्यात म्हणजे बोलमध्ये ती चिरलेली पाने ठेवावीत त्यात बारीक चिरून एक  मिरची व एक लसणीची पाकळी घालावी. त्यात ताजे लावलेले दही साधारण भाजीचे चार चमचे घालावे हलक्या हाताने चांगले मिसळून घ्यावे. त्यात वेळेवर चवीनुसार साखर व मीठ घालावे. जेवणासाठी दही पालक तयार आहे.


**अलका धाराशिवकर**





# शब्दकोडे – उत्तर

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 म | ज | 2 ला | | 3 ढ | ल | 4 पा | | 5 द | बा | 6 व |
| धु | | जि | | सा | | चा | | र | | हि |
| 7 प | गा | र | वा | ढ | | 8 र | क्त | वा | हि | नी |
| | | वा | | 9 सा | 10 ब | ण | | जा | | |
| 11 रा | व | णा | 12 ला | | च | | 13 प | त | पे | 14 ढी |
| ज | | | 15 चा | बू | क | स्वा | र | | | व |
| 16 स | र | 17 दा | री | | भ | | 18 वा | 19 व | ट | ळ |
| | | टी | | 20 भा | र | 21 त | | ज | | |
| 22 प | र | वा | न | गी | | 23 ल | हा | न | थो | 24 र |
| ड | | टी | | र | | वा | | का | | ब |
| 25 दा | गि | ने | | 26 थि | ल्ल | र | | 27 टा | गो | र |

## परिपत्रके (Flyers)




महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२४
**अध्यात्मपीठ**
गुरुवार दिनांक १७ ऑक्टोबर २०२४
शिकागो वेळ: रात्री ८ ते ९:३०
भगवद्गीता १२ वा अध्याय पठण - अक्षदा सावंत
श्रीमद भगवदगीता १८ वा अध्याय निरूपण
वक्त्या
रजनीताई पटवारी
* शांतिमंत्र
आयोजन: माधव गोगवले, रेखा देवधर, शिल्पा देशपांडे, ऊर्मिला दामले, अनिरुद्ध दामले, हर्षा थत्ते, अश्विनी कुंटे, समीर बोंगाळे


2024 MMC Bhramangatha
Presents
What: Dubai
Who - Kavita Kulkarni
When: Tue 22-Oct at 8:00 pm Central
Where - Zoom link, password to be provided
Dubai Miracle Garden
DUBAI
UAE
Presented by
Nameetatai Vedak, Ulka Nagarkar, Kavita Kulkarni
Sameer Bongale , Vaishali Belsare


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२४
साहित्यकट्टा आणि अध्यात्मपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने
सादर करत आहे
बालदिन स्पेशल
"यशवंत चित्रपटाच्या बाल कलाकारांसोबत गप्पागोष्टी "
मंगळवार १५ आक्टोबर २०२४, सं. ८.०० वाजता (शिकागो वेळेनुसार)
बुधवार १६ आक्टोबर २०२४, स. ६.३० वाजता (भारतीय वेळेनुसार)
आयोजक - साहित्यकट्टा आणि अध्यात्मपीठ चमू २०२४


महाराष्ट्र मंडळ शिकागो
|| इतिहास मंच ||
प्रस्तुत करत आहे
Itihas Manch Session # 129
विषय: सनातन धर्म
व्याख्याते: श्री. श्रीधर दामले
दिनांक व वेळ: शुक्रवार, २५ ऑक्टोबर २०२४, रात्री: ८:०० - ९:३० CT
आयोजन: चेतन रेगे, माधव गोगावले, विशाल नवलकर, वैशाली बेलसरे,
वैष्णवी नवलकर, श्री रेगे, आणि समीर बोंगाळे
Join us live via MMC Zoom or Catch up via MMC YouTube - Itihas Manch Playlist


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२४
साहित्यकट्टा सहर्ष सादर करत आहे
बोलका कट्टा
शब्द सुरांची मैफल
( मराठी, हिंदी गाणी )
श्री अनिल ताटके
निवेदन -- सौ.अलका वठारकर
सौ.तृप्ती सरदेसाई
मंगळवार १२ नोव्हेंबर २०२४ सं. ८.०० वाजता.(शिकागो वेळेनुसार)
बुधवार १३ नोव्हेंबर २०२४ स. ७.३० वा.(भारतीय वेळेनुसार) वाजता
आयोजक - माधव गोगावले, उल्का नगरकर ,अश्विनी कुंटे, श्रध्दा भट, मंजुषा पांडे, समीर बोंगाळे.


धन्यवाद